मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
( ठाणे जिल्हा वाचनालय ) वाचनालय / संदर्भ / नौपाडा
६१ सन १८९४
श्री.गौतमबुद्ध यांचे चरित्र

६१

चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय

लेखक

~~ज्ञानोदयेन्दु प्र.~~

सन १८९४

छापखाना: ज्ञानोदयेन्दु, अमरावती

## उपोद्घात.

"श्री जगद्गुरु गौतम बुद्ध यांचें चरित्र" हें पुस्तक "लाइट् ऑफ एशिया" या नांवाच्या इंग्रजी पुस्तकाच्या आधारावरून लिहिलेलें आहे. इंग्रजींतील मूळ ग्रंथ सर एडविन् आरनॉल्ड यांनीं लिहिला आहे. तो फारच उत्तम उतरला आहे असें मोठमोठ्या विद्वान लोकांचें मत आहे. युरोपांतील भाषांतून जे अनेक ग्रंथ बौध्य धर्माच्या संबंधानें प्रसिद्ध झालेले आहेत त्यांतील माहिती लाइट् ऑफ एशिया या नांवाच्या कवनांत उत्तम रीतीनें गोंविलेली आहे. बुद्धाचें चरित्र व त्याच्या धर्माच्या मुख्य मुख्य गोष्टी या कवनांत सांगितल्या आहेत. सर एडविन आरनॉल्ड यांस संस्कृत भाषेचें उत्तम ज्ञान असून त्यांनीं संस्कृत ग्रंथांचाहि गौतम बुद्धाचे चरित्राच्या संबंधानें उपयोग केला आहे.

बौध्य धर्माची हकीकत अशी आहे कीं, इसवी सन सुरू होण्यापूर्वीं सुमारें सहाव्या शतकांत हिमालय पर्वत व गंगा नदी यांच्या दरम्यान जो प्रदेश आहे त्या प्रदेशांतील कपिलवस्तु राजधानींत शुद्धोदन राजा व त्याची बायको मायाराणी, या दोघांस एक पुत्र झाला. त्याचीं नांवें अनेक आहेत; परंतु गौतम बुद्ध हें त्याचें नांव सुप्रसिद्ध आहे. गौतम बुद्धास विराग कसा उत्पन्न झाला, व संसाराचा त्याग त्यानें कसा केला, पुढें तपश्चर्या करून ज्ञानाची प्राप्ति करून घेऊन आपल्या धर्माची स्थापना कशी केली याविषयींची हकीकत पुढें चरित्रांत दिलेलीच आहे. गौतम बुद्धाचा जन्म व त्याचें मरण या दोन गोष्टी भरत वर्षांतील पुरातन काळच्या इतिहासांत अतिशय विश्वसनीय अशीं दोन स्थळें आहेत. त्याचा जन्म इ० सनापूर्वी १२२ या वर्षी झाला व त्याचा मृत्यु इसवी सनापूर्वी ५४३ या वर्षी घडून आला. मरणसमयीं बुद्धाचें वय सुमारें ऐंशीं वर्षांचें होतें.

बौध्य धर्माचें अनुकरण करणारे लोक सुमारें ५० कोटी आहेत ह्मणजे या पृथ्वीतलावर जी लोकसंख्या आहे त्यांपैकीं निमे मानव प्राणी या धर्माचे अनुयायी आहेत. या धर्मास राजाश्रय मिळाल्यापासून त्याचा प्रसार विशेष होत गेला. अशोक राजा हा इसवी सनापूर्वी २५० या वर्षी उदयास आला. त्यानें या धर्माचा अवलंब केला. त्याचा मुलगा महिन्द श्रामण होऊन लंकेकडे गेला व तेथें त्यानें या धर्माचा प्रसार केला. तेथें जे जे धर्मग्रंथ लिहिले ते सर्व पाली भाषेत लिहिले गेले. नंतर याचा प्रसार पंजाब, तिबेट, चीन, जपान व मोंगोलिया इत्यादि देशांतून झाला. तो संस्कृत भाषेत जे बौध्य धर्माचे ग्रंथ होते त्यांच्याच आधारें झाला. लंकेकडील बौध्य धर्माच्या मतास हीनयान अशी संज्ञा आहे. तिबेट, चीन वगैरे उत्तरेकडील प्रांतांतून जें मत सुरू आहे त्यास महायान असें ह्मणतात; ह्मणजे पाली भाषेत असलेले ग्रंथ व त्या ग्रंथांच्या द्वारें ब्रह्मदेशादि देशांतून जो धर्माचा प्रसार झाला तो एक संप्रदाय आहे असें समजतात, व संस्कृत ग्रंथ व त्या ग्रंथांवरून

तिबेटादि देशांतून जो धर्माचा प्रसार झाला तो दुसरा संप्रदाय आहे असें समजतात. लंकेकडील जो संप्रदाय तो पुरातन काळच्या बौध्य मतास अनुसरून आहे व तिबेटादि देशांतील संप्रदाय हा पुरातन काळीं असलेल्या मताहून फारच भिन्न आहे असें विद्वान लोकांचें मत आहे.

पाली भाषेंत "त्रिपिटीका" या नांवाचा एक ग्रंथसमूह आहे. "त्रिपिटीका" ह्मणजे तीन करंडक. पहिल्या करंडकाचें नांव सूत. दुसऱ्या करंडकाचें नांव विनय. तिसऱ्या करंडकाचें नांव अभिधर्म. सूत या नांवाच्या ग्रंथसमूहांत श्रामण जनांस व गृहस्थाश्रमांत राहणाऱ्या लोकांस उपयोगी पडणारा असा बुद्धानें केलेला उपदेश आहे. विनय या नांवाच्या ग्रंथांतून संघाचे नियम व श्रामण जनांनीं पाळावयाचे नियमविधि सांगितलेले आहेत. अभिधर्म या नांवाच्या ग्रंथसमूहांत बौध्य धर्माचें तत्वविवेचन केलेलें आहे. या ग्रंथांची विल्हेवारी व व्यवस्था इसवी सनापूर्वी ५४३ वे वर्षी झाली असें विद्वान लोकांचें मत आहे. त्याच वेळीं हे ग्रंथ लिहिले गेले असतील असें नाहीं; तर त्या वेळीं बुद्धाच्या उपदेशाची विल्हेवारी लागली गेली व तेंव्हांपासून त्या उपदेशांचें वेदाप्रमाणें पठण होत असतें.

ललितविस्तार हा संस्कृत भाषेंतील ग्रंथ आहे. युरोपच्या पंडितांनीं या दोन्ही संप्रदायांच्या बऱ्याचशा ग्रंथांचें परिशीलन केलें आहे; व त्यांपैकीं बरेच ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध करून त्यांचीं इंग्रजी, फ्रेंच इत्यादि भाषांतून भाषांतरें प्रसिद्ध केलीं आहेत.

उपदेशांची विल्हेवारी झाली ह्मणून जें वरतीं लिहिलें आहे तें काम बौध्य धर्माच्या पहिल्या महा मंडळांत अथवा संगितींत झालें. ही संगिती इ० स० पूर्वी ५४३ वे वर्षी भरली होती. दुसरी संगिती इ० स० पूर्वी ४३० या वर्षी भरली होती व तिसरी संगिती इ० स० पूर्वी २५० या वर्षी राजा अशोक यानें भरविली. दोन्ही संगितींत धर्माच्या आचारांत व विचारांत जे दोष शिरले होते ते दूर करण्यांत आले. चवथी संगिती राजा कनिष्क यानें इ० स० ४० या वर्षी भरविली होती, या वेळींहि ग्रंथांची विल्हेवारी पुनः एकदां लाविली गेली व हीनयान व महायान हीं दोन नांवें अनुक्रमें दक्षिणेकडील व उत्तरेकडील संप्रदायांस देण्यांत आलीं असें ह्मणतात.

इ० स० ३९९ या वर्षी फहियन या नांवाचा चीन देशांतील बौध्य धर्मानुयायी पंडित या देशांत आला व गंगेकडील मुलखांत त्यानें १४ वर्षें प्रवास केला व पुढें तो इ० स० ४१३ वे वर्षी आपले देशास परत गेला. त्या वेळीं बौध्य धर्मानुयायी लोक व श्रामण व त्यांच्या वस्तीसाठीं केलेलीं विहारें त्याला ठिकठिकाणीं आढळलीं. पुढें इ० स० ६२९ या वर्षी ह्यूनस्यांग या नांवाचा दुसरा चीन देशांतील पंडित या देशास आला. हाहि बौध्यधर्माभिमानीच होता. तो सर्व हिंदुस्थानदेशभर फिरला. व पुढें इ० स० ६४५ या वर्षी चीन देशास परत गेला. बौध्यधर्मी लोक ठिकठिकाणीं याच्या पाहण्यांत आले, तसेंच ब्राह्मण धर्माचेंहि प्राबल्य त्याला ठिकठिकाणीं आढळून आलें. इ० सनाच्या

शतकाच्या शतकापासून या देशांत बौध्य धर्मास उतरती कळा लागली, आणि सांप्रत तर या देशांत त्याचा अगदींच लोप झाला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

गौतम बुद्धाच्या उपदेशाच्या संबंधानें बराच भाग मुख्य चरित्रांत आलेला आहे. अगदीं साध्या गोष्टींवरून तो लोकांस उपदेश करी. अशा प्रकारचे दोन उपदेश मी येथें सांगतों. हे मुख्य चरित्रांतच यावयाचे असत. पण कांहीं कारणामुळें आले नाहींत.

## मोहरीच्या दाण्याचा दाखला.

किसा गोतमी या नांवाची एक रूपवती तरुण स्त्री होती. तिचा विवाह एका श्रीमान सावकाराच्या एकुलत्या एका पुत्राबरोबर झाला होता. परस्परांवर या वधुवरांचें प्रेम फार असे. त्यांस एक फार सुंदर असा मुलगा झाला. हा हिंडूं फिरूं लागतो इतक्यांत सर्पदंशानें मरण पावला. किसा गोतमी उराशीं मुलाचें प्रेत घेऊन माझ्या लेकराला औषधोपचार करून बरें करा असें ह्मणत रडत रडत घरोघर फिरत होती. इतक्यांत एका श्रमणाची व तिची गांठ पडली; व त्यानें तिला सांगितलें 'बाई, तो माझा गुरू आहे. त्याच्याकडे जा. तो तुझ्या बालकाला कांहीं औषध देऊन बरें करील. माझ्याजवळ द्यावयास कांहीं औषध नाहीं," ती गौतमाकडे आली व साष्टांग दण्डवत घालून ह्मणाली ' गुरु महाराज, या माझ्या लेकराला चालतें बोलतें करितां येईल असें औषध तुमच्याजवळ आहे काय हो!' 'बाई, मला थोड्याबहुत औषधांची माहिती आहे' असें गुरु बोलला. 'कोणती वल्ली व कोणत्या औषधीचा पाला, मी तुह्मास आणून देऊं तें मला सांगा ह्मणजे ती वल्ली व त्या औषधीचा पाला मी तुह्माला आणून देतें. मग तुह्मी त्याचें रसायन करून माझ्या लेकरास द्या ह्मणजे माझें लेकरूं बोलतें चालतें होईल.' 'मला तोळाभर मोहऱ्या आणून देशील का बाई?' ती दुःखित माय ह्मणाली 'हो गुरु. मी मोठ्या आनंदानें तुला तोळाभर मोहऱ्या आणून देतें बरें.' 'परंतु बाई ज्या घरीं आजपर्यंत आईबाप, नवरा, बायको, पोर, अथवा नोकरमाणसें मरण पावलीं नसतील तशा घरांतून मोहऱ्या घेऊन ये ह्मणजे झालें.' 'बरें आहे, तर मग तशाच मोहऱ्या मी तुला आणून देतें,' असें ह्मणून ती तरुण बाई घरोघर गेली, आणि मोहऱ्या मागूं लागली. सर्व लोक मोहऱ्या देण्यास तयार झाले. परंतु ही तरुण स्त्री ह्मणूं लागली ' तुमच्या घरांत आजपर्यंत कोणी मेलें आहे काय? जर कोणी मेलें असलें तर मात्र तुमच्या घरांतील मोहऱ्या कामास येणार नाहींत.' लोक ह्मणूं लागले 'बाई, तूं असें काय बोलतेस? जित्या माणसांची संख्या थोडी. मेलेल्यांची बहुत.' नंतर ती बाई पुष्कळ घरें फिरली परंतु कोणी ह्मणत आमच्या घरचा मुलगा वारला, कोणी ह्मणाले आमचा बाप वारला, कित्येक ह्मणाले आमची आई वारली. कोणी ह्मणाला माझा भाऊ वारला. कोणी ह्मणाला माझी बहीण वारली. याप्रमाणें ज्या घरीं कोणी तरी माणूस मेला नाहीं असें घर एकहि त्या बाईस सांपडलें नाहीं. असें जेव्हां झालें तेव्हां ती बाई शुद्धीवर आली आणि

आपल्या मुलाचें प्रेत तिनें जंगलांत ठेवून दिलें आणि तशीच गुरूकडे आली, आणि गुरूला नमस्कार घालून ती त्याच्यापुढें हात जोडून उभी राहिली. गुरु तिला ह्मणाला 'बाई, मोहऱ्या आणल्यास काय?' ती ह्मणाली 'महाराज, नाहीं. लोक मला सांगतात कीं मेलेल्यांची संख्या बहुत आहे. जितीं माणसें थोडीं आहेत.' मग गुरूनें तिला बोध केला कीं, ह्या जगतांतील सर्व वस्तु अशाश्वत आहेत, ह्यावर चित्त ठेवून उपयोग नाहीं. हा बोध श्रवण करून तिच्या मनाचे सर्व संशय दूर झाले आणि तिनें प्रभूच्या मार्गाचा अवलंब केला.

## पेरणाऱ्याचा दाखला.

भारद्वाज या नांवचा कोणी ब्राह्मण शेतीचा धंदा करून आपली उपजीविका करून रहात होता. हंगामाच्या वेळीं खळ्यावर धान्य तयार करून गाड्यांतून घालून त्यानें घरीं आणलें. चार शेजाऱ्यापाजाऱ्यांस बोलावून त्यांस त्यानें मेजवानी दिली. गुरु आपला भिक्षेचा कमण्डलु हातीं घेऊन तेथें येऊन उभा राहिला. जमलेल्या मंडळीपैकीं कांहीं लोकांनीं त्याला ओळखिलें व कांहींकांच्या तो माहितीचाच नव्हता. ज्या लोकांनीं त्याला ओळखिलें त्यांनीं त्यास सत्कारपूर्वक अभिवंदन केलें. भारद्वाज ब्राह्मणाला राग येऊन तो ह्मणाला कीं, "श्रामण, मी नांगरवखर करून धान्य पेरितों, व मेहनत करून आपली उपजीविका करितों. तुह्मीहि याप्रमाणें माझ्यासारखी मेहनत केली तर तुह्मालाहि खावयास विपुल मिळेल." गुरु उत्तर देतात 'अरे ब्राह्मणा, मी शेतकरीच आहें. मीहि वखरनांगर करून धान्य पेरितों, आणि आपलें पोट भरितों.' ब्राह्मण ह्मणाला कीं 'तुह्मी ह्मणतां कीं मी शेतकरी आहें. परंतु शेतकऱ्याचीं साधनें तुह्मांजवळ दिसत नाहींत. तुमच्याजवळ बैल कोठें आहेत, बीं कोठें आहे व नांगर कोठें आहे?' गुरू उत्तर करितो 'भक्ति या नांवाचें बीज मी पेरितों. सत्कृत्याचा पाऊस त्याजवर पडला ह्मणजे हें बीं जमिनींत रुजतें. त्याला कोंब फटून तें वाढीस लागतें. ज्ञान व मर्यादा हे माझ्या नांगराचे भाग आहेत. माझें मन ही बैलाच्या वेसणीची दोरी आहे. धर्म हें नांगराचें रुमणें, आस्था ही माझी पराणी, तत्परता हा ओढणारा बैल, याप्रमाणें मी जमीन नांगरतों, वखरतों, व त्यांत वाढलेलें जंगल काढून टाकितों, अमृतमय निर्वाणाची प्राप्ति हा माझ्या धंद्याचा हंगाम आणि अशा या माझ्या नांगरण्यानें येथील सर्व दुःखाची परिसमाप्ति होते."

ही गौतम बुद्धाच्या उपदेशाची पद्धत वर्णनीय आहे. बौध्य धर्माचें सार हें कीं या जगांत फारच दुःख आहे व त्यापासून सुटका करून घ्यावी. सुटका करून घेण्याचा मार्ग नव्हता तो मार्ग बुद्धानें शोधून काढिला असें त्याचें ह्मणणें आहे. जगांत दुःखच आहे व सुखाचा कांहीं अंश नाही ही गोष्ट कितपत खरी आहे याचा विचार आपल्या अनुभवावरून वाचकांनींच करावा. या स्थळीं यासंबंधीं विशेष विचार करण्याची अवश्यकता नाहीं.

—— * ——

स. च. ३०३

॥ श्री ॥

# श्रीजगद्गुरु गौतम बुद्ध यांचें चरित्र.

## श्रीजगद्गुरु गौतम बुद्ध यांचें चरित्र.

जो सर्व जगाचा तारणारा, ज्यास इहलोकीं राजा सिद्ध असें ह्मणतात, व जो पृथ्वी, आकाश, व पाताळ या त्रैलोक्यांत अनुपमेय, व जो सर्वमान्य, बहुज्ञानी, व बहुउत्तम, व अति दयाशील, व जो निर्वाणातें नेणारा, व धर्मातें कथन करणारा, असा जो प्रभु बुद्ध त्याच्या मानव कुळांतील जन्माचा वृत्तांत येणेंप्रमाणें आहे.

श्रेष्ठ मानिलेल्या स्वर्गाखालीं चार दिक्पाल राहतात, तेच इहलोकींचे अधिपति आहेत. ज्या स्थळीं हे अधिपति राहतात, त्या स्थलाचे खालचे बाजूस उंच असे कटिबंध आहेत. या स्थळीं परलोकवासी झालेले असे साधुजन तीस हजार वर्षेंपर्यंत वास करून नंतर पुनरपि देह धारण करितात. याच स्थळीं प्रभु बुद्ध वास करीत असतां देह धारण करण्याची पांच निश्चयात्मक चिन्हें त्याजवर दिसूं लागलीं. हीं चिन्हें देवांनीं जाणिलीं व ते ह्मणाले, बुद्ध जगास साहाय्य करण्याकरितां पुनर्जन्म धारण करील. प्रभु बुद्धहि बोलला कीं अनेक जन्म मी आजपर्यंत धारण केले. तर आतां हा माझा शेवटला जन्म मी धारण करून जगास साहाय्य करावयास जातों. आतां माझें जनन मरण चुकलें. आणि जे माझा धर्म ग्रहण करतील त्यांस जन्ममरणापासून मुक्ति मिळेल. हिमालय गिरीच्या दक्षिण बाजूस जेथील लोक बहु पवित्र आहेत व राजा न्यायशील आहे अशा स्थळीं शाक्यकुळीं मी खालीं जाऊन जन्म घेतों. ही गोष्ट आह्मां मानवांच्या उद्धारासाठीं घडली. त्याच रात्रीं शुद्धोदन राजाची पत्नी माया राणी हिला ती पतीसह निद्रिस्त असतां एक चमत्कारिक स्वप्न पडलें. नभोमंडळांतून एक बहुकांतिमान तारा निघाला. त्याची प्रभा सूर्य किरणासारखी असून रंग गुलाबी रंगाच्या मौक्तिकासारखा होता. तो तारा बालकाच्या दुधापेक्षां शुभ्र असून सहा दांत आहेत अशा हत्तीच्या लक्षणांनीं चिन्हित होता. हा तारा तिच्या देहांत शिरला व

नंतर त्यानें तिच्या उजव्या बाजूच्या गर्भाशयांत प्रवेश केला. इतका तिला भास झाला नाहीं तोंच ती जागृत झाली. अन्य मातांच्या नशिबीं नाहीं असा तिला या स्वप्नावरून अत्यानंद झाला. आणि प्रातःकाल होण्यापूर्वीं सुखदायक असा प्रकाश अर्ध्या पृथ्वीवरून गेलेला तिनें पाहिला. त्या काळीं मजबूत अशा टेंकड्या हालल्या. पाण्याच्या लहरी स्तब्ध व शांत झाल्या. दिवसा फुलणारीं कुसुमें जशीं ऐन दोन प्रहरीं फुलावीं तशीं तीं प्रातःकालींच विकसित झालीं होतीं. जसा उष्णकाळचा सूर्य भयाण अशा अरण्यासहि शोभायमान करितो, त्याप्रमाणेंच मायाराणीच्या आनंदानें अगदीं खोल पाताळलोकासुद्धां सर्व जन आनंद पावते झाले. त्याच वेळीं अशी एक आकाशवाणी झाली कीं, अहो पुनर्जन्म धारण करणाऱ्या मृतजनांनो, उठा, आणि श्रवण करा. आणि जन्ममरणाच्या फेऱ्यांतून, मुक्ति मिळविण्याची उमेद धरा. बुद्धाचें आगमन झालें तत्क्षणीं अनेक नरकलोकांतून शांतता झाली. मृत्युलोकांत आनंदाचे फुंदके निघूं लागले. वायु हा केवळ अपरिचित आनंदानें समुद्रावरून व जमिनीवरून वाहूं लागला. जेव्हां दुसरा प्रातरुदय झाला, व ही कथा वृद्ध अशा स्वप्नार्थ सांगणाऱ्यांस श्रुत झाली, तेव्हां त्यांनीं येऊन सांगितलें कीं, कर्क राशि व सूर्य यांचा संयोग आहे, वेळ बहुत उत्तम आहे. मायाराणीस पुत्रसंतान होईल, व तो पुत्र झाला तर पवित्र, बहुज्ञानी, देहधारी यांचें कल्याण करणारा, व जनाच्या अज्ञानाचा निरास करणारा असा होईल; अथवा राज्याधिकार करणेंच जर त्यानें पत्करिलें, तर सर्व जगाचें राज्यसूत्र धारण करील. या प्रकारचा मायाराणीस पुत्र होईल, असे आम्हास स्वप्नावरून दिसतें. मायाराणीस पुत्र होण्याचे दिवस पूर्ण झाल्यावर, एके समयीं भर दोनप्रहरीं, ती राजमंदिराच्या कुसुमवनीं, महान्, बहुउच्च, पुष्पें ज्याचीं विकास पावलीं आहेत, व ज्याच्या मस्तकीं कान्तिमान् पर्णें आहेत, अशा पलाश वृक्षाच्या आश्रयानें उभी होती तेव्हां वृक्षानेंहि पुत्र प्रसवाची वेळ आहे असें जाणिलें. त्या सज्ञान वृक्षानें मायाराणीच्या सभोंवार आपल्या खांद्या खालीं लववून एक लतामंडप केला. पृथ्वीनें कुसुमांची लाखोली मायाराणीस शय्या करण्यासाठीं उत्पन्न केली. तसेंच स्नानास पाणी मिळावें ह्मणून, जवळच एक बाण होता त्यांतून शुद्ध स्फटिकासारखा असा निर्झर वाहूं लागला. प्रसववेदना न होतां तीस पुत्र झाला. ह्या सर्वावयवपूर्ण व अंगवैकल्यरहित पुत्राच्या देहावर उत्तम जन्माचीं बत्तीस लक्षणें होतीं. इकडे हें वर्तमान राजवाड्यांत येऊन पोहोंचलें. राजपुत्रास ज्या रंगीत पालखींतून आणिलें त्या पालखीचे दांडे धरणारे भोई सुमेरुपर्वतावरून आलेले चतुर्दिक्पाल होते. ज्याचें सैन्य रौप्य वस्त्र व मुक्ताजडित शस्त्रें धारण करितें, असा प्राचीदिक्पाल, नीलाश्व ज्याचें वाहन, व रत्नजडित ज्याचें शिरस्त्राण व कुभांडस नां-

वाचे ज्याचे सारथि असा जो दक्षिणदिक्पाल, रक्तवर्णअश्व ज्यांचें वाहन, व शुक्तिबद्ध ज्यांचें शिरस्त्राण, अशा नागलोकांसहवर्तमान आलेला जो प्रतीचदिक्पाल, पीतवर्णअश्व ज्यांचें वाहन, व सुवर्णमय ज्यांचें शिरस्त्राण अशा यक्षकिन्नरांसहित आलेला जो उदीच्यदिक्पाल, असे हे चतुर्दिक्पाल त्याची पालखी राजमंदिरीं आणिते झाले. त्यांचा सर्व थाटमाट गुप्त होता. बाह्यांतरी ह्या देवी वाहकांचा वर्ण आणि वेष, साधारण भोया सारिखा होता. ते दिनीं देव व देवदूत मानवांसह वर्तत होते. ही गोष्ट मानवांस समजली नाहीं. प्रभु बुद्धाचा इहलोकीं पुनरपि अवतार होणार, व जगदोद्धार होणार ह्मणून स्वर्गी मोठा त्याकाळीं आनंदोत्सव होत होता. हा सर्व प्रकार राजा शुद्धोदनास समजला नाहीं. त्यास जीं स्वप्नें पडलीं त्यांनीं त्याचें अंतःकरण अगदीं अस्वस्थ झालें. स्वप्नार्थ विदित करणाऱ्यांनीं, राजाकडे येऊन राजपुत्राची सर्व लक्षणसंपन्नता जेव्हां राजास विदित केली, ते काळीं राजाचें मन संतुष्ट झालें. ते राजास येणेंप्रमाणें बोलते झाले; राजा, सहस्त्र वर्षांच्या अवधीनें एक चक्रवर्ती राजा होतो, तसाच तुझा पुत्र आहे. त्याला ईश्वरी सप्त देणग्या आहेत; विष्णूचें चक्र, कौस्तुभमणि, मेघावरून चालणारा वाजी, हिमासारिखा शुभ्र असा हस्ती, बहु धूर्त असा सचिव, अजिंक्य असा सेनाधिपति, सौंदर्यपूर्ण असें स्त्रीरत्न. ह्या गोष्टी राजानें श्रवण करून, त्यानें अशी आज्ञा फरमाविली कीं आज नगरांत नागरिक जनांनीं मोठा आनंदोत्सव करावा. या आज्ञेनुसार मार्ग धुववून त्याजवर गुलाब पाण्याचे सिंचन करविलें, वृक्षांस पताका आणि कंदील टांगिले, नानाप्रकारचे खेळ करणारे गारुडी व कोल्हाटिणी, तसेंच दांडपट्टा खेळणाऱ्यांचें हस्तचापल्यानें लिंबें कापणें; तसेंच सर्पास अभिमंत्रित करून त्यांचे तमाशे, दोरखंडावरून वाघनखें लावून चालणाऱ्यांचे खेळ, हे चमत्कार पाहत पाहत आनंदी जन रस्तोरस्तीं आनंद करीत फिरत होते. कलावंतिणी पायांत घुंगरे घालून, नानालंकार लेवून, जनांस रंजवीत होत्या; बहुरूपी नाना जनावरांचीं सोंगें घेऊन रस्त्यांतून तमाशा करीत होते. व्याघ्रांचा तमाशा चालला होता. इकडे कुस्त्या, दांडपट्टा वगैरे खेलाडीलोक खेळ करीत फिरत होते. नानातऱ्हेचीं वाद्यें वाजविणारे लोक गांवांतून वाद्यांचा घोष करीत रस्तोरस्तीं फिरत होते. दूरदेशीय वणिक् राजास पुत्ररत्न झाल्याचें श्रवण करून, नानालंकार, व नानावस्त्रें, अशा मौल्यवान देणग्या घेऊन आले; कित्येक वणिक् जनानीं किनखापाचे मौल्यवान कापड आणिलें, कोणी शाली कोणी मौक्तिक, कोणी मलयगिरीचें चंदन, कोणी कांहीं, कोणी कांहीं, असे नाना पदार्थ घेऊन दूर देशांहून लोक आले आहेत. राजेलोक खंडण्या घेऊन, राजाचे भेटीस आले आहेत याप्रमाणें जिकडे तिकडे शहरांत लोकांची गर्दी होऊन गेली आहे. राजपुत्राचा नामकर्णोत्सव होऊन त्याचें नांव **सर्वार्थसिद्ध**, अथवा **सिद्धार्थ** असें ठेविलें. ह्या परकीय जनांमध्यें, असित

नामाभिधान धारण करणारा, वयानें अतिवृद्ध व जो अरण्यांत एकांतीं वास करीत असल्यामुळें ज्याच्या कर्णीं इहलौकिक शद्ब बहुत वर्षेंपर्यंत आला नव्हता असा सिद्ध पुरूष देवांचीं आनंदोत्सवाचीं बुद्धाच्या जन्माचीं गाणीं चाललीं होतीं तीं ऐकून, बुद्ध पुरुषाचा अवतार पाहण्याकरितां ह्मणून या भूलोकीं आला. तो तपोज्ञानवयोवृद्ध असा होता. त्या पूज्य साधूस, राजाराणी या उभयतां दंपत्यानें पाहूननमन केलें, व पुत्र त्याच्या पायीं अर्पण केला; हें पाहून तो साधु मायादेवीस ह्मणाला, देवी अशी गोष्ट कदापि होणार नाहीं. मीच या बालकास प्रणिपात केला पाहिजे. असें बोलून त्या साधूनें त्या पुत्रास साष्टांग नमस्कार अष्ट वेळां घातला. पवित्र बालका, मी तुला जाणिलें. तूं बुद्ध आहेस. तूं धर्म, ज्ञान यांचा उपदेश करून देहधारी जनांचा उद्धार करावयास या इहलोकीं आगमन केलें आहे. तुझा उपदेश श्रवण करण्याचें जरी ह्या माझ्या नशिबीं नाहीं, कारण मी लवकरच मृत होणार, तथापि मला तुझ्या चरणाचें दर्शन झालें, ह्यांतच मी संतुष्ट आहें. राजास उद्देशून तो साधु येणें प्रमाणें बोलिला.ः राजा श्रवण कर. असा मोहरा लक्षावधि वर्षें गत झाल्यावर उत्पन्न होतो. ः आणि एकदा अशी गुलाबाची कळी उमलली ह्मणजे जगांत चोहोंकडे ज्ञानाचा सुवास पसरतो, आणि ममतेचा मधबिंदु लोकांस चाखावयास मिळतो. तुझे पोटीं असें अरविंद यावें, हें तुझें भाग्यच होय. अहाहा! किती भाग्यशाली तुझें घराणें आहे! तथापि सर्वच प्रकारें तूं भाग्यवान नाहींस, कारण ह्या पुत्राच्या वियोगाची तुजवर कुऱ्हाड पडणार आहे आणि हे भगवति देवि, हें कमल तुझ्या उदरीं आलें ह्मणून, देव व मानव यांस तूं प्रिय झाली आहेस. तुला आजपासून परम पवित्रता प्राप्त झाली आहे. तुला दुःखाचा लवलेशही होणार नाहीं. इहलोकीची वस्ती दुःखमय एतदर्थ आजपासून तूं सर्व प्रकारच्या दुःखयातनेंतून मुक्त होशील. हें भविष्यकथन सातव्या दिवशीं घडून आलें. ते दिनीं माया राणी हास्यमुख होत्साती निद्रायमान झाली आणि पुनरपी जागृत न होतां, त्रयस्त्रिंशत स्वर्गधामीं तिचा प्राण निघून गेला. ते स्थलीं असंख्य देव तिची पूजा करीत आहेत. त्या बहुमान्य मातेची सेवा करण्यास तत्पर असे ते देवगण तिच्या सभोंवार उभे आहेत. बालकाचें पोषण करण्यास कोणी राजकन्या, महाप्रजापती हें नामाभिधान धारण करणारी राजानें आणविली, व ज्या पुत्राच्या ओष्ठद्वयानें, असंख्य जनांस सांत्वन प्राप्त झालें आहे, त्या ओष्ठद्वयास ती राजकन्या दुग्धपान करिती झाली. अशीं अष्टवर्षें गत झाल्यावर, राजपुत्रास जें जें शिक्षण योग्य, तें तें आपल्या पुत्रास द्यावें असा दूरदर्शी राजानें विचार केला. बुद्धास प्राप्त होणारें वैभव; तसेंच त्यास प्राप्त होणाऱ्या शारीरयातना, याविषयीं पूर्वीं राजास भविष्य श्रुत झालें होतें. ह्या प्राप्त होणाऱ्या शारीरयातना, व तदवलंबी प्राप्त होणारें जें वैभव ह्या दोन्ही गोष्टींचें निवारण करण्याविषयीं राजाचे प्रयत्न सतत चालले होते.

मोठी सचिवसभा निमंत्रित करून, माझ्या पुत्रास यथायोग्य शिक्षण देण्यास कोण पुरुष बहुज्ञानी आहे, हें मला विदित करावें, अशी राजानें सचिवमंडळास आज्ञा केली. प्रत्येक सचिवानें, महाराज विश्वामित्र योग्य पुरुष आहे, असें सांगितलें. विश्वामित्र हा बहुज्ञानी पुरुष असून धर्मशास्त्रविद्याकलापारंगत असा होता; विश्वामित्र योग्य गुरु आहे असें बहुमत पडल्यावर, राजानें त्यास निमंत्रण करून, माझ्या पुत्रास शिक्षण द्यावें अशी त्यास आज्ञा केली; आणि एका शुभ दिनीं, राजपुत्रानें आपला वृषभवर्ण चंदनाचा रत्नजडित लेखनपीठ होता, तो घेऊन त्यावर सुवर्ण धूलिका घालून, तशीच आपली लेखणी हातीं घेऊन, गुरुजवळ खालीं मान घालून नम्रपणें उभा राहिला. द्विजाती तांनीं श्रवण करूंनये ह्मणून विश्वामित्रानें गायत्री मंत्र मंदपणें ह्मटला. बाळा, हा मंत्र आपल्या पाटीवर लिही; आचार्य महाराज, लिहितों. असें नम्रपणें गुरुजीस राजपुत्रानें प्रत्युत्तर देऊन, आपल्या लेखनपीठावर तो मंत्र सर्व ज्ञात लिपींत त्यानें लिहिला. हा चमत्कार पाहून आचार्य बोलले. बाळा, लिहिणें पुरे आतां. आतां अंक लिहूं. मी एक, दोन, तीन, चारापासून दहापर्यंत आंकड्यांचा उच्चार करीन आणि पश्चात् एकं, दहं, शतं, सहस्रापासून तों लक्षापर्यंत उच्चारण केलें कीं, तूं ही माझ्यामागून तसेंच ह्मणत ये बरें. राजपुत्र आचार्यांचे मागून संख्या ह्मणूं लागला; आणि ती समाप्त झाल्यावर लक्षसंख्येपुढें त्याचें तसेंच ह्मणणें चाललें होतें. याप्रमाणें संख्यावाचन झाल्यानंतर, बिंदुसंख्या तो राजपुत्र ह्मणूं लागला. ही संख्या झाल्यावर तो सर्व प्रकारच्या संख्या एका मागून एक अशा ह्मणतच राहिला. हें अद्भुत आश्चर्य पाहून आचार्य विश्वामित्र साष्टांग दंडवत घालून आपल्या शिष्यास ह्मणतात, बा तूं आचार्यांचा आचार्य, गुरूचा गुरु, तूं माझा आचार्य, मी तुझा आचार्य नाहीं. बा राजपुत्रा, तूं पूज्य आहेस. मी तुला वंदन करितों. तूं आपलें पुस्तकविरहित ज्ञान जें आहे तें प्रदर्शनाकरितां शाळेंत येतोस, आणि गुरूची मर्यादा कशी ठेवावी, हें पण तूं जाणतोस. याप्रमाणें मर्यादशील प्रभु बुद्ध, सर्व आचार्यांसह वागे, पण आचार्यांहूनही तो ज्ञानातीत होता. तो वाचेचा मोठा मधूर असून शाहणा असे. ह्याच्या शरीराची कांति राजबिंड्यासारखी असून तो चालीनें मोठा सभ्य असे. जरी जातीचा शूर होता, तथापि कोमल अंतःकरणाचा, मर्यादेचा, व शिष्टाचारप्रवीण असे. भित्र्या हरिणाची आनंदास्तव मृगया करणाऱ्या तरुण लोकांत हा अप्रतिम धीट असा घोडेस्वार होता. राजमंदिराच्या सभोंवार असणाऱ्या वनांतून रथ चालविण्यांत प्रवीण असा कोणीच यासारखा सारथी नव्हता. ऐन मृगया होत असतां, आणि हरिण आतां हातीं लागणार, अशा समयीं हा राजपुत्र वारंवार स्तब्ध राहून हरिणास न धरितां, त्यास तसेंच जाऊं देई. अश्वां-

स धांवण्याचे श्रम न सोसून ते धांवा टाकीत अशा समयीं आपली अर्धी जिंकलेली मृगया तशीच सोडून देई अथवा कधीं कधीं दुःखो-द्गार मनांतून काढी. याप्रमाणें आमचा प्रभु, जसजसा वयोवृद्ध होत चालला तसत-शी त्याची भूतदया अधिकाधिक वाढूं लागली. वृक्षांची प्रथम पालवी जशी कोमल असते, परंतु तशा लहानशा अंकुरापासून महान वि-स्तीर्ण असा छायवान वृक्ष होतो त्याप्रमाणें आम चा प्रभु जसजसा वयानें मोठा होत चालला तस-तशी त्याची भूतदया अधिकाधिक वाढूं लागली. त्याला दुःखाचा लवलेशही विदित नव्हता. केवळ नांवांनीं मात्र अश्रु, शोक, व दुःख हे शब्द, कांहीं अपरिचित गोष्टींचीं नामाभि-धानें आहेत, एवढें मात्र प्रभूस अद्यापपा-वेतों ठाऊक होतें. उत्तर दिशेस हिमालय गिरिच्या गिरिकंदरीं वरटीं करून राहणारा असा राजहंस पक्षांचा समुदाय प्रेममोहित होत्साता प्रेम शब्दाचा रव रव करीत वसंत ऋतूंत एके दिवशीं, राजा उपवनांतून जात असतां, सिद्धार्थ राजपुत्राचा चुलतभाऊ रा-जपुत्र देवदत्त यानें आपले तीरानें नेम धरून नभोमंडलांत आपला विषकारक बाण सोडि-ला. तो बाण अग्रसरीं उड्डायमान होणारा असा राजहंस पक्षी यास मर्मी लागून तो चटकन भूमीवर पडला. त्याच्या शरीरांतून कुंकुमासारिखें रक्त वाहूं लागलें व तेणेंकरून पक्ष्याचें सर्व अंग आरक्त-वर्ण झालें. हें पाहून सिद्धार्थ राजपुत्रानें, पक्ष्यास मायेनें उचलून घेऊन आणि आपण

ज्याप्रमाणें प्रभु बुद्ध आसनारूढ पाह तद्वत आसनस्थ होऊन आपल्या मांडी त्या पक्ष्यास घेतलें. त्याच्या आंगावरून त्य आपला हात फिरविला. त्याचे पक्ष नीट के त्याचे काळजावर आपला कोमल हस्त ठे त्याची धडकी शांत केली. ज्याप्रमा महत शांततेनें केलीवृक्षाचीं पर्णें वाऱ्यानें मंदप हालत असतात, त्याप्रमाणें राजपुत्रानें आप बहु कोमल हस्त पक्ष्यास कुरवाळण्याकरि त्याचे आंगावरून मंदपणें फिरविले. डाव्य हातांत राजहंस धरून उजव्या हातानें, त्य ला जो दुष्ट शर लागला होता, तो त्या त्या पक्ष्याच्या आंगांतून काढून घेतला. आ व्रण झालेल्या ठिकाणीं राजपुत्रानें थंड अश वृक्षपर्णें व थंड व सुखदायक असा मधा ठेविला. ह्या प्रियकर पुत्राला अद्याप पावेतो दुःखाचा लवलेशही माहीत नव्हता. आणि ह्मणूनच त्या शराचें टोंक कसें लागतें हें पा हण्या करितां, त्यानें स्वतःस तें टोंचून पाहि आणि जेव्हां तें लागलें, तेव्हां राजपुत्र नेत्र अश्रुपूर्ण झाला व तसाच त्या बापड्या पक्ष्या चा समाचार घेण्याकरितां ह्मणून मागें परतला कांहीं काळ गत झाल्यावर एक मनुष्य सि द्धार्थ राजपुत्राकडे येऊन ह्मणाला, पुष्पवृक्षा च्या वेलीमध्यें, माझ्या राजपुत्रानें मृत केलेल असा राजहंस पडलेला आहे. तो हंस माझ स्वामी मागत आहे. देतोस काय ? सिद्धा राजपुत्र ह्मणाला, जर हंस मृत झाला असत तर तो त्याच्या नाश करणाऱ्याकडे पाठविण्यास हरकत नव्हती. परंतु हंस जीव धरून आहे. मा

प्रियकर भावानें हंसाची उड्डायमान होण्याची गति कुंठित केली आहे. तेव्हां तो मी मृत नाहीं. नंतर देवदत्त सिद्धार्थ राजपुत्राच्या समक्ष येऊन ह्मणाला, अरण्यवासी पक्षी मृत असो अथवा जिवंत असो, ज्यानें त्याला भूतळीं पाडिला, त्याचा तो आहे. तो मेघमंडलांत असतां त्याजवर कोणाची सत्ता न व्हती. भूमंडळीं पडल्यावर तो माझास झाला आहे; दे माझा मला पक्षी, सिद्धार्थी. मग आमच्या प्रभूनें राजहंसाचा कंठ आपल्या कोमल अशा कपोलद्वयास लावून तो मोठ्या गंभीरतेनें ह्मणाला, नाहीं सख्या, हंसपक्षी माझा आहे. लक्षावधि वस्तूंमध्यें, दयेच्या सत्तेनें व प्रेमाचे स्नेहत्वामुळें हा पक्षी माझा. कारण माझी अंतरसाक्ष अशी आहे कीं मानवास दया, धर्म, हीं शिकविणें, व वाचाविरहित प्राण्याचा पुरस्कर्ता होणें हेंच माझें कर्तव्य आहे. केवळ मानवाचेच दुःखाचा परिहार करणें नाहीं तर इहलोकीं जो दुःखसागर आहे त्याचें सर्वस्वी मला दूरीकरण करणें आहे. परंतु सख्या राजपुत्रा, तुला जर त्याचा वाद करणें आहे, तर हें प्रकरण आपण सूज्ञ जनांकडे नेऊं. आणि ते जें सांगतील तेंच शिरसावंद्य आपण मानूं. याप्रमाणें सचीव जनांचे दरबारीं त्या प्रकरणाची वाटाघाट सुरू झाली. कांहीं सचिवजन एक पक्षाचें प्रतिपादन करीत. आणि कांहीं अन्य पक्ष योग्य आहे, असा वाद करीत. याप्रमाणें दरबारांत वाद होत असतां, एक वृद्ध अपरिचित असा ब्राह्मण उभा राहून असें बोलूं लागला कीं, "जर जीवितास कांहीं मोल आहे, तर जीवन संरक्षकाची जीवन नाशकापेक्षां जीवन धारण करणाऱ्या वस्तूवरची सत्ता अधिक आहे नाशक नाश करितो; संरक्षक संरक्षण करितो" ह्मणून हा पक्षी सिद्धार्थास द्यावा. हा निश्चय सर्व प्रधानांस पसंत पडला. परंतु त्या ब्राह्मणास जेव्हां राजा पोषाख देण्यास ह्मणून आतां पाचारण करणार इतक्यांत तो ब्राह्मण गुप्त झाला. त्या समयीं कोणी एकानें, फणाधारी असा नाग हळूच सरपटत निघून जातांना पाहिला. इहलोकीं देव असेंच वारंवार आगमन करितात. भूतदयेच्या आचरणाचा प्रारंभ प्रभुबुद्धानें या प्रकारें केला. तथापि त्या राजपुत्रास त्या राजहंस पक्ष्याचे दुःखाव्यतिरिक्त दुःख मुळींच माहीत नव्हतें. हा राजहंस दुःखातीत होत्साता स्वजनाकडे चालता झाला. परंतु दुसरे दिवशीं राजा आपल्या पुत्रास ह्मणाला, बाळा, चल, वसंत ऋतूचें सौंदर्य पहा. पीक चांगलें यावें ह्मणून वसुंधरेची कृषिकर्मकार नानाप्रकारांनीं कशी समजावणी व लाड करीत आहेत ? मला चितेवर ठेवून जेव्हां अग्नि लावतील तेव्हां जें माझें राज्य तुझें होणार, व ज्यांत सर्व लोकांची मनीषा पूर्ण होऊन कोशभांडार भरत आहे असें हें माझें राज्य तूं पहा. ऋतुसौंदर्य मोठें रमणीय आहे. झाडांस नवी पालवी येत आहे. तसेंच जिकडे तिकडे वृक्षांस मोहोर फुटला आहे. चारा चोहोंकडे हिरवागार दिसत आहे आणि नां-

गर हांकण्याचा रवरव जिकडे तिकडे ऐकूं येत आहे. ही जी शोभा, ती किती रमणीय आहे हें तूं पहा. याप्रमाणें पुत्रास राजानें पाचारण केलें. नंतर दोघेही पितापुत्र उत्तम अश्वारूढ होत्साते फिरावयास गेले. मार्गांतून जिकडे तिकडे बागबगीचे, उपवनें, कुंपणाच्या रांगा दिसत होत्या. त्याचप्रमाणें चोहोंकडे तांबड्या चिकण मातीचीं शेतें, तसेंच वृषभ करकर शब्द होणाऱ्या अशा जुवाच्या ओझ्यानें त्रस्त झालेले, काळ्या चिकण मातीच्या शेतावर नांगर चालला असतां मातीचीं डिखळें दृष्टीस पडत आहेत. जमीन चांगली नांगरली जावी म्हणून नांगर हांकणारे लोक नेट देऊन नांगरावर उभे आहेत. तसेंच ताडवृक्षांच्या मधून मंदमंद वाहणारा निर्झर मंजूल शब्द करीत वाहत आहे, आणि ज्या ज्या ठिकाणांतून तो वाहत होता त्या त्या ठिकाणीं वसुंधरेनें त्याचे वेलातट नानाप्रकारच्या वेलींनीं शोभायमान केले आहेत. अन्य स्थळीं, पेरणी करणारे लोक पेरण्या करीत आहेत. जंगलांतून चोहोंकडे पक्षांचे गायनाचा कलकलाट चालला आहे. वसंत ऋतु आला म्हणून सर्व चराचरांस आनंद झाला आहे. आंबराईमध्यें सूर्यपक्षी ह्या डाहाळीवरून त्या डाहाळीवर उडत आहेत, तांबर पक्षांची टिवटिव; तसेंच फुलपांखरूं मारण्याकरितां टपून राहणाऱ्या लहान पक्ष्यांची इकडून तिकडे धांवधांव, नानाप्रकारच्या लहान पक्ष्यांची या झाडावरून त्या झाडावर धांवत जाण्याची गर्दी, मैनेचें गाणें, कोकिलांचा मंजूल व मोहक असा ध्वनि, सुशोभित मोराचें लांडोरीला पाहून नाचणें, सरोवरांतून शुभ्र अशा बदकांचा समुदाय, तसेंच फार दूर असणाऱ्या खेड्यांतून जाणाऱ्या वरातीचे वाजंत्र्यांचा शब्द असा हा आनंदमय धनधान्यसमृद्धिपूर्ण प्रदेश पाहून राजपुत्र संतोषाप्रत पावला. परंतु सूक्ष्म विचार करितां ह्या आयुष्यरूप सुखदायक गुलाबकळीला कांटे आहेत, असें त्याचे दृष्टीस पडलें. निवळ संरक्षण होण्याकरितां भाकरीचा तुकडा मिळावा म्हणून काय प्राण जाईपर्यंत मानवास कष्ट करावे लागतात. महत्त्वेत्र वृषभास मानव ऐन माध्यान्हकालीं नांगर लवकर लवकर वाहण्याकरितां म्हणून कसा त्याच्या मऊशा पाठीवर टोंचित असतो, तसेंच नानाप्रकारचे प्राणी एकमेकांस कसे परस्पर खातात, पिपीलिका अति सूक्ष्म प्राण्यास, सरडा पिपीलिकांस, सर्प सरड्यांस, घार सर्पास, वारीस गिधाड, याप्रमाणें मोठा प्राणी लहान प्राण्यांची कत्तल उडवितो, हाच प्रकार जलचरांत व वायुचरांत चालला आहे, असें त्यानें पाहिलें. कीटक, पशु, पक्षी, यांतच हा स्वकल्याणनिमित्त अन्य जीव घात करण्याचा प्रकार नाहीं, तर मानवांत सुद्धां असा प्रकार चालतो. हें जेव्हां त्याचे लक्ष्यांत आलें; तेव्हां राजपुत्र सिद्धार्थ सुस्कारा टाकून बोलतो "हीच काय ती सुखदायक वसुंधरा! आणि हीच पाहण्यासाठीं" मला इकडे आणिलें काय? शेतकऱ्याच्या मिष्टान्नांत काय हा मिठाचा अंश! काय हे वृषभाचे कष्ट व श्रम! दुर्बळ व सबळ यांचें

केवढें तांडव युद्ध ! जळीं, काष्ठीं, पाषाणीं कोणीकडे ह्मणून ठाव नाहीं ! दूर व्हा तुह्मी, जे कांहीं मला दाखविलें त्याचा मला विचार करूं द्या " असें ह्मणून पवित्र प्रभु बुद्धाचे पुतळे जसे आपण पाहतों, तशाच रीतीनें जंबू वृक्षाचे भूतळीं त्यावेळीं प्रभु बुद्ध आसनस्थ झाला, आणि आयुष्यांत हा जो दुःखरूपी कंटक, त्याचें मूलस्थान व तो परिहार करण्याचे उपाय याविषयीं प्रभु बुद्ध प्रथमतःच विचार करूं लागला. त्याचें अंतःकरण अत्यंत दयामय होऊन गेलें, चराचरांसाठीं तो अत्यंत प्रेमपूर्ण होऊन गेला आणि दुःखाचा परिहार करण्याकरितां त्याचें अंतःकरण पूर्वोक्त गोष्टींच्या ओझ्यानें इतकें सद्गदित झालें कीं, इह लोकीचें इंद्रियभान, व स्वात्मशुद्धि याचा राजपुत्रास पूर्णपणें विसर पडून तो समाधिस्त झाला; आणि याप्रमाणें धर्मपदाचें प्रथम पद " ध्यान " त्याप्रत तो राजपुत्र पावता झाला; ज्या वृक्षाखालीं प्रभुबुद्ध आसनस्थ झाला होता, त्या वृक्षावरून आकाश मार्गानें, पांच पवित्र पुरुषांचा समुदाय जात असतां, त्यांच्या उड्डायमान होण्याचे पंखांची गति कुंठित होऊं लागली. " कोणती श्रेष्ठतर शक्ति आह्मांस नीच प्रदेशाप्रत ओढीत आहे असे ते साशंकित झाले. विदेही जनांस ईश्वरी अंशाचें ज्ञान होत असतें, आणि पवित्र जनांचीं वसतिस्थानें त्यांस विदित होतात. नंतर त्यांनीं खालीं पाहिलें तों आरक्त वर्णाच्या कांतीनें मुगुटायमान व उद्धार करण्याच्या विचारांत निमग्न असा प्रभु बुद्ध त्यांच्या दृष्टीस पडला. तेव्हां आंबराईतून अशी वाणी झाली कीं, ऋषिजनहो, हा जन जगाचा उद्धार करील. खालीं उतरून त्याची अर्चना करा. याप्रमाणें ते प्रकाशमान लोक खालीं आले, आणि त्यांनीं त्याच्या स्तुतीचें गाणें गाइलें. पश्चात त्यांणीं आपले पंख सांवरून ते देवादिकांना हें शुभ वर्तमान निवेदन करण्याकरितां चालते झाले. इकडे राजाकडून राजपुत्राच्या शोधार्थ कोणी दूत निघाला. माध्यान्ह समय जरी लोटून गेला, आणि दिनकर जरी अस्ताचल पर्वताकडे गेला, तथापि हा राजपुत्र विचारांत गर्कच होऊन गेला होता, हें त्या दूतानें पाहिलें. तसेंच जरी इतर वृक्षांच्या सावलीचा लोप होऊन गेला होता, तथापि जंबु वृक्षाच्या शाखा एकाच स्थळीं स्तब्ध होत्या. प्रभूच्या पवित्र मस्तकीं, तिरकस किरणांचा ताप लागूं नये ह्मणून त्याजवर त्या छाया करीत होत्या. ह्याच समयीं दूत शोध करण्यास आला. त्या घनदाट छायेंतून त्यानें एक वाणी ऐकिली. राजपुत्रास निवांत वसूं द्या. त्याच्या अंतःकरणांतून, विचाररूपी अभ्रें नाहींतशीं होईपर्यंत छायाही पण नष्ट होणार नाहीं." अशी त्या वृक्षानें वाणी केली.

अनंतर, प्रभु आसनोत्थित होऊन गृहाप्रत चालता झाला.

—○*○—

## द्वितीयोध्याय.

जेव्हां आमचा प्रभु याप्रमाणें कालक्रमणा करून आपल्या वयाचे अष्टादश वर्षांप्रत येऊन पोहोंचला, ते समयीं पितुराजानें आज्ञा फिरविली कीं, तीन महान राजमंदिरें बांधावीं. एक मंदिर उत्तम चौकोनी वहालांचें करून त्याला गंधसरू काष्टांनीं मढवावें. हें मंदिर हिमऋतूसाठीं असावें, कारण त्यायोगें शीत निवारण होईल. तसेंच दुसरें, अनेक वर्णशिरायुक्त संगमरवरी दगडांचें राजमंदिर बनवावें. हें ग्रीष्मऋतूचा ताप निवारण करील. तसेंच तिसरें राजमंदिर ज्या वेळेस चंपक पुष्पांचा भर असतो व जमिनींत बीं रुजण्याचा काल असतो अशा समयीं ज्या मंदिरापासून आनंद व सुख प्राप्त होईल, असें मंदिर बनवावें. त्या मंदिरांची नांवें सुभा, सुरमा आणि रमा हीं होत. त्या मंदिरांसभोंवार सुंदर व रमणीय उद्यान व उपवनें यांची दाट गर्दी लागून गेली होती. तसेच स्फटिकासारखे निर्झरही त्या ठिकाणीं होते. तसेच सुगंध वृक्षांच्या रांगा, व मोठमोठाले लतामंडप, तशींच हिरवीगार चेंडुफळी खेळण्यास मैदानें अशा प्रकारें ते राजवाडे विराजमान होते. सिद्धार्थ राजपुत्र या उपवनांतून व उद्यानांतून चाहील तिकडे खेळत असे. प्रत्येक घडीस कांहीं नूतन करमणूक तेथें तयारच असे. तारुण्याच्या ऐन भरांत असल्यानें, जीवित हें त्यास रमणीय व ऐश्वर्यसंपन्न वाटे; आणि त्याचा सर्वकाल सुखांत जाई. तथापि कधीं कधीं सरोवराच्या स्फटिकासारख्या शुभ्र जलावरून आकाशमार्गानें ढग जाऊं लागलीं असतां ज्याप्रमाणें कालिमा येते त्याप्रमाणें प्रभु बुद्धाच्या आनंदमय अशा रमणीय जीवितावर विचारांची काळी सावली येऊन पडे. राजानें हें दुःश्चिन्ह पाहून आपल्या सचिव जनांस पाचारण केलें. आणि ही सचिव सभा भरल्यावर राजा त्यांस निवेदन करूं लागला. सज्जनहो विचार करा, ऋषिगणांनीं तसेंच स्वप्नार्थ कथन करणाऱ्यांनीं, असें विदित केलें आहे कीं हा बालक जो मला जिवापर्ता प्यारा आहे तो आपल्या सर्व शत्रूंची पायमल्ली करून टाकील. आणि सकल वसुंधरेचा नृपश्रेष्ठ बनून राहील आणि हेंच मला इष्ट आहे. असें जर त्यानें केलें नाहीं; त्याणें नृपश्रेष्ठ होण्याचें जर पतकरिलें नाहीं तर तो शोचनीय व विनीत असा आत्मसंयमी होईल व स्वदेहास यातना देण्याचें पतकरील, आणि या प्रकारें जें रक्षणीय तें नष्ट करील, व ज्या गोष्टीचे सुगुण किंवा दुर्गुण याविषयीं आपण अनभिज्ञ आहोंत त्याची कदाचित तो प्राप्ति करून घेईल. अशाविषयीं चिन्हें आपल्या मुद्रेवरून तो दाखवीत आहे. परंतु तुह्मी चतुर आहां आणि तुह्मी मला सुमंत्रच द्याल. तर सुमित्रांनो, तो माझा सुपुत्र भूमिपति होण्याची कोणत्या रीतीनें उमेद धरूं लागेल व असा जो सुमार्ग त्याकडे त्या-

ग्रं. च. २०३

चीं पाउलें कशीं वळतील हें मला कथन करा. राजाची अशी आज्ञा श्रवण करून, वयोवृद्ध सचिव प्रत्युत्तर देता झाला. राजाधिराज महाराज, ह्या ज्या विकृती आपल्या सुपुत्रांच्या अंतःकरणांत उद्भवल्या आहेत त्यांचें शमन प्रेमरूपी कामदेवाच्या शरानेंच होईल. त्याची अशी उदास वृत्ति झाली आहे ह्मणून त्याच्यासभोंवार प्रमदा कौटिल्यांचा पाश पसरा; निरुत्साह सौंदर्यानभिज्ञ असा जो हा गुणवंत ऐश्वर्यसंपन्न पुत्र, त्याला प्रेमसुखाची काय माहिती? अप्सरेनें एकदां आपल्या चलापांग दृष्टीचा शर जर एखाद्या मनुष्यावर प्रक्षिप्त केला तर तो शर त्यास स्वर्गीचा विसर पाडतो; व बिंबोष्ठ अशा स्त्रियेचा ओष्ठरस प्राशन करून जे महान् धीराचे व निश्चयाचे पुरूष सुद्धां मत्त गजासम होतात; मग ह्या बालकाची काय कथा! ह्मणून, महाराज, कोमलांतःकरण व मृदु शरीर धारण करणाऱ्या अशा प्रमदासह त्याचें लग्न लावा. तसेंच यास उत्तम असे सौंगडे पहा. जे विचार त्याच्या अंतःकरणांत रात्रंदिवस घोळत आहेत व जे शृंखलांनीं बद्ध होऊं शकत नाहींत ते विचार सहजगत्या एखाद्या प्रमदेचे केशपाश बद्ध करून टाकितील. ही गोष्ट सर्वांस रुचकर वाटली. परंतु राजा ह्मणाला, जर आपण त्याचें लग्न करूं लागलों तर त्याचें प्रेम एखाद्या भलत्याच स्त्रीवर लुब्ध होईल कारण प्रेमाची आवड निवड निराळ्याच प्रकारची आहे. आणि त्याच्या सभोंवार सुंदरीरूपी उद्यानच करून त्यास ह्मटलें बा, ह्या सुंदरीरूपी पुष्पांपैकीं जें तुझा पुष्प पसंत पडेल तें पुष्प तूं तोड, तर तो विस्मय पावून ज्या सुखाचा त्यास अनुभव नाहीं अशा सुखाच्या स्थितीचा तो मोठ्या आनंदानें त्याग करील. अन्य सचिव त्यास उत्तर देतो. राजा, इतर जे त्याहून कमी योग्यतेचे पुरुष आहेत त्यांस जसें कोणीना कोणीतरी मोह पाडतें, तसेंच ह्यासही एखाद्या स्त्रीचा मुखचंद्रमा इंद्राच्या नंदनवनींच्या सुखाहून आल्हादतर वाटेल. आणि वसुंधरावासी लोकांस जागृत करणारी गौरवर्ण अशी जी उषा तिच्या स्वरूपाहून बहु रमणीय असें एखाद्या स्त्रीचें स्वरूप त्यास वाटेल, तेव्हां राजा, मी सांगतों तें कर. एक मोठा थोरला क्रीडासमारंभ करवून, आपल्या राज्यांतील सकल कुमारिकांस पाचारण करून शाक्यदेशींच्या क्रीडा व लीला कराव्या. व त्यांत विशेष यौवनसौंदर्यादिगुणेंकरून ज्या उत्तमता पावतील, त्यांस राजपुत्राकडून अलंकारादि उपहार देववावे. ह्या उपहारांचा स्वीकार करण्यासाठीं, जेव्हां त्या कन्या राजपुत्राच्या आसनासान्निध जातील, तेव्हां कोण्या सुंदरीच्या अवलोकनानें राजपुत्राचें औदासिन्य जाऊन कपोलावर टवटवी येईल, हें कळण्यासाठीं एका दोघांस राजपुत्राच्या सन्निधस्थ ठेवावें. आणि येणेंप्रमाणें ह्या प्रेमनेत्रांनीं निवड केलेली रति त्यास देऊन त्यांस सुखैश्वर्यांत भुलवून टाकावें ही मसलत सर्वांस आवडली. नंतर त्या दिवशीं दवंडीवाले यांजकडून दवंडी पिटविली कीं, आज राजवाड्यांत मोठा समा-

रंभ होणार आहे. ह्या वेळीं सर्व तरुणी कुमारिकांनीं तेथें जमावें आणि अशा कुमारिकांत ज्या सकल गुणसंपन्न अशा ठरविल्या जातील त्यांस त्यांच्या कमजास्त गुणावरून युवराज महाराज उपहार देतील. जी कुमारिका सर्वोत्तमता पावेल, तीस सर्वोत्कृष्ट व बहु मोलाचे उपहार दिले जातील. आणि याप्रमाणें कपिलवस्तु नगरीच्या सर्व कुमारिका आपल्या कृष्णतम केसांच्या वेण्या घालून नेत्रांत सुरमा घालून स्नानादि विधि आटपून, नाना परिमल आंगास लावून, तसेच नानाविध अलंकार शरीरावर लेऊन, नाना प्रकारच्या शाली, व तशींच मौल्यवान सुशोभित वस्त्रें परिधान करून आणि हात पाय आरक्त वर्णांकित करून, व भाळीं उत्तम प्रकारचें कुंकम लेऊन त्या सुंदरी राजद्वारीं येऊन थडकल्या. अशा ह्या भारतवर्षीय कन्या सुंदरींचा जमाव मंद मंद गतीनें चालणारा, अंतःकरणांत कंपायमान झालेला व ज्यांची भयाकुल होत्साती दृष्टि भूमीपतित झालेली असा हा सुंदरी समुदाय पहाणें किती रम्य होय! युवराज गंभीरतेनें व निश्चलितपणें बसला होता व जरी तो सौम्य दिसे तथापि त्या सुंदरीजनांची मनीषा त्याजवर बसली नाहीं. इतका पुण्यपूर्ण तो त्यांस वाटत असे. प्रति कुमारिकेनें, आपली दृष्टि खालीं करून वर मुद्रा केल्यावांचून निघून जावें, आणि जर परिजनांस एखादी कुमारिका विशेष वाटून युवराजाचे विशेष मनार्ह आहे असें वाटलें तर ती एखाद्या बुजलेल्या हरणीसमान कंपायमान होत्साती उभी राही, आणि युवराजाच्या सुखदायक हस्ताचा स्पर्श झाल्यावर ती आपल्या मैत्रिणीकडे तशीच भयव्याकुल होत्साती निघून जाई. राजकृपा झाली ह्मणून तिला कांप सुटे, कारण तो युवराज इतका दैवैश्वर्यसंपन्न व साधुरैश्वर्यसंपन्न व योग्यतापूर्ण दिसे कीं, अन्यथा कल्पनातरंग अशा राजकृपापात्र सुंदरीच्या मनांत यावयाचेच नाहींत. याप्रमाणें एकामागून एक क्रमाक्रमानें कपिलवस्तुनगरीचा हा कन्यासुंदरीरूपी पुष्पगुच्छ जाऊं लागला. आणि सर्व देणग्या संपून गेल्यावर, तसाच सुंदरींचाही समुदाय संपूर्ण झाल्यावर, यौवनपूर्ण यशोधरा त्या स्थळीं आली. आणि ती तेजःपूर्ण कुमारिका येतांक्षणींच युवराज सिद्धार्थाची मुद्रा चलित झाली असें परिजनांनीं तात्कालिक जाणिलें. अहाहा ! ! काय तिचें स्वरूप; शरीर रचना स्वर्गींच्या अप्सरेवत; शंभूच्या पार्वतीसारखी जिच्या लावण्याची शोभा, हरिणी आपल्या सहचरांसह प्रीतिविहारांत गर्क असतां जी तिच्या नेत्रीं शोभा दृष्टीस पडते, तशी तिची नेत्रदृष्टि, असें त्या कन्येचें सौंदर्य, मुखचंद्रमा जिचा इतका सुबक कीं ज्याचें स्वरूप विधान करण्यास वाणी असमर्थ आहे. अशी जी ती मोहिनी तिनें आपले द्वय करतल उरस्थित करून, युवराजास न्याहाळून पाहूं लागली. साचल कंठ होऊन "मजसाठीं कांहीं देणगी आहे काय" अशी पृच्छा करून तिनें हास्यवदन केलें. देणग्या सर्व समाप्त झाल्या तथापि, वल्लभे,

भागिनी, जिच्या स्वरूपानें आजि आमच्या नगरीस इतकी रमणीयता प्राप्त झाली त्या तुला हा घे माझा हार असें युवराजानें भाषण करून, कंठीं जो मौक्तिकहार होता तो काढून घेऊन तिच्या कृष्णवर्ण व बहु मृदु अशा कंठीं घातला. तत्क्षणीं दोघांची एकदृष्टि होऊन परस्परांच्या अंतःकरणामध्यें प्रेमोत्पत्ति झाली. बहुत कालक्रमण झाल्यावर व ज्ञानपरिपूर्णावस्था झाल्यावर प्रभूस कोणी विचारिलें कीं, तरुणपणीं, शाक्य कुळीं जन्मलेल्या सुंदरीकडे आपल्या मनानें तिकडे इतका प्रबल ओढा कां घेतला ? प्रभु बुद्धानें उत्तर दिलें कीं त्या वेळीं जसें परस्परांस आह्मी परकीय जन आहोंत असें वाटत होतें, तसे परकीय आह्मी नव्हतों. बहुत वर्षांपूर्वीं एका पारध्याचा पुत्र यमुना नदीच्या कांठीं वन्यकन्याजनासह बालक्रीडा करीत बसला होता. तेव्हां त्या कन्याजनांनीं त्याला सांगितलें कीं, गड्या, आह्मी फुगड्या खेळतों आणि आह्मामधून उत्तम कोण खेळते ह्याचा निवाडा करण्यासाठीं तूं येथें आमचा खेळ पहात बैस, ह्मणजे आह्मी एकमेकींसह भांडण कज्जा करणार नाहीं. असें ह्मणून जसे संध्याकाळीं ससे घिरट्या घालण्याची लीला करितात, त्याप्रमाणें त्या कन्या देवदारू वृक्षाखालीं खेळूं लागल्या. ही क्रीडा समाप्त झाल्यावर त्या पुत्रानें त्यांचा निवाडा करून बक्षिसें वांटलीं. कोणाच्या वेणीच्या बुचड्यांत त्यानें फुलांचा झुबकाच खोंविला, कोणाच्या वेणींत त्यानें वनकुक्कुटाची शिखाच खोंविली, कोणाच्या डोक्यांत त्यानें सुकुमार फुलांचे झुबकेच खोंविलें. परंतु त्यांपैकीं एकजण जी सर्वांमागून खेळली, परंतु जी त्याजकडे प्रथमतः आली तिला त्या पुत्रानें एक पाळीव हरिण दिला; शिवाय त्यानें अंतःकरणाचा प्रेमाही दिला. हें कन्यादंपत्य वनांत बहुत वर्षें सुखानें कालक्रमणा करीत होतें आणि तसेंच तें विभक्त न होतां सुखानें परलोकवासी झालें. पहा ! ज्याप्रमाणें वर्षाऋतु गत झाल्यावर पेरलेल्या बीजास कोम फुटून त्याचा महान् वृक्ष होतो, त्याप्रमाणें बरें व वाईट, सुख व दुःख, प्रेम व द्वेष, पुनरपि, फलपूर्ण अथवा निष्फल, प्रकाशवंत अथवा कृष्णवर्ण, गोड अथवा कडू, अशीं रूपं धारण करून घेतात. आणि या प्रकारेंच मी तो पारधिपुत्र होतों, व यशोधरा ही ती वनकन्या होती; आणि जावत्कालपर्यंत या जन्ममरणाचें चक्र फिरणार, तावत्कालपर्यंत आह्मामध्यें संबंध हा तसाच राहणार. सिद्धार्थ राजपुत्राच्या परिजनानें राजपुत्र सुंदरीस अनेकविध व बहु मोल अशा देणग्या देत असतां जो कांहीं कथाभाग घडला तो राजास निवेदन केला. सुप्रभुबुद्धाचें कन्यारत्न कुमारी यशोधरा देणगीचा स्वीकार करण्यास येईपर्यंत, युवराज कसा निश्चल स्थित होता आणि तिचें दर्शन झाल्याबरोबर एकाएकीं त्याची मुद्रा कशी चंचल झाली, आणि नंतर त्या दोघांची कशी एकदृष्टि झाली आणि नंतर त्यानें तिला मण्यांचा हार कसा दिला, तसेंच त्यांनीं परस्परांकडे कसें प्रेमानें पाहिलें; ह्या सर्व गोष्टी त्या परिजनानें राजास विदित केल्या. हें वर्तमान श्रवण करून राजास बहु हर्ष झाला. तो ह्मणाला, अहो, आतां

आपणांस आमिष सांपडलें. आकाशगामी हा जो पक्षी त्यास भूतळीं आणण्याची मसलत होऊंद्या. माझ्या पुत्रास विवाह करण्याविषयीं त्या कुमारिकेस विचारण्याकरितां दूत पाठवा. परंतु शाक्यदेशीं अशी चाल होती कीं, कोणी, कुलीन व रूपवती अशा कुमारीसह लग्न करण्यास इच्छूं लागला, तर इतर जे तरुण तिचें पाणिग्रहण करण्यास तयार असतील, त्या सर्वांपेक्षां त्यानें शौर्यादि गुणांत आपण विशेष आहों असें आपल्या पराक्रमानें दाखविलें पाहिजे. राजासहि हा नियम लागू होता. तेव्हां आलेल्या दूतास तिच्या पित्यानें असा निरोप सांगून पाठविला कीं, राजा, कन्येचें पाणिग्रहण करण्यास, जवळचे तसेंच दूर देशीचे राजपुत्र तयार आहेत. जर महाराजाचा सौम्य युवराज धनु लवविण्यांत, तसेंच दांडपट्टा व तरवारीचे हात फिरविण्यांत, तसेंच अश्वारूढ होण्यांत ह्या सर्वांमध्यें श्रेष्ठता मिळवील तर तो सर्वांत आह्मास बहुतच इष्ट होईल. परंतु तो एकांतवासी असल्यानें इतक्या गोष्टी कशा घडून येणार? राजपुत्र सिद्धार्थ यानें तर मला यशोधरा पत्नी करा असें राजास ह्मटलें. "त्यावरून नृपतीला फारच वाईट वाटूं लागलें. कारण हा यशोधरेचा पण राजपुत्राच्या हातून पूर्ण होणें अगदीं असंभाव्य होतें. देवदत्त धनुर्विद्येंत निपुण, अर्जुन अश्वविद्येंत आणि युद्धशास्त्रांत निपुण असे महान् महान् प्रतापी तरुण पुरुष असतां माझ्या मुलाला ही यशोधरा कशी प्राप्त होणार ह्याची राजास मोठी चिंता पडली. असें असतांहि युवराज स्मित वदनानें ह्मणाला, हेही सर्व प्रकार मी शिकलों आहें. गांवांत दंवडी पिटवा कीं, जे लोक ज्या विद्येंत निपुण आहेत त्यांनीं खुशालपणें यावें आणि युवराज हा त्यांस त्या त्या विद्येंत हटवून टाकील. अशा क्षुल्लक कारणास्तव मी आपली प्रिय वस्तु गमविणार नाहीं. तेव्हां सातव्या दिवशीं असें जाहिर केलें कीं, आज युवराजासह अनेक विद्याकोविद यांनीं स्पर्धा करावी. ज्याचा जय होईल त्यास यशोधरेचें पाणिग्रहण करण्यास मिळेल. ह्मणून सातव्या दिवशीं शाक्य लोकांतील उत्तम जन, मध्य देश व अनेक शहरें या ठिकाणांहून आले आणि जेथें हा उत्सव होणार त्या ठिकाणीं गेले. कुमारिका आपल्या आप्तजनांसह मोठ्या लवाजम्यानें तिकडे गेली. बरोबर वाजंत्री होतीं; तशींच अनेकविध वाहनें होतीं. राजकुलीं जन्मलेला असा देवदत्त तसेंच श्रेष्ठकुलीं उत्पन्न झालेले नंद व अर्जुन जे सर्व तरुण जनांत कुसुमवत् होते ह्यांनीं कन्या सुंदरी यशोधरेचें पाणिग्रहण करण्याची तत्परता दाखविली. इतक्यांत युवराज सिद्धार्थ आपल्या शुभ्रकंटक नामें अश्वरत्नावर विराजमान होत्साता त्या स्थळीं प्राप्त झाला. हा अश्व लोकांचा जमाव पाहून चकित मुद्रेनें चोहोंकडे पहात होता. ज्याचें राहणें राजे लोकांच्या चरिताहून अगदीं भिन्न आहे, परंतु जे स्वरूपादि कारणानीं अगदीं सम आहेत, आणि कदाचित् सुखदुःखाचे संबंधें सुद्धां एकच असतील असा प्रजाजन, सिद्धार्थ राजपुत्रास

मोठ्या चकित दृष्टीनें अवलोकन करीत होता. परंतु राजपुत्रानें जेव्हां बहु प्रियकर अशा त्या यशोधरा कन्यासुंदरीस पाहिलें, तेव्हां स्मित वदन करून, अश्वाच्या रश्मि आकर्षून अवचित त्या भव्य अशा अश्वाच्या पृष्ठभागावरून खालीं उतरला आणि ह्मणाला, जो सर्वोत्तम नाहीं तो हें मौक्तिक ग्रहण करण्यास सुपात्र नाहीं. माझे जे प्रतिस्पर्धी आहेत, त्यांनीं स्वपराक्रमांनीं ह्या रत्नाचें पाणिग्रहण करण्यास आह्मी पात्र आहों असें दाखवावें. धनुर्विद्येंत प्राविण्य दाखविण्याकरितां नंद उठला आणि सहा गव्युति इतक्या अंतरावर पितळेचा नगारा ठेविला होता तिकडे त्यानें आपला बाण सोडला. अर्जुनानें सुद्धां तितक्याच अंतरावर, देवदत्तानें आठ गव्युतींवर तीर सोडून आपलें धनुर्विद्येंत नैपुण्य दाखविलें. परंतु राजपुत्र सिद्धार्थ यानें असें सांगितलें कीं माझा निशाण मारण्याचा नगारा दहा गव्युतिइतक्या अंतरावर ठेवावा. तो नगारा तेथून एका फार सूक्ष्म बिंदुप्रमाणें दिसत होता. नंतर त्या तिघांनीं आपलीं निशाणें मारिलीं. नंदानें आपला बाण निशाणाच्या नगाऱ्यांतून पार असा सोडिला. तसाच पण अर्जुनाचाही नेम झाला. देवदत्तानें आपला बाण इतक्या चतुराईनें सोडिला कीं, बाणाचीं दोन्ही टोंकें त्या नेमाच्या पार गेलीं. जनसमुहास हें पाहून बहुत हर्ष झाला. पुढें बुद्धाची नेम मारण्याची पाळी आली. तेव्हां आपल्या आवडत्या युवराजाचा नेम चुकून तें अभाग्य आपल्या दृष्टीस पडूं नये ह्मणून मधुसम प्रियकर अशी जी सुंदरी यशोधरा इनें आपल्या भयव्याकुल नेत्रांवरून आपल्या साडीचा पदर घेतला. वेतसाचा तीरकमठा राजपुत्रानें हातीं घेऊन त्याला रुप्याच्या तारांनीं बांधिलें. हें धनु बहुत बळकट मनुष्यावांचून इकडचें तिकडे एक वीतभर सुद्धां कोणाच्यानें करवत नसे; असें हें धनुष्य हातीं धारण केल्यावर त्याच्या दोरीचा टणत्कार त्यानें केला. आणि नंतर किंचित् हास्यवदन करून धनूचीं दोन्ही टोंकें एके ठिकाणीं होईपर्यंत त्याची रज्जु ओढिली. मग अर्थातच मधला भाग निमिषमात्रांत तुटून गेला. ही एका प्रकारची मौज झाली; यांत प्रियेसाठीं कांहींच म[illegible] केलें नाहीं. आह्मा शाक्यकुलांतील राजपुत्रांस वापरण्यासाठीं धनुष्य नाहींच काय असें तो सिद्धार्थ राजपुत्र बोलला. एका परि[illegible]नानें असें उत्तर दिलें कीं, महाराज, देव[illegible]दिरीं सिंहानूचें धनुष्य आज बहुत काल[illegible] पडलें आहे, त्याचा उपयोग कोणाच्यानें[illegible] करवत नाहीं, आणि जरी कोणी चतुर पुरु[illegible]तें हातीं धारण करण्यास सज्ज झाला, तथापि त्यांतून त्याला तीर सोडतांच येणार ना[illegible] "जा, तें धनु मजकडे आण. तें काय [illegible] कश्चित् मानवाचें धनु" असें युवराज बोलला. वृषभाच्या शिंगासारखीं चिचोळीं सुवर्णपत्रजडित अशीं ज्या धनुकोटीचीं टों[illegible] होतीं व जें पोलादाचें बनविलेलें होतें, असे पुरातन काळांचे धनु तें राजपुत्रापुढें भृत्[illegible]नांनीं महाप्रयासानें आणून ठेविलें. तें किती बळकट आहे हें पहाण्याकरितां, [illegible]द्धार्थ युवराजानें, त्यास आपले जानुकफल[illegible]

पर्यंत वळवून ह्मटलें "माझ्या सौंगड्यांनो, यानें आतां निशाण मारा. परंतु त्यांच्यानीं तें धनु धरवेना. मग राजपुत्रानें हलकेच खालीं लवून धनूस वळविलें; आणि त्याच्या रज्जूस त्यानें टणत्कार दिला. त्याचा शब्द इतका कर्कश व मोठा झाला कीं, शहरांत घरोघरीं जे लोक राहिले होते, त्यांच्या कानीं हा शब्द गेला व त्यांसही हा आवाज कशाचा झाला अशी आशंका उत्पन्न झाली. तेव्हां शेजारी पाजारी बोलूं लागले कीं सिंहानूंचें धनुष्य आज राजपुत्रानें उचलून तें घेऊन तो शिकारीस जात आहे. त्याच्या रज्जूचा हा शब्द आहे. नंतर एक तीर त्या धनुकोटीवर" ठेवून व त्यास आकर्षून राजपुत्रानें सोडिला. तो तीक्ष्ण तीर अगदीं नभोमंडलापर्यंत जाऊन पोहोंचला. आणि नंतर त्या निशाणाच्या आरपार निघून जाऊन कोठेंही न थबकतां तसाच मैदानाच्या पलीकडे जाऊन दृष्टीआड झाला. हा धन्वाकर्षणाचा खेळ समाप्त झाल्यावर देवदत्त ह्मणाला, आतां आपण हातीं खड्गें घेऊन तीं चालविण्यांत कोण नेपुण्य दाखवितो हें पाहूं. पद्यांगुली जाड असा तळस वृक्ष देवदत्तानें आपल्या खड्गानें छेदून टाकिला. अर्जुनानें त्याहून स्थूल असा वृक्ष छेदिला. नंदानें अधिक पराक्रम करून दाखविला. नऊ बोटें स्थूल असे दोन तरु एके ठिकाणीं वाढले होते. हे दोन्ही तरु सिद्धार्थानें आपल्या खड्गाच्या एका सपाट्यानें दुभंग केले; आणि तेहि इतक्या सफाईनें कीं, खंड झालेले दोन्ही भाग निराळे न होतां, जशाचे तसेच उभे राहिले. हें पाहून नंद ह्मणाला, त्याचें खड्ग बोथटलें आहे. हे शब्द कानीं पडतांच कन्या सुंदरी यशोधरा वृक्षाकडे अवलोकन करिती झाली; व वृक्ष जसेचे तसेच उभे आहेत, हें पाहून ती बहुत कंपायमान झाली. जे सुरलोक हा कथाभाग लक्ष्य लावून अवलोकन करीत होते त्यांनीं मंद असा दक्षिण दिग्वायु सोडिला तेणेंकरून खंड झालेले जे तरूचे भाग, ते मैदानांत खालीं पडले. हा खेळ झाल्यानंतर पाणीदार व उत्तम जातीचे असे वाजी रंगभूमीवर आणिले. ह्यावर आरूढ होण्याच्या विद्येंत आपलें नैपुण्य दाखविण्याकरितां ते राजपुत्र ऐकमेकांस हतवीर्य करण्याचा प्रयत्न करूं लागले. अश्वपालांनीं सर्व वाजींस मैदानावर तीन चक्कर दिले. सिद्धार्थाचा वाजी कंटक यानें सर्वांच्या पुढें धांवून सर्व अश्वांस धांवण्यांत मागें पाडिलें. तोंडांतून फेंस पडतो न पडतो इतक्यांत तो वीस भाले लांब जाई. असा त्याचा पळण्याचा वेग असे. नंद ह्मणतो यांत हो काय! कंटकासारखे अश्वावर रूढ होऊन विजयश्री मिळविणें यांत कांहीं नवल नाहीं. याकरितां बेलगामी अश्व आणा आणि अशा अश्वावर आरूढ होण्यास कोण निपुण आहे, हें जनांस तात्काळच समजून येईल. अनंतर अश्वपालांनीं एक कृष्णवर्ण, शृंखलाबद्ध, भयप्रदनेत्री, विस्तृतघ्राणेंद्रियसंपन्न, स्थूल अयाळ आहे असा, नाल न लाविलेला, खोगीर कधीं न घातलेला असा वाजी त्या स्थळीं आणिला. शाक्यकुळीच्या तरुण राजपुत्रांनीं त्रिवार त्यावर आरूढ होण्याचा यत्न केला. परंतु त्या रानवट अश्वानें तितक्यांदा त्यांस

जमिनीवर लज्जायमान असें करून खालीं लोळविलें. अर्जुनानें मात्र एकदां मोठ्या प्रयासानें त्याजवर आरूढ होऊन त्याजकडून मैदानावर एक चक्कर करविलें. अश्वास शृंखलामुक्त करा असें सांगून अश्वारोहणविद्येंत आपलें कांहीं नैपुण्य त्यानें जनांस दाखविलें. परंतु मैदानावर एकही फेरी पुरी झाली नाहीं, तोंच अश्व दांत ओंठ खाऊन व संताप पावून अर्जुनाच्या पायाचा चावा घेऊं लागला. त्याला त्यानें जमिनीवर तर लोळविलें आणि पादाक्रांत करून जिवें मारणार इतक्यांत अश्वपाल धांवले आणि त्यांनीं मदांध अश्वाला शृंखलाबद्ध केलें. हें पाहून सर्व जनांच्या तोंडांतून एकच वाणी निघाली कीं, सिद्धार्थ राजपुत्रा, तूं या अश्वावर आरूढ होण्याचे भरीस पडूं नको. त्याचा वेग प्रभंजनवत् असून, रक्त अग्निज्वालेसारिखें आहे. सिद्धार्थ ह्मणाला, , अश्वास शृंखलामुक्त करून त्याच्या मानेवरच्या केसांचा झुपकाच द्या. तो केशपुंज त्यानें स्वस्थपणें हातीं धरला, आणि त्याच्या कर्णीं कांहीं मंद असा शब्द बोलून राजपुत्रानें वाजीच्या नेत्रांवरून प्रकोपित अशा त्याच्या मुखावरून, तसेंच त्याच्या कंठावरून, व स्वेदपूर्ण पृष्ठभागावरून आपला हात फिरविला. त्या कृष्णवर्ण वाजीनें तत्क्षणीं आपले वर चढविलेले कर्ण खालीं केले; व शांत व विनीत असा तो उभा राहिला. त्या वेळेस जनांस असें वाटलें कीं, अश्व प्रभू बुद्धास ओळखून तो त्याची पूजाच करीत आहे. हा प्रकार अवलोकन करून जन आश्चर्यमग्न पावते झाले. प्रभू बुद्ध आरूढ होतांना वाजी इकडे तिकडे मुळींच हालला नाहीं, आणि फिरण्याचा इशारा यत्किंचित प्रभु बुद्धानें केल्यावर अश्व मुक्ताद्यानें मैदानावरून फेरे करूं लागला. हें पाहून जन ह्मणाले, अ तां विद्यानैपुण्य पाहणें पुरे. सिद्धार्थ हाच सर्वोत्तम जन आहे. त्याचप्रमाणें सर्व यशोधराभिलाषि तरुण जनांनीं, हाच आह्मा सर्वांत उत्तम आहे, असा उद्गार काढिला. कन्यासुंदरीचा पिता सुप्रबुद्ध हाही बोलला कीं तूं आह्मास बहु प्रियकर आहेस; यास्तव तूंच सर्वोत्तमता प्राप्त करावीस, हेंच आमच्या मनांत होतें आणि आमची मनीषा पूर्ण झाली हें पाहून आह्मी बहुत संतुष्ट झालों आहों. हे राजबिंड्या, युद्ध, मृगया, इत्यादि अनेक प्रकारच्या विद्या ह्यांचा अभ्यास न करितां तूं कोणत्या हिकमतीनें या सर्व कलांत नैपुण्य प्राप्त करून घेतलेंस; जती संन्यासी होण्याचीं जीं स्वप्नें तुला पडत त्या विचारांत तूं निमग्न असतां हें कोविदत्व कसें प्राप्त करून घेतलेंस? हे सुकुमार राजपुत्रा, तूं मिळविलेला आपला कोशभांडार स्वीकार. नंतर ती सुरेख व सुस्वरूप व मनोहर अशी भारतवर्षीय कन्यासुंदरी पित्याची आज्ञा होतांच आसनोत्थित होऊन मोगऱ्याच्या कुसुमांचा हार हातांत धारण करून भ्रकुटीवरूव किंचित पदर घेऊन मोठ्या डौलानें त्या तरुण जनांच्या आंगावरून जाऊन दैविसंपत्ति धारण करणारा असा तेजःपुंज व जो नुकताच कृष्णवर्ण वाजीवर आरूढमान झालेला व ज्यानें अश्वाच्या कंठावर आपला हात ठेविला आ

असा सिद्धार्थ राजपुत्र ज्या स्थळीं उभा होता त्या स्थळीं ती मनोहर कन्या गेली. राजपुत्रास तिनें विनम्रभावें नमन केलें. आणि रतिपूर्ण व इंद्राच्या अप्सरेवत् आपला मुखचंद्रमा तिनें आपल्या इष्टजनांस दाखविला. नंतर सुवासित कुसुमांचा हार तिनें आपल्या प्रियाच्या कंठीं घातला. आणि आपलें वैकल्यरहित असें शिर त्याच्या वक्षस्थळीं ठेविलें. पश्चात त्याच्या पायास स्पर्श करण्याकरितां खालीं लवून ती मानहर्षसंपन्न असे नेत्र धारण करणारी कन्या राजास बोलती झाली. हे सख्या राजपुत्रा, तुझा आश्रित हा जो जन त्याजकडे तूं अवलोकन कर. परस्परांच्या हातांत हात घातलेलें असें तें दंपत्य मोठ्या उत्साहित मुद्रेनें जेव्हां जनांनीं अवलोकन केलें तेव्हां तो देखावा पाहून लोकांस बहुत आनंद झाला. नंतर पुन्हा कृष्णवर्ण व सुवर्णमय अशा वस्त्रानें तिनें आपला मुखचंद्रमा झांकून घेतला. बहुत वर्षांनंतर जेव्हां बुद्ध पूर्ण ज्ञानावस्थेप्रत आले, तेव्हां लोकांनीं त्यांची विनवणी करून त्यांस त्यावेळीं झालेल्या क्रमाचें इतिवृत्त विचारिलें; व तसेंच यशोधरेनें कृष्णवर्ण व सुवर्णमय पदर कां घेतला होता व ती उद्दामपणें कां चालली होती याचें स्पष्टिकरण विचारिलें. तेव्हां तो जगमान्य प्रभु त्यांस कथा सांगता झाला. "ही कथा मला विदित नव्हती, निदान पूर्णपणें माहीत नव्हती. पण अर्धपणीं एक गोष्ट मी जाणत होतों. आणि अर्धी जाणण्याचें कारण असें कीं, जावत्कालपर्यंत हें जन्ममरणाचें चक्र चाललें आहे तावत् गतगोष्टी, गतविचार, आणि गतजन्म यांचें कधीं कधीं स्मरण होतें. आतां पूर्णपणें आढळतें कीं लक्षावधि वर्षांपूर्वीं मी जो आतां बुद्ध आहें तो त्या वेळीं व्याघ्र होतों; आणि जातीच्या सौंगड्यांसहवर्तमान हिमालय गिरीच्या दरीकंदरीं रानोमाळ फिरत होतों. माझ्या दिनगुहेच्या समीपभागीं जीं जनावरें चरावयास येत त्यांजकडे दर्भासनावरून मी मिटमिट असा पहात बसें व विचार करीं कीं हीं क्षणोक्षणीं मरणाच्या समीपतर येत आहेत. रात्र पडली ह्मणजे आपल्या भक्षासाठीं अतृप्त व क्रूर असा होऊन, हरिण व मानव यांचा दबा धरून बसें. त्या वेळचे माझे सौंगडे ज्यांच्या भेटी रानीं होत त्यांमध्यें एक व्याघ्री होती, ती फारच सुस्वरूप होती. ती प्राप्त करून घेण्यासाठीं अरण्यांतील सर्व व्याघ्रांचें तुंबळ युद्ध झालें. ज्याप्रमाणें यशोधरा हिनें पदर घेतला होता तद्वत् त्या व्याघ्रीचें बाह्यांग होतें. श्वापदांमध्यें तिच्यासाठीं मोठा संग्राम चालला असतां ती निंब वृक्षाच्या खालीं छायेंत मी कोणकोणास मारितों हें टक लावून पहात बसली होती. आणि युद्धावसानीं ती व्याघ्री ज्याज्या श्वापदांस मी मारून टाकिलें होतें, त्यांच्या आंगावरून येऊन प्रेममोहित होत्साती माझे नितंब चाटिती झाली. नंतर मोठ्या प्रेमानें व उद्दाम अशा ऐटीनें मजसह जंगलांत गेलो जन्ममरणचक्र याप्रमाणें नीच उंच असतें."

ती कन्यासुंदरी राजपुत्रास दिली व तीही मोठ्या उत्साहानें त्याजकडे गेली. ज्या-

वेळेस तारकाग्रह सुस्थानीं व मेषराशीचा उदय होता, ते समयीं विवाहोत्सव झाला. विवाहमंडपाचा सर्व तयारी होऊन पुष्पमाला दोघांनीं परस्परांच्या गळ्यांत घातल्या. व विवाहकंकणें दोघांनीं एकमेकांच्या हातीं बांधिलीं, तापलेल्या दुधावर दोन कुशाचे दर्भ ठेविले. आणि ते वाहात वहात कांहीं वेळानें जवळ जवळ आले. हें एक आमरणांत प्रीतीचें शुभ चिन्ह होय. होमाग्नि सभोंवार तीनदां सप्तपदी झाली. पवित्र जनांस दक्षिणा दिल्या, देवळें मंदिरें यांसही देणग्या दिल्या; मंत्राचाही जपघोष झाला, दोघांचे पदरांच्या गांठी बांधून कुमारीचा वृद्ध पिता ह्मणाला, बा पूज्य राजपुत्रा, आजपर्यंत जिच्या-वर आमची सत्ता होती ती आजपासून तुझी झाली. जिचें जीवन सर्व प्रकारें तुजवर अवलंबून आहे तिच्यावर माया व प्रेम ठेव. अनंतर प्रियतम अशी ती सुंदरी यशोधरा इला, नृत्य, गायन, व वाजंत्री अशा थाटमाटानें राजगृहीं आणिलें. परस्परांस दोघांनीं प्रेमळ आलिंगन देऊन रतिसुखांत दोघेंहि रममाण झालीं.

राज्यत्याग करण्याची मनीषा इचा प्रतिबंध एवढ्यानें होईल असा भरवसा न धरितां रतिसुखांत गर्क झालेल्या दंपत्यासाठीं राजानें मोठें एक आनंदोद्भव राजमंदिर बांधिलें. राजपुत्राच्या या विश्रामवनाव्यतिरिक्त इहलोकीं कोणताच अद्भुत चमत्कार नव्हता. मंदिरा-सभोंवार जें अरण्य होतें त्यांत मध्यंतरीं एक हरित अशी टेंकडी होती. त्या टेंकडीच्या पायथ्याशीं रोहिणी नदीचा निर्झर वहात होता. ह्याचा उगम हिमालय गिरीवर असून तेथून तो निर्झर गंगानदीच्या लहरीस आपली खंडणी घेऊन जात होता. दक्षिण दिशेस चिंचेचे व ताडाचे महान् महान् वृक्ष असून ते शुभ्र अस्मानी रंगाच्या पुष्पांनीं दाट भरून गेले होते. आणि ह्या झाडाच्या गर्दीनें कोणताही पदार्थ दृश्यमान नसे. त्या झाडींतून शहराची गजबज दूर असणाऱ्या मधुमाक्षिकांच्या गुणगुणण्याप्रमाणें मंद अशी ऐकूं येई. उत्तरेस शुभ्र असें तट होतें. तें आकाशास जाऊन थडकलें होतें. आकाशाचा अस्मानी रंग व तटाचा हिमांकित शुभ्र रंग ह्यांची मोठी शोभा दिसे. ह्या ठिकाणीं कोणत्याही मानवाचा पाय लागला नव्हता. अपरंपार व भव्य अशा त्यावरील सपाटी होत्या. तेथें कड्यावर कडे, उतरणीवर उतारणी, दरीवर दरी, खिंडीवर खिंडी, आणि जों जों वर दृष्टि फेंकावी तों तों ती अगदीं अस्मानास जाऊन पोंहचे आणि आपली वाचा येथें देवादिक यक्ष किन्नरासह बोलूं लागली आहे काय असा भास ती रममाणशी सुंदर वनशोभा पाहून मानवास होई. ह्या हैमवत् गिरीच्या खालीं घनदाट अशीं अरण्यें पसरलीं होतीं. त्यांत मधून मधून टेंकडीवरून पडणारे पाण्याचे धबधबे होते. ही झाडी गगनचुंबित होती. तसेंच खालीं ओकवृक्ष व देवदारूवृक्षांची गर्दी लागून गेली होती. ह्या भयाण अरण्यांत तित्तिर पक्षांचा आरव व चित्त्याची भयंकर गर्जना मधून मधून ऐकूं येई. तसेंच टेंकड्यांवरून वनमेष आणि गिरक्या घालणारे

गरूड पक्षी यांचा शद्ब ऐकून जिवास मोठी करमणूक वाटे. ह्या टेंकड्याचे नीच प्रदेशीं जें सपाट मैदान होतें, त्याची शोभा तर फारच रमणीय होती. हें मैदान असें दिसे कीं, टेंकड्या ह्याच कोणी अति पवित्र स्थंडिलें, व त्यांच्याजवळ जणु काय चित्रविचित्र रंगाचें जपजाप करण्यासाठीं मोठें आसन पसरलें आहे. ह्याच्या समोर कारागिरानें मोठा थोरला मंडप तयार केला होता. चोहोंबाजूनीं खांबाच्या मोठमोठाल्या शाला बांधिल्या होत्या. त्या खांबावरून नाना चित्रें काढिलीं होतीं. राधाकृष्ण व गोपी, तसेंच सीता व हनुमान आणि पांच पांडवांची द्रौपदी, तसेंच जो चक्रांकुशासहित संपत्ति व ज्ञान यांचा दाता, आपली वक्र सोंड हालवीत आहे असें श्री गणेशाचेंही चित्र काढलें होतें. या रमणीय मंडपांत जाण्याच्या मार्गावर वृक्षांचे अनेक चक्रव्यूह केले होते. दरवाज्यावर अनेकविध रंगांच्या लकेरी असतात असे संगमरवरी दगड होते. दाराची मेहेराप फारच सुंदर होती. उंबरठा एका उंच जातीच्या संगमरवरी दगडाचा केला होता. दारें मलयगिरीच्या चंदन वृक्षाच्या लांकडांचीं केलेलीं होतीं. त्यांवर नानाप्रकारच्या वेलबुटी कोरल्या होत्या. ह्या दरवाज्यांतून, रमणीय व उंच अशा दिवाणखान्यास घनदाट अशा वृक्षमंडपांतं जाण्याचा रस्ता होता. तसेंच ह्या मार्गावरून जाळीदार असे सज्जे, उत्तम असे राजमंदिराचे जिने, चित्रविचित्र असे मंडप, ज्यांवर नाना प्रकारचे पुष्पगोस कोरले आहेत असे मंडपाचे स्तंभ दिसत होते. ज्या ठिकाणीं हा मार्ग जात होता, त्या ठिकाणीं शीतल अशीं कारंजीं उडत होतीं. व त्यांत नीलकमलाच्या पुष्पांचें व पर्णांचें जाळें पसरलें होतें. तसेंच त्यांत नानारंगाचे मत्स्य शुभ्र स्फटिकासारख्या पाण्यांतून दिसत होते. जें ह्या मार्गावर वनमंडप होतें त्यांतून महताक्ष असे हरिण सूर्यकिरणप्रकाशित अशा पुष्पांचें चरवण करीत बसले होते. तसेंच गगनचुंबित ताडवृक्षांतून, इंद्रधनु रंगासारखे ज्यांचे पक्ष आहेत, असे पक्षी बागडत होते. तडागांच्या अशा कंगोऱ्यांतून हरित आणि शुभ्र अशा बंदकांनीं आपलीं सुरक्षित घरटीं केलीं होतीं. तेथील प्रदेशाच्या चकचकीत अशा चिरेबंदीवरून मोर आपले पिसारे पसरून बसत असत. तसेंच त्याच स्थळीं दुग्धवत शुभ्र असे क्रौंच पक्षी, व लहान असे माणसाळलेले घुबडपक्षी, आरक्तवर्ण असे राघु, ह्या फलावरून त्या फलावर उड्या मारीत होते. पिवळे सूर्यपक्षी ह्या वृक्षाच्या मोहोरावरून त्या वृक्षाच्या मोहोरावर उड्या मारीत फिरत आहेत. भित्री जाळ्यावरून निर्भयपणें ऊन घेत बसत. खारी तर खाणें हातांतून घेत. चोहोंकडे त्या ठिकाणीं शांतता नांदत होती ह्मणूनच हा सर्व प्रकार निर्भयपणें चाललेला दिसत होता. तसाच भित्रा असा काळा सर्प जो घरांत असल्यामुळें घराचा भाग्योदय होतो, तो ही आपलें सुस्तपणें वेटाळें टाकून, ऊन घेत चंद्रविकासिनी पुष्पाच्या आश्रयानें बसत असे. त्या ठिकाणीं कस्तूरिका मृग बागडत असत. तसेंच वानरमंडळ त्या

स्थळीं उड्या मारीत असत. या गोष्टींनीं तीं विलासमंदिरें भरून गेलीं होतीं. शिवाय त्यांत फार सुशील असा सेवकजन ठेविला होता. सौंदर्यपूर्ण तीं मंदिरें असत. एवढेंच नाहीं, तोंडांतून शब्द निघण्याबरोबर काम करण्यांत तत्पर असे लोक त्या ठिकाणीं ठेविले होते. खुष करण्यांत त्यांस मोठा आनंद होत असे; आणि खुष करून देणें हें पण त्यांस आवडत असे. आणि याप्रमाणें सुंदरी यशोधरेसह राजपुत्राचा आयुष्यक्रम चालला. वर जे दिवाणखाने आणि शाळा सांगितल्या त्यांहूनही एक फारच निराळें पण बहुतच सुंदर असें रम्य स्थळ असे. चतुर पुरुषांनीं आपलें सर्व कसब ह्या स्थळीं उतरून दिलें होतें. त्याचा दरवाजा चतुष्कोनी मंडपासारखा होता. आणि त्या स्थळाच्या मध्यंतरीं शुभ्र स्फटिकासारख्या संगमरवरी दगडाचें विहारकासार होतें. सभोंवारच्या शिळांवरून नानाप्रकारची वेलबुटी कोरली होती. हिमावरून चालणें ज्या प्रमाणें ग्रीष्मऋतूंत हितावह असतें, त्याप्रमाणें यांवरून चालणें सुखावह वाटे. सूर्यकिरणें त्या शिळांवरून पडलीं ह्मणजे फारच रम्य शोभा दिसे. आणि त्यांचें वक्रीभवन व परावर्तन होऊन नानारंगपूर्ण अशीं तींच किरणें मंदिराच्या द्वाराच्या कमानीवर पडत. मग जेव्हां त्यांचें तेज कमी होई त्यावरून असें वाटे कीं, दिनकर हा त्या रम्यस्थळांस पाहून अगदीं रममाण झाला आहे. ह्या द्वाराच्या पलीकडे रम्य असें अंतःपूर होतें. त्यांत नानाप्रकारचे दीप लाविले होते; आणि त्यांच्या प्रकाशानें तें स्थळ अगदीं विलक्षण सौंदर्याप्रत पोहोंचलें होतें. तेथें सुवर्णमय रेशमाचीं तशींच किनखापाचीं वस्त्रें पसरलीं होतीं. तसेंच तऱ्हेतऱ्हेचे पडदे लाविले होते. त्या पडद्यांतून राजपुत्र व कन्यासुंदरी यशोधरा मात्र जात. ह्या स्थळीं दिवस व रात्र यांचा भेद मुळींच समजत नसे. कारण प्रातरुदयाचे वेळीं ऊन पडे परंतु त्याची उष्णता सायंकाळच्या संधिप्रकाशासारखी असे. तसेंच त्या ठिकाणीं शीतल असा वायु वाहत असे. मृदंग, वीणा, व इतर नानावाद्यांचा घोष सतत रात्रंदिवस चाललेलाच असे. नानाप्रकारचीं अन्नें त्या ठिकाणीं सदोदित तयार असत. तशीच फळफळावळही तेथें ठेविलेली असे. हिमाचलावरील हिममिश्रित अशीं अनेकविध सरबतें त्या दंपत्यासाठीं करून ठेविलीं असत. तशींच मिठाई व मिष्टान्नें यांची तर लयलूट होती. नाना कलावंतिणींचें नृत्य व गायन अहोरात्र चालू ठेविलेलें असे. नानातऱ्हेचीं वाद्यें वाजविणारे अशा लोकांची त्या ठिकाणीं गर्दी करून ठेविली होती. प्रेमोत्पन्न करणारा जन, असा त्या राजपुत्राच्या सेवेंत तत्पर, त्या सुखशाली राजपुत्रास निद्रायमान झाला असतां हा सेवकजन विंझण्यानें वारा घाली; आणि तो जागृत झाला कीं, पायांत घुंगरे बांधून नाचणाऱ्या वारांगनांचे गाण्याचे मंजूळ स्वरानें त्याच्या चित्तास तो मोहून टाकी; आणि यशोधरा सुंदरी आपल्या हातांत नानापरिमल सुवासिक पदार्थ घेऊन त्यास त्याच्या दुर्विचारांपासून दूर करून प्रेमपहाऱ्याच्या मोह-

जालांत ती त्यास घाली. युवराज सिद्धार्थाची या मोहकरूपी संसारांतील कालक्रमणा चालली होती. इतक्यानेंच बस्स झालें नाहीं. राजानें असा बंदोबस्त ठेविला होता कीं, त्या राजमंदिराच्या तटाच्या आंत कोणींहि मृत्यु, वार्धक्य, दुःख, शोक, अथवा दुखणें या गोष्टींचा उच्चार सुद्धां करूं नये. त्या रमणीय दरबारांत जर कोणी स्त्री नृत्यक्रीडा चालली असतां आंणवली, अथवा घाबरून नेत्र जर कालेंविद्रे केले, अथवा नाचतां नाचतां विसावा घेण्याकरितां ह्मणून जर कां एखादी कलावंतीण खालीं लवली, अथवा पायाचा थकवा जाण्याकरितां ह्मणून जर विश्रांति घेण्यासाठीं खालीं बसली, तर तात्काल तिला महान् अपराध्याप्रमाणें त्या विलासमंदिराच्या हद्दपार करित. कारण तिच्या मृणालतुल्य शरीराला इजा झालेली पाहून, राजपुत्र शोक करूं लागेल. मंदिराबाहेरील जगतांतील संसारदुःखाचा उच्चार करण्याची कोणाची मगदूर? अशा अनिष्ट गोष्टीचा उच्चार झाला कीं, लागलाच उच्चार करणाऱ्यास शिक्षा देण्याकरितां दूत चोहोंकडे मंदिरांत राजाच्या हुकुमानें फिरत. अश्रु, यातना, रोग, शोक, आणि चिंता यांचा उच्चार राजपुत्राच्या कानीं जाऊं नये, अशी राजाची सक्त आज्ञा होती. तसेंच कलावंतिणींच्या पायांतील घुंगुर सुद्धां गमावतां कामा नये. प्रतिदिनीं प्रातरुदयाचे समयीं कोमेजलेलीं गुलाबाचीं फुलें हीं बागांतील वृक्षांवरून काढून टाकून देत. गळलेलीं पर्णें तोडून टाकीत. कारण कांहीं एक अशुभ चिन्ह त्या मंदिरांत वास करण्याऱ्या युवराजाच्या दृष्टीस पडूं देऊं नये, ह्मणून मोठ्या सक्तीचा हुकूम दरबारांतून झाला होता. असें करून पुत्राच्या अंतःकरणांतून शोचनीय विचार नष्ट व्हावे, आणि भाकित कथन झालेलें मोडावें ह्मणजे माझा पुत्र मोठा सत्ताधीश होऊन सार्वभौम राजा होईल. आणि त्याच्या ऐश्वर्याच्या दिनमणीची चोहोंकडे कांति फांकेल आणि हें पुत्रमुख माझ्या नेत्रद्वयांच्या दृष्टीस पडेल. मग मी किती भाग्यशील होईन बरें? आणि अशासाठींच हे सर्व उपाय मी चालविले आहेत. असें राजा आपल्या सखिवजनांस बोलून दाखवीत असे. आणि ह्मणून करितां, राजानें आणखांही बंदोबस्त करून ठेविला होता तो असा. ज्या विलासमंदिराचा द्वारपाल प्रेम आणि तेथील सुखें व आनंद ह्मणजे अडसरें, अशा या मंदिराच्या सीमेहून फार अंतरावर एक मोठी थोरली तटबंदी राजानें करविली. त्या तटबंदीस अवजड असे पितळेचे दरवाजे करून ठेविले होते. ह्या दरवाज्यांस बिजागऱ्यावरून हालविणें ह्मणजे सहज शंभर मनुष्यें लागत. दरवाजा उघडतांना जो आवाज होई तोच अर्धे योजना इतके अंतरावरून ऐकूं येई. त्या दरवाज्याच्या आंत एक दुसरा दरवाजा व त्याच्याही आंत आणखी एक तिसरा दरवाजा, असे तीन दरवाजे राजानें करून ठेविले. विलासमंदिर सोडून जर बाहेर निघावयाचें झालें तर या तीन दरवाज्यांतून निघून गेलें पाहिजे. ह्या तीन अवजड, भव्य द्वारांवर राजानें तीन वि-

श्राम् असे द्वारपाल योजिले होते. आणि त्यांस अशी ताकीद दिली होती कीं, माझा मुलगा राजपुत्र जरी असला तथापि त्याला सुद्धां ह्या दरवाज्यांतून जाऊं देऊं नका, आणि माझ्या आज्ञेचा भंग कराल तर जाणा देहांत शिक्षा तुह्मास होईल, ध्यानांत ठेवा.

## द्वितीयोध्याय समाप्त

—०—

## तृतीयोध्याय.

ह्या विलासमंदिरांत आमचा प्रभु सुख व प्रेमयुक्त अशी वस्ती करून होता. त्या स्थळीं त्यास यातना, अतृप्त इच्छा, दुःख, रोग, वार्धक्य अथवा मृत्यु यांची या मृत्युलोकीं वस्ती आहे असें मुळींच ठाऊक नव्हतें. आणि जर यत्किंचित त्यास माहित असलें तर ज्याप्रमाणें झोपाळु स्वप्नामध्यें समुद्रपर्यटन करीत असतात तद्वत् होय. परंतु अनेक प्रसंगीं असें होई कीं प्रियतमा यशोधरा इच्या वक्षस्थळावर आपलें शिर स्वस्थ मनें करून ठेविलें असतां तसाच प्रभुबुद्ध निद्रित होई. प्रियजन यशोधरा ही आमच्या प्रभूस विशेष निद्रासुख व्हावें ह्मणून आपल्या प्रेमळ हस्तानें त्यास विंझण्यानें वारा घाली. अशा ऐन सुखांत असतां तो एकदम दचकून उठून, माझ्या! अरे! जगा! मी ऐकतों, मी जाणतों, मी येतों असा आक्रोश करी. अशा समयीं भयाभीत होत्साता ती पतिव्रता विचारी, प्रभु कोणती वेदना होते ती मज सांग. अशा काळीं प्रभूच्या दृष्टींत विलक्षण प्रकारची भूतदया दिसून येई आणि त्याच्या भयप्रद मुद्रेवर ईश्वरी तेज दिसे. नंतर प्रभू किंचित् हास्यवदन करून प्रियतमेच्या नेत्रांचे अश्रुगळ पुसून टाकी. आणि वाद्यांचा घोष होऊं द्या ह्मणून सेवकजनांस आज्ञा करी. याप्रमाणें घोष होत असतां समीपच्या जनांस मधुर सुस्वर गान ऐकूं येई. परंतु त्या वाद्याच्या द्वारें देव प्रभु बुद्धास सूचनार्थ अशीं गाणीं गात. तीं गाणीं कोणत्या प्रकारचीं होतीं हें आतां निवेदन करितों. आह्मी भ्रमण करणाऱ्या वायूचे शब्द आहोंत. आह्मास विश्रांति मिळत नाहीं. ध्यानांत ठेवा. मर्त्यमानवाचें जिणें श्वासोच्छासाच्या एक्या स्पंदक्याप्रमाणें आहे. आह्मी कोठून आलों, कोठें जातों हें तुह्मास ज्ञात होणार नाहीं. तुमच्यासारखेच आह्मी आहोंत. आमच्या चक्रासारख्या भ्रमण करणाऱ्या दुःख स्थितीऐवजीं सुखाचा कोणता अंश आह्मास मिळतो? तुह्मास या निश्चक्रमाच्या ऐपआरामांत काय सुख आहे तें सांगा. जर हा प्रेमरूपी छायावान् वृक्ष सदोदित रहावयाचा असता, तर यांत निश्चयेंकरून आनंद आहे, परंतु ही आरामर्यादा फारच क्षणिक आहे. हे मायापुत्ररत्ना, आह्मी सर्व पृथ्वीवर भ्रमण करितों ह्मणून शोकगान या तारांवर करितों. आह्मी चेष्टा वगैरे न करितां आह्मी खात्रीपूर्वक सांगतों कीं चोहोंकडे देशांतरास दुःखा-

चा अश्रुपात होत आहे. ह्या संसाराची निरर्थकता जनांस पूर्णपणें समजत नाहीं ह्मणून आह्मास शोक करितांना हसूं येतें. आकाशगामी अभ्रें यांस निश्चल रहावयास सांगणें, अथवा वाहत्या जलौघास हातानें धरा असें सांगणें हें जितकें संभाव्य, तितक्याच प्रकारें संसार मिथ्या आहे असें जनांस सांगणें संभवनीय होय. परंतु ह्या जगाचा उद्धार करावयाचा आहे, आणि त्याचा काल तर समीप आला आहे. जग सर्व दुःखमय होऊन गेलें आहे, त्यास सत्याचा मार्ग दिसत नाहीं. ह्मणून हे मायापुत्रा, ऊठ, जागृत हो, स्वस्थ पडूं नको, तुझें विश्रांतीचें स्थान तूं मिळविण्याकरितां प्रयत्न कर, प्रेमसुख हें प्रेमी जनासाठीं राखून ठेव. त्याचा उपभोग तूं घेऊं नको. जनाच्या दुःखाचा परिहार करण्यासाठीं राज्याचा त्याग कर आणि जगाचा उद्धार कर. या विषयांच्या तारांवर आह्मी याप्रमाणें शोकगान करित आहोंत आणि तूं ज्या गोष्टी सुखस्थानें आहेत असें मानितोस तें मिथ्या असून तेंच तुला सत्य वाटतें त्याचें हें आह्मास आश्चर्य वाटून हसूं येतें.

ह्यानंतर एके दिवशीं अशी गोष्ट घडली कीं, प्रेमवान यशोधरेच्या हातांत हात घालून प्रभुबुद्ध आपल्या विलासाच्या मंदिरांत बसला असतां, गातां गातां एका सुस्वरूप कलावंतिणीचा मधुर शद्ब जरा खालावल्यामुळें तीही खालीं बसली आणि सायंकाळ सुखानें गुजरावा ह्मणून नानाचमत्काराच्या कथा, तशाच कांहीं दूर दूर देशाच्या गोष्टी, तशाच अद्भुत गोष्टी राजास सांगती झाली. सुस्कारा टाकून राजपुत्र ह्मणाला, चित्रा मला गोष्ट सांगून विण्यावरच्या गायनाची आठवण करते तिला ह्याबद्दल प्राणप्रिये तुझें मौक्तिक दे; परंतु सखे प्राणप्रिये, जगाचा एवढा विस्तार आहे काय ? अशी भूमिका आहे काय कीं ज्या स्थळीं सूर्य समुद्राच्या लाटांत अस्तायमान होतांना दिसतो, आणि आमच्यासारखे असंख्य प्राणि आहेत काय ? आणि कदाचित् त्यांना दुःख होत असेल काय ? जर असा जन आपल्या माहितीचा असता तर आपण त्यास साह्य केलें असतें. दिनकर आपल्या सुवर्णमय मार्गावरून पूर्वेकडून पश्चिमेकडे ज्यावेळेस जातो, त्यावेळेस मला बहुत वेळा आनंदाश्चर्य होतें. हे प्राणप्रिये, तुझ्या वक्षस्थळीं शीर ठेविलें असतां आणि बाहूनें तुझें आलिंगन घेत असतां मला अनेक प्रसंगीं असें वाटतें कीं, दिनकरासह सूर्यास्त समयीं ताम्रवर्ण अशा पश्चिमदिशेस जावें आणि त्यास्थळीं वस्ती करणाऱ्या जनांचें अवलोकन करावें. अनेक लोकांवर आपण प्रेम ठेवावें. नाहीं तर काय उपयोग ? ह्याक्षणीं सरतेशेवटीं, मला किंचित वेदना होत आहेत. त्या वेदना प्रिये तुझ्या मुखाच्या चुंबनानें नाहींशा होत नाहींत. हे चित्रे, तुला ते सुखकर देश माहीत आहेतना ? तूं जो चपल अश्व मला विदित केलास तो कोठें बांधलेला आहे तें सांग. मी त्याजवर आरूढ होऊन ह्या सर्व पृथ्वीचा विस्तार पहावा असें मला वाटतें. जर मला तो पलीकडे बसलेला जटायु पक्षी याचे पंख असते तर मी हिमालयावर उडून गेलों असतों. ज्यास्थळीं हिमावर सूर्यकिरण प्र-

काशित असल्यानें गुलाबकळीच्या रंगाची झांक मारित आहे त्या ठिकाणीं आरूढ होऊन आसमंतांत नजर फेंकावी असें माझे मनांत येतें. पलीकडे काय आहे हें पाहण्याचा आणि शोध करण्याचा विचार मी आजपर्यंत कां केला नाहीं, सांग? चित्रे! सांग? ह्या आमच्या पितळेच्या दरवाज्यापुढें काय आहे हें सांग. त्यापैकीं एकजणीनें उत्तर दिलें, महाराज! प्रथमतःच पुरी आहे त्यांत नानाविध देवळें आहेत. सुवासिक पुष्पांनीं भरलेल्या अशा अनेक बागा व उपवनें आहेत. त्यानंतर महान् महान् आंबराया आहेत; आणि नंतर सुशोभित अशीं शेतें चोहोंकडे प्रसरलेलीं आहेत. मधून मधून नाले, झरे, मैदानें, आणि अरण्यें अशीं कोशानुकोश लागून गेलीं आहेत. याप्रमाणें या प्रांताची मर्यादा उल्लंघन केल्यावर राजा बिंबासर याचें राज्य आहे. त्याची ही सीमा झाल्यावर, अफाट ही पृथ्वी आहे, आणि त्यांत कोट्यवधि मनुष्यें वस्ती करून व कोणत्याही प्रकारें संकटानें आपली उपजीविका करून त्यांत आपली आयुर्मर्यादा संपेपर्यंत राहिलेलीं आहेत. सिद्धार्थ राजपुत्र ह्मणाला ठीक! उद्यां दोन प्रहरीं माझा रथ सज्ज करून येण्यास चाणास माझा निरोप सांगा. नंतर मी रथस्थ होऊन पलीकडे काय आहे तें पाहीन. नंतर सेवकजनांनीं राजास विदित केलें कीं आमचा प्रभु सिद्धार्थ राजपुत्र याचा मनोदय असा आहे कीं, रथस्थ होऊन दुपारीं बाहेर फिरावयास जावें व मानवसमुदाय पहावा. सावधान राजानें उत्तर केलें कीं, बाह्यदेश पाहण्याची ही त्याची वेळच होय. परंतु एवढी मात्र सावधगिरी ठेवावी कीं चोहोंकडे शहरांत दवंडी पिटवून लोकांस उत्तम वस्त्रालंकार लेववयास आज्ञा करा. कोणत्याही स्थळीं शहरांत किरकिर, गोंगाट होऊं देऊं नका. आणि आंधळे, पांगळे, बहिरे, लुले, रोगी, वृद्ध, रक्तपितीचे व दुर्बळ अशा सर्व लोकांस रस्त्यावर येण्याची मनाई करा. याप्रमाणें राजाची आज्ञा झाल्यावर सर्व रस्ते साफ केले. आणि भिस्त्यांनीं चोहोंकडे रस्त्यांतून पाणी टाकिलें. कुलस्त्रियांनीं दाराच्या आंत उंबऱ्यावरून कुंकवाचा सडा केला. ताज्या फुलांच्या माळा करून घरास लाविल्या आणि अंगणांतील तुळशीचीं वृंदावनें चुन्यानें रंगविलीं. घराच्या भिंतींवरून नानाप्रकारचे रंग लाविले. वृक्षवेलींतून झेंडे रोंविले. मूर्तीस मुलामे देऊन साफ केलें. मोठ्या वृक्षांतून सूर्याचा प्रकाश दिसत होता. आणि बागबगीच्यांतून जीं नानामंदिरें होतीं त्यांतून देवदेवता सजवून ठेविल्या होत्या. अशा मोठ्या समारंभानें जी सुशोभित केलेली पुरी ती जणुकाय अभिमंत्रित देशाची नगरी आहे कीं काय असें वाटे. दवंडी पिटणारे ढोलकीं व थाळ्या हातांत घेऊन पुरीच्या सर्व ठिकाणीं राजाचा हुकूम फरमाविण्यास गेले. "श्रवण कराहो पौरजन, आज कोणत्याही प्रकारचा हिडीस देखावा पुरींत न दिसला पाहिजे. मुके, अंध, पंगु, रोगी, वृद्ध, दुर्बल, महारोगग्रस्त अशा लोकांनीं गांवांतून आज फिरतां कामा नये, रात्र पडून बरीच अवधी होई पर्यंत कोणीही स्मशानांत प्रेत नेतां कामा नये,

अशी शुद्धोदन राजाची आज्ञा होय, सर्वांस निवेदन व्हावें. " याप्रमाणें राजाचे आज्ञेनुसार कपिलवस्तु नगरींत जनांनीं आपलीं गृहें सुशोभित केलीं. हिमवत शुभ्र व विशाल अशा बाजिनींयुत व बहुरम्य अशा रथावर आरुढ होत्साता नगरींतून राजपुत्र मोठ्या समारंभानें जाऊं लागला. लोक ज्या मोठ्या उत्साहानें राजपुत्राचें दर्शन घेत होते तो आनंदपूर्ण देखावा ज्यांनीं नेत्रानीं अवलोकन केला असेल ते किती भाग्यशाली बरें? प्रभु सिद्धार्थही बहुत आनंदित झाला. आणि आपल्या प्रजेची सुखदायक स्थिती पाहून खरोखरच आयुष्य रमणीय आहेसें त्यास वाटूं लागलें. प्रभु बुद्ध ह्मणाला, जग मोठें रमणीय व मनोरम आहे. त्याचे मजवर मोठें प्रेम आहे असें दिसतें. आणि हे मानव यद्यपि राज्यसंपत्ति न भोगतां तथापि बहुत सुखी व आनंदी दिसतात. आणि ह्या माझ्या कष्ट करणाऱ्या प्रिय बहिणी यासाठीं मी कांहींएक न करितां त्या मजवर सर्वदा प्रीति ठेवतात याचें कारण काय? मी जर या लेकरावर प्रेम केलें तर त्यास समजेल काय? तो सुंदरसा शाक्य मुलगा ज्यानें आपले आंगावर फुलें टाकिलीं त्याला घ्या आणि तो आपल्यासह गाडींत बसून गांवांत फिरेल. मी बाह्यप्रदेशांत आज आलों एवढ्यानेंच जर या जनांस इतका संतोष व आनंद झाला, तर खचीतच सांगतों अशा लोकांवर राज्य करणें यासारखी सुखाची गोष्ट कोणतीच नाहीं. जर आमच्या या पुरींतील लोकांजवळ अक्षयी सुखी असण्याचा व हास्यमुख राहण्याचा व धनधान्यादि सुख देण्याच्या वस्तूंचा संचय आहे, तर आज आमची कोणत्या गोष्टींनीं नड पडणार आहे? बा चाणा, रथास पुढें चालीव, मोठ्या दरवाज्यांतून रथास ने आणि या सुखदायक व आनंदपूर्ण जगाचे जे जे चमत्कार मला विदित नाहींत ते अवलोकन करूं दे. राजपुत्राची आज्ञा याप्रमाणें होतांच रथास राजद्वारांतून नेलें. आनंदी पौरजन रथासभोंवार जमून त्यांपैकीं कित्येक लोकांनीं त्याच्या आंगावर पुष्पमाला घातल्या. कित्येकांनीं त्यास तांबुळ व पुऱ्या खावयास दिल्या, आणि सर्वांच्या मुखांतून "महाराजांचा जय" या शब्दांचा घोष सतत चालला होता. आणि हाच आनंदमय देखावा सर्व गांवभर होता. कारण राजाचीच अशी आज्ञा होती कीं, कोणत्याही प्रकारची कुसंस्था दृष्टीस पडूंनये. याप्रमाणें जिकडे तिकडे आनंद भरून गेलेला आहे इतक्यांत एका रस्त्यावर मोडक्याशा झोंपडींत एक मानव लपून राहिला होता. वार्धक्याच्या योगानें गलित व शक्तिहीनत्वामुळें लटलट शरीर ज्याचें हालत आहे असा एक म्हातारा माणूस त्या झोंपडींतून बाहेर पडला. आंगावरील सर्व वस्त्रांच्या चिंध्या झाल्या होत्या. नेत्रांनीं त्याच्यानें पाहवेना. अशा प्रकारची त्याच्या शरीराची अवस्था झाली होती. त्याच्या आंगचर्मास इतक्या सुरकुत्या पडल्या होत्या आणि त्याला सूर्याचा ताप लागून तें इतकें काळें झालें होतें कीं, मांसरक्तविरहित असा जो त्याचा अस्तिपिंजरा त्यास एका प्राण्याचें चर्म जणूं काय लटकाविलें आहे अशा प्रकारें वार्धक्य त्याचे आंगीं नांदत होतें.

त्याची पाठ अगदीं लवून गेली होती. त्याच्या नेत्रांच्या बुबुळांवर सर्वदा अश्रुपातामुळें मळ जमला होता आणि डोळे चिपडांनीं भरले होते. त्याचे तोंडचे दांत गेल्यामुळें तें बोळकें झालें होतें; आणि पक्षवायुमुळें त्याचें तोंड कांपत होतें; इतक्या लोकांचा जमाव पाहून व इतका आनंद पाहून तो वृद्ध मनुष्य अगदीं घाबरून गेला होता. एक हाताचे मुठींत मोडकीशी काठी लटलटणाऱ्या शरीरास आधार मिळावा म्हणून त्यानें धरली होती आणि दुसरा हात त्यानें वरगडीवर ठेविला होता. श्वासोच्छ्वास त्याला मोठ्या संकटानें घेतां येई. 'अहो ! सुजनांनो भिक्षा घाला, नाहींतर मी आज किंवा उद्यां मरून जाईन' असे तो मुखानें दीनवाणे शद्ब काढितो न काढितो इतक्यांत त्याचा घसा दाटून येई आणि शद्ब बंद होई. तथापि आपला हात पुढें पसरून नेत्रांनीं टिकटिक पाहत व उसासे टाकीत भिक्षा घाला, भिक्षा घाला असा तो शद्ब करीत असतां राजपुत्राची स्वारी त्या बाजूनें जाऊं लागली. त्या समयीं आसपास जे लोक होते त्यांनीं त्याचे हातपाय धरून त्यास एकीकडे सरकाविलें आणि त्यास ते ह्मणतात " राजपुत्राची स्वारी इकडून येत आहे तूं त्यांच्या दृष्टीस पडशील, जा आपल्या झोंपडींत जाऊन पड." अशा समयींच प्रभु सिद्धार्थाचा रथ त्या ठिकाणीं येऊन पोहोंचला. हा सर्व देखावा त्याच्या दृष्टीस पडला तेव्हां तो ह्मणाला' त्या मनुष्यास तेथेंच राहूंद्या'. आणि असें बोलून तो चाणास प्रश्न करिता झाला. बा सारथे, हा मानवासारिखा दिसणारा प्राणी कोण आहे ? तो नष्टेंद्रिय अति कुरूप व अति दुःखी असा दिसत आहे. कधींकाळीं एखादे मानवास अशा प्रकारचीच जन्मापासून स्थिति प्राप्त झालेली असते काय? उद्यां किंवा परवां माझा प्राण निघून जाईल, असा जो तो शद्बोच्चार करीत आहे, त्याचा अर्थ काय? त्याला खावयाला अन्न मिळत नाहीं यामुळें का त्याचीं हाडें बाहेर दिसतात? सारथी उत्तर करितो ' महाराज ! हा मनुष्य वयोवृद्ध आहे. सुमारें ऐशीं वर्षांपूर्वी त्याची पाठ ताठ होती. नेत्र चकचकीत होते, आणि शरीरबांधा सुरेख होता, आतां काळानें त्याचें तेज नाहींसें केलें आहे आणि त्याची शक्ति व बुद्धि हीं नष्ट करून टाकिलीं आहेत. त्याच्या आयुष्यरुपी दिव्यांतलें तेल संपून गेलें आहे. आणि आतां जी त्यांत धुकधुकी राहिली आहे ती थोडक्या काळांत अगदीं नष्ट होऊन जाईल याप्रमाणें या नरदेहाची स्थिति आहे. या गोष्टीं सध्यां मनांत आणूं नये. राजपुत्र बोलतो, चाणा, इतरांचीही अशीच स्थिति होणार काय? किंवा, बा ! ही स्थिति थोडक्यांसच येते आणि इतरांस येत नाहीं, असें आहे काय ? महाराज ! जो कोणी जन या पुरुषाइतका वृद्ध होईल त्याची दशा अशीच होणार. राजपुत्र ह्मणतो, काय ? मी जर इतका वृद्ध झालों तर मीही असाच होईन काय ? यशोधरा, जालिनी, हस्तबाल, गौतमी, गंगा आणि इतर आमचीं माणसें हीं जर इतकीं वृद्ध झालीं तर त्या सर्वांची स्थिति अशी होणार ? अशीच स्थिति होणार असें उत्तर सारथी

देता झाला. मग राजपुत्र ह्मणाला 'चल, रथास मागें परतीव आणि मला माझ्या गृहांत जाऊं दे. या अशा गोष्टी माझ्या अवलोकनांत येतील, असा मला मुळींच भास झाला नव्हता.' ह्या गोष्टीचा विचार मनांत घोळत आहे, मुद्रा म्लान झाली आहे अशा स्थितींत प्रभु बुद्ध आपल्या मनोहर भुवनांत बसते झाले. सायंकाळीं जीं जीं नाना पक्वानें भोजनास केलीं होतीं, त्यांची चव प्रभूनीं घेतली नाहीं. त्याचप्रमाणें फळफळावळ भोजनोत्तर खावयास ह्मणून जी ठेविली होती त्यासही पण प्रभूनीं स्पर्श केला नाहीं. मनोहर सुंदरींचें नानाप्रकारचें गान व वाद्य महालांत चाललें असतां वर मुद्रा करून मुळींच त्यांकडे त्यांनीं पाहिलें नाहीं व त्यांजसह भाषणही कोणत्याही प्रकारें केलें नाहीं. प्रभूचे पायाजवळ जेव्हां सुंदरी यशोधरा येऊन ह्मणाली कीं, माझ्या प्राणप्रियाला मजपासून सुख प्राप्त होत नाहीं काय ? तेव्हां मात्र प्रभूनीं या प्रकारें उत्तर दिलें. 'मत्प्राणप्रिये ! ज्या सुखाचा नाश होणार तें सुख मला तुजपासून प्राप्त होतें परंतु त्यापासून जिवास दुःख मात्र होतें; आणि सखे, यशोधरे, आपण दोघेहीजण कांहीं काळानें वार्धक्यदशेस पावूं हें तुला ठाऊक आहे काय ? आणि आपण प्रेमविरहिता, कुरूप, वृद्ध, दुर्बल व भुविनत अशीं होऊं हें तुला विदित आहे काय ? आणि जरी कदाचित् आपण प्रेमानें तोंडांत तोंड आणि आंगास आंग अशा रीतीनें दोघेजण एकमेकांस चिकटून राहिलों तथापि ज्याप्रमाणें रात्र पडली ह्मणजे पलीकडे टेंकडीवर जीं गुलाबकळीच्या रंगासारखीं किरणें दिसतात तीं जशीं शुभ्र होऊन जातात परंतु नाहींतशीं झालीं असें दिसत नाहीं, त्याचप्रमाणें सखे काळ जो आहे तो माझी भोगेच्छा आणि तुझें सौंदर्य चोरून घेऊन जाईल. अशा स्थितीप्रत आपण जाणार हें मला समजल्यापासून त्या भयानें मी फार व्याकुल झालों आहें. आणि काळ जो सर्वांस वृद्ध करितो, त्याच्या पाशजलांतून आपण जीं सप्रेम हृदयाचीं माणसें ह्यांची सुटका कशी होईल या गोष्टीच्या विवंचनेंत माझें अंतःकरण गढून गेलें आहे. पुनः पूर्वोक्त दुःखस्थितींत प्रभुबुद्ध जागरण करीत त्या रात्रीचा काल घालविते झाले. . त्या रात्रीं महाराज शुद्धोदन यांस अनिष्ट स्वप्नें पडलीं. पहिलें दुःखोत्पादक स्वप्न जें राजास पडलें तें असें. सुवर्णमय, तेजःपुंज, वैभवशाली व विशाल असा इंद्राचा ध्वज त्याच्या दृष्टीस पडला. फार प्रबळ अशा वायूच्या वेगानें दैवी ध्वजाच्या चिंध्या होऊन तो जमिनीवर पडला. नंतर अदृश्य अशा पुरुषाचा समुदाय येऊन त्यांनीं शहरच्या दरवाज्याजवळून पूर्वेकडे पडलेल्या ध्वजाच्या दोऱ्या नेल्या. दुसरें भयप्रद स्वप्न ह्मटलें ह्मणजे, रौप्यदंत धारण करणारे असे दहा हत्ती होते. दक्षिणेकडील मार्ग त्यांनीं आपल्या जोराच्या चालीनें अगदीं तुडवून टाकिला. ह्या नागसमुदायाच्या अग्रेसर नागावर राजपुत्र आरूढ होता व बाकीचे नाग त्याच्या मागून चालत होते. तिसरें भयप्रद स्वप्न ह्मटलें ह्मणजे असें होतें कीं, एक मोठा थोरला गाडा होता त्यास

[library stamp]

मंद तेज धारण करणारे असे चार वाजी जुंपिले होते. त्या वाजींच्या नासिकास्थानांतून शुभ्र धूर आणि मुखांतून अग्नीसारख्या ज्वाला निघत होत्या. ह्या अशा गाडींत सिद्धार्थ राजपुत्र बसला होता. चवथें स्वप्न या प्रकारचें होतें—एक सतत चालणाऱ्या गतीचें चक्र होतें. त्याचा तुंबा फारच चुकचकीत सोन्याचा होता आणि त्याच्या आरी रत्नजडित होत्या. त्याच्या धांवेवर कांहीं विलक्षण प्रकारचा लेख लिहिला होता. पांचवे स्वप्नाचा प्रकार असा—एक मोठा थोरला दुंदुभि नगर व टेंकडी यांच्या मध्यभागावर ठेवलेला होता. तो राजपुत्र एका लोखंडांच्या दांड्यानें इतक्या जोरानें वाजवीत होता कीं त्याचा शद्ब तिन्ही लोकांपर्यंत गेला होता. सहाव्या स्वप्नीं राजानें एक मोठा टोलेजंग मनोरा पाहिला. त्याची उंची इतकी होता कीं, त्याच्या शिखरास ढग टेंकलेला होता. त्याच्या शिखरावर राजपुत्र बसून आपल्या दोन्ही करांनीं चारी बाजूंकडे फारच सुंदर अशा रंगांचीं रत्नें तो इकडे तिकडे फेंकीत होता. त्यामुळें असा भास झाला कीं, हिरे, माणकें व पाच इत्यादि अनेक मोलवान रत्नांचा पर्जन्यच पडत आहे. सर्व देशांतून ह्या मोलवान पदार्थांचा संग्रह करण्याकरितां ह्मणून लोकांचा समुदाय एकत्र मिळून ते लोक तीं रत्नें गोळा करीत आहेत. सांतवे स्वप्नीं राजानें असें पाहिलें कीं मोठा शोकाचा गजर होत आहे. सहा मनुष्यें आक्रोश करीत आहेत, त्यांनीं आपले हात तोंडावर ठेवून ते निराश होत्साते इकडे तिकडे फिरत आहेत. राजाला निद्रेंत असे निरनिराळे दृष्टांत झाले. स्वप्नार्थ कथन करणारे जे अनेक राजाचे चतुर पुरुष होते, त्या कोणासही त्या स्वप्नाचा उलगडा करितां येईना. याउपरी राजाला क्रोध येऊन तो ह्मणाला, "काय ? मजवर जो दुःखाचा डोंगर कोसळणार आणि जो या दृष्टांतांनीं देवांनीं मला विदित केला त्याचा उलगडा करून सांगण्यास तुह्मा माझ्या सेवकांस कांहींच ज्ञान नाहीं काय ?" राजाचा दृष्टांत कोणाच्यानें उलगडून सांगवेना. एतदर्थ प्रजाही मोठी कष्टी झाली. परंतु नगराच्या द्वाराशीं एक हारेणाजिन पांघरलेला असा वृद्ध पुरुष एके समयीं जनांच्या दृष्टीस पडला. त्याचा वेष गोसाव्यासारखा असून तो कोणाच नगरवासी जनांच्या परिचयाचा नव्हता. त्याला हें वर्तमान विदित होतांच तो ह्मणाला, मला राज्याकडे न्या, मला त्याच्या दृष्टांताचा उलगडा लागला आहे. अपरान्ह रात्रीचीं हीं गूढार्थ सूचक स्वप्नें त्यास विदित झाल्यावर राजास मुजरा करून तो ह्मणाला, हे महाराज ! ह्या तुझ्या गृहास मी अभिवंदन करितों. येथून रविप्रभेपेक्षांहि कांतिमान असा प्रकाश उदित होणार आहे. पहा हीं सप्त भयप्रद चिन्हें सात अभिनंदनीय गोष्ट, आहेत. ह्यांपैकीं प्रथम ज्या दृष्टांतांत तूं भव्य व विशाळ अशी ध्वजा पाहिली व जी, इंद्राच्या चिन्हांनीं अंकित होती, जी भूमिस्थळीं पडली व जिला उचलून नेलेली तूं पाहिली तिजवरून असें जाणावयाचें कीं प्राचीन मतांचा लय होऊन नवीन मतें उप-

स्थिर व्हावयाची. जसे दिवसाचेच कल्प बनतात, तसेच मानवांचे स्थित्यंतराप्रमाणें देवदानवादिकांचेंही स्थितिमान बदलतें आणि हीच गोष्ट दर्शविण्याकरितां इंद्राची ध्वजा अशा प्रकारें पडली, व अशा प्रकारें तिला घेऊन लोक गेले. ज्या दहा नागांनीं मदोन्मत्त होऊन पृथ्वी कंपायमान केली, त्यावरून असें समजावें कीं, ज्ञानविज्ञानाचे जे दहा गुण, त्यांनीं राजपुत्र विराजमान व बळवंत होत्साता आपल्या संपत्तीचा त्याग करील आणि सत्याच्या स्वीकारानें वसुंधरेस कंपायमान करील. अग्निज्वाला मुखांतून निघणारे रथाचे वाजी, ते, ज्या चतुर्गुणिकरून तुझा पुत्र संशय व अज्ञान सोडून सुखदायक प्रकाशमय ज्ञानाप्रत येईल, त्याचें दर्शक चिन्ह ज्या रथचक्राचा तुंबा तेजस्वी व सुवर्णमय होतातें चक्र होय. जो विशाळ डंवरू राजपुत्रानें वाजविला, त्याचा अर्थ असा कीं प्रभु जो नियमशास्त्राचा उपदेश करील त्याचा मेघगर्जनेप्रमाणें सर्व पृथ्वीवर प्रसार होईल. जो मनोरा तुला गगनचुंबित असा दिसला त्याचा अर्थ असा कीं शुभवर्तमान त्याप्रमाणें फैलाव पावेल. शिवाय त्या मनोऱ्याच्या शिखरावरून जीं मुक्ताफळें आसमंत् भागीं विखरलीं तीं त्या नियमशास्त्राचा अर्थनिधि होत. हा अर्थनिधि देव व मानव या सर्वांस प्रिय होणार आहे. याप्रमाणें त्या स्वप्नाचा अर्थ होतो. तसेंच तूं सुखस्तंभ खरे पण—क्रुद्ध न झालेले असे जे महाजन अवलोकन केले ते सहा गुरू मुख्य आचार्य होत. तुझा पुत्र त्यांच्या पदरीं त्यांचा वेडेपणा घालील. हे राजा! आनंदोत्सव कर, माझा प्रभु युवराज याचें सुभाग्य राज्यप्राप्तीपेक्षां मोठें आहे. आणि याचीं फाटकीं अशीं वस्त्रें हीं सोन्याच्या वस्त्रापेक्षांही बहुमोलाचीं आहेत. हेंच तुझें स्वप्न होतें. आणि हा सर्व प्रकार सात रात्रींमध्यें घडून येईल. याप्रमाणें तो महापुरुष बोलता झाला. त्याचें भाषण संपतांच त्यानें राजास साष्टांग नमन केलें आणि तो आला तसाच परतला. नंतर त्यास देणगी देण्याकरितां म्हणून परत आणावयास जासूद पाठविले. परंतु दूत त्याच्या मागें जाऊन परत येऊन म्हणाले, आम्ही त्यास चंद्राचे मंदिरीं जातांना पाहिलें, आणि त्या ठिकाणींच आम्ही गेलों परंतु आंत पाहतों तों कोणी नव्हतें. एक घुबड मात्र इकडून तिकडे उड्या मारीत होतें. याप्रमाणें देव कधीं कधीं पृथ्वीवर संचार करितात परंतु त्या दुःखी राजाला मोठा चमत्कार वाटला, आणि त्यानें सिद्धार्थ राजपुत्राचें अंतःकरण विशेष पाशांत व मोहांत पडावें एतदर्थ त्या राजमंदिरीं म्हणजे ज्या ठिकाणीं कलावंतिणीचे ताफ्यांचें नृत्य व गायन अहोरात्र होत होतें, त्या स्थळीं विलासाचे दुसरे नवीन प्रकार ठेवण्याविषयीं आज्ञा केली. तसेंच पितळेच्या द्वारावर त्यानें पहारेकऱ्यांची दुसरी एक चौकी ठेवली. तथापि ब्रह्मलिखितापुढें कोणाचा पगडा चालणार? पुनरपि एकवार राजपुत्राचे मनांत आलें कीं, आपण ह्या बंदिशाळेच्या बाहेर जाऊन मानवदेहाचें जें सुख तें पहावें आणि त्याचा अंत केवळ कालरुपी निबिड व निर्जन अशा प्रदेशांत होतो कीं काय हें पहावें! कृपा क-

रून मला आपली पुरी कशी काय आहे, ती पाहूं द्या. एवढें मात्र करा कीं त्यांत कोणत्याही प्रकारची अदलाबदल न व्हावी. तर जशी तिची रचना आहे व जसे तिचे राहिवाशी नित्यशः कालक्रमण करितात तशा नित्याचे स्थितींत मला ती पहावीशी वाटते. याप्रमाणें युवराजानें शुद्धोदनास प्रार्थना केली. महाराजांनीं ममतेनें पूर्वीं लोकांस अशी वर्दी दिली होती कीं, रस्ते, गल्ल्या व घरें संस्करून लोकांनीं आनंदित अशा मुखांनीं युवराजास भेटावें आणि हेंदर जितकें असेल तितकें काढून टाकावें. तथापि माझे ऐकण्यांत असें आलें आहे कीं हा नित्यक्रम नाहीं; हे पितृराजा, जर मी आपल्यास प्रिय आहें, आणि राज्याचा जर वारसदार आहें, तर लोकांचा नित्यक्रम पहाणें अवश्य आहे. ते कोणते उद्योग धंदे करितात व उपजीविका कष्टानें किंवा सुखानें करितात हें सर्व मला समजलें पाहिजे. हे पित्या, लोकांची साधारण स्थिति कशी आहे ह्याचें अवलोकन मला करूं दे. आणि असा फेरफटका करून आलों कीं व सुखदुःखाचें ज्ञान करून घेतलें ह्मणजे संतोषानें आपल्या सुखाच्या वस्तीप्रत येईन. आणि यदाकदाचित् संतोष जरी पावलों नाहीं तरी प्रज्ञ तरी होईन, ह्मणून हे राजा, सेवकांसह प्रातःकालीं शहर व नगरवासी लोकांमधून मला जाण्याची आज्ञा व्हावी. कदाचित् ह्या दुसऱ्या पुर्यभिनिवेशानें पुत्र शाहणा होईल. माझ्या पुत्राला सर्व देशावलोकन करूं द्या आणि अवलोकनानंतर त्याचे मनांत कसे तरंग उठतील हें मला विदित करा. असें राजा आपले सचिव जनांस बोलता झाला. असो. याप्रमाणें राजपुत्र आणि चाण प्रातःकालीं दुसरे दिवशीं बाहेर प्रयाण करिते झाले. त्यांच्याजवळ राजमुद्रा असल्यानें द्वारपालांनीं द्वारें उघडलीं. राजपुत्रानें वणिकजनाचा वेष धारण केला होता. त्यामुळें द्वारपाळास हे कोण आहेत असें समजण्यांत आलें नाहीं. पायरस्त्यानें शाक्यजनांत मिसळून ते सर्व नगराभोंवतीं प्रयाण करिते झाले. आणि अशा प्रकारानें जनांच्या सुखदुःखस्थितीचें त्यांनीं अवलोकन केलें. मार्गांतून दोनप्रहरीं लोकांची दाटी आहे. वणिकजन नानाप्रकारचे विक्रय करण्याचे पदार्थ घेऊन मांडीवर मांडी घालून बसले आहेत. उपवस्त्राच्या पदरीं द्रव्याची पुरचुंडी बांधली आहे, व दुकानो दुकानीं पौरजन पदार्थांचा क्रय करण्याचे गडबडींत फिरत आहेत. कित्येक लोकांची भाव ठरविण्याची गडबड चालली आहे. आणि पैस पैस असा ध्वनि सारथ्यांच्या मुखांतून निघत आहे. तसेंच खटाऱ्यांच्या दगडी चाकांचा गजर, वृषभांची मंद मंद गति, व खटाऱ्यांत कर कर आवाज करणारें असें लादलेलें ओझें, त्याचप्रमाणें गाणें गाणारे भोई आणि ऐन उन्हांत घामोघाम झालेले असे रुंद मानेचे हमाल लोक व कुपांतून आणलेल्या उदकानें पूर्ण असे मोठमोठाले डोईवर घेतलेले हंडे, व कडेवर ज्यांनीं आपलीं बालकें घेतलीं आहेत अशा गरती स्त्रिया, माशांनीं भरून गेलीं आहेत अशीं मिठाईचीं दुकानें, विणकरी आपला माग घेऊन बसलेला आहे. तसेंच पिंजारी आपले पिंजे

घेऊन रस्तोरस्तीं वाजवीत फिरत आहेत, तसेंच जात्याच्या तळीवर भरडा घालून पीठ बायका दळीत बसल्या आहेत, कुत्रीं उकिरड्यावर उच्छिष्टासाठीं एकमेकांवर भोंकत आहेत, तसेंच शिकारी लोक आपलीं लोखंडी काट्याचीं चिलखतें घालून शिकारीस जाण्यास निघालें आहेत, तसाच लोहार कुऱ्हाड, कुदळ वगैरे जिनसा भट्टींत घालून तापवून लालभडक करीत आहेत, त्याचप्रमाणें पाठशाळेंत बालकें आपल्या गुरूसभोंवार अर्धचंद्राकार असा वेटाळा घालून बसलीं आहेत, व मंत्रघोष करीत आहेत, व सामान्य व महान् अशा देवांचीं नांमें पठण करीत आहेत, रंगारी नानापरींचे रंगाचीं पातळें, पागोटीं वाळवीत उभे आहेत, त्याचप्रमाणें सैनिकजन आपल्या तरवारी इकडे तिकडे फिरविण्याचा अभ्यास करीत आहेत, रस्तोरस्तीं मोठ्या ताठ्यानें चालणारे असे ब्राह्मण, शूर असे क्षत्रिय व कष्टकरी असे शुद्र, अशा लोकांचा समुदाय दृष्टीस पडत आहे, गारुडी सापांचा खेळ करीत आहेत, तेच फण्यानाग हातीं घेऊन त्यास आपल्या आंगावरून सर्व लोकांसमोर चढूं देत आहेत अथवा त्यास चेतवून त्यांकडून फूं फूं करवीत आहेत, तथापि मंत्र सामर्थ्येंकरून आम्ही त्यास आपल्या कह्यांत ठेवितों असा चमत्कार जमलेल्या तमासगीर लोकांस दाखवीत आहेत; दुसरीकडे नवरानवरींची वरात, ताशामरफा, मशाली व वाजंत्री व वऱ्हाडी व्याही व विहीणी शोभायमान केलेले असे तुरंग यांसह येत आहेत, तसेंच कांहीं गरीब साध्वी पतिव्रता आपला पति देशांतराहून सुखरूप यावा म्हणून एखाद्या जाज्वल्य मानलेल्या देवाकडे घृतदीप अथवा तैलदीप घेऊन जात आहेत, कोणी देवा, मला पुत्र होऊंदे म्हणून देवास नवस करण्याकरितां जात आहेत; असे नानाप्रकारचे देखावे पहात पहात, वेशीबाहेर ज्या ठिकाणीं कुंभकार आपलीं मृत्तिकाभांडीं करितो तिकडे ते वळले. तेथून निघून तांबट आळींतून वाटेवरचीं नानाप्रकारचीं देवालयें पहात पहात शहरच्या तटापलीकडे धरणावरून नदीकडे ते दोघे असामी येऊन थडकले. तेथून ते प्रयाण करण्यास निघणार इतक्यांत रस्त्याच्या एका बाजूकडून ‘अहो सज्जन जनांनो, मला उठून उभे राहण्यास साह्य करा, नाहींतर मी घरीं जाऊन पोहोंचण्यापूर्वींच मरण पावेन’ असा दीनवाणा शब्द त्यांनीं ऐकिला. ज्यानें असा दुःखोद्गार काढिला तो फार दुर्बल जन होता. वार्धक्यानें ह्याच्या शरीरांत कांहींच जीव राहिला नव्हता, तें लटलटा कांपत होतें. आणि हा दीनवाणा असा होऊन मातीमध्यें लोळत पडलेला होता. व्यथेनें तो गांजून गेला होता, व त्याच्या आंगावर कांहीं काळेंढिद्रे फोड आलेले होते. भिवयांवरून सतत घामाच्या धारा चालल्या होत्या. तोंड वांकडें झालें होतें आणि त्याचे नेत्र आक्रोश करून करून फार वाईट झालेले दिसत होते. त्यावरून असें वाटे कीं ते मोठा चिंताग्रस्त होता. धांपा टाकीत टाकीत त्यानें जवळच्या काटकुटक्याच्या आश्रयानें उभें रहावें आणि अर्धा उभा राहतो न राहतो इतक्यांत मोठ्यानें ओरडोंरे व ह्या-

मराठी ग्रंथ संग्रहालय

णावें अरे रे ! देवा ! किती हें दुःख मी सोसावें ! अहो जनहो, दुर्बलांस साह्य करा. असा हा दीनवाणा शब्द सिद्धार्थानें श्रवण केल्यावर तो त्याजकडे धांवून गेला, त्या दुःखी मनुष्यास त्यानें आपला कोमल हस्त देऊन उठविलें आणि आपण तसाच खालीं बसला, व त्यालाही खालीं बसवून त्याचें डोकें मोठ्या ममतेनें आपल्या मांडीवर ठेविलें, आणि त्याची विचारपूस करूं लागला. तुला कोणती व्यथा झाली आहे, तुला उठवत कां नाहीं, तुझ्यावर कोणतें संकट येऊन पडलें आहे, तें सांग. अरे, चाणा, हा असे दुःखोद्गार कां काढितो; ह्याच्यानें बोलवत कां नाहीं ? सारथी उत्तर करिता झाला. हे महाराज ! ह्या मनुष्याला कांहीं व्यथा झालेली आहे. त्यामुळें त्याच्या शरीरांतलीं पंचमहाभूतात्मक तत्वें खवळून गेलीं आहेत. त्याच्या शरीरांतलें रक्ताचें अभिसरण आजपर्यंत चांगलें चालत होतें. परंतु आतां अभिसरणाच्या रक्तवाहिन्या नीट चालत नाहींत. त्याचें काळीज जें आजपर्यंत सुरळीत चाललें होतें, त्याच्या गतींत आतां अगदीं बिघाड झालेला आहे. धनुकोटी ज्याप्रमाणें मोकळी सोडल्यावर ढिली पडते त्याप्रमाणें त्याचे स्नायु अगदीं निर्जीव झाले आहेत. त्याच्या मांडींत, कंबरेंत बळ असें तिलप्राय राहिलें नाहीं. आणि तारुण्याची जी शोभा व जो आनंदीपणा असावा तो निर्मूल नाहींसा झाला आहे. ह्याला फेंपरें आलें आहे. पहा तो आंगास कसे आळेपिळे देत आहे. त्याचे डोळे पहा कसे रक्तबंबाळ झाले आहेत. आणि दांत पहा इकडे कडकड वाजवीत आहे. आणि त्याचा घसा गुदमरून गेल्यामुळें त्याच्यानें श्वासोछ्वास सुद्धां घेववत नाहीं. पहा तो कसा मरणोन्मुख झालेला आहे. परंतु रोग आपला अंमल पूर्णपणें बसविल्यावांचून आणि त्याला पिळून काढिल्यावांचून तो त्याला मरूं देणार नाहीं. आणि याप्रमाणें त्यास गांजून घेऊन तो बेशुद्ध होऊन वेदनातीत झाला ह्मणजे प्राण त्याच्या देहांतून निघून जाईल. ह्मणजे ह्या रोगाची स्वारी दुसऱ्या एखाद्या कुडीला पीडा देण्याचें मांडील ह्मणून महाराज त्याला असें धरून काय उपयोग आहे ? कारण व्यथा त्याला सोडून आपणास बाधेल. त्या माणसास तसेंच हातांनीं धरून व त्याचें समाधान करीत असा आपला प्रभु सारथ्यास प्रश्न करिता झाला. याप्रमाणें व्यथित असा जन इहलोकीं पुष्कळ आहे काय ? आणि सौंगड्या, माझी सुद्धां अशी स्थिति होणार काय ? सारथि ह्मणाला, महाराज, अशी स्थिति अनेक प्रकारें मनुष्यास प्राप्त होते. कोणी वातरोगानें पीडिलेला असतो, कोणास महारोगाची व्यथा असते, कोणी दुःखसमुद्रांत बुडून गेलेला असतो, कोणी ताप, हिंव इत्यादि रोगांनीं ग्रस्त असतो, मिळून काय कोणाही प्राण्याला ह्या देहीं सुखस्थितीचा अंश असा पूर्णपणें मिळत नाहीं. राजानें पुन्हा अशी पृच्छा केली कीं काय अशा व्यथा मानवांस सतत् प्राप्त होतात काय ? होय सख्या राजपुत्रा, जसा दडून साप येतो, नकळत दंश करून नाहींसा होतो; अथवा मारेकरी जसा

झाडींत जंगलांत लपून राहून दडून पांथस्थाचा जीव घेतो अथवा विद्युल्लतेमुळें क्षणांत देशांतील एखाद्या प्रांताचा नाश होतो व दुसरा बचाऊन जातो तद्वत, हे राजा, हे व्याधि आणि रोग, अकस्मात येऊन मानवांवर हल्ला करितात. मग सदा मनुष्याचें आयुष्य याप्रमाणें धोक्यांत आणि काळजींत असतेंना? होय, राजपुत्रा, तसेंच तें असतें. कोणाच्यानें असें ह्मणवणार नाहीं कीं मी आतां सुरक्षित निजतों आणि अशाच सुखानें उठून उद्योगास जाईन आणि जीं संकटें व व्यथा मानवास प्राप्त होतात, त्याचाच हा शेवट कीं देहाची अशी दुःखमय स्थिति होते. मनुष्य जर इतके काळपर्यंत वांचेल तर त्याचा देह असाच दुर्बळ व व्याधिपीडित होणार बरें राजपुत्रा ! ! ! बरें, चाणा ! ह्या व्याधीची व्यथा कोणाच्यानें सहन झाली नाहीं; अथवा ती सहन न करावी ह्मणून जर कोणाच्या मनांत त्याचा शेवट करण्याचा विचार आला अथवा हा जसा अपंग आहे त्याप्रमाणें जर त्यानीं यातना सहन केल्या, आणि याप्रकारें सहन करून दिवसानुदिवस तो अधिक दुर्बल होत गेला, तर त्याचा परिणाम काय शेवटीं होणार? राजा ! तो मरण पावतो. “ मरण पावतो ह्मणजे काय? ” सर्वांचा अंत करणारा असा मृत्यु होय. केव्हां तरी व कसा तरी तो सर्वांस प्राप्त होतो. थोडेबहुत लोक वयोवृद्ध होऊन मरण पावतात व कांहीं व्यथेनें पीडिले जाऊन मरतात. परंतु मरण हें सर्वांस आहे. त्यापासून कोणाची सुटका नाहीं ! तें पहा प्रेत तिरडीवर येत आहे. नंतर सिद्धार्थानें आपले नेत्र वर केले. आणि पहातो तों वाळवंटावर रडत रडत मोठ्या गर्दीनें कांहीं लोक जातांना त्यानें पाहिले. सर्वांच्यापुढें जो मनुष्य चालला होता त्याच्या हातांत एक शिंकाळी होती, त्यांत प्रेतविधीच्या संस्कारार्थ अग्नि ठेविलेला होता. प्रेत एका तिरडीवर ठेविलेलें होतें. त्यास चार माणसांनीं चोहोंकडून खांदा दिला होता, त्याच्यामागें इष्ट मित्र श्रीराम जयराम जयजयराम असें ह्मणत चालले होते. सर्व लोकानीं क्षौर केलेला होता. त्या तिरडीवर लाकडासारखें निर्जीव, निस्तेज प्रेत होतें. जेथे चौर रस्ते येत तेथें त्यांनीं खांदे बदलून पुन्हा मोठ्यानें रामराम ह्मणून नदीकडच्या मार्गाची वाट धरावी. वाळवंटावर आल्यावर त्यांनीं प्रेत तिरडीसकट पाण्यांत नदीच्या कांठीं ठेविलें आणि नंतर चिता रचून तिजवर त्यास ठेविलें. आणि चार कोंपऱ्यास अग्निस्पर्श करून पूर्णपणें प्रेत दहन होईपर्यंत त्या ठिकाणीं वाळवंटावर त्या मृत माणसाचे, बरोबर आलेले लोक गुण गात बसले. “ जनन झालेल्या प्राण्याचा असा कां शेवट होतो? ” असें राजपुत्र बोलता झाला. चाण प्रत्युत्तर करितो. तो चितेवर ठेविलेला माणूस, ज्याचें आतां कांहींही उरलें नाहीं तो जिवंत असतां आनंदानें खात पीत होता. आणि आपल्या जिवास कोणत्याही प्रकारें धका लावूं देत नसे, आणि अशा प्रकारें त्याची कालक्रमणा चालली असतां ज्याचा मागमूस मुळींच नाहीं, असा कोणत्या तरी प्रकारें ये-

ऊन मग सावी ठेंच ह्मणा, किंवा तळ्याच्या पाण्यांत कांहीं एक रोग होऊन ह्मणा, अथवा वरावरून कौल पडलें ह्मणा, अथवा सर्पदंश किंवा खिळा पायांत गेला ह्मणा, किंवा थंडी झाली ह्मणा, या प्रकारांपैकीं एक प्रकार होऊन तो माणूस मरण पावला. आणि आतां त्यास भूक नाहीं, तहान नाहीं, दुःख नाहीं, आनंद नाहीं; त्याचें चुंबन घेतलें असतांही त्यास आनंद कांहीं नाहीं अथवा विस्तवानें तो पोळत नाहीं. त्याचें मांस जे अग्नींत भाजत आहे, त्याचाही त्याला भास होत नाहीं अथवा चंदनाचीं लांकडे जीं चितेंत जळत आहेत त्यांचा त्याला सुवास नाहीं, त्याचें कर्णेंद्रिय नष्ट झालें आहे; दृष्टि अंध झाली आहे. रसनेंद्रियाची चव नाहींशी झाली आहे. ज्यांच्यावर तो प्रीति करीत होता, ते आतां त्याजविषयीं शोक करीत आहेत. परंतु सर्व मिथ्या आहे. ज्या देहावर त्यांची प्रीति होती त्याचा या प्रकारेंच नाश केला पाहिजे नाहींतर किडे जंतु हे त्या शरीरास भक्षण करून टाकतील. या प्रमाणें देहधारी जनाचा शेवट होतो. थोर व लहान, सुवृत्त व कुवृत्त या कोणास मरणानें सोडिलें नाहीं. आणि असें ह्मणतात कीं, ह्या देहाचा त्याग झाल्यावर, प्राणि पुनर्जन्म धारण करितो. कोठें व कसा ह्याविषयीं अगदीं अज्ञान, आणि पुनः देह धारण केल्यावर याच प्रकारें यातना, वियोग, आणि जळती चिता हा मृत जनाचा चौऱ्यायशीं योनींचा फेरा. इकडे सिद्धार्थ राजपुत्र हा सर्व चमत्कार पाहून एकसारखा खालीं वर पाहूं लागला. त्याचे नेत्र दुःखाश्रूनें भरून गेले. ह्या दुःखसागरांत बुडून गेलेल्या धरणीची त्यास अत्यंत दया आली आहे. एकदां आकाशाकडे त्यानें नजर फेकावी व एकदां पृथ्वीकडे अवलोकन करावें. जणू काय कांहीं एखादी गोष्ट हरपून गेली होती, तिच्या शोधास त्याचें मन गुंतून गेलें आहे. तथापि त्याच्या त्या दृष्टीवरून एवढा भास होई कीं वस्तु प्राप्य आहे, आटोक्यांत आहे व माहितीची आहे; परंतु आधुनिक कालीं मात्र ती कोठें दृष्टीआड झाली आहे. अपरिमित अशा प्रेमानें अंतःकरण सद्गदित झालेलें आहे, मुद्रा अवाच्य अशी तेजःपुंज झाली आहे, असें असतां ह्या दुःख स्थितींतून जनोद्धार होणार ह्याविषयींचा जो त्याचे मनांत प्रमोद आला त्यासरसा तो येणेंप्रमाणें बोलता झाला. हे दुःखमय संसार! अहो बांधवजन, तुह्मां कित्येकांस मी जाणतों, व कित्येकांस जाणत नाहीं; मरण आणि शोक, या दोघांची सांगड घालणारा, जो आपला प्राण, त्याच्या जाळ्यांत आपण सांपडलों आहों. या पृथ्वीस किती यातना भोगावी लागते याचा मागमूस मला लागला. येथील आनंद ह्मणजे किती निरर्थक आहेत, येथील उत्तमोत्तम आनंद यांनीं मानवांचा खेळ कसा मांडिला आहे; व त्यांस फसविण्यांत त्यांनीं कसा डाव मांडिला आहे; त्याचाही मला अनुभव आला आहे; आणि आनंद प्राप्त होण्याकरितांही मानव कशी हाडांचीं काडें करितो, व किती काळजी वाहातो याचाही अनुभव आला आहे! ह्या

आनंदाचा ज्या अर्थी शेवट दुःखांत, तारुण्याचा वार्धक्यांत, प्रेमाचा वियोगांत, देहधारणाचा देहांतांत, आणि या मरणाचा पुनरपि या चौऱ्यायशींच्या फेऱ्यांत आणि अशा रीतीनें भुलथाप देणारा आनंद व यातना देणारें दुःख यांच्या जुवास भवितव्यता जणू काय मानवांस पुनः पुनः जुंपीत आहे. मी सुद्धां या अभिलाषास भुललों होतों. आणि या संसारांत संसारसुखाचा उपभोग घेत राहणें हें मोठें चित्तवेधक वाटे. संसार ह्मणजे एक नदीचा ओघ ज्यावर सूर्याची किरणें पडलीं आहेत व जो मोठ्या शांतपणानें वाहत आहे व अशा आनंदांतच आपण सदा सर्वकाल राहूं असा मला खोटा भास झाला होता, परंतु अनुभवांतीं समजून आलें कीं, हा संसाररूपी नदीचा ओघ आपली खळखळ, मैदानांतून मंदपणें कमी करित करित, शेवटीं त्या दुष्ट व लवणवत् मृत्युरूपी सागराकडेस जातो. ज्या पडद्यानें आजपर्यंत माझी दृष्टि अंध केली होती, तो आतां फाटून गेला आहे. हीं निराश्रित मनुष्यें जीं आपल्या देवतांचा संकटसमयीं धांवा करितात आणि ज्यांच्या विनवण्या कोणीही ऐकत नाहींत अथवा जर कोणी ऐकणार असला तर जो त्यांच्याकडे दुर्लक्ष्य करितो. ह्या दुर्बल माणसांपैकींच मी एक माणूस आहें. ह्या आह्मा अनाथांस, कांहींतरी आश्रय असलाच पाहिजे. हे आह्मी दुःख कसेंतरी करून निवारावें ह्मणून आह्मास साह्यदाता कोणी तरी असावा नाहीं बरें ? अथवा ह्या देव आणि देवता यांलाच आश्रयाची गरज लागत नाहींना ? इतके तर ते दुर्बळ नसतील ना ? अशी गोष्ट असल्यास कष्टी आणि शोकार्त मनुष्यास साह्य त्याच्यानें देववणार नाहीं. मला जर दुःखी आणि कष्टी मनुष्यास साह्य देण्याचें सामर्थ्य असतें तर त्यास मी क्षणभरही रडूं किंवा कण्हूं दिलें नसतें. जगाची उत्पत्ति करून त्यांस संकटांत पडूं देणें असें ब्रह्मदेव करील काय ? कदापि नाहीं. सर्व समर्थ जर तो असें करितो तर तो सुष्ट नाहीं; आणि असें जर मानिलें कीं, तो सुष्ट परंतु सर्व सामर्थ्य त्याच्या आंगीं नाहीं तर तो देव कशाचा झाला. बा ! चाणा घरीं चल ! मी धायलों. अवलोकन करून माझ्या नेत्रांची तृप्ति झाली.

ह्या सर्व गोष्टींचा वृत्तांत पितृ राजाच्या श्रवणीं येतांच त्यानें दोन पाहऱ्याच्या ठिकाणीं तीन पाहरे ठेविले. आणि पाहरेकऱ्यास सक्त ताकीद दिली कीं दिवसां अथवा रात्रीं माणसास आंत जायचें नाहीं किंवा वाड्याच्या बाहेर निघावयाचें नाहीं. स्वप्नाच्या सप्त रात्री लोटून जाईपर्यंत ही आज्ञा अंशमात्र सुद्धां उल्लंघन व्हावयाची नाहीं. असा राजानें सक्त हुकूम शिपायांस देऊन ठेविला.

## तृतीयोध्याय समाप्त.

# चतुर्थोऽध्याय.

ज्या काळीं नियमित दिवस पूर्ण झाले आणि प्रभूची संसारत्यागाची घडी भरून आली त्या काळीं सुवर्णमंदिरीं फारच मोठा आकांत झाला. परंतु जीवनधारी जनांस उद्धारमार्ग मोकळा झाला. या महाभिनिष्क्रमणाची कथा जो प्राणी श्रवण करील तो या चौऱ्याशींच्या फेऱ्यांतून मुक्त होईल.

या भारतवर्षांत चैत्र शुद्ध पौर्णिमेचें चांदणें फारच मनोरम आणि आल्हाददायक असतें. ते समयींच आम्रवृक्षांचीं फळें रक्तवर्ण होतात. अशोकवृक्षाच्या पुष्पबहारानें वायु परम सुवासिक होतो. रामजन्मदिन ह्याच समयास येतो. ऋतुमहात्म्यानें वनोवनीं व नगरोनगरीं आनंदाचा बहर असतो. जलाशय, पर्वत, मैदान व रमणीय भूमिका व या सुवर्ण मंदिराचे गगनचुंबित असे मनोरे यांजवरून या समयीं एके दिवशीं चंद्रप्रकाश पडला असतां ह्या विश्रामवनाची रमणीयता व शांतता फारच अनुपमेय व शोभायमान भासलीं. या स्थळीं या समयास कोणत्याच प्रकारचा ध्वनि श्रवणीं येत नसे. मधून मधून 'मुद्रा दाखवा' 'मुद्रा दाखवा' असे सैनिकाच्या मुखांतून निघालेले शद्ब, तसेंच अंगण ह्मणून जो त्याचा जाब होता त्याचा ध्वनि, तसेंच सैनिक लोकांच्या नगाऱ्याचा आवाज, कोल्ह्याची कुई, रातकिड्याचा सतत चालणारा किरकिर शद्ब यांखेरीज कोणत्याहि प्रकारचा अन्यशद्ब श्रवणीं या समयीं येत नव्हता. मंदिराच्या आसमंत भागीं सर्व दूर सामसूम झालेलें होतें.

मंदिरांतील भूमिका चित्रविचित्र पाषाणांनीं मढविलेली असून भिंतींवर मौक्तिक मिश्रित चुन्याची सफेती दिलेली होती. चंद्राचीं किरणें त्या चित्रविचित्र भूमिकेवर पडलीं ह्मणजे ती भूमिका पाचूंची केलेली आहे काय असा भास होई. मध्यरात्र असल्यामुळें तत्स्थानवासी सुंदरीजनास गाढनिद्रा लागून गेली होती. जर ह्यावेळेस त्यांच्याकडे कोणी पाहिलें असतें तर त्यांतील प्रत्येकींत सौंदर्यातिशयता नांदत आहे असा त्याला भास झाला असता. जवाहिऱ्याच्या दुकानीं गेलें ह्मणजे एकाहून एक वरचढ अशीं रत्नें दृष्टीस पडतात व पाहणाऱ्यास तेथून निघण्याची सुद्धां इच्छा होत नाहीं, तद्वतच ह्या सौंदर्यरूपी बहाराची नेत्रांस शोभा दिसल्यावर कोणाचीहि तें स्थळ सोडून जावें अशी इच्छा झाली नसती. असो. निद्रेच्या भरांत ह्या स्त्रिया होत्या ह्मणून त्यांचीं नाजुक व मोहक शरीरें अस्ताव्यस्त पडलेलीं होतीं. गौरवर्ण असे त्यांचे अवयव कांहीं झांकलेले व कांहीं उघडे असे दिसत होते. गुळगुळीत व लकलकीत अशा त्यांच्या केशपुंजाच्या नानाविध प्रकारांनीं वेण्या घातलेल्या होत्या. कित्येकांच्या बुचड्यांत पुष्पमाला घातलेल्या होत्या. पक्षी जसे दिवसभर मधुर गायन करून व आपल्या मादीवर प्रेम करून करून रात्रीं श्रमी होऊन जातात व नंतर आपलें

डोकें पायांत घालून स्वस्तपणें विश्रांति घेतात व प्रातःकाळ झाला ह्मणजे पुनरपि गेल्या दिवसाचा व्यापार आरंभितात तद्वतच येथील स्त्रियांची अवस्था होत असे. त्या दिवसभर श्रम करून रात्रीं अशा गाढ निद्रेनें आपल्या दिवसाच्या श्रमाचा परिहार करीत. असो; याप्रमाणें त्या मंदिरांतील स्त्रिया ह्या प्रसंगीं निद्रासुखांत बुडून गेल्या होत्या.

मंदिरांत जे उत्तम अशा रुप्याचे दिवे रुप्याचे सांखळ्यांनीं टांगिलेले होते त्यांतील जळणाऱ्या तेलाचा सुगन्ध यावेळीं चोहोंकडे पसरून गेलेला होता. ह्या दिपांचा प्रकाश चंद्रकिरणामुळें अगदीं निस्तेज झालेला होता. त्यामुळें दम घेतांना हालणाऱ्या ह्या स्त्रियांच्या उरस्थळांची फारच शोभा दिसे. कित्येकांचे मुखचंद्रमे गौरवर्ण होते व कित्येकांचे कृष्णवर्ण होते. तोरणासारख्या शोभायमान ज्यांच्या भिवया, पोवळ्याच्या माळेसारखे लाल लाल भडक ज्यांचे ओष्टद्वय, शुभ्र व तेजःपुंज ज्यांची दंतपंक्ति, मऊ व काळसर अशा ज्यांच्या पापण्या, गालावर पडलीं आहेत अशीं ज्यांच्या केसांचीं झुलपें, अंमळ इकडे तिकडे हालचाल केली कीं मोठा शब्द करणारीं अशीं ज्यांच्या पायांतील घुंगरें, राजपुत्रानें देऊं केलेल्या देणग्यांचीं स्वप्नें ज्यास पडत होतीं, अशा प्रकारचा स्त्रीजन त्या मंडपांत ह्या वेळीं निद्रित झाला होता. ह्या समूहापैकीं एके स्त्रीजवळ वाजविण्याचा विणा समीपभागीं तसाच्यातसाच पडला होता. प्रभूस गायनानें निद्रा यावी या हेतूनें गान करीत असतांच ती आपण स्वतःच निद्रित झाली. तिच्या जवळच दुसरी एकजण हरिणास गुलाबाच्या पाकळ्या चारीत बसली अशी असतां हरिण व ती दोघेंजण निद्रा पावतीं झालीं. गुलाबाचें फूल कांहींसें हरिणाच्या तोंडांत व कांहींसें त्याला चारणाऱ्या स्त्रियेच्या मोकळ्या हातांत राहिलेलें होतें. तसेंच दुसऱ्या बाजूस दोन मैत्रिणी मोगऱ्याच्या कळीचे हार गुंफतां गुंफतांच झोंपी गेल्या. दोघीजणी अगदीं चिकटून निजल्या होत्या. एकीमेकीचे हात एकीमेकींच्या गळ्यांत होते. एकीनें आपलें डोकें फुलांच्या कळ्यांवर ठेवून ती तशीची तशीच निजली होती; दुसरीनें आपलें मस्तक आपल्या मैत्रिणीच्या अंगावर ठेवून तिचे कोमलांगाचीच उशी केली होती. तिसरी एकजण रत्नांचा हार करितां करितां तशीच निजून गेलेली होती. हिरा, माणिक, पाच चंद्रचकोर अशीं नानामौल्यवान रत्नें गुंफायाचीं तशींच तेथें पडलीं होतीं. गुंफलेल्यांचा अर्धा हार तिच्या मणगटांत राहिला होता त्यामुळें तिच्या हाताची शोभा मात्र फारच रमणीय दिसे. ती मेरुमणी पांचेचा करणार होती. त्याजवर फार बारीक काम केलेलें होतें. देवदेवांचीं चित्रें व वेदवाक्यें त्याजवर खोदलेलीं होतीं. मंदिरांतील झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्याच्या मधुर शब्दानें त्यास चटकन निद्रा लागून चित्रविचित्र सतरंज्यांवर ह्या गुलाबकळीसारख्या कोमल बालिका दिवस केव्हां उगवेल याची वाट पहात जणूं काय मिटून गेल्या होत्या. राजपुत्राच्या रंगमहालाच्या बाहेरच्या खोलींत हा सुंदरीजन निद्रायमान

झाला होता. अंतरभागीं सौंदर्याच्या जणूं काय खाणी व प्रशान्त व प्रेमळ अशा या मंदिराच्या धनिणी ह्मणजे गंगा व गौतमी या निजल्या होत्या.

या रंगमहालाचा पडदा लाल व निळे रंगांच्या भरजरी कापडाचा बनविलेला होता. तो चंदनाच्या लाकडाची कमान केली होती त्याला टांगिलेला होता. या स्थळीं उंच असें चंदनी लांकडाचें सिंहासन केलें होतें. त्यावर राजपुत्राचा निजावयाचा छपरपलंग ठेविलेला होता. त्यावर भरजरीचें किनखापाचें कापड आंथरलें होतें. मंचक फारच मऊ होता. त्याजवर पाय ठेविला ह्मणजे असा भास होई कीं आपला पाय गिरोणींच्या मोहरावर पडला आहे. भिंती लंकेच्या किनाऱ्यावरील मौक्तिकांनीं मढविलेल्या होत्या. रंगमहालाची पटाई रत्नजडित होती. या चित्रविचित्र रंगाच्या मण्यावर कमळें व पक्षी यांचीं चित्रें फार कौशल्यानें कोरलेलीं होतीं. घुमटावर व आजूबाजूस चोहोंकडे वेळूच्या जाळ्या करून लाविलेल्या होत्या. त्यांतून आल्हाददायक चंद्रप्रकाशाचीं किरणें रंगमहालांत पडलीं ह्मणजे फारच मनोरम असा देखावा दिसे. दहा पांच पावलें टाकलीं ह्मणजे पलीकडेसच रमणीय असा उद्यान केलेला होता. त्या स्थळीं जीं सुवासिक पुष्पांचीं झाडें लाविलीं होतीं त्यांचा सुवास या जाळ्यांतून येई; आणि तो चोहोंकडे मंदिरांत पसरला ह्मणजे मंदिरास फारच रमणीयता येत असे. हें स्थळ सौंदर्यपूर्ण राजपुत्रानें व मोहक अशा यशोधरारूपवतीचें वसतीस्थान असल्यामुळें त्या स्थळास किती विशेष शोभा आली असेल हें वर्णन करणें कठीण आहे.

सुंदरी यशोधरा रात्रीच्या समयीं निद्रामग्न झाली असतां एकाएकीं दचकून उठली. दोन्ही तिचे तळहात तिच्या कपाळावर होते. डोळ्यांतून एकसारख्या अश्रूंच्या धारा चालू होत्या. छातींत धडकी भरली होती. पदर कमरेखालीं पडला होता. त्रिवार तिनें आपले प्रियाचे हाताचें चुंबन घेतलें. तिसऱ्यांदा प्रभूचा हात उचलून घेऊन त्याचें चुंबन घेऊन सद्गदित कंठानें प्रभूस हाक मारून ह्मणाली "प्रभू, जागा हो. मी घाबरून गेलें आहे, माझ्याशीं कांहीं गोड शब्द बोलून माझें समाधान कर." राजपुत्र तिला ह्मणाला "सखे, प्राणप्रिये, तुला कसलें दुःख झालें आहे?" पुनः सुस्कारा टाकून ती ह्मणाली, सख्या राजपुत्रा, मी गर्भार होतें तें तुला माहित होतेंच. आजच संध्याकाळीं मी प्रसूत होऊन मला मुलगा झाला. मुलगा माझ्याजवळ बाहू घालून निजला होता. आणि ह्या सुखाच्या आनंदांत मी झोपीं गेलें असतां मला तीन भयप्रद अशीं स्व पडलीं त्यामुळें माझा जीव कष्टी होऊन गेला आहे. पहा सख्या. पहिल्या स्वप्नांत मी जें पाहिलें तें तुला सांगतें. एका विशाल शृंगाचा फार मोठ्या शरिराचा असा एक वृषभ होता. त्याच्या शिंगांच्या मध्यभागीं कपाळावर एक सतेज असा हिरा होता. नागाच्या मस्तकीं जसें सतेज कंठरत्न असतें तसें त्या बैलाच्या भाळीं रत्न

होते. हा बैल शहरच्या रस्त्यांतून नगराबाहेर चालला होता. त्याला अडवून धरण्याची कोणाची ताकद नव्हती. इंद्रदेवाच्या मंदिरांतून अशी आकाशवाणी झाली कीं "जर याला कोणी अडवून धरणार नाहीं तर पहा हो हें नगर ओसाड होऊन जाईल." अशी जरी वाणी झाली आणि पुष्कळ लोकांनीं त्याला अडवून धरून ठेवण्याची शिकस्त केली परंतु तो बैल कोणाच्या हातीं सांपडेना. मग मला मोठ्यानें रडू आलें आणि मी त्या बैलाच्या गळ्यास मिठी मारली; आणि लोकांस शहरच्या वेशींचे दरवाजे बंद करण्यास सांगितले. परंतु त्या वृषभानें मोठा हंबरडा फोडून माझ्या हाताला हळूच मानेनें हिसका देऊन जोरानें पुढें चालता झाला. जातांना वेशीच्या दरवाज्यावरचे जे रक्षक होते त्यांस पायाखालीं तुडवून दरवाज्यास धक्के मारून गांवाबाहेर तो निघून गेला. हें एक स्वप्न झालें. दुसऱ्या स्वप्नाची कथा अशी आहे कीं, चौघेजण असे तेजःपुंज महापुरुष स्वर्गांतून सुमेरू पर्वतावर खालीं उतरतांना माझ्या दृष्टीस पडले. त्यांच्या त्या भव्य व सतेज मुद्रेवरून मला असा भास झाला कीं, हे कोणी पृथ्वीचें संरक्षण करणारे यक्ष असावेत. त्यांच्यामागें असंख्यात स्वर्गीचे दिव्य लोक चालत होते. हे यक्ष आमच्या नगरांत प्रवेश करिते झाले. जे समयीं हा मेळा इंद्राच्या मंदिरावरून गेला त्यावेळीं तेथें उभारलेला जो सुवर्णध्वज फडफड हालून खालीं पडला; तात्कालिक दुसरा ध्वज ज्याच्यावर हिरे आणि माणकें चढविलीं होतीं व ज्याच्या किनारी भरजरीच्या केल्या होत्या असा तेथें उभारला गेला. त्या ध्वजावर जीं नव्या लिपींत अक्षरें व वाक्यें लिहिलीं होतीं तीं या रत्नाच्या प्रकाशानें स्पष्ट दिसत होतीं. या नूतन वाक्याच्या श्रवणानें व वाचनानें सर्व जनांस मोठा आल्हाद झाला. पूर्वेकडील वाऱ्याची जी झुळुक आली त्यामुळें त्या ध्वजाची जी गुंडाळी झाली होती ती गुंडाळी सुटून त्यावरील वाक्यें स्पष्ट दिसूं लागलीं व सर्वांस वाचतां आलीं. आमच्या बगिच्यांत आम्ही कधीं जीं झाडें पाहिलीं नाहींत व तीं झाडें कोठलीं असावींत याचाही अंदाज मला नाहीं अशा झाडांच्या मोहराचा वर्षाव झाला.

हे सखे कमलवदने, यांत दुःख मानण्यासारखा कोणताही भाग नव्हता. जें तुझ्या दृष्टीस पडलें तें तुझें सुभाग्य समज.

सख्या राजपुत्रा, तूं सांगतोस तें खरें. परंतु याचा जो दुःखप्रद शेवट झाला त्यामुळें माझ्या पोटांत धस्स झालें आहे. वर विदित केलेला झाडाच्या मोहराचा वर्षाव आल्यावर अशी एक वाणी झाली कीं "वेळ आली" "वेळ आली." ही वाणी झाल्यावर मला तिसरें स्वप्न पडलें. तें असें. मी तुझ्या समीपभागीं निद्रायमान झाली असतां मी तुला मिठी मारून आलिंगन देण्यास प्रवृत्त झालें, तों प्रिया मंचकीं कोणी नव्हतें. बिछान्यावरची उशी नवीच्या नवीच, तेथें तुझा एक आंगरखा मात्र पडला होता. त्या-

शिवाय तुझें तूं जो माझा जीव, माझा प्राण, माझा राजा, माझी सर्व संपत्ति ती तुझें त्या बिछान्यावर कांहीं एक उरलें नव्हतें. स्वप्नांतच मी उठलें आणि तुझा मोत्याचा जो कंबरबंद माझ्या कंबरेला मी बांधला होता तो न दृष्टीस पडतां दंश करणारा सर्प मात्र त्या ठिकाणीं माझ्या दृष्टीस पडला. तसेंच माझ्या पायांतल्या सांखळ्या गळून पडल्या. माझ्या हातांतल्या सोन्याच्या बांगड्या हातांतून गळून पडल्या. डोक्यांतल्या जाईजुईच्या फुलांची धूळ होऊन गेली. आपला हा विवाहमञ्चक खालीं ढासळला; किरमिजी रंगाचा हा किनकाफीचा पडदा फाटून गेला दुरून मला त्या पांढऱ्या शुभ्र बैलाचा हंबरडा ऐकूं आला. आणि "वेळ आली" "वेळ आली" अशी भयप्रद वाणी पुनरपि झालेली मला ऐकूं आली. ही वाणी ऐकल्याबरोबर माझ्या पोटांत धस्स झालें आणि मी जागी झालें. सख्या, या दृष्टांताचा काय रे अर्थ? हें माझ्या मरणाचें चिन्ह आहे काय? गड्या माझ्या मरणापेक्षांहि कडू ह्मणजे तूं माझा त्याग करून जावें अगर तुला कोणी धरून न्यावें याचें तर दर्शक हे दृष्टांत नाहींत ना?

आपल्या दुःखाग्रस्त स्त्रियेच्या अंगावर सिद्धार्थानें आपला हात टाकून तिच्याकडे मोठ्या प्रेमानें अवलोकन केलें. या समयींची प्रभूची मुद्रा मावळत्या सूर्याप्रमाणें दर्शनीय होती. प्रभू यशोधरेकडे अवलोकन करून ह्मणतो "सखे, अढळ प्रीतीमुळें जर जिवास समाधान होतें असलें तर तुला समाधान करून घेण्यास जागा आहे. कारण, प्रिये, तुला जे दृष्टांत झाले ते जरी घडून येणाऱ्या गोष्टींचीं चिन्हें आहेत, आणि देवदानव यांच्यामध्ये चलाचल झालेली आहे असें जरी या दृष्टांतावरून अनुमान बसवितां येतें, आणि यावत सृष्टीला या चौऱ्याशींच्या फेऱ्यांतून सुटण्याचें साधन जरी समीप आलेसें दिसत आहे व कसलाहि तुजवर अथवा मजवर प्रसंग येऊन पडावयाचा असो. प्रिये. हें सत्य आहे कीं माझें आजपर्यंत यशोधरेवर निःसीम प्रेम होतें व पुढेंहि तसेंच राहील. पृथ्वींतील लोकांस जे कष्ट भोगावे लागतात त्यांच्यापासून जनांची अशी सुटका व्हावी या विवंचनेंत मी पुष्कळ दिवस गढून गेलों आहें हें तुला माहीत आहेच; आणि घडी आल्यावर जें व्हावयाचें तें होईल. कदापि चुकणार नाहीं. परंतु तुझ्यासाठीं माझा जीव फारच गुंतून पडला आहे. ज्या लोकांचा व माझा परिचय नाहीं व आजपर्यंत ज्यांचें मला दर्शन झालें नाहीं व ज्यांची मजला ऐकीव सुद्धां माहिती नाहीं अशा अपरिचित जनांसाठीं जर माझा जीव तुटतो व अशा लोकांच्या कष्टांनीं जर मी कष्टी होतो तर तूं जो माझा जीव, माझें हृदय व माझा विसावा त्या तुझ्याठायीं माझा प्राण किती बरें घिरट्या घालील; तसेंच या मंदिरांतील जीं माझीं प्रेमाचीं माणसें त्यांच्यासाठीं माझ्या जीवास किती बरें हळहळ राहील. ह्या सर्व गोष्टींचा तूंच विचार कर. हें प्रिय लेकरूं तुजपासूनच झालें ना? तूंच त्याची माता ना? मग माझें प्रेम तुजवर किती असावें बरें हें सहजच तुझ्या लक्ष्यांत आलें असेल.

प्रिये तूं आतां आराम कर. मी उठून काय होत आहे तें पाहतों."

प्रभूचें भाषण झाल्यावर रूपवती यशोधरा नेत्रीं अश्रु जशाचे तसेच असतां मोठमोठाले सुस्कारे टाकीत झोपीं गेली. तिच्या भयाभित मुद्रेवरून व सुस्काऱ्यावरून असें दिसे कीं 'घडी आली" "घडी आली" हे शब्द पुन: तिच्या कानीं स्वप्नांत येत आहेत. यशोधरा झोपीं गेली, सिद्धार्थ जागत बसला. इतक्यांत चंद्र वृश्चिकराशीजवळ आला; आणि अमके अमके ग्रह एके ठिकाणीं जमले ह्मणजे प्रभूची अभिनिष्क्रमणाची वेळ होईल असें जें भविष्य मागेंच आलें होतें त्याप्रमाणें ते ते ग्रह नभोमंडळीं जमले; आणि ते ग्रह 'एकत्र जमून जणूं काय प्रभूस बोलूं आले. "ह्याच रात्रीचा हाच समय तुझा जाण्याचा आहे. मोठेपणा मिळविण्याच्या मार्गाचें अवलंबन कर अथवा उत्तमोत्तमता मिळविण्याच्या मार्गाचें अवलंबन कर. राजाधिराज व्हावयाचें असल्यास तसें कर अथवा निर्जन अरण्यांत राहून एकटा असा एकांतवास करून जगाचें साहाय्य कर." देवादिकांनीं त्याच्या सूचनेसाठीं जीं मागें गाणीं गायलीं होतीं त्यांचा स्वर त्याला ऐकूं येत आहे असा त्यास भास झाला. जो प्रभू बुद्ध तारकागणाकडे टक लावून पाहत बसला होता तो आतां पुढें काय करणार याची अपेक्षा करीत देव आसपास जमून अदृश्य असे राहिले होते; कदाचित देवादिकांनीं गाणींहि गायलीं कोण जाणे!

घडी जमून आली आहे. मला आतां येथून निघालेंच पाहिजे. हे सखे, तूं निद्राग्रस्त झालेली आहेस. तुझे कोमल ओष्ठद्वय मला हें आनंदमंदिर सोडून वनांतरीं जाण्यास निमंत्रण करितात खरें; परंतु तुझी माझी मात्र तुटातूट होते. समोर जें गपचिप बसलेलें आकाश दिसत आहे त्यावर माझ्या कर्तव्याचा निरोप लिहिलेला मला दिसत आहे. हाच कार्यभाग माझे हातून झाला पाहिजे. याच्यासाठीं माझा जन्म या जगांत झाला. मला मिळालेल्या राज्याच्या सिंहासनाचा मी त्याग करणारच. जीं राज्यें मी तरवारीच्या बळावर मिळविणार होतों त्यांचाही मी त्याग करितों. लढाया करून दिगंतरीं कीर्तीचा ध्वज उभारण्याची माझी इच्छा नाहीं. या पृथ्वीतलावर शांतीचें आचरण ठेवावें. साधी जमीनच आपला बिछाना करावा, वनांतरीं आपली वस्ती करून रहावें, क्षुद्र प्राण्यांसह स्नेह जोडावा, अति शुद्र जीं वस्त्रें परिधान करितात तींच आपण अंगावर घ्यावीं, भिक्षापात्रीं जें अन्न दयाशील लोकांकडून मिळेल त्याचेंच सेवन करावें. गुहेंत राहून आपलें शितादिकापासून शरीर रक्षण करावें, दुःखग्रस्त व निराशेची वाणी जी मी ऐकितों त्याचा परिहार करावा हाच याचा उद्देश आहे. दिगंतरीं जर मोक्षाचा कोठें मार्ग असला आणि दुःखग्रस्त लोकांची जर सुटका होण्यासारखी असली तर तो मार्ग शोधून काढावा हाच या उपासांचा व दरिद्रावस्था धारण करण्याचा हेतु आहे. सर्व संगाचा परित्याग करून जनोद्धाराचा मार्ग मी पाहणार. असला तर साध्य हो-

ईल, नसल्या तर प्रयत्न मोल असें जिवास समाधान तरी होईल. दयाशील अशा देवदेवता या जगांत आहेत काय? त्यांनी त्यांच्या भक्तांसाठीं कांहीं केलें आहे काय? पामरजन मोठमोठालीं देवादिकांसाठीं विस्तीर्ण मंदिरें करून त्यांत नंदादीपें जाळतात, नानाप्रकारचे बलि देऊन देवतांस संतुष्ट करण्याचा प्रयत्न करितात. मोठमोठाले मंत्र जागर करतात. पुरश्चरणें सुरू ठेवतात. ब्राह्मणांस मिष्ट पक्वान्नें देऊन संतुष्ट करितात; विष्णु, शिव, सूर्यनारायण इत्यादि देवादिकांच्या नामाचा जयघोष करितात; या सर्व गोष्टींपासून मानवांचें कांहीं कल्याण होतें काय? उत्तम जनांचा तरी या देवादिकांपासून उद्धार होण्यासारिखा आहे काय? किंवा हे स्तोत्रपाठ. हीं पुरश्चरणें व्यर्थ शीण अशा आहेत. कोणातरी मानवाची या उपायांपैकीं एखादे उपायांनीं यातना नाहींशी झाली आहे काय? जिवलग माणसांची झालेली तुटातूट दूर करण्याची या देवांच्या अंगीं शक्ति आहे काय? हींव, ताप, वृद्धापकाळ, मृत्यु, व चौऱ्यांशींचा फेरा चुकविण्याचें साधन या देवतांजवळ आहे काय? अथवा हा सर्व पोरखेळच आहे? माझ्यां जिवलग बहिणीनीं जे अनेक उपास व जीं नानाविध व्रतें केलीं त्यायोगें त्यांच्या प्रसूतीच्या यातना कमी होतात काय? तुळशीपत्राची लाखोली वातल्यानें आणि दह्यादुधाचे नैवेद्य दिल्यानें कधीं कोणाच्या दुःखाचा परिहार झाला आहे काय? असें तर नसेल ना कीं कांहीं देवता सुष्ट असतात व कांहीं दुष्ट असतात? परंतु यांच्या हातांत बरेंवाईट करण्याची शक्ति आहे काय? किंवा मनुष्याचें चरित्र कर्मानुरोध आहे? कर्माप्रमाणें पुनरपि जननं पुनरपि मरणं तर होत नसेल ना? एकदां जीवित धारण केलें कीं देवादिकांच्या पायरीपर्यंत जाऊन पुनः क्षुद्र जंतु व्हावयाचें व पुनः पुनः त्या चक्रावर फिरावयाचें. हें गूढ कशा प्रकारचें आहे याचें ज्ञान होऊन सर्व जीवितांची सुटका होण्याचा मार्ग सांपडल्यास किती बरें चांगलें होईल? या गोष्टीचें आपणास अज्ञान असल्यामुळें आपली स्थिति पुढें काय होईल याच्या भयानें आपण अगदीं कष्टी होऊन गेलों आहों. जर उद्धार होण्यासारखा असला तर तो सांपडण्याचें साधनहि निःसंशय असलें पाहिजे. युगांतरीं पूर्वी मानव शीतादिकांच्या तापांपासून नाशाप्रत पावत होते. अशाच स्थितींत दुःखग्रस्त असतां तेजोमय सूर्यापासून आलेला परंतु गारगोटींत छपून असलेला अग्नि कोणातरी मानवास सांपडला असावा. पहिल्याप्रथम क्रूर जनावरांप्रमाणें माणसें जनावरांचे मांस भक्षण करीत असत. व तशांतच कोणातरी मानवास बी पेरण्याची युक्ति सुचून धान्य उत्पन्न करून त्यावर उपजीविका करावी अशी गोष्ट त्याच्या मनांत आली असेल. व तेव्हांपासूनच लोक धान्य उत्पन्न करूं लागले असतील. लिहिण्याच्या व बोलण्याच्या भाषेची अशीच स्थिती असेल. पहिल्यादा मनुष्य बरळतच असेल. असें होतां होतांच पुढें कोणाच्या तोंडांतून स्पष्ट वाणी निघाली असावी

व हातांनीं अक्षरें वळलीं गेलीं असतील. व अशावरूनच लिहिण्याची पद्धति सुरू झाली असावी. जीं जीं सुखाचीं साधनें आह्मा मानवांस मिळालीं आहेत, तीं सर्व श्रमांतींच प्राप्त झालीं आहेत. मग ज्याला संपत्ति मिळाली आहे, इच्छा असली तर राज्य करणें ज्याच्या हातीं आहे, ज्याला वय झाल्यामुळें आयुष्याचा कंटाळा आला नाहीं, परंतु यौवनाच्या आनंदांत जो पूर्णपणें नांदत आहे, ज्याला विषयभोगाचा वीट आला नाहीं, विषयांत रमून राहण्याची ज्याला अतोनात हौस आहे, तोंडावर सुरकुत्या येऊन आयुष्यकाळ बराच लोटल्यामुळें खिन्न जो झालेला नाहीं, तर यश आणि सौंदर्य ज्यांच्या उल्हासाच्या भरांत जो नांदत आहे, व इच्छा असल्यास हवा त्या रूपवतीचा उपभोग घेण्याची शक्ति ज्याच्या आंगीं नांदत आहे, ज्याला कष्टाचा लवलेश नाहीं, ज्याला कोणत्याहि गोष्टीची उणीव नाहीं, अशा माझ्यासारख्या मनुष्यानें केवळ मानवांचें दुःख दूर व्हावें ह्मणून जर सर्व गोष्टींचा परित्याग केला आणि उद्धारमार्ग कोठें छपून राहिलेला आहे त्याचा जर शोध चालविला तर तो मार्ग कोठें-तरी, कधींतरी सांपडल्यावांचून रहाणारच नाहीं. सांपडल्यास मृत्यूवर मानवाचा विजयध्वज होईल. माझें प्रेम माझ्या राज्यावर, माझा प्राण माझ्या लोकांसाठीं तुटतो, सांप्रतकाळीं जो लोक माझा आहे त्यासाठींच माझा जीव प्रेमानें भरून गेला आहे असें नाहीं तर माझ्या देहाच्या बलिदानानें जे जन माझे होतील त्या कोट्यवधि प्राण्यांसाठीं मी आपल्या राज्याचा त्याग करून मी आपल्या देहाचा बळी देतों. अहो तारकगणांनों, तुह्मी मला निमंत्रण करितां तें मला समजलें आहे! तुह्मी माझ्या निघण्याची वाट पहात आहां मला ठाऊक आहे. मी निघालों बरें! मी निघालों! अगे कष्टी वसुंधरे! तुझ्या लोकांसाठीं मी आपलें यौवन, सिंहासन, आनंदानें भरलेलें आयुष्य, सुखानंदानें भरलेला माझा राजवाडा, आणि ही माझी प्रियतम यशोधरा जिच्यापेक्षां कोणतीहि वस्तु या जगांत मला प्रिय नाहीं, व जिचा त्याग करणें सर्वांत कठीण ती सुद्धां जगाच्या कल्याणासाठीं सोडून देणार. पण प्रिये, जगाचा उद्धार करितांना तुझाहि मी उद्धार करीन. माझ्या लेंकराला आशीर्वाद देऊन मग जावें असें जर मी ह्मटलें आणि वाट पाहिली, तर कोण जाणे माझें मन स्थिर रहाणार नाहीं. माझा निश्चय ढळेल. बायको, लेंकरूं, बाप व माझी प्रजा इतक्यांचा त्याग करून जाणें मला दुरापास्त झालें आहे. पण प्रियांनो, तुह्मीहि घडीभर दुःख सोसा. कारण जगास यापासून मोक्षमार्गाची प्राप्ति होणार आहे. झाला तर माझा निश्चय झाला बरें. आतां मी राज्यत्याग करणार बरें. अविश्रांत श्रम करून व अघटित प्रयत्न करून जर या मोक्षमार्गाची प्राप्ति होणार असली तर तशी मेहनत मी करणार, व हा मार्ग साध्य करून घेतल्यावांचून परत येणें कदापि घडणार नाहीं. हाच शेवटचा निश्चय.

यशोधरा निद्रित असतां तिच्या पायाचें चुंबन राजपुत्रानें घेतलें. तिच्या डोळ्यांतले

भश्रू अजून जशाचे तसेच होते. तिच्या मुखाकडे अगदीं मोठ्या प्रेमानें अवलोकन करून तो ज्या मंचकावर निजली होती तें स्थळ स्थंडिलाप्रमाणें मानून त्यासभोंवार त्यानें त्रिवार प्रदक्षणा घातल्या, व आपले दोन्ही हात छातीवर ठेवून ह्मणाला "ह्या बिछान्यावर आजपासून मी कधीं निजणारच नाहीं." अशी आण वाहून जावयास निघाला तों त्याचें पाऊल पुढें सरकेच ना. तिनदां त्याची गति अशी झाली पुढें जाई व मागें येई. यशोधरेवर इतकें त्याचें प्रेम जडून गेलें होतें. सरते शेवटीं आपले तोंडावर पांघरूण घेऊन रंगमहालाचा पडदा वर करून तो पुढें सरकला.

पडद्याच्याबाहेर जो दिवाणखाना होता त्या ठिकाणीं त्याच्या मैत्रिणी निजल्या होत्या. प्रशान्त समयीं कमलिनी जशा मिटून जातात त्याप्रमाणें हा स्त्रीसमुदाय गाढनिद्रेंत ग्रस्त झाला होता. कसल्याहि प्रकारची हालचाल तेथें नजरेस आली नाहीं; फळाला फळ जसें जोडलेलें असतें तशा राजपुत्राच्या दोघी बाहिणी गंगा व गौतमी ह्या दोघीजणी एका बिछान्यावर लगटून निजल्या होत्या. त्यांच्या आसपास बाकीच्या त्याच्या सैंगड्या निजल्या होत्या. ह्या सुखी लोकांना पाहून राजपुत्राच्या मुखांतून पुढें लिहिलेले उद्गार निघाले. "गड्यांनो, तुह्मी मला फारच आवडतां. पण गड्यानों, मी तुह्माला सोडून जर गेलों नाहीं तर तुमचें आमचें होणार काय? आपणा सर्वांस ह्मातारपण येईल; आणि त्यापासून समाधान मात्र कांहीं होणार नाहीं; मरूनहि जाऊं पण त्या मरणापासून कांहीं सद्गति लागणार नाहीं पहा गड्यांनो, जशा तुह्मी गाढ निद्रेंत निजून गेल्या आहांत तशाच तुह्मी मरून जाल; आणि गुलाबकळी सुकून गेल्यावर मग तिची शोभा व सुवास नष्ट होऊन जातात. दीपकांतील तेल संपलें कीं त्याची ज्योत नाहींशी होते.

हे रात्री! या निद्रित माणसांच्या डोळ्यांवर तुझी झांपड घाल. त्यांचे ओष्टद्वय बंद करून टाक, नाहीं तर यांच्यापैकीं कोणीतरी जागा होऊन मी जातों ह्मणून शोक करायास लागून माझ्या संसारत्यागास अडचण येईल. आमचा सर्वांचा आयुष्यक्रम वृक्षवल्लीसारखा आहे. कांहीं उन्हाळे कांहीं पावसाळे व कांहीं हिंवाळे झाल्यावर पानें सकन जाऊन जीर्ण होऊन जातात. पुढें आला तर वसंत ऋतु येईल. नाहींतर अंतच. ही गोष्ट माझ्यानें सहन होत नाहीं. जर मला सर्व प्रकारच्या सुखांची समृद्धि आहे, आणि देवादिकांसारखा जरी मी ऐषआराम भोगत आहें, तथापि प्राणीमात्र या अज्ञानांधःकारांत गढून गेले आहेत. त्यांचें दुःख माझ्यानें देखवत नाहीं. ह्मणून या आयुष्याचा काळ जावत्पर्यंत कांहीं हालचाल करण्याजोगा आहे तोंपर्यंत आह्मा सर्वांच्या सुटकेचा कांहीं मार्ग निघाला तर शोधून पाहवा, आणि सद्गतीचा ज्ञानप्रकाश लोकांस करून द्यावा.

मग सिद्धार्थ राजपुत्र हे सर्व प्रियजन ज्या ठिकाणीं निजले होते त्या ठिकाणाहून

हळूच निघून गेला. बाहेर येऊन पाहतों तों चोहींकडे अंधार पडला आहे आकाशांत तारकांची अनुपमेय शोभा दिसत होती; जणूं काय हा तारकागण प्रभूकडे बहुत प्रेमानें अवलोकन करीत आहे असा भास झाला. शीतळसा जो वायु वहात होता त्यानें राजपुत्रानें परिधान केलेल्या वस्त्राचें चुंबन घेतलें. यासमयीं बगिच्यांतील अनेक जातीच्या फुलझाडांचा मंदसा सुवास चोहोंकडे पसरला होता. हिमाचलापासून तों थेट लंकेच्या समुद्रापर्यंत प्रभूला पाहून वसुंधरेचा आत्मा जणुंकाय प्रेमानें हालत होता. ग्रंथांतरीं असें लिहिलें आहे कीं आकाशांत चोहोंकडे सुखानंदाच्या गाण्याचा मधुर स्वर चालला होता. देवादिक आपआपल्या स्वर्गांतून खालीं चोहों दिशांकडे उतरून स्वर्गीचें गाणें गात होते. त्यांच्या तेजानें रात्र चोहोंकडे प्रकाशमान झाली होती. सृष्टि आनंदमय झाली होती. नाना मौल्यवान् रत्नांनीं जडित आहेत अशीं वस्त्रें परिधान करून चतुर्दिग्पाल आपले हात जोडून ज्या राजपुत्राचे नेत्र अश्रुपूर्ण झालेले होते, परंतु जगाचा उद्धार करण्याचा अटळ अशा निश्चयानें ज्याचें ओष्ठद्वय मिटलें होतें त्याकडे अवलोकन करीत तटस्थ उभे राहिले होते.

तसाच प्रभु अंधारांत पुढें सरकून मोठ्यानें आरोळी मारून ह्मणाला, "अरे चाणा! ऊठ जागा हो, कंटकास तयार करून घेऊन ये!"

चाण सारथी मंदिराच्या फाटकाजवळ निजला होता. तेथून हळूच उठून डोळे चोळीत चोळीत प्रभूकडे येऊन आज्ञा महाराज ह्मणून पुढें असें बोलला कीं, महाराज, या समयीं जिकडे तिकडे अंधार झालेला आहे. या वेळीं आपण घोड्यावर बसून बाहेर जाणार काय?

बा, चाणा, अगदीं हळू बोल. माझ्या घोड्यावर खोगीर घालून तयार करून घेऊन ये. या सुखमंदिरांतील वस्तीचा मला वीट आला आहे. येथलें रहाणें कारागृहांतील रहाण्यासारखें दुःखकारक झालें आहे. कारण माझें मन सत्याचा शोध करून त्याची माहिती लोकांस करून देण्यासाठीं फारच अतुर झालें आहे. त्याकरितां ह्या सुखवासाचा त्याग करून सत्याचा थांग लागेपर्यंत परत या स्थळीं न येण्याचा माझा निश्चय आहे. हें कार्य करण्याची हीच घडी आली आहे; बा, लवकर तयारी कर.

सारथी बोलतो, बा राजपुत्रा! पूर्वी महान महान ज्योतिषांनीं असें ज्योतिष भविष्य वर्तवून ठेविलें आहे कीं शुद्धोदन राजाचा महापराक्रमी पुत्र अनेक राज्यें मिळवून सर्व राजांचा पाडाव करून त्यांच्यावर अधिकार बसवून राजाधिराजाच्या पदवीप्रत जाईल, मग त्यांचे भविष्यकथनास बाध येणार काय? बा! धनधान्यपूर्ण ही वसुंधरा सोडून तूं भिक्षेकरी बनून आपले हातीं भिक्षापात्र घेऊन भिक्षेवर आपलें उपजीवन करणार काय? अरे सख्या, हा सुखसागराचा लोट सोडून देऊन तूं रानोमाळ जवळ कोणी नाहीं असा एकटा फिरणार काय?

प्रभू बोलतो " बा सख्या, ह्याच कारणास्तव माझा जन्म झाला आहे. ज्या राजपदाची प्राप्ति करून घेण्यासाठीं मी अतुर आलों आहें, त्याचें मोल इतर सर्व राजपदांचें मोल एकत्र केलें असतांही फारच अधिक पडेल. त्या राजपदाची थोरवी फार. येथील सर्व वस्तु नाशंवत आणि क्षणभंगुर आहेत. जा माझा घोडा घेऊन ये."

पुनः सारथी उत्तर देता झाला. महाराज, ह्या तुमच्या करणीनें पितृराजा तर शोकसागरांत बुडून जाईल. ज्या लोकांचें सुखधाम ह्मणजे तुह्मी त्यांची ह्या तुमच्या त्यागानें काय दुशा० होईल ह्याचा विचार केला काय? सध्यां तर तुह्मी त्यास समुद्रांत ढकलीत आहां; त्यांत तुह्मी सुख कसें हो देणार?

राजपुत्र सिद्धार्थ बोलतो, मित्रा! प्रेमापासून होणारें जें सुख त्या सुखाच्या प्राप्तीसाठीं जें प्रेम आपण एकमेकांवर करितों तें प्रेम मिथ्या. परंतु मी जें याच्यावरतीं प्रेम करितों तें तशा प्रकारचें मिथ्या प्रेम नाहीं. सुख व आनंद असण्याची मला परवा नाहीं, ह्यांचें जें क्षणभंगुर सुख आहे त्याचीहि मला फारशी परवा नाहीं. तर ह्या माझ्या प्रियजनांचा व सर्व प्राणिमात्रांचा अक्षयींचा उद्धार व्हावा अशी माझी मोठी उत्कट इच्छा आहे, आणि प्रेमानें हा उद्धार जर साध्य होत असला तर गड्या, तो साध्य करून घेण्यासच मी त्याग करून जात आहें. जा माझा कंटक अश्व तयार करून घेऊन ये.

आज्ञा महाराज असें ह्मणून रडत रडत कष्टानें चाण तबेल्यांत गेला खुंटीवर टांगलेला रुप्याचा लगाम काढून कंटकास तबेल्यांतून काढला व त्याला कसण्याच्या तयारीस लागला. घोड्याला लगाम देऊन दोरीनें त्याची मान अडकवून टाकली. खरारा वगैरे करून घोड्यास अगदीं साफ केलें. मग त्याच्या पाठीवर चौकोनी नमदा घातला व खोगीर बरोबर मधोमध पाठीवर ठेवून पिछाडी घालून खोगरास कसून टाकलें. नकशीदार सोन्याच्या रिकाबी दोहों बाजूंला दोन लटकावून दिल्या. खोगिरावर जाळीदार व मोत्याचे रेशमाचे गोंडे ज्याला होते असें किनखाफीचें कापड घातलें. अश्व असा सज्ज करून ज्या राजमंदिराच्या स्थळीं सिद्धार्थ राजपुत्र उभा होता त्या स्थळीं त्याला आणिलें. राजपुत्राला अवलोकन करितांच कंटक अश्वास मोठा आनंद झाला. तो मोठ्यानें खिंकाळूं लागला व नाकपुड्या वर करून अत्यानंदानें उड्या मारूं लागला. जर देवांनीं या समयीं निद्रित जनांचें कर्णेंद्रिय आपल्या अदृश्य अशा पंखांनीं स्तंभित करून टाकिलें नसतें तर खरोखरच कंटक अश्वाचें खिंकाळणें, व त्याच्या नालबंद केलेल्या टापांचे आवाज सर्व जनांच्या श्रवणीं गेले असते एवढा थोरला त्याच्या खिंकाळण्याचा व टापांचा आवाज झाला होता." ग्रंथांतरीं या समयींचें वर्णन या प्रकारचें केलें आहे.

कंटक अश्वानें डौलानें वर केलेलें डोकें राजपुत्रानें मोठ्या प्रेमानें खालीं केलें, घोड्याची लखलखणारी मान त्यानें थोपटली.

आणि सिद्धार्थ अश्वास याप्रमाणें बोलता झाला. "वा शुभ्र कंटका, थंड हो; आजपर्यंत घोडेस्वार एका स्वारींत कधींही गेला नाहीं इतक्या दूर मला तूं आजच्या रात्रीं घेऊन जा. आज रात्रौ मी कोणत्या मार्गानें मनुष्याचा उद्धार होईल याचा पत्ता लावण्यासाठीं मी या आनंदमंदिरांतून निघून जाणार. ही गोष्ट मला कोणत्या स्थळीं सांपडेल याचा मागमूस मला अद्यापर्यंत मिळाला नाहीं, तथापि ह्या उद्धारमार्गाचा पत्ता लावल्याखेरीज मी परत येणार नाहीं हा मात्र माझा निश्चय झाला आहे. तर गड्या, माझ्या प्रिय कंटका, आज रात्रौ तूं, हिंमत धरून चल. जगकारितां सहस्त्र शूर शिपाई नागव्या तरवारी हातीं घेऊन आपला मार्ग अडवून धरूं लागले तरी तूं मागें हटूं नको. खंदक आडवा आला तरी अगर मोठ्या दुर्गाची भिंत आडवी आली तरी भिऊन मागें सरूं नको. पहा गड्या! तुझ्या पाठीवर मी हात ठेवून पुढें चल असें तुला म्हटल्याबरोबर प्रभंजन वाऱ्यापेक्षांहि तीव्र वेगाची तूं आपली गति ठेव. माझ्या प्रिय अश्वा, आज तूं वायु व अग्नि यांस मागें हटीव. आजच्या ह्या माझ्या कृत्यानें जगास जो खुला मार्ग होईल त्याचे श्रयाचे अंशाचा तूं वांटेकरी हो. आज रात्रौ जो मी या आनंदमंदिरांतून निघून अश्वारूढ होऊन निघून जाणार आहें तो मानवजातीचाच उद्धार व्हावा म्हणून जात नाहीं तर जे जीवजंतु ज्ञानवाचाविरहित आहेत व ज्यांना आपलीं दुःखें व संकटें सांगतां येत नाहींत व आशेचाहि मधांतु ज्यांच्यापाशीं नाहीं अशा सर्व यच्चयावत् प्राणिमात्राचा उद्धार व्हावा म्हणून तो उद्धारमार्ग शोधून काढण्याकरितां मी येथून सुखांचा त्याग करून जात आहें, तर गड्या, या श्रयाचा तुला निःसंशय अंश भाग मिळेल, म्हणून मोठ्या शौर्यानें आपल्या धन्याला आपल्या पाठीवर घेऊन चल!"

असें बोलून प्रभु घोड्यावर हळुच उडी मारून बसला. त्यानें कंटकाच्या कमानदार मानेवर थोपटल्याबरोबर घोडा वेगानें निघाला. दगडावर घोड्याचा पाय पडला म्हणजे दगडांतून विस्तवाच्या ठिणग्या निघत, शुद्ध देवांनीं मोहोराचीं पुष्पें गोळा करून अश्व ज्या रस्त्यानें जाणार तितक्याच रस्त्याच्या भागावर पसरून ठेविलीं होतीं, तसेंच लगामाचा व त्याला बांधलेल्या सांखळ्यांचा आवाज होऊं नये म्हणून त्या देवांनीं आपल्या अदृश्य हस्तांनीं लगाम व सांखळ्या धरून ठेविल्या होत्या. ग्रंथांतरीं असें लिहिलें आहे कीं. मंदिराच्या अंतर भागांतील द्वाराजवळ फरसबंदी केलेली होती, त्यास्थळीं घोडा वेगानें जाऊं लागला म्हणजे आवाज होऊं नये म्हणून वायुमंडलांतील यक्षांनीं मंत्रित केलेलें वस्त्र पसरून ठेविलें होतें. त्यामुळें घोडा फरसबंदीवरून जाऊं लागला तेव्हां कोणत्याहि प्रकारचा शब्द न होतां घोड्यासकट राजपुत्र कोणासहि न समजतां त्या दरवाज्यांतून निघून गेला.

तीन पिनळेचे पत्रे एकत्र करून जें दार केलें होतें त्याठिकाणीं ते आले. हें दार इतकें

भारी होतें कीं शंभर माणसांच्यांनीं सुद्धां हालत नसे. या स्थळीं जेव्हां ते येऊन थडकले तेव्हां तें दार आपोआप उघडलें गेलें व राजपुत्राचा मार्ग बिनधोक मोकळा झाला. या दरवाज्याच्या बिजागऱ्या इतक्या घट्ट बसल्या होत्या कीं, दरवाजा उघडावयास लागलें कीं त्याचा कर्कश शब्द दोन दोन कोसांपर्यंत लांब जाई.

जेव्हां सिद्धार्थ राजपुत्र मंदिराच्या मध्यभागच्या दरवाज्याजवळ व मंदिराच्या अगदीं शेवटल्या दरवाज्याजवळ आला तेव्हां असाच प्रकार घडून आला. राजपुत्र जवळ आला कीं दरवाजे आपोआप उघडत. त्याचप्रमाणें निरनिराळ्या ज्या शिपायांच्या चौक्या केल्या होत्या त्या चौक्यांवरील रखवालदारांस या समयीं घोर निद्रा लागून गेली होती. रखवालदाराच्या हातांतल्या तरवारी व भाले हातांतून निसटून जमिनीवर पडले होते. चिलखतें व ढाली त्यांच्या अंगांतून निसटून खालीं पडल्या होत्या. अशा घोर निद्रेनें शिपाई व त्यांचे अधिकारी या सर्वजणांस मोहित करून गुंगून टाकिलें होतें. मालव देशांतल्या वावरावरून जो गुंगी आणणारा वायु निघाला तो आमच्या प्रभूच्या जाण्याच्या रस्त्यानें आला. त्याचा एकदां श्वासोच्छ्वास घेतला कीं मनुष्यें गुंग होऊन मूर्च्छा येऊन पडत. आणि त्या वाऱ्याच्या सपाट्यांत मंदिरांतील सैनिक व त्यांचे अधिकारी सांपडले; आणि प्रभूचा मार्ग बिनधोक झाला. व तो या विलासमंदिरांतून सुखानें बाहेर पडला.

पूर्वेकडील पर्वताच्या शिखरावर अर्ध भात्याच्या अंतरावर जे समयीं शुक्राची चांदणी दिसूं लागली आणि देशाच्या सिमेवर असणाऱ्या अनोमा नदीवरून प्रभातसमयाचा सुखदायक वायु वाहूं लागला, ते समयीं आमच्या प्रभूनें लगामाचे दोर आंवळून धरून अश्वास थोपविलें. नंतर त्यानें घोड्यावरून जमिनीवर उडी टाकिली, आणि कंटक अश्वाच्या भाळाचें चुंबन घेतलें, आणि चाणास याप्रमाणें गोड व मधुर शब्दांनीं बोलता झाला "बा सख्या चाणा, हें जें तूं मला दिलेंस त्यापासून मानवजातींतील अन्य मानवांप्रमाणें तुझेंहि कल्याण झाल्यावांचून रहाणार नाहीं. तूं जितकें मजवर प्रेम करितोस तसेंच प्रेम माझेंहि तुजवर आहे. आतां हा अश्व घेऊन माघारा जा. हा माझा मौक्तिकजडित मुगुट परत घेऊन जा. हीं माझीं राजकीय वस्त्रेंहि परत ने. तसेंच हा माझा रत्नजडित कंबरबंद व ही माझी रत्नजडित तलवार त्याचप्रमाणें माझ्या मस्तकीं मी धारण केलेला हा माझा केशपुंज तूं परत घेऊन जा. यांपैकीं एकाचीहि मला अवश्यकता नाहीं. हे सर्व जिन्नस तूं पितृराजाला नेऊन दे. आणि माझा असा निरोप सांग कीं सिद्धार्थ माघारा परत येईपर्यंत त्याचा तुह्मास विसर पडूं द्या. तो जे समयीं परत येईल ते समयीं तो दसपट राज्यप्राप्ति मिळवून येईल. सत्याचा प्रकाश प्राप्त व्हावा ह्मणून हें जें त्यानें अश्रांत शोध करण्याचें आरंभिलें आहे त्याची फलप्राप्ति ह्मणजे चातुर्य व शहाणपण याचा बहुत मोठा पुरवठा तो अनेक निर्वात स्थ-

ळांपासून घेऊन येईल. आणि ज्या हेतुस्तव हे श्रम आरंभिले आहेत तो जर सिद्धीस गेला तर सिद्धार्थ विजयध्वज घेऊन येईल; पहा ही सर्व वसुंधरा माझी आहे कारण मी तिच्यासाठीं अविश्रांत सेवा करणार आहें. राजास सांग कीं माझें अत्यंत प्रेम या वसुंधरेच्या ठायीं असल्यानें ती माझी झाली आहे. मानवांचा उद्धार मानवाच्या श्रमापासूनच होण्याची उमेद आहे. तर यावत्कालपर्यंत कोणीहि व कधींहि हें साधण्यासाठीं श्रम केले नसतील तितके श्रम मी करणार आहें. आणि या माझ्या जगतीचा उद्धार व्हावा ह्मणूनच मी या जगतीचा त्याग करून जातों."

# चतुर्थोध्याय समाप्त.

---

# पंचमोध्याय.

सुगंध तृण व तालीवृक्ष यांनीं भरपूर असा वैभार रूप झालेल्या सरस्वती नदीच्या उष्णोदकाच्या लहरींनीं ज्याचे पाय धुतले जात असा वैपुल्ल, जलाशय व वृक्ष ज्यांत अतोनात भरपूर लागून गेले आहेत असा तपोवनगिरि, अनंत बुभुक्षित घारी ज्यावर वसति करून आहेत असा शैलगिरि, व रत्नखचित रत्नागिरि, असा लहानसा पर्वत पंचक राजगृहनगरीच्या आसमंत भागीं होता. या रत्नागिरीच्या एका उंच भागावर अंजीराच्या वृक्षांनीं आच्छादिलेली अशी एक गुहा होती. त्या गुहेकडे जाण्याचा मार्ग नागमोडीचा होता. मार्गांतील खडकाळ रस्ता मनुष्याच्या पावलानें अगदीं झिजून गेला असून मधून मधून केशराचीं शेतें, वेळूचीं वनें, दाट असे आम्रवृक्ष, शुभ्रस्फटिकासारखे मोठमोठाले फत्तर, लहान लहान टेंकड्या, वनपुष्पांचे ताफे अशा नाना रमणीय गोष्टी गुहेकडे जातांना दृष्टीस पडत. या स्थळांप्रत जाणाऱ्या सर्व पांथस्थ जनांनो, येथें आला ह्मणजे आपल्या पायांतून जोडे काढा, आणि साष्टांग दण्डवत घाला, कारण पृथ्वीतलाचे ठायीं हें महान् पवित्र स्थळ आहे.

अशा स्थळीं प्रभुबुद्ध आपला काळ तपश्चर्या करीत घालवीत होता. मनुष्यास मुक्तीचा मार्ग उघडण्यास्तव वर्षाऋतु, हिमंत ऋतु ग्रीष्मऋतु या तिन्ही ऋतुकाळीं पीत अशीं वस्त्रें धारण करून भिक्षापात्र अवलंबून जे किंचित् अन्न लोक धर्मादाय ह्मणून देत त्याजवरच तो आपलें जीवन चालवीत होता. रात्रीं तृणशय्येवरच अशा निर्जन वनांत तो शयन करी. सभोंवार बुभुक्षित व्याघ्रादि क्रूर वनपशु भयंकर असे शब्द काढीत. सौख्यभोग अशी जी त्याची सुंदर काया तिचा उपवास, जागरण, अचल ध्यानादि व्रतें करून त्यानें हालअपेष्टा करावी. कधीं कधीं तो इतका ध्यानशील होई कीं काया पाषाणवत् अचल होऊन खारी वगैरे जनावरांनीं त्याच्या अंगावर फिरावें. मानववास ज्यांस सहन होत नाहीं असे भित्रे पक्षी त्याच्या समीप असलेल्या अन्न भरलेल्या कमण्डलूंतून अन्न वेंचून खात.

येणेंप्रमाणें माध्यान्होपासून मध्यरात्र-पर्यंत त्यानें ध्यानस्त असावें. मध्यानीस सूर्य-किरणांनीं पृथ्वी तापून गेली आहे व मृग-जलपूर्ण वातावरणांत सर्व वृक्ष व मुळें जणुं काय नृत्यच करीत आहेत. सूर्यास्त झाल्यावर आकाश तारकांनीं संपन्न होत्सातें अनुपम असें आपलें सौंदर्य दाखवूं लागतें. नानाप्रकारचे पक्षी आपले रवरव सुरू करितात. दिवाभीत आपली घु घु करूं लागतो. रातकिडा आपल्या किर्र शद्बाचा घोष करितो अशा नानाविध चेष्टा पृथ्वीतलावर होत असतां त्याचें समाधिस्त चित्त ह्यांहीं-करून आकर्षित न व्हावें, परंतु विचाराच्या गहन अशा दरिकंदरीं त्याचें मन लुब्ध असे. नानाप्रकारचे विचार अंतःकरणांत उद्भवून त्यांचे समाधान करण्यांतच त्याचा काळ जात असे. संसाररूपी जो चक्रव्यूह त्याच्यांतून बाहेर निघण्याचा मार्ग कसा उमजेल या विवेचनेंत त्याला कोणत्याहि गोष्टीचें भान रहात नव्हतें. गहन आंधारांत मध्यरात्रीच्या समयास, जे काळीं क्रूर श्वापदांच्या शद्बाखेरीज, अथवा लोकांच्या अज्ञानरूपी जंगलांतून काम-क्रोधादिक षड्रिपु यांचा जो मोठा मानवमनाच्या पटांगणावर डाव चाले त्याच्या शद्बाखेरीज दशादिशेस गंभीर अशी शांतता नांदूं लागली ह्मणजे मग प्रभु निद्रित होई. चंद्रानें आकाशाचा दहावा भाग आक्रमित केला नाहीं तोंच अरुणोदयाचे पूर्वींच त्यानें जागृत होऊन गिरीच्या सपाटीवर उभें राहून निद्रित अशी जी धरणी असे तिचा व तिच्यांतील वस्ती करणाऱ्या कोट्यवधि जंतूंचा परिणाम काय होईल यांचा चिंतापूर्वक विचार करावा. इतक्यांत प्रातःसमय होऊन सूर्य नारायण आपल्या अनेकविध किरणांनीं पृथ्वीस "जागी हो" ह्मणून उठवूं लागे. सूर्योदय होतांच इतर जनांसारखें त्यानें दिवसपतीस नमन करावें. स्नान मुख-मार्जनादि क्रिया करून शुद्धांग होऊन आपलें भिक्षापात्र हातीं घ्यावें. नागमोडी-च्या रस्त्यानें त्यानें नगरीमध्यें प्रवेश करून आपलें भिक्षापात्र भरून जाईपर्यंत लोकां-पासून भिक्षा घ्यावी. मार्गांतून जात असतां नागरिक जनांनीं मोठ्या शद्बानें त्याच्या दैविक मुद्रेस अवलोकन करून ह्मणावें "महाराज, ह्या भिक्षेचें ग्रहण करा. बाळकांनो जा, महाराजांचे पायांवर डोकीं ठेवा. त्याच्या कौपिन वस्त्राची किनारी आपल्या नेत्रांस लावा. जा, त्याच्या कमंडलूंत दूध घाला. जा, गुरूला घरांतून मोदकाचें खाद्य आणून द्या." आणि त्याप्रमाणें त्या बाळकांनीं मोठ्या प्रेमानें करावें. सर्व लोकांच्या दुःखानें व्याकूळ व दयेनें पूर्ण असा आमचा प्रभु मार्गांतून चालला ह्मणजे त्याची पञ्चशरासारखी मोहक कायां पाहून एखादी भारतवर्षीय कन्या चकित मुद्रा धारण करून प्रेममोहित होत्साती आपल्या सौंदर्यपूर्ण अशा कृष्णवर्ण-नेत्रांनीं, त्याजकडे एकाग्र चित्तानें पाही. मनीं धारणा केलेल्या पुरुषाचाच पुतळा तिजपुढें उभा आहे असा तिला भास होई, आणि तिच्या अंतःकरणांत प्रेमाचा पाझर सुटे. लोकांनीं आपणास अंतःकरणपूर्वक दानें दिलीं ह्मणून मधुर अशा शद्बांनीं त्यास आपली कृतज्ञता

दर्शवून पीत वस्त्र व आपली भिक्षापूरित कमण्डलुहस्त असा आमचा प्रभु आपल्या निर्जन स्थळाचें मार्गावलंबन करी. तेथें जाऊन पुण्यशील ऋषींच्या समागमें ज्ञानप्राप्ति, बोधश्रवण, शंका समाधानादि नानाविध क्रिया करीत तो आपला काळ लोटी.

रत्नागिरीच्या पर्वतशिखरावर मध्यंतरीं गर्द छायेंत तापसी जनांची वस्ती होती. या स्थळीं योगी, ब्रह्मचारी, भिक्षुक आणि जटी व सन्यासी आपल्या देहाची विटंबना, कामक्रोधादि षड्रिपुंपासून त्रास न व्हावा म्हणून करीत. कित्येक तपस्वीजन आपले हात वर करून अहोरात्र उभे असत. हाताच्या रक्तवाहिन्या शिथल पडून हात शुष्क लांकडासारिखे निर्जीव होत ते पाहून असें वाटे कीं वृक्षावर शुष्क खांद्याच उगवल्या आहेत कीं काय! दुसऱ्या कित्येकांनीं आपल्या मुठीच वळवून ठेविल्या होत्या. हें त्यांचें व्रत इतके दिवस चाललें होतें कीं, त्यांच्या बोटांचीं नखें तळहातांतून आरपार गेलेलीं होतीं. काय त्या मानवप्राण्यांचें धाडस! खडावांवर खिळे लावून त्या खडावा पायांत घालून कित्येकांनीं चालावें. इतर कित्येकांनीं टोकदार अशा गारगोट्यांस जमवून त्यांनीं आपलें वक्षस्थळ, भ्रुकुटी आणि जंघा यांस मढवावें. पुनरपि त्यावरती अग्नीनें क्षतें पाडावीं. आणि याप्रकारें आपलें अंगमांस कृष होल्यावर त्यांत खिळे आणि वनकंटक सन्निविष्ट करावे. शरीरत्वचेस रक्षा आणि मृत्तिका फासून मृत माणसांच्या अंगावरील वस्त्र परिधान करून श्वापदासारखें जमिनीवर लोळावें. दुसरे असे कित्येक होते कीं त्यांनीं ज्या ठिकाणीं स्मशानभूमि असे त्याठिकाणीं प्रेतामध्यें जाऊन लोळावें. सभोंवार घारी व गिधाडें प्रेतांवर ठेविलेले पिंड खात बसलेलीच असत. कित्येकांनीं शिवनामस्मरण पञ्चाशत वेळीं करावें, सर्प आपल्या कृष्णवर्ण अशा मानेसभोंवार गुंडाळावे असा हा दुःखी समाज त्या ठिकाणीं जमला होता. त्यांच्या टाळु उन्हाच्या तापानें करपून गेल्या होत्या. डोळे चिपडांनीं वरबळीत झाले होते. त्यांचें अंग ओढून गेलें होतें. मुखचर्या पांच दिवस मरून पडलेल्या प्रेतासारखी झाली होती. अलीकडच्या बाजूस धान्याचा एक एक दाणा खाऊन कित्येक उपास करून राहणारे होते. पलीकडल्या बाजूस दुसरा एक तपस्वी पडला होता. तो आपल्या वरणांत कडू पाला घाली व तसें खाई. असें करण्याचें कारण हें कीं आपल्या जिभेस मिष्टान्न खाण्याची संवय लागूं नये. त्यांच्या पलीकडच्या बाजूस एक तपस्वी होता तो फारच विलक्षण प्रकारचें तप करीत होता. त्यानें आपली दृष्टि अंध करून घेतली, जिव्हा कापून टाकिली, शिस्न छाटून टाकलें, पाय तोडून टाकिले, अशा प्रकारें लुळा व बधिर त्यानें आपणास करून घेतलें होतें. अशा प्रकारें आपली उत्तम काया विद्रुप करून परमार्थ सुखप्राप्तीची त्यानें यातायात चालविली होती. जगांत दुःखोत्पत्ति करून मानवास देव पीडा देतात त्यांस ह्याचें दुःख पाहून आपण जे जनांस दुःख देतों तें कांहींच नाहीं, असें पाहून लाज उत्पन्न होत असेल!

आणि यमराज जितकी यातना मानवास देण्यास समर्थ आहे त्यापेक्षांहि जबर यातना सहन करून मानव देवादिकांपेक्षां बळकट होतात.

ह्या अशा समुदायास दुःखित मुद्रेनें पाहून आमचा प्रभु त्यांच्या गुरूस ह्मणाला. "महाराज! आज बरेच दिवस मी ह्या पर्वतशिखरावर वस्ती करून आहें. मी सत्यशोधक आहें. आपण व हे माझे बंधु अशा तऱ्हेनें स्वतः होऊन दुःख कां भोगितां? जी आयुर्मर्यादा दुःखानें अगोदरच पूर्ण आहे तींत आणखी हा दुःखाचा समुच्चय कां वाढवितां?"

तो योगी असें उत्तर देता झाला. "शास्त्रांतरीं असें लिहिलें आहे कीं आमरणांत जर या प्रकारें आपण देहाची अपेक्षा करूं तर या क्रियांनीं देहधारी आत्मा शुद्ध होऊन कल्पनातीत अशा सौख्यपूर्ण लोकांत जाईल."

राजपुत्र बोलतो—"तो आकाशगामी आपण जो मेघ पाहतां आणि सांप्रत जो तुमच्या इंद्रदेवतेस सुवर्णमय वस्त्राप्रमाणें आच्छादन करितो तो खवळलेल्या अशा समुद्रांतून निघून वरतां गेला; परंतु अश्रूप्रमाणें त्याचे जलबिंदु होऊन तो पुनरपि भूतळीं पतन पावेल. आणि नंतर नाला, खिंडारे व नद्या यांच्या द्वारें गंगेस जाऊन मिळेल आणि तेथून समुद्रास जाऊन मिळेल. सख्या मित्रा, ह्या प्रमाणें स्वर्गाची कांहीं काळ वस्ती करून तपस्वीजन पुनरपि भूतळीं पतन पावणार नाहींत याविषयीं कांहीं प्रमाण निश्चित असें तुह्माजवळ आहे काय? कारण जो चढेल तो पडेल आणि क्षित वस्तूचा अंश समाप्त होईल; आणि तद्वतच यममर्दनींच्या पण्यशाळेत स्वरक्ताचा पात करून जर स्वर्गसुख एक समयीं आपण संपादन कराल तर पुनरपि अधःपात होऊन तोच श्रम करणें तुह्मास भाग पडेल."

तो तपस्वी शोकाकुल होऊन बोलतो. "आपण ह्मणतां तसेंच कदाचित असेल. कोणत्याहि वस्तूचें निश्चित ज्ञान आपण्या मानवास नाहीं; तथापि जशी अंधारमय रात्र समाप्त होऊन सूर्योदय होतो व श्रमाची समाप्ति झाल्यावर शांति होते आणि तुह्मास विदितच आहे कीं उत्तम गतीची इच्छा धरणाऱ्या आत्म्यास नष्ट देहानें पाशबद्ध करून तर टाकिलें आहे त्यांतून त्याची सुटका करण्यास आह्मी अल्पकालिक ताप सोसून महत्कालपर्यंत सुख भोगण्याचा इच्छेनें तपश्चर्येच्या मार्गानें देवादिकांशीं झगडा मांडिला आहे.

हा सुखभोग कोट्यान् कोटि वर्षे यद्यपि जरी प्राप्त झाला तथापि अंतीं त्याचा शेवटच होणार. त्रैलोक्यांत तरी शाश्वत असें जीवन सांपडणार आहे काय? तुमचे देव तरी अनंतकाळ रहाणारे आहेत काय?

योगी प्रत्युत्तर करितात कीं ब्रह्मदेवाशिवाय कोणत्याहि देवता आद्यंत रहित नाहींत.

प्रभुबुद्ध बोलता झाला. "महाजनहो, तुह्मी ज्ञानसंपन्न असून पुण्यशील व निश्चयाचे पुरुष दिसतां तर अशा प्रकारचें अनिश्चित द्युत खेळणें तुह्मास उचित दिसतें काय? कारण जो लाभ होईल अशी तुह्मी

आशा बाळगितां तो लाभ तर नष्ट होणार आणि त्यासाठीं अशा प्रकारें शरीरपीडन ज्यापासून न इहलोकीं न परलोकीं सुख; आज्ञांकित असा अश्व निकारण ताडिला असतां लवकर मरून जातो अथवा एखादि नौका नेमलेल्या बंदरीं जाण्यापूर्वींच जशी फुटून जाते तद्वतच अनेक जन्म धारण करून जो हा देह प्राप्त झाला आहे व जो ज्ञानप्राप्ति करून घेण्याचें वातायन आहे आणि ज्याच्या द्वारेंच ज्ञानाचा अरुणोदय कोणत्या दिशेस होणार हें कळणार आहे, आणि कोणत्या दिशेस उत्तम गतीचा मार्ग आहे हेंहि पण कळणार आहे अशा ह्या देहाची तुह्मी विटंबना करून नसत्या सुखाची अपेक्षा करितां हें तुह्मास उचित दिसतें काय ?"

त्या योग्यांनीं नंतर उत्तर केलें कीं, ह्या मार्गाचें आह्मी अवलंबन केलें आहे आणि मरणोत्तर सुखभोग आहे अशी आह्मी अपेक्षा धरून मार्गांत जरी अग्नि असला तथापि अंत होईपर्यंत त्यावर आह्मी आक्रमण करणार. कदाचित आपणास दुसऱ्या मार्गाचें ज्ञान झालें असल्यास तें आह्मास निवेदन करावें. नाहीं तर आपणास शांति असो हा आमचा आशीर्वाद घेऊन आपल्या मार्गानें आपण चालावें.

मानव अशा प्रकारें आपल्या देहाची विटंबना करून आत्म्यास मरण येऊं नये ह्मणून केवढी प्रीति बाळगितात, ज्या देवता मानवास सुखभोग होऊं नये ह्मणून इतक्या जपतात अशा देवतांस संतोषविण्याकरितां देहास यातना कशा कशा प्रकारें करून घेतो; याप्रमाणें स्वबुद्धीनें देहास यातना देऊन यमयातनास लाजविण्याचा तर त्यांचा विचार नसेलना? देहाची अशी अपेक्षा करून आत्म्याचा उत्तम गतीचा मार्ग सुलभ करण्याकरितां ह्मणून तर तो असे प्रकार करीत नाहीं ना? कोण जाणे! हे विचार प्रभूंच मनांत येऊन तो दुःखित मुद्रेनें तेथून चालता झाला.

रानांतील पुष्पांकडे पाहून प्रभु बुद्ध बोलता झाला "अहो क्षेत्रनिवासी पुष्पांनो! आपलीं तोंडें सूर्यनारायणाकडे वळवून आनंदानें तुह्मी प्रकाश ग्रहण करितां. रुपेरी, सोनेरी व निळीं अशीं चित्रविचित्र वस्त्रें परिधान करून संतोषपूर्वक सुखमय असा सुवास लोकांस देतां. तुह्मी आपल्या सुखपूर्ण आयुष्याची अवधी कां कमी करीत नाहीं? तुमचें तोषविणारें असें लावण्य नष्ट कां करीत नाहीं? आकाशरंगी अशा समुद्राच्या शीतळ लाटांचा मलयगिरीवरून जो दक्षिण दिग्वायु येतो तो घेण्यास उच्च होणाऱ्या ताडवृक्षांनो! क्षेत्रांत कोमल असा तुमचा अंकुर येऊं लागल्यापासून तों फलप्राप्ति होईपर्यंत तुह्मी मोठ्या समाधानानें वाढतां ह्याचें तुह्माजवळ मर्म काय आहे हें तुह्मी सांगतां काय? अहो सुखानंदांत रममाण होणाऱ्या पक्ष्यांनो! इकडून तिकडे जे तुह्मी मोठ्या आनंदानें उड्या मारितां; तुह्मास तुमचें जीवित नकोसें कसें होत नाहीं? उपासादि व्रतें करून उत्तम गति होते असें तुह्मी कां मानीत नाहीं? मानव जो तुमच्यावर प्रभुत्व करितो व तुह्मास मारून तुमच्या

रक्तावर जो आपलें पोषण करितो तो प्राज्ञ आणि ज्ञानसंपन्न देहास यातना देतो हा मोठा चमत्कार नव्हे काय?

याप्रमाणें प्रभूच्या मुखांतून उद्गार निघत असतां पर्वतावरून पटपट चालणाऱ्या मेंढ्याच्या पावलांनीं उडालेली धूळ वाऱ्यानें खालीं आली. वरवीं मेंढ्या गमत रमत हळुहळु शहराकडे मार्ग कंठीत चालल्या होत्या. जातां जातां झाडांचा पाला खाण्यासाठीं कित्येक मध्यें मध्यें थांबत. जेरा त्यांपैकीं एखादी आडमार्गाला गेली कीं, मेंढपाळ गोफणींतून दगड फेंकून पुनः तीस कळपांत आणी. त्यांपैकीं एक आपल्या दोन पिलांसह हळुहळु चालली होती. त्यांपैकीं एक करडूं कोठें दगड लागून रक्तबंबाळ झालें होतें आणि दुसरें नाचत बागडत चाललें होतें. मेंढी दोघांसही जपून घेऊन कळपाबरोबर चालली. तें लंगडें करडूं पाहून प्रभूनें त्याला उचलून मेंढीस तो बोलता झाला, बा ऊर्णांग धारण करणाऱ्या माते चल तुला जिकडे जावयाचें असेल तिकडे तुझें लेंकरूं घेऊन तुजबरोबर मी येतों. पलीकडील गुहेंत त्या तपस्वी जनासह बसन धरणीतलावर होणारीं दुःखें एकाग्रचित्तानें पाहणें व तुजसारख्या दुःखीजनाचें साह्य करणें हीं दोन्ही कृत्यें समान पुण्यशील आहेत.

परंतु प्रभुबुद्ध मेंढपाळांस असें विचारिता झाला कीं, "गड्यांनो, मेंढ्या तर सायंकाळ झाला असतां रानांतून घरीं नेत असतात परंतु तुह्मी या दोन प्रहराचे वेळेस त्यांस कां ह्मणून नेतां?"

"आमचा राजा आज यज्ञ करीत आहे ह्मणून आह्मास शंभर मेष नेऊन देण्याची आज्ञा झाली आहे. राजाच्या देवतांची तोषपूर्वक पूजा व्हावी एतदर्थ हा यज्ञसमारंभ चालला आहे" असें ते मेषपाळ उत्तर देते झाले.

नंतर गुरुराज ह्मणता झाला. "मीहि तुमच्यासह येतों." हातांत त्या लंगड्या करडास उचलून घेऊन धुळींतून व सूर्याच्या तापांतून प्रभुबुद्ध शांतपणें चालला. मेंढी त्याच्या पायाजवळून में में शब्द काढीत चालली.

याप्रमाणें मार्गाक्रमण करून सायंकाळीं सूर्यास्ताचे समयीं ते नगरींत प्रवेश करिते झाले. राजाचे सेवक ज्या ठिकाणीं पाहरा करीत होते अशा दरवाज्यांतून त्यांनीं जेव्हां प्रवेश केला त्या समयीं तो भृत्यजन आमच्या प्रभूच्या तेजःपुंज अशा मुखाकडे पहात तटस्थ उभा राहिला. बाजारांत सामान घेऊन आलेल्या लोकांनीं आपले खटारे एकीकडे ओढून घेतले. क्रियविक्रय करणाऱ्यांचा शिवीगाळ करूनें जो सवदा चालला होता तो त्यांनीं क्षणभर बंद ठेविला. लोहार ऐरणीवर हातोडा मारावयाचा विसरून हातांत हातोडा असतांच तसाचातसाच उभा राहिला. कोष्ट्यानें आपली वीण तशीचीतशीच टाकली. कारकुनानें आपली जमाखर्चाची वही अचुक बंद केली. सराफ कवड्या मोजतां मोजतां विसरला. तांदुळाची बाजारांत जी रास लागली होती तिजकडे कोणाचें लक्ष्य नव्हतें ह्मणून शिवाचें वहान

वृषभराज आनंदानें खाऊन आपली मनीषा पूर्ण करीत होते. विकत घेणाऱ्याच्या भांड्यांत दूध भरतां भरतां भांडें भरून गेलें हें गवळ्याला समजलेंच नाहीं ह्मणून भांड्याबाहेर दूध वहात जात होतें. या सर्व जणांचें चित्त प्रभु गायीसारिखा नम्रपणें जात होता त्याच्याकडे एकाग्र होऊन गेलेलें होतें. काय त्याची मोहक अशी गंभीरता! ज्या स्त्रिया त्यास पाहण्यासाठीं ह्मणून आपल्या दरवाज्यांत उभ्या होत्या त्या एकमेकीस विच रूं लागल्या कीं "यज्ञमेष हातीं घेऊन चालला आहे असा सौंदर्यपूर्ण हा कोण परुष असावा? कसा तो शांतीचा आणि लावण्याचा पुतळा आहे! हा कोणत्या जातीचा असावा बरें? त्याचे नेत्र किती प्रेमळ आहेत! हा देवांचा राजा शक्र तर नसेलना? त्यांपैकीं कित्येकजणी ह्मणाल्या "अहो! पर्वतशिखरावर जे तपस्वी रहातात त्यांच्यासमागमें जो पुण्यशील पुरुष रहातो तोच हा आहे." विचारसागरांत गर्क असा आमचा प्रभु इकडे तिकडे लक्ष्य न देतां चालला होता. हर! हर!! काय माझ्या ह्या मेषांची दशा! त्यांस कोणी मेषपाळ नाहीं. अंधार रात्रींत त्यांस मार्गदर्शक असा कोणी नाहीं. मजसहवर्तमान असणारीं हीं जीं वाचाविरहित श्वापदें त्यांसमानच हे माझे मेष डोळे मिटून मरण हीच कोणी एक जी सुरी तिजकडे जात आहेत." अशा मननांत गुंग होत्साता लोकांचें भान न राहतां प्रभुबुद्ध चालला. नंतर एकजणानें राजाकडे जाऊन असें सांगितलें कीं "महाराज आपण यज्ञकर्मासाठीं आज्ञापिलेला असा मेषकळप कोणी पुण्यशील तपस्वी घेऊन येत आहे."

राजा यज्ञमंडपीं उभा होता. त्याच्या उभय पार्श्वभागीं शुभ्र वस्त्रें परिधान केलेले असे ब्राह्मण मंत्रघोष करीत होते. मध्यवर्ती असें जें स्थंडिल होतें त्यांतून जो अग्नि प्रदिप्त झाला होता त्यास ते घृताच्या आहुति देत होते. चंदनाचीं काष्टें जीं होमकुण्डांत ज्वलित होतीं त्यांतून निघणाऱ्या अग्निज्वाळा घृतादिकांच्या आहुति ग्रहण करून प्रदक्षिणा करीत होत्या. होमकुंडाच्या सभोंवार वालुकामय एक लहानसा प्रदेश केलेला होता. त्यावर अर्पण करण्यासाठीं ह्मणून मारलेले असे प्राणी पडले होते. त्यांच्या अंगांतून जो रक्तस्राव होत होता तो मंद असा वहात वहात वालुकामय प्रदेशांत शोषून जाई. त्याच स्थळीं चित्रविचित्र रंगाचे ज्याच्या अंगावर ठिपके आहेत असा एक मेष पडलेला होता. त्याचें मस्तक मुंजेनें त्याच्या शेपटीस बांधलें होतें; आणि एक ब्राह्मण मंत्रघोष करीत त्याच्या ताणलेल्या मानेवरून विळा फिरवीत होता. मंत्र असा होता कीं, 'अहो! भयप्रद देवतांनो! बिंबासरानें आरंभिलेल्या अनेक यज्ञांचा हा उत्तम बळी ग्रहण करावा. आनंदानें हें उडणारें रक्त अवलोकन करा. सुवासित अशा ज्वाळांमध्यें पुरोडाशाचें जें भाजन होत आहे त्या सुवासिक अशा हविषान्नाचा सुगंध घ्या. राजाचा पापभार ह्या अजावर राहो आणि अग्निज्वाळा त्यास गिळून टाको. पहा! ह्या चछुरीकेचा मी त्याच्या मानेवर प्रहार करितों.

इतक्यांत मंदस्वरानें प्रभुबुद्ध बोलते झाले. "हे राजाधिराज, त्यास मारूं देऊं नका." असें ह्मणून तात्कालिक त्या बद्ध बलिप्राण्यास तो बुद्ध मुक्त करिता झाला. त्यांचें स्वरूप असें होतें कीं माणसावर त्याचा एकदम पगडा बसे. त्या बलिप्राण्यास मुक्त करीत असतां त्याचा हात कोणी धरिला नाहीं. नंतर राजाची आज्ञा मागून जीवनाविषयीं तो प्रभु बोलूं लागला. "सर्वांस दुसऱ्याचा जीव घेता येतो; परंतु देतां कोणास येत नाहीं. हें जीवित रक्षण करण्यासाठीं किती मोठें तांडव जीवनधारी प्राण्यांस करावें लागतें! अति क्षुद्रप्राणी जरी असला तथापि जीवित त्यास फारच प्रियकर वस्तु आहे. परंतु ज्या ठिकाणीं दयेची वस्ती आहे तेथें जीवित ही देणगी आहे. कारण दया दुर्बळावर कृपाळु व बलिष्ठांस भूषण अशी आहे. मानव देवादिकांपाशीं कृपा भाकितो परंतु ज्यांस तो देवासारिखाच आहे त्यावर तो करुणा करीत नाहीं. सर्व जीवनधारी प्राणी एकमेकांस अदृष्ट अशा शृंखलेनें बद्ध आहेत. अहो! ज्या प्राण्याचा तुह्मी वध करितां ते तुह्मास ऊर्ण व दूध या रुपानें करभार देत नाहींत काय? आणि जे हात त्यांचा वध करितात त्यांवरच ते आपल्या जीवितसंबंधीं रक्षणाचा भरंवसा ठेवीत नाहींत काय? शास्त्रांतरीं लिहिलेलें आहे कीं जी जीवनज्वाळा शुद्ध जातीची आहे ती नाना प्रकारचीं जीवितें धारण करून पशुपक्षादिकांपासून तों मानवापर्यंत पायरी पायरीनें चढत जाते. असें जर आहे तर आत्म्याचा जो नियमित मार्ग तो तुह्मी यज्ञ केल्यानें मोडाल; आणि त्यायोगें पापाचे मात्र धनी व्हाल. प्राण्याचा रक्तस्राव केल्यानें आत्मा शुद्ध होऊं शकत नाहीं. देवादिकांचें स्वरूप मंगल असल्यानें त्यांस कदापि रक्तस्रावापासून तोष होणार नाहीं; आणि ते अमंगल असल्यास अवदान देण्यांत हित नाहीं. अरे, सर्वांनीं हवेतसे अनाचार करून, ज्या इहलोकीं चांगल्याचें फळ चांगलें होणार, दुष्ट कृत्याचें दुष्ट फल होणार, कायिक, वाचिक, मानसिक, हीं तीन प्रकारचीं कृत्यें ज्या जातीचीं तुमच्या हातून घडून येतील तशाच जातीचें फल तुह्मास प्राप्त होणार असा न्याय असतां निरपराधी प्राण्यावर आपलें पाप टाकूं पहातां काय? तसें कदापि होणार नाहीं. जसें कराल तसें भोगाल." सत्य आणि दया यांहींपूर्ण असा हा उपदेश, शोभायमान असें आसन धारण करून, वाचा स्तब्ध झाली आहे अशा जनांस प्रभु बुद्धानें केला. उपदेश श्रवण करून रक्तपूर्ण असे आपले हात पुरोहितांनीं वस्त्रांनीं झांकून टाकिले. राजा प्रभुबुद्धाच्या समीप येऊन हात जोडून उभा राहिला, यद्यपि प्रभुबुद्धाचा उपदेश चाललाच होता. "या पृथ्वीतलाचे ठायीं जीवनधारी प्राणी परस्परांशीं स्नेहानें वर्तून निरक्त आणि शुद्ध अशा अन्नाचें जर ग्रहण करील ह्मणजे धान्य, फल, शुद्धोदक हीं जीं सर्व प्राण्यासाठीं सृष्ट आहेत ह्यांचेंच सेवन करून जर राहील तर हें पृथ्वीतल किती बरें सुखाचें झालें असतें!" या शब्दांनीं प्रभुनें उपदेशाचा जेव्हां शेवट केला तेव्हां पुरोहितांनीं आपलीं होमकुंडें अस्ताव्यस्त केलीं; बलिप्राण्याचा वध

करण्याची छुरिका फेंकून दिली. दुसऱ्या दिवशीं गांवांत दवंडो पिटवून स्तंभावरून असा लेख कोरविला कीं "आजपर्यंत यज्ञकर्माकरितां व भक्षणाकरितां वध व हत्या झाली, परंतु आजपासून कोणीहि रक्तस्राव अथवा मांस भक्षण न करावें. कारण ज्ञानाची वृद्धि होत आहे; जीवित सर्वांचें एकच आहे; आणि दयावंतास दयांश प्राप्त होतो. येणेंप्रमाणें राजाची इच्छा आहे सर्वांस विदित व्हावी." प्रभुबुद्धांनीं जे कालापासून मृदु व गोड भाषणांनीं आपला उपदेश केला तेव्हांपासून यच्चावत् जीवनधारी प्राण्यामध्यें गंगेच्या प्रदेशीं सुखशांति वसत आहे.

सर्व जीवनधारी प्राणीमात्रावर प्रभूची इतकी ममता व माया असे कीं, पुस्तकांतरीं असें लिहिलें आहे कीं "अनेक वर्षांपूर्वी जेव्हां प्रभु ब्राह्मणजन्मांत होते ते वेळीं दलिद्र ग्रामासमीप मुंड नांवाच्या पर्वतावर तपश्चर्या करण्याकरितां ह्मणून वस्ती करून ते रहात होते. ते समयीं पृथ्वीतलाचे ठायीं दुर्भिक्ष पडलें होतें. साळींत दाणा आला नव्हता तोंच अनावृष्टिमुळें साळीचे रोप वाळून गेले. उन्हाचा प्रखर ताप झाल्यानें अरण्यांतील सर्व कासारांतील जल नाहीसें झालें. वृक्ष व तृण हीं होरपळून गेलीं. पशुपक्षी इत्यादि वनचरांस थारा नसल्यामुळें तीं रानोमाळ अन्नान करीत गेलीं. अशा समयीं एक बुभुक्षित व्याघ्री, जलोवाच्या तापलेल्या पाषाणावर पसरली होती. ती प्रभूच्या दृष्टीस पडली. भुकेनें तिचे वाटोळे नेत्रांचें हिरवट तांबडें तेज पडे. तिची सुकून गेलेली जिव्हा जबड्याच्या बाहेर हातभर लांब पडलेली होती. एखाद्या मोडक्याशा झोपडीचें वाशामध्यें जसें छप्पर लटकून रहातें त्याप्रमाणें तिच्या ढुंगणावरच्या पट्टेदार कातडीच्या सुरकुत्या वळून ती कातडी फासळ्यामध्यें लटकलेली होती. सुरकुत्या पडलेल्या आंचळाजवळ बुभुक्षित अशीं तिचीं दोन पिलें पडलीं होतीं. तीं पिलें निर्दुग्ध झालेलीं आंचळें ओढओढून चोखीत होतीं. पण त्यांत त्यांस दुधाचा लवलेशहि मिळत नसे, ह्मणून तीं पिलें मोठमोठ्यानें किंकाळ्या फोडीत. ती त्यांची रोडकी कृष झालेली आई त्यांस ममतेनें चाटी, गुरगुर करीत त्यांस ती आपल्या पाठीवर पडूं देई. हें पिलांचें दुःख पाहून तिला फार दुःख होई. आणि तें दुःख शमन करावें ह्मणून आपलें तोंड भुमीवर ठेवून ती वाळुवर पसरली. मध्येंच तिनें मेघासारखी गर्जना केली. ही तिचीं अत्यावस्था पाहून प्रभुखेरीज कोणासहि दया आली नाहीं. प्रभूनीं विचार केला कीं ह्या वनराक्षसीला साह्य देण्याचा एकच उपाय आहे. मांसहार तिला जर मिळाला नाहीं तर, हीं पोरें सायंकाळपर्यंत मरण पावतील. ह्या रक्तपीची दया कोणास येणार? जर मी तिचा भक्ष झालों तर माझ्या जीविताशिवाय अन्य कोणाची हानी होणार नाहीं, आणि प्रेमाकरितां जर जीवदान दिलें तरी त्यांत अहित कोणतें होणार? असा विचार करून प्रभूनें मुकाट्यानें आपल्या खडावा, काठी, यज्ञोपवित, पागोटें आणि नेसावयाचें धोतर एकेबाजूस ठेवून ते त्या

व्याघ्रीच्या पुढें येऊन, "हे माय! हें घे तुजसाठीं भक्ष. असें ह्मणून ते व्याघ्रीच्या समोर उभे राहिले. भुकेनें व्याकुळ झालेल्या व्याघ्रीच्या हें दृष्टीं पडतांच ती फ केशसा शद्ब काढून आपल्या पिल्ला जवळून उठून त्या अनुमत अशा बळीला अधोभागीं भूमीवर पाडिती झाली. अनंतर आपल्या तीक्ष्ण अशा नखांनीं त्याला विदारून टाकिलें, व आपले पीत असें हात त्याच्या रक्तांत भरवून उष्ण असा उसासा टाकून तिनें त्या निर्भय व उत्तमोत्तम अशा मानवास भक्षून टाकिलें.

राजा बिंबासरानें प्रभूचें कुळ व त्याचें सांप्रतचें कर्म जाणून तो राजपुत्रास आग्रहपूर्वक विनविता झाला. "हा तुझा देह उपवासादिकें करून दुःखभार सोसण्यास अनर्ह आहे. तुझे हात राजवेत्र धरण्यास उचित असतां त्यांनीं भिक्षापात्र अवलंबावें हें आह्मास बरें दिसत नाहीं. बा, प्रिया, चल मजसह माझ्या घरीं. मी यावत्काल राज्यासनीं आहें तावत् तूं माझ्या प्रजेस ज्ञान दे. तुझा विवाह आह्मी एका सुंदरीसह करितों. मी मृत झालों ह्मणजे माझ्या मागें तूं राज्यारूढ व्हावें." हें राजाचें भाषण ऐकून निश्चित मनाचा बुद्धप्रभु राजास याप्रकारें प्रत्युत्तर देता झाला. "हे उदार राजा, माझ्या पित्याच्या घरीं मला कांहीं उणें नव्हतें परंतु सत्याचा शोध करावा ह्मणून मी त्या सर्वांचा त्याग केला. इंद्रानें आपलें पद जरी मला दिलें आणि तेथील अप्सरांनीं जरी मला वेढून घातलें तथापि आतां त्याचा मला स्वीकार करणें नाहीं. धर्मराज्याचा प्रासाद रचावा ह्मणून मी अरण्यांत जातों. तेथून मी गयेस गमन करीन. त्या स्थळीं मला प्रकाश मिळेल अशी मला आशा आहे. तो प्रकाश उपवासादिक आचरणानें, शास्त्रावलोकनानें व ऋषि समागमानें कदापि प्राप्त झाला नाहीं. उपवासादिक आचरणांनें मी देहाची अशी अवस्था केली आहे. तथापि राजा, मार्गाचा शोध लागला नाहीं. करितां ज्या स्थळीं तो प्राप्य आहे त्या स्थळीं मला जाऊं दे. प्रकाश प्राप्त झाला ह्मणजे तूं जें हें प्रेमनिमंत्रण केलेंस त्याचा उपकार फेडण्यास्तव मी तुजकडे येईन."

अनंतर राजा बिंबासरानें बुद्धगुरूच्या सभोंवार प्रदक्षिणात्रय करून चरणीं मस्तक ठेवून आपल्या गमनानें आपला हेतु अति त्वरेनें सिद्धीस जावो असें राजा बोलता झाला. असमाधान पावलेला मुखचंद्रमा म्लान झालेला आणि षडवर्ग तपादिकांचे आचरणानें निःशक्त झालेला असा हा भगवान बुद्ध उरवेल नामक अरण्याकडे चालता झाला परंतु गिरीवर आम्रछायेंत अह्लार, उदार व अन्य यतिपंचक यांनीं त्याचा मार्ग अवरोधून त्यास थांबवून घेतलें, आणि याप्रकारें त्यास बोलते झाले. "बा गुरो, सर्व गोष्टींचा शास्त्रांतरीं उल्लेख स्पष्टपणें केला आहे. श्रुतिस्मृतिपेक्षां महान् योगी यांस सुद्धां ज्ञानाधिक प्राप्य नाहीं. ज्ञानकांडांत कथिलेल्या ज्ञानापेक्षां मर्त्य मानवास अधिक ज्ञान होणें असंभवनीय होय. निर्देह, निःकर्म, निर्भाव, प्रशांत, निर्बधिक, अविकृत, सत् ,

चित्, आनंद ह्या गुणांनीं पूर्ण ब्रह्मस्वरूप ज्ञानकांडांत वर्णिलें नाहीं काय? निर्मोह, निःकर्म, निरहंकार, संसारातीत कसे होऊन ईश्वर पदाप्रत जाऊन त्याच्या तत्वांत मिळून जाणें व असत्यापासून निवृन सताची प्राप्ति करून घेणें, इंद्रियाच्या पाशापासून दूर होऊन शान्ति व निर्वाण कसें प्राप्त करून घ्यावें हें कर्मकांडांत कथिलें नाहीं काय?

शाक्य महामुनीनें हे त्यांचे शब्द श्रवण केले. यद्यपि समाधान प्राप्त न होत्साता तो तसाच आपल्या वसतीच्या स्थळाप्रत चालता झाला.

## पंचमोध्याय समाप्त.

—᠁—

## षष्टमोध्याय.

या अरण्यांतील एकांत स्थळांत पुनः एकवार लोकांचीं दुःखें, दैवाची गति, शास्त्रवचनें जलचरादिकांपासून कोणतें ज्ञान मानवांनीं शिकण्यासारखें आहे, ज्या अनादि गुह्यापासून सर्व जगदुत्पत्ति झाली व ज्या अंधकाराप्रत सर्व चराचर नष्ट होतात असे जे सतासत ह्यांजविषयीं विवेचन करीत प्रभु आपला काळ लोटीत होता जें इंद्रधनुष्य केवळ अभ्राचें बनून नभोमंडळीं राहतें व ज्यावर चित्रविचित्र रंग दृष्टीस पडतात, तद्वत् जें आयुष्य सतासतामध्यें उत्पन्न झालें त्याचा परिणाम, त्याची उत्पत्ति इत्यादि अनेकविध विषयांच्या विवेचनांत प्रभूनें गुंग होऊन जावें. सूर्य उगवे कोणीकडे व मावळे कोणीकडे याची शुद्धि सुद्धां विचारांत गर्क असतां त्यास राहू नये. प्रसंगीं अन्नभक्षण सुद्धां न व्हावें, उपजिवीका केवळ अधोभागीं पडलेल्या फळांनीं प्रभूनें करावी. यानें त्याची कांति निस्तेज झाली. त्याच्या शरीरावर जीं द्वात्रिंशत् राजचिन्हें होतीं त्यांचा सुद्धां लोप झाला. वाळलेल्या वृक्षपर्णावर तरी बरीच वसंताची कांति रहाते परंतु जो देशांत श्रेष्ठ होता, व मानवकुळाचा मोहरा होता तो अगदीं निस्तेज व म्लान असा झाला.

एके प्रसंगीं इतकी दुरावस्था प्रभूची झाली कीं, श्रमानें मृतवत् असा होऊन तो धरणीवर पडला. रुधिराभिसरण नष्ट झालें. श्वासोच्छ्वास मंद झाला. कोणत्याहि प्रकारची हालचाल होत नव्हती. अशा समयीं एक धनगराचा पोर बाजूनें चालला होता. त्यानें प्रभूची अशी स्थिति पाहिली. नेत्र मिटलेले, ओष्टावर व्यथेचीं चिन्हें, भर दोनप्रहरच्या तप्त झालेल्या सूर्याचा मुखावर प्रकाश पडलेला, प्रभूची अशी विपरित अवस्था झालेली आहे, असें त्या मुलानें पाहिलें. त्याला कींव येऊन त्यानें मोठमोठालीं पर्णें गोळा केलीं व त्यांस एकांत एक गोवून त्याचें झांकण प्रभूच्या पवित्र अशा मुखावर घातलें. तसेंच आपल्या एका शेळीचें दूध काढून त्यानें तें धारोष्ण असें दूध प्रभूच्या मुखांत दुरून ओतलें. प्रभूची काया पूत अशी दिसत होती. ह्मणून स्पर्श करणें त्यास बरें वाटलें नाहीं. ग्रंथांतरीं असें लिहिलें आहे कीं, सभोंवार जंबुद्वीप वृक्षांचीं जीं रोपें होतीं तीं

फार त्वरेनें वाढलीं आणि त्यांची छाया इतकी गर्द झाली कीं, जसें पारध करण्यास राजा गेला ह्मणजे त्यासाठीं विश्रांतीचे सुंदर वृक्षमंडप बांधितात, तद्वतच हे दिसूं लागले. हें अवलोकन करून तो धनगराचा पोर विस्मय पावला, आणि प्रभुबुद्धाला देव मानून त्याची पुजा करूं लागला. ह्याप्रमाणें किंचित् विसावा मिळाल्यावर प्रभु उठून बसले आणि त्यामुलाजवळ भरलेला दुधाचा लोटा मागूं लागले. मुलगा ह्मणतो महाराज, मी जातीचा शूद्र आहें. माझ्या स्पर्शानें आपणास विटाळ होईल.

जगमान्य प्रभु प्रत्युत्तर करितात. "दया आणि पार्थिव तृषा सर्व चराचर प्राण्यास जोडितात. सर्वांच्या शरिरांतून एकाच वर्णाचें रक्ताभिसरण होतें. त्यांच्या नेत्रांतून जो अश्रुपात होतो त्यामध्यें सुद्धां भेद नाहीं. सर्वांच्या अश्रुगलांतून क्षार असतो. जे काळीं मानव जन्मास येतो त्या काळीं त्याच्या भाळीं टिळा किंवा गळ्यांत यज्ञोपवित असें कांहींच नसतें. जो सदा सत्कृत्यें आचरितो तोच द्विज आणि जो दुराचरण करितो तोच नीच योनी. माझ्या भावा, दे मला तो दुधाचा लोटा. माझी कार्यप्राप्ति झाल्यास ह्या तुझ्या कृत्याचें तुला फळ मिळेल." हें श्रवण करून तो धनगराचा पुत्र आनंद पावला, आणि प्रभूच्या विनंतीस मान्य झाला.

दुसऱ्या एका दिवशीं त्याच रस्त्यानें कांहीं कलावंतिणी आपल्या गाण्याच्या सरंजामासह जात होत्या. त्या कोठें यात्रा होती ह्मणून आपलें गाणेंबजावणें करण्याकरितां चालल्या होत्या. त्यांजबरोबर त्यांचा एक तबलजी आणि एक सारंगी वाजविणारा होता. त्या कलावंतिणींचे पायांत घुंगरें बांधिलीं होतीं. त्या जेव्हां चालत तेव्हां त्या घुंगरांचा मद्दु असा ध्वनि निघे. त्यांचा सारंगी वाजविणारा जो होता तो मध्यें मध्यें आपल्या तारांचा आवाज करीत जाई. त्या नाचत नाचत त्या सारंगीवाल्यास ह्मणाल्या "गड्या, तुझी सारंगी ज्या वेळीं सुरावर वाजते त्यावेळीं आमचें नृत्यहि फार उत्तम तऱ्हेनें चालतें. सारंगीचा सूर मध्यम मात्र असावा ह्मणजे आह्मी नाचून जनांचें चित्त आपणाकडे ओढून घेतलेंच समजा. तार जर फार ताणली तर तुटते, आणि मग गाण्याचा होतो विघाड. जर तारेला बेतानें ताण दिला नाहीं, तर सूर फारच मंद निघतो आणि गाण्याचा सूर व त्याचा सूर मिळत नाहीं, करितां सारंगी नीट लावून बेताचा जर सूर काढाल तर गाण्याची आह्मी बाहार करून देऊं."

याप्रमाणें संवाद करीत करीत मौजेनें त्या अरण्यमार्गांतून त्या कलावंतिणी धिमे धिमे चालल्या होत्या. फुलपांखरूं जसें या झाडावरून त्या झाडावर निर्भयपणें जातें, आणि आपण काय करीत आहों याची जशी त्यास शुद्ध नसते, त्याप्रमाणें या पोरकट स्वभावाच्या तरुणी चालल्या होत्या. त्यांचा हा संवाद आणि हीं त्यांचीं निर्वेध अशीं बोलणीं व वागणूक पाहून जवळ वटवृक्षाखालीं जो पुण्यवान् योगी बसला होता त्याच्या अंतः-

करणावर त्याचा ठसा कसा उमटतो आहे हें त्यांच्या स्वप्नीं सुद्धां आलें नसेल. ह्यांचें हें अशा प्रकारचें चरित्र पाहून प्रभुबुद्धानें डोळे वर करून ह्मटलें "मूर्खजनांपासूनहि शहाण्यास वारंवार शिकतां येतें. हा आयुष्यरूपी तंतु मी विनाकारण ताणतों. असें करण्यापासून कोठें मुक्त करणारें गायन निघणार आहे काय? सत्याचा शोध करितां करितां माझी दृष्टि अगदीं मंद होऊन गेली. सांप्रत जें मला शक्तीचें अगत्य आहे, त्या वेळीं माझी शक्ति खगून गेली. इतर मानव प्राण्यांस ज्या अन्नाची अवश्यकता असते तें जर मला आतां मिळेल तर फार बरें होईल. नाहींतर आतां मरणपंथास जावें लागेल. सर्व मानव प्राण्यांस जीवन देण्याची जी मी उमेद बाळगिली तिचा आतां असा मरणानें अंत होणार! तेव्हां अशा प्रसंगीं अन्नाचा पुरवठा मिळाला तर किती बरें सुखकारक होईल."

त्या नदीच्या तीरीं एक सेनानी नामा जमीनदार वस्ती करून होता. त्याजवळ सेंदरांचा समुदाय बहुत होता. गरीब व दीन अशा लोकांचा तो साह्यकारी असे. त्याचें नांव सेनानी होतें ह्मणून त्या गांवाचें नांवही सेनानी असेंच पडलें होतें. त्याची स्त्री सूजाता नामें बहुगुणसंपन्न असे. तिचा स्वभाव गोड असा होता ह्मणून सेनानीच्या घरांत शांतता व अनुपम असें सुख नांदत असे. ती पतिव्रता असून सौम्य स्वभावाची, दयाशील, उदार, रूपवती, मोहक सौंदर्यसंपन्न होती. स्त्रीजातीमध्यें ती एक अपूर्व असें रत्नच होती. तो जोडा आपली कालक्रमणा मोठ्या सुखांत करी. इतक्या गोष्टींनीं जरी ते कुळ संपन्न होतें तथापि त्यांच्या सुखांत एक दुःखाचा अंश होता. तो असा कीं त्यांस पुत्रसंतान नव्हतें.

तिनें पूजादिक बहुत प्रकारें पुत्रसंतानासाठीं देवाची बहुत आराधना केली. सांभाच्या पिंडीस पुष्कळ प्रदक्षिणा केल्या, शाळुंकेवर अनेक चंदनाच्या उट्या चढविल्या. जाईजुई इत्यादि नानाप्रकारच्या फुलांच्या माळा शाळुंकेवर दररोज घालाव्या. तिला जें जें करावेंसें वाटलें तें तें तिनें पुत्रप्राप्ति व्हावी ह्मणून केलें. सुजातेनें असा नवस केला होता कीं जर मला पुत्ररत्न झालें तर मी वनदेवांस पक्वान्नांचें भोजन देईन. हा त्या स्त्रीपुरुषांचा मनोदय कांहीं काळानें पूर्ण झाला. स्त्रीस गर्भ राहून नऊ महिन्यांनीं सुंदर असें पुत्ररत्न झालें. तेव्हां नवस फेडावा ह्मणून आपल्या तीन महिन्यांच्या बाळकास ओटींत घेऊन आपल्या डोकीवर पंच पक्वानाचें पात्र घेतलें. आणि अशा प्रकारें वनदेवाच्या स्थानाकडे चालती झाली.

मंदिर स्वच्छ करण्याकरितां सुजातेनें आपली दासी राधा इजला अगोदर पाठविलें. ती जेव्हां मंदिरांत पूजेची सर्व प्रकारची तयारी करण्याकरितां आली ते समयीं तिनें जिवंत असा एक पुरुष पाहिला. तिला वाटलें कीं माझ्या स्वामिनीस वनदेव प्रसन्न झाला आणि ह्मणूनच तो आता मूर्तिमंत बसला आहे. ती घाईघाईनें आली तशीच माघारी गेली आणि आपल्या स्वामिनीस ह्मणूं लागली

कीं "बाईसाहेब, वनदेव तुह्मास प्रसन्न झाला आहे. तो मूर्तिमंत मंदिरीं येऊन आपले हात आपल्या मांडीवर ठेवून बसला आहे. त्याचा मुखचंद्रमा फार तेजःपुंज आहे तथापि त्याची कांति सौम्य व भव्य अशी आहे. केवढें तुमचें भाग्य कीं, आज आपल्यास देवदर्शन झालें."

अनंतर सुजातेनें त्यास साक्षात देव मानून त्याजपुढें साष्टांग नमस्कार घालून भिडेनें खालीं मान घातली व असें ह्मणू लागली. "हे पवित्र देवा, जो तूं या अंबराईंत वस्ती करून आहेस, जो तूं सर्व सुखाचा दाता आहेस, मज तुझ्या दासीवर आज तूं आपल्या साक्षात दर्शनानें इतका प्रसाद केला; तर आह्मी हस्तिदंतासारख्या शुभ्र अशा दुधाचा हा जो नैवेद्य तुजकरितां आणिला आहे तो तूं आह्मावर प्रसन्न होऊन ग्रहण कर."

मग सुवर्णपात्रांत तिनें ती खीर भरिली आणि प्रभुपुढें ठेविली. कांचमण्याच्या कुपींत उत्तम अशा गुलाबांच्या फुलांचें जें तिनें अत्तर आणिलें होतें तें त्या कुपींतून काढून तिनें प्रभूच्या हाताला लाविलें. प्रभु त्या खिरीचें सेवन करीत असतां एका शद्धाचाहि त्यांनीं उच्चार केला नाहीं. ती आनंदपूर्ण माता मोठ्या भक्तीनें ते समयीं एकीकडे उभी राहिली. वाळुकामय अशा प्रदेशांतून प्रवास करीत असतां जसा एखादा पक्षी उदकस्थानें अवचित पाहून आपल्या पंखावरची अथवा मानेवरची रेती जलानें धुवून काढून ताजातवाना होऊन आनंदांत होतो, तद्वत्, त्या सुग्रासानें प्रभूची काया व मुद्रा तेजःपुंज झाली होती. जे दिवस अन्नावांचून गेले व ज्या रात्री जागरणांत गेल्या त्यामुळें प्रभूच्या शरीरावर क्षीणता आली होती, ते सर्व प्रसंग स्वप्नवत् होऊन कांति उत्तम झाली; जणूं काय शरीरासह आत्म्यानेंहि तें मिष्टान्न ग्रहण केलें.

तूंच आमचा वनदेव आहेस काय आणि मी आणिलेला नैवद्य तुला प्रियकर झाला काय?

प्रभुबुद्ध बोलले "बाई, तूं आणिलें हें काय आहे?" सुजाता यावर असें प्रत्युत्तर करिती झाली कीं, हे पवित्र देवा, शत गायींचे दुधानें मी पन्नास गायींस पोशिलें, त्या पन्नासांचें दूध मी दुसऱ्या पंचविसांस चारिलें, त्या पंचविसांचे दूध मी बारा गाईंस चारिलें आणि त्या बारा गाईंचें दूध मी माझ्या ज्या उत्तम सहा गाई आहेत त्यांस चारिलें. त्यांचें दूध काढून तें तापविलें; नंतर आमच्या शेतांत जे उत्तम तऱ्हेचे तांदुळ त्यांतून उत्तम तांदूळ काढून त्यांची ही मालमसाले घालून तुजकरतां खीर केली. ह्या वृक्षाखालीं मी उभी असतां असा नवस केला होता कीं मला जर पुत्र झाला तर तुला अशा प्रकारचा नैवेद्य मी अर्पण करीन. मला पुत्र झाला आणि मी अत्यंत सुखी आहें. स्वसंतोषानें मी बहुत कष्ट करून हा तुजकरिता नैवेद्य आणिला आहे.

प्रभुबुद्धानें हळूच तिच्या मस्तकावर ज्य हातांनीं जगाचा उद्धार होत आहे ते आपले हात ठेवून असा तिला आशीर्वाद दिला

कीं, जो तुला सुखाचा अंश प्राप्त झाला आहे तो तुझ्या वांट्यास बहुत दिवस येवो; आणि या बालकावर कोणत्याहि प्रकारचें संकट न येवो. कारण भगिनी, मी हा तुजसारखाच माणूस आहें, मी देव नाहीं. असें असतां तूं माझें इतकें साह्य केलें. सांप्रत मी विदेशीं आहें. पूर्वी मी राजपुत्र होतों. आज सहा वर्षेपर्यंत अहोरात्र मी, ज्या प्रकाशापासून लोकांस ज्ञानप्रदीप मिळावा अशा प्रकारचें स्थान कोठें आहे ह्याचा मी शोध करीत आहें. ह्या श्रमानें मी फार थकून गेलों होतों; आणि माझी काया निर्जीव अशी झाली होती. इतक्यांत ज्याप्रमाणें जन्मजन्मांतरांनीं आत्मा पापमुक्त होऊन उत्तम दशेस पावतो, त्या तुझ्या ह्या अन्नदानानें मी सजीव झालों. माझे अनेक जन्म होऊन आतां मी ह्या जन्मीं आलों आहें. तुला बाई हा संसार आणि यांतील मायाजाळें सुखकर वाटतात काय?

सुजातेनें प्रत्युत्तर केलें कीं, हे पूज्य देवा! माझी बुद्धि लहान! आणि कमलपुष्पवटिका पर्जन्य किंचित पडला तरी जशा जलानें भरून जातात, परंतु त्याच पर्जन्यापासून यत्किंचितहि जमिनीस ओलावा होत नाहीं, तसें देवा, माझ्या प्रियपतीची मजवर कृपा असली आणि माझें बालक सुखी असलें ह्मणजे मला सुखाची लयलूट होते.

सूर्योदयापासून सायंकाळपर्यंत गृहसंबंधीं कार्यांनीं माझें मन गुंतून जातें. जेव्हां मी प्रातःसमयीं उठतें तेव्हां मी देवाची आराधना करून भिक्षेकरी लोकांस भिक्षा घालितें. अनंतर तुळसीवृंदावनावर सडासारवण करून माझ्या सेवकिणींतील प्रत्येकीस तिचा कार्यभाग सांगतें. याप्रमाणें सर्व गृहकार्यें दोन प्रहरचा समय होईपर्यंत करितें. नंतर माझा पति क्षणभर विश्रांति घेतो ते समयीं मी सुस्वर असें गाणें ह्मणतें आणि त्यांस विंझण्यानें वारा घालतें. सायंकाळीं जेव्हां पति फराळ करितात तेव्हां मी त्यांस वाढतें. हें झाल्यावर देवळीं देवदर्शनास जातें आणि सोयरेधायऱ्या बायकांबरोबर चार सुखदुःखाच्या गोष्टी सांगून पांच सहा घटिका रात्र झाली ह्मणजे आह्मी निजावयास जातों. इतकें सुख भोगीत असतां व सर्व गोष्टींनीं समृद्ध असतां व आतां तर ज्याचा हात लागला असतां आह्मी स्वर्गीं जाऊं असा आह्मास पुत्र झाला असतां मी संतुष्ट नसावें काय? शास्त्रांतरीं असें लिहिलें आहे कीं, जो कोणी प्रवाशाकरितां त्यास विश्रांति मिळावी ह्मणून रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करील अथवा लोकांच्या सुखासाठीं विहिरी व तळीं खणील; आणि ज्यास पुत्रप्राप्ति होईल त्यास मरणोत्तर सौख्यवस्ती मिळेल. ऋषिजनांनीं जें लिहिलें तेंच सत्य असें मानून मी त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवितें. देव ह्या ऋषिजनांसह बोलत असत. त्यांस वेदांतील गुह्य अवगत होतीं. धर्म आणि नीति, सदाचरण व शांति ह्यांची त्यांस चांगली माहिती होती. तेव्हां अशा पुरुषांच्या वचनांवर मजसारिख्या अबलेनें पूर्ण विश्वास ठेवावा हेंच युक्त आहे. मला हेंहि ठाऊक आहे कीं, ' सुकृत्याचा परिणाम चांगला होतो; अपकृत्याचा परिणाम

अपकारक होतो. हा न्याय सर्वत्र सारिखा आहे; कारण सुवृक्षापासून सुफळें होतात, विषतुल्यफळें विषकारक वृक्षापासून उत्पन्न होतात, कोणाचें वाईट इच्छिलें तर द्वेष वाढतो, दया केली तर स्नेह होतो, सहनशीलतेपासून शांति उत्पन्न होते ह्या गोष्टी आह्मी नित्यशः पाहतों; आणि अशी स्थिती जर येथें आहे तर असाच प्रकार. किंमपि याहून उत्तमा- वस्था परत्र नसेल काय? परत्र उत्तमच स्थिति असली पाहिजे, कारण इहलोकीं एका दाण्यापासून अनेकावधि दाणे होतात; आणि सूक्ष्म अशा पुष्परजांचीं बहुशोभायमान अशीं पुष्पसहस्त्रें उत्पन्न होतात; महाराज, दुःखें म- नुष्यांवर येतात, हें मला माहीत आहे. त्यांच्यायोगें कितीजरी सहनशील मनुष्य असला तथापि त्याची पायमल्ली व्हावयाची. ह्या बालकानें जर प्राण सोडिला तर माझ्या उरांत कोणी एकदम सुरी भोसकली असें होईल आणि तसें खरोखर झालें तरच बरें होईल, कारण मग मला, बाळका- स अलिंगून घेतां येऊन पतिव्रता स्त्रिया आ- पले पतीच्या पूर्वी जर मरण पावल्या तर ज्या लोकांत त्या वस्ती करून असतात त्या लोकांत जाऊन मी आपल्या पतीची पतिव्रताधर्मानें अपेक्षा करीन. परंतु मृत्यूनें जर माझ्या प्रिय पतीस अगोदर नेलें तर मी एक मोठी चिता रचून त्यावर आसनस्थ होईन; आणि पतीचें मस्तक मी आपल्या मांडीवर ठेवीन; आणि नंतर चितेस पेट लावून घेईन. धर्मशास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, भारतवर्षांतील स्त्रिया आ- पल्या पतीबरोबर जर सहगमन करतील तर त्यांच्या या पातिव्रत्यानें त्यांच्या पतीस जितके अशा पतिव्रता स्त्रियांच्या अंगावर रोम अस- तात तितकीं वर्षें स्वर्गवास होतो. असा माझा निश्चय आहे ह्मणून मी कशाचीहि धास्ती बाळगीत नाहीं; आणि ह्मणूनच हे पवित्र देवा, माझा काळ इतक्या सुखानें जातो. असें आहे तरी जे दरिद्री आणि शोकपूर्ण आहेत अशांचें मला विस्मरण पडलें नाहीं. "त्यांजवरचीं संकटें देव करो आणि लवकर जावोत. जें मला दिसतें तें मी विनम्र- भावानें आचरण्यास मागेंपुढें पहात नाहीं, जे नियम विधि धर्मशास्त्रांत सांगितले आहेत ते मी सर्वकाळ पाळितें. अशाकरितां कीं, परलोकीं सुख व्हावें."

नंतर आमचा प्रभु बोलिला. तुझें जें ज्ञान आहे तें ऋषिजनांच्याहि ज्ञानापेक्षां अधिक आहे. जे आपणास गुरु ह्मणून ह्म- णवून घेतात त्यांस तूं शिकविण्यास योग्य आहेस. जो मार्ग तुला माहीत आहे त्यापेक्षां अधिक जाणण्याची तुला अवश्यकता नाहीं. त्यांतच तूं संतुष्ट ऐस. अगे, पुष्पासारिख्या कोमल ज्या तुह्मी त्यांनीं अशा प्रकारचे छा- येंत वस्ती करून रहावें. सत्याचा जो सूर्य आहे त्याचा ताप तुह्मास सहन होणार नाहीं. तो ताप सहन करणारे वृक्ष निराळ्या जाती- चे असतात, आणि त्यांस बहुत काळानें आपलीं डोकीं वर आकाशांत नेतां येतात. तूं माझें पूजन केलें. आतां मी. अगे निष्कपट हृदये, तुझें पूजन करितों. पक्षी आपल्या घरीं मायेच्या बंधनानें येतात आणि त्यांस असें करावें ह्मणून कोणी शि-

क्षण दिलें नसतें, तद्वत तुला ज्ञान कोणी न शिकवितां तूं ज्ञानवान आहेस. मनुष्याची मुक्ति होण्याचा संभव आहे हें तुझ्या निष्कपट स्वभावावरून कळतें. तसेंच आयुश्चक्र कोणत्या रीतीनें हातीं लागणारें आहे हेंहि पण तुझ्या स्वभावावरून कळतें. सदा तुजजवळ शांति नांदो आणि सर्व तुझ्या आयुष्यभर सौख्यप्राप्ति तुझ्या वांट्यास येवो. ज्याला तूं देव मानीत होतीस तो मी तुजजवळ असा आशीर्वाद मागतों कीं जसा तुला इष्ट हेतु प्राप्त झाला तसा माझाहि हेतु सिद्धीस जावो.

"तुझें कार्य सिद्धीस जावो" असें ह्मणून ती आपल्या बालकाकडे कौतुकानें पाहूं लागली, तों बालकानें आपला हात प्रभुबुद्धाकडे नेऊन त्याची पूजा केली. मुलांस पुष्कळ समजतें. त्यांस समज आहे हें आपणास मात्र समजत नाहीं. तें पुष्टिकारक अन्न मिळाल्यामुळें अंगांत तकवा येऊन प्रभुबुद्ध बोद्धीवृक्ष ज्या स्थळीं होता त्या स्थळाकडे जाते झाले (हा वृक्ष आजपासून कदापि कोमजावयाचा नाहीं, आजपासून त्या वृक्षाचें सर्वलोक वंदन करतील.) ह्या वृक्षाखालीं बुद्धास सत्याची प्राप्ति व्हावी ह्मणून पूर्वसंकल्प होता. ह्या गोष्टीचें ज्ञान प्रभूस आतां झालें ह्मणून तो या ज्ञानवृक्षाकडे गंभीर अशीं पाऊलें टाकीत चालता झाला. अहो विश्वांनो! समाधान माना, आमचा प्रभु त्या वृक्षाकडे गेला.

तो त्या वृक्षाचे नर दाट अशा छायेंत जसा जाऊं लागला, तसें पृथ्वीतलावरच्या तृणानें वंदन करून त्याची पूजा केली. अकस्मात त्याच्या पायावर पुष्पांची लाखोली येऊन पडली. वनवृक्षांच्या फांद्या त्याजवर सावली करण्याकरितां ह्मणून खालीं लवल्या. जलदेवतांनीं कमलसुगंधयुक्त असा शीतल वायु नद्यादिक जलस्थानापासून पाठविला. वनवराह, हरिण व पुंडरिकादि नानाजातीचे वनपशु हे आपलें जन्मवितुष्ट विसरून आपापल्या वसतीस्थानापासून मोठ्या डोळ्यांनीं प्रभूकडे टक लावून पाहत झाले. विषकारी नाग आपल्या थंड अशा वेटाळ्यावर बसून प्रभूस सन्मान देण्यासाठीं आपली फणा मोठ्या डौलानें हालवीत होता. चित्रविचित्र रंगांचीं जीं फुलपांखरें होतीं, त्यांनीं आपला आनंद दाखविण्याकरितां पंखांनीं शद्ब केला. घारीनें आपलें भक्ष्य सोडून देऊन ती आनंदानें ओरडूं लागली. चित्रविचित्र पट्टयाच्या खारी आनंदानें इकडे तिकडे धांवूं लागल्या. साळीपक्षी आपल्या विणलेल्या व हालत असणाऱ्या घरट्यावरून टिवटिव करूं लागले. सरडा इकडून तिकडे धांवूं लागला. मैना गाऊं लागली. खबुतरें त्या ठिकाणीं जमलीं. सूक्ष्म जीवजंतु हेहि आनंद पावते झाले. मंजुळसें गाणें ऐकूं येऊं लागलें. त्याचा अर्थ असा होता "हे प्रभु, हे सख्या, हे प्राणदात्या, हे तारणाऱ्या! क्रोध अभिमान, इच्छा, भय, शंका इत्यादिकांस तूं आपल्या हस्तगत करून ज्या तूं आह्मा सर्वांकरितां सर्वस्वाचा त्याग केला आहेस तो तूं आतां वृक्षाखालीं गमन कर. हें दुःखव्यापी जग तुझी उपकारस्तुति करीत आहे. तूंच बुद्ध आहेस, तूंच त्याच्या दुःखांचे नि-

वारण करशील. हे सन्मान व आशीर्वाद पावलेल्या! मार्गाचें आक्रमण कर. हे महाराजा व विजयश्रीसंपन्न योद्धच्या, तुझा अति यत्न आह्मासाठीं कर. ज्या रात्रीची युगानुयुगें अपेक्षा करीत होतों ती रात्र आली. तुझ्या जिंकण्याची घटिका येऊन पावली."

जेव्हां प्रभुबुद्ध वृक्षाखालीं जाऊन बसले तशी रात्र पडली. हा प्रभुबुद्ध आहे व ह्याच्याच हातून मानवास मुक्ति मिळावयाची आहे, या वेळीं त्यास सत्याचा थांग लागून तो जनास उद्धारमार्ग मोकळा करील असें जाणून तमाधीश जो मार यानें आपल्या सर्व सेवकांस बुद्धास जाऊन छळा अशी आज्ञा दिली. ज्ञान व प्रकाश यांच्याशीं ज्यांचा कलह लागलेला आहे असे जे राग, तृष्णा, अरति, षड्रिपु, अज्ञान, भय, निराशा ज्यांची मावली आहे अशी लक्षावधि दुःखें, जीं दरीकंदरीं लपून राहिलीं होतीं तीं सर्व आपल्या लवाजिम्यासह एकदम आपआपल्या स्थानांतून बाहेर पडलीं. बुद्धाचा द्वेष त्यांनीं आरंभिला. त्याचें मन चंचल करावें अशाविषयीं त्यांचे यत्न चालले. ह्या पैशाचिक योनींनीं प्रभुच्या समीप सत्य न येण्याविषयीं युद्धसंग्राम चालविला याचा अंत महाज्ञानी जनास सुद्धां लागावयाचा नाहीं. कधीं कधीं वादळाच्या समयीं जीं नानाप्रकारचीं भयें उत्पन्न होतात तशीं उत्पन्न व्हावीं, कधीं पिशाचयोनीसमुदाय पुढें येऊन उभा रहावा, कधीं आकाशांत विजांचा गडगडाट उत्पन्न होऊन अकस्मात् विद्युत्पतन व्हावें. कधीं सुस्वर गायन करणाऱ्या अशा मोहक स्त्रिया कांहीं गुजगुज करीत आहेत व प्रेमानें आपणास हांका मारीत आहेत असा भास व्हावा. कधीं राज्यदान करणारा पुरुष पुढें राज्य घे ह्मणून ह्मणत आहे, कधीं थट्टेनें सत्याची निर्भर्त्सना झालेली ऐकूं यावी. हा सर्व चमत्कार बाह्य सृष्टींत होत होता अगर प्रभूच्या अंतर्यामीं होत होता त्याचा निश्चय मला करितां येत नाहीं. परंतु पुस्तकांतरीं जें लिहिलें आहे, तें तुह्मास मी निवेदन करितों.

प्रथमारंभीं दहा महापापें ह्मणजे माराचे दहा प्रबल सेवक येऊन प्रभूच्या समोर उभे राहिले. प्रथमतः आत्मवाद नामें दूत पुढें सरसावला. जगत्त्रयांत अहंभावावांचून जर कोणी उपस्थित झाला तर ह्या आत्मवादास सहन होत नाहीं. जर तूं बुद्ध झाला आहेस तर इतरांस ज्ञानविरहित राहूं दे. तूं आपल्या स्थितीपासून भ्रष्ट झाला नाहींस व चिरकाळ तसाच जर राहिलास, तर बस्स आहे. निर्विकारी जे देव त्यांस मिळणारे सुखाचा उपभोग घेऊन अयत्नि असा हो" असा उपदेश आत्मवादानें प्रभु बुद्धास केला. यावर प्रभुबुद्ध- असें प्रत्युत्तर करिते झाले कीं, तुझ्या बोलण्यांतील सत्यांश हा दूषित झाला आहे. तुझ्यांतील जो असत्यांश आहे तो शापतुल्य आहे. जा; जे स्वात्म्यावर प्रेम ठेवितात त्यांस तूं आपल्या मोहजाळांत अटकीव. नंतर तेजहीन अशी आशंका पुढें सरसावली. हें पाप मोठें उपहासक असें आहे. तें आमच्या गुरुच्या श्रवणीं गुणगुणून असें ह्मणूं

लागले कीं, वस्तु मात्र मिथ्या भास आहे. आणि ह्या मिथ्या भासाचें ज्ञान असणें वृथा शीण आहे. अरे, तूंच असें मिथ्या ज्ञान उभें करितोस व तूंच अशा नसल्याच्या मागें लागतोस. ऊठ, येथून सर्वच उपहासास्पद आहे असें मानून स्वस्थ ऐस. मानवास उद्धारमार्ग नाहीं. ह्या भवचक्रांतून त्यास सुटका नाहीं. अगे मिथ्या विशिकिछे, तुझा माझा संबंधच नाहीं. तूं कपटपूर्ण अशी मानवाची द्रेष्टी आहेस" असें प्रभूनें उत्तर दिलें. महाचेटकी परमाशा नामा जी सर्व भूमीमध्यें लीन श्रद्धा या नांवानें प्रसिद्ध आहे व जी मानवांचीं अंतःकरणें व त्यांचे आत्मे यांस यज्ञयागादिविधींमध्यें गुंतवून टाकिते व जिच्या हातीं नरकद्वार बंद करण्याच्या व स्वर्गद्वार उघडण्याच्या किल्ल्या आहेत, व जी नानाविध मतें उपस्थित करिते ती परमाशा प्रभूचा छळ करण्यास प्राप्त झाली. "अरे प्राचीन धर्म ग्रंथ व देवतादिक या सर्वांस तूं दूर झुगारून देण्याचा प्रयत्न करितोस! देवांचीं मंदिरें तूं निर्जन करून टाकणार काय? ज्या नियमविधीकडून ब्राह्मण जनांची उपजीविका चालते आणि राज्यें सबळ असतात त्या नियमविधीचा तूं विध्वंस करणार काय? पहा ही गोष्ट तुला जड जाईल." असें ती शिलावत परमाशा प्रभूस बोलती झाली. प्रभु बोलतात "जें मी रक्षावें असें तूं म्हणतेस तें सांवलीसारखें नाशिवंत आहे; तथापि सत्यनिर्बंध अनश्वर आहे. म्हणून ज्या तूं अंधकारांतून आलीस त्या अंधकारांतच गमन कर." अनंतर षड्रीपुचा राजा कामदेव हा मोठ्या शौर्यानें पुढें सरसावला. तो प्रेमाधीश व सौख्यसंपन्न अशा राज्याचा आधीश आहे. देवादिकांवर सुद्धा त्याचा अंमल चालतो. आपला सखा जो वसंत ह्यासह व धनु व बाण पञ्चक हातीं घेऊन हास्यमुख असा त्या स्थळीं तो प्राप्त झाला. विषकारी बाणापेक्षांहि त्याचे बाण पंचक फार घातकी आहे. सभोंवार विलासनेत्रोष्टसंपन्न असा सुंदरीसमूह त्यासहवर्तमान होता. ह्या सुंदरी जनाचे फारच मनोहर असें नृत्यगायन चाललें होतें. त्यांचा मोह इतका पडला होता कीं, रात्री, चंद्रिका, व चंद्र त्यांचे गाणें ऐकण्यांतच जणूं काय स्तब्ध व प्रशान्त होऊन त्यांनीं आपलें आक्रमण करण्याचें बंद पाडलें आहे. त्या सुंदरी बुद्धास अशा अर्थाचें गाणें गाऊं लागल्या कीं, पूर्वकालीं तूं किती सुख भोगीत होतास. ह्या जगत्रयामध्यें सौंदर्यसंपन्न अशा स्त्रियेच्या मधुर व सुगंधित गुलाबी रंगाच्या स्तनद्वयापेक्षां कोणताहि पदार्थ प्रेमळ नाहीं. रत्नाचें मोल ह्या सुखापेक्षां काय अधिक असणार? अरे, ह्या प्रेम व सौंदर्यपूर्ण अशा रुपांमध्यें जितका प्रेमळ मधुरपणा आहे त्यापेक्षां अधिक त्यांच्यापासून होणाऱ्या स्पर्शसुखामध्यें आहे. आपल्या जिवात्म्याशीं तें सुख प्रत्यक्ष मूर्तिमंत येऊन बोलतें. आपल्या अंगीं अभिसरण होणारें जें रुधिर आहे त्यास तर हें स्पर्शसुख अतिप्रियतम वाटूं लागतें. ह्या स्थळींच स्वर्गसुख नांदत आहे व कर्ता व कृती हा भाव नष्ट होऊन मानव देवादिकांचें ऐश्वर्य भोगतात. सह-

स्त्रावधि यातना भोगून जीवात्मा हें वस्तुसौख्य भोगण्यास झटतो; त्याची योग्यता अशीच आहे. कोमल व मृणालतुल्य मृदु अशा हाताच्या वेळख्यांत असतां सर्व आयुष्य काळाचें कृतकृत्य झालें असें जें वाटतें, अशा प्रसंगीं कोणातरी प्राण्यास वाईट वाटलें आहे काय? याप्रमाणें त्या स्त्रिया आंपल्या हातांनीं प्रेमखुणा करीत करीत; नेत्र ज्यांचे प्रेममदानें पूर्ण झाले होते, त्या प्रभुबुद्धापुढें पूर्वोक्त अर्थाचें गाणें गात गात नाचत होत्या. ह्या प्रेमपूर्ण नृत्यांत स्त्रीजनांनीं आपलें अंग व अवयव इतक्या चपलाईनें हालवावें कीं, जशी पुष्पाची कळी पूर्णपणें न उमटितां अर्धीमुर्धीच उमटते व तेणेंकरून तिचा सर्व भाग न दिसतां केवळ रंगाचेंच दर्शन होतें त्याप्रमाणें त्यांच्या त्या चपलाईनें त्यानीं आपलें अंग व अवयव दाखविलेंसें करून न दाखविल्यासारखेंच करावें. अशा प्रकारें त्यांचें तें प्रेममोहजाळ फारच मनोवेधक असें झालें. असें गायन व नृत्य करीत करीत तो स्त्रीजन जसजसा वृक्षाच्या समीप येत चालला तसतसा तो देखावा विशेष अनुपम्य असा झाला. समीप आल्यावर प्रभूस ऐकूं जाईल अशा त्या स्त्रिया शब्दांनीं ह्मणूं लागल्या कीं, हे सिद्धार्थ, मी तुझी आहें, मी तुझी आहें, माझ्या सुखांगाचा स्पर्श तर कर आणि यौवनसौख्य कसें असतें त्याची तुला अभिरुचि समजेल. ह्या मोहानें प्रभूचें मन वेधलें नाहीं असें पाहून कामदेवानें आपलें गारुड धनुष्य ओढिलें. त्यासरसें नृत्य करणाऱ्या स्त्रीजनांत जी श्रेष्ठ होती तिनें मधुर यशोधरेचें रूप धारण करून पुढें येऊन पातली. नेत्र तिचे अश्रूंनीं पूर्ण झाले होते. वर्ण जरी नेत्रांचा काळसर होता तथापि त्यांत मोहकपणा विशेष नांदत होता. हात तिचे पसरलेले होते व प्रेमालिंगनाची अपेक्षा करीत आहेत असें दिसत होतें. शद्बस्वर तिचा शोकरसपूर्ण होता. ती सांवली उसासा टाकून प्रभूस करुण स्वरानें ह्मणाली. "हे माझ्या सख्या राजपुत्रा! अरे, तुजाशिवाय माझी मरणावस्था झाली आहे. आपण रोहिणी नदीच्या तिरीं ज्या वेळीं सौख्योद्यानांत वस्ती करून होतों त्या समयीं जो सुखांशाचा लाभ होत होता तशा प्रकारच्या सौख्यलोकाचा तुला लाभ झाला आहे काय? तूं गेल्यापासून हीं वर्षें मला शोकवत व कष्टवत गेलीं. अरे प्राणप्रिया सिद्धार्था, चल परत घरीं चल. एकवेळ माझा ओष्ठस्पर्श तर कर. तुझें आलिंगन तर मला घेऊं दे. आणि मग सर्व निरर्थक अशा या श्रमाचा अंत होईल. मजवर तुझें प्रेम सर्वस्वी नव्हतें काय?" अगे सांवली तूं असें माझ्या सखेचें सुंदर कपटरूप धारण करून येतेस काय? तुझें कापट्य मी जाणिलें. तूं माझ्या सखीचें रूप धारण करून आलीस ह्मणून मी तुला शाप देत नाहीं परंतु जशी तूं तशीच इतर सर्व स्वरूपें आहेत असें मला वाटतें. ज्या अभावापासून तूं निघालीस त्याच अभावाप्रत नष्ट होऊन जा." हें प्रभूचें भाषण झाल्यावर मोठा शद्ब होऊन सर्व सुंदरीजन विद्युत व अभ्र अशा रूपांनीं नाहींसा झाला.

नंतर आकाशाचें रूप फार भयंकर होऊन वादळ उत्पन्न झालें; आणि मग महाभयंकर अशीं पापें तेथें येऊन थडकलीं. द्वेषबुद्धि जिचा गुण आहे अशी पतिघ नामा पापी पुढें सरसावली. तिच्या कटीसभोंवार सर्पाचीं वेटाळीं होतीं. हे सर्प तिचे स्तनाचें दूध चोखीत होते. ती जें शापोच्चारण करीत होती त्यासह हे सर्प आपले फुसकारे टाकीत. प्रभूनें आपल्या प्रशांत अशा मुद्रेनें तिचे ओष्टद्वय बंद करून टाकिले; आणि तिच्या अंगावरच्या सर्पास आपला विषकारी दंश न दिसावा ह्मणून आळेपिळे घेण्यास लाविलें. अनंतर रूपराग मोह त्या स्थळीं पुढें झाला. आयुर्मर्यादा वाढावी या लोभानें मोहित होत्साता सदाचरणानें कसें वागावें ह्याचें विस्मरण व्हावें हा या मोहाचा गुण आहे. नतर लौकिकेच्छा हा जो अरूप राग, ज्याचा मोह ज्ञात्यास सुद्धां फसवितो आणि जो जगांत युद्धें उत्पन्न करितो व नानाप्रकारचे कष्ट मनुष्याकडून करवितो तो पुढें येऊन उभा राहिला. अभिमान हाहि नंतर पुढें सरसावला. तसाच स्वात्म्यास पुण्यशील मानून संतुष्ट राहणारा असा जो नववा पापपुरुष तोहि पुढें येऊन थडकला. त्यासह दुष्ट व खल असे विकार कित्येक बेडकांच्या रूपानें, कित्येक पाकोळीच्या रूपानें व कित्येक दुसरीं हिडिस रुपें धारण करून तेथें प्रवृत्त झाले. अन्याय व भय यांची माऊली जी अविद्या, जी चालली असतां मार्गे अंधारच सोडून जावयाची, हीहि त्या स्थळीं प्रभूस आपल्या ताब्यांत आणण्याकरितां प्राप्त झाली. असा हा मोहाचा समुदाय प्राप्त झाला. धरणीच्या मुळापासून सुटलेले जे धरणीधर ते हालले, प्रभंजन वाताची सुरवात झाली. अभ्रांतून पर्जन्य पुरासारिखा खालीं पडला. पृथ्वीतलावर ज्या खिंडी पडल्या होत्या त्यांतून जणूं काय कोणी कोलित लावून टाकिली आहे अशी धरणी दणाणली. नानाविध नरकलोकांतून भयप्रद व विशाळ रुपें धारण करून तेथील नरकाधीश कृष्णरंगाच्या वातावरणांतून किंकाळ्या फोडीत व डरक्या मारीत व आपल्या विस्तीर्ण अशा पंखांचे वेगानें ताडन करीत, इकडून तिकडे आपल्या सैन्यासह प्रभूस मोहजालांत पाडण्यासाठीं फिरत होते.

तटबंदांनीं व विशाल व मजबूत अशा दरवाजांनीं किल्ला जसा बंदोबस्तांत असतो तसा सत्वगुणांनीं बलिष्ट असतां प्रभु प्रशान्त मुद्रेनें बसले असून बाहेर कोणते डावपेंच चालले आहेत ह्यांकडे त्यांनीं चित्तहि लाविलें नाहीं. बोद्धिवृक्ष सुद्धां बाहेर चाललेल्या तुषारांनीं किंचित चलनसुद्धां पावला नाहीं. त्या वृक्षांचें प्रत्येक पर्ण निश्चल होतें. वायु मंद असला ह्मणजे त्या वायूनें तृणावरून पडलेले दवाचे थेंब न पडतां तृणाला जशी अनुपमेय शोभा येते तशीच वृक्षाच्या प्रत्येक पानास शोभा आली होती. वृक्षाच्या ज्या पारंब्या पसरून मोठा थोरला मंडप झालेला होता त्या मंडपाच्या बाहेर वर सांगितलेले सर्व चमत्कार झाले.

तिसऱ्या प्रहरच्या सुमारास पृथ्वीच्या ठायीं मोठी शान्तता पसरली. नरकाधीश

व त्यांचीं सैन्यें अदृष्ट झालीं. चंद्रमा अस्तास जाऊं लागला. त्या सुमारास फार सुखकर शीतलसा वायु धरणीवर येऊं लागला. अशा समयीं प्रभूस समासंभुवावस्था प्राप्त झाला. मानवास अप्राप्य अशा ज्ञानप्रकाशानें प्रभूस आपले पांचशें पन्नास पूर्वीचे जन्म यांचें ज्ञान झालें. एखादा मनुष्य पर्वतावर चढून पर्वतशिखरावर जर उभा राहिला आणि आपण ज्या मार्गानें वरतीं गेलों तो मार्ग कसा आहे हें जर तो मनुष्य पाहूं लागला तर त्यास ती वाट फारच चमत्कारिक दिसेल. कडा, कंगोरा, दाट झाडी, दलदल व पाय घसरून पडण्याजोग्या उतरंडी, पर्वताचा पायथा, सूर्यप्रकाश पडलेली अशीं सपाट मैदानें, धबधबे समीप आहेत अशा जागा, गुहा, सरोवरें, अशा स्थलांतून ती वाट आलेली आहे असें त्याच्या दृष्टीस पडेल; त्याचप्रमाणें ज्यांत आयुर्मर्यादा अति अल्पकाळ आहे अशा नीच योनीपासून चढत चढत दश गुणांची ज्या जन्मीं प्राप्ति होते त्या योनीप्रत तो कोणकोणत्या योनींतून चढत आला हें प्रभूस स्पष्टपणें समजलें. पूर्वजन्मीं जसें पेरावें तसें अन्यजन्मीं प्राप्त होतें, ज्या स्थळीं एकाचा मार्ग समाप्त होतो त्या स्थळींच अन्य जन्माचे मार्गास प्रारंभ होतो; लाभ झालेला ज्ञातीं दृष्टिगोचर असून ज्या कारणामुळें दुसरे कित्येक लाभ झाले नाहींत त्याचीहि पण समजूत पडते. एका जन्मीं सत्कृत्य केलें तर अन्य जन्मीं त्याचें फल शंभरपट जास्ती मिळतें व तसेंच असत्कृत्य झालें तर त्याचा मोबदला कसा दुसऱ्या जन्मीं शंभर पटीनें जास्ती मिळतो, मृत्यु आला म्हणजे धेवेंदवीची कशी बिनचुक ताळेबंदी होऊन पुण्य अगर पाप हें कसें दुसऱ्या जन्माच्या हिशेबांत काडी इतकाहि त्यांतील अंश कमी न होतां जाऊन पडतो व तसेंच गतजन्मींचे विचार व कृत्यें, यत्न व सिद्धि, स्मृति व चिन्हें यांचा भावी जन्माशीं कसा संबंध जडतो ह्याचेंहि त्यास ज्ञान झालें.

ह्याच प्रहरास आमच्या प्रभूस अभिज्ञावस्था प्राप्त झाली. त्यायोगें ज्या गोलांस नांवें सुद्धां नाहींत असे अनेकविध गोल, सूर्य व त्यांच्या ग्रहमालिका आश्चर्यवत् अशा नियामकपणानें अंतराळांत चलन करीत आहेत हें सर्व प्रभूच्या दृष्टीस पडलें. अगाध व तीररहित व अनून असा हा तारकामय सागर विकाररूपी भरतीच्या अविश्रांत अशा लहरींनीं सतत हालत आहे असें प्रभूच्या दृष्टोत्पत्तीस आलें. ग्रहमालिका ज्यांच्या भोंवतीं आहेत असे अनेकविध सूर्यगोल त्यानें पाहिले. हे सूर्यलोक अन्य महान सूर्यलोकाभोंवतीं फिरत आहेत व ते पुनः त्याहून जे विशाल आहेत त्यांच्या सभोंवार फिरत आहेत आणि अशी एकावर एक विशाल विश्वरचना आकाशांत असंख्य योजनें रचलेली आहे असें त्यास समजलें. शिवाय जरी त्याला नानाविध संख्या पाठ येत होत्या तरी ही विशाल विश्वरचना किती कल्पादि चालली होती ह्याचें शाब्दिक प्रमाण त्यास बसवितां येईना. असंख्य अशा लोकांतून जेव्हां तो आक्रमण करीत होता तेव्हां त्यानें अधोभागीं व ऊर्ध्वभागीं जो

गोललोकसमूह पाहिला त्याची अशी व्यवस्था होती कीं जेथें अंधार असेल तेथें त्याचा लोप होऊन प्रकाश व्हावा. मरणविकाराचा अंत होऊन जीवन व्हावें, अभावाच्या स्थळीं भावस्थिति उत्पन्न व्हावी, निराकाराचा आकार व्हावा, साधु वस्तूंत सेधीयस गुण यावा आणि सेधीयस वस्तु साधिष्ट व्हावी आणि हा सर्व खेळ शब्दविरहित अशा आज्ञेपासून चालला होता. आज्ञा करणारा व मना करणारा असा कोणी नव्हता. ज्या शक्तीच्या प्रभावानें हें रचणें, मोडणें व पुनरपि रचणें चाललें होतें व ज्या शक्तीच्या बलानें गुण, सौंदर्य, सत्य व उपयोग या प्रधान नियमानुसार वस्तुन्याय होत होता ती शक्ति निर्विकल्प, अनिर्वाच्य, श्रेष्ठतम व देशातीत अशी आहे. ह्या शक्तीच्या रहस्यानें जे चालतात ते कल्याण पावतात परंतु जे तसें करीत नाहींत त्यांचा मात्र नाश होतो. किडामुंगी आपापल्या नेमलेल्या धर्मानुसार जर वर्तन करतील तर त्यांचें कल्याण होईल. बहिरीससाणा आपल्या पिलाचें पोषण करितो. ह्यांतच त्याला सुख मिळणार आहे. दहिंवराचा बिंदु व प्रकाशमान तारा हे दिलेल्या प्रकाशानें त्या वेळेस प्रकाशमान होतात त्या वेळेस हे दोघेहि त्या शक्तींचेंच कार्य करितात. मानव आपल्या निष्कलंक अशा आचरणानें व जीवितधारि लहान मोठ्या प्राण्यास यथाशक्ति व निष्ठेनें त्यांच्या जीवित्वास जर साह्य देईल तर त्याला अन्य जन्म फार सुखाचा जाईल. ह्या कथा प्रभूंनें तिसऱ्या प्रहरच्या अवकाशांत अवलोकन केल्या.

चतुर्थ प्रहरास प्रारंभ झाला ते समयीं त्यास दुःखरहस्य कळलें. सुवर्णकाराचा अग्नि दामट अशा कोळशांनीं जसा पेट घेत नाहीं तसें अनिष्ट गोष्टींचा ह्या दुःखाशीं समागम झाला ह्मणजे धर्मविधीचें पालन होत नाहीं. महत्तर अशीं जीं अनेक सत्यें आहेत त्यांपैकीं दुःखसत्याचे रहस्याचा त्यास उलगडा पडला. दुःख हें जीवित्वाची सांवली आहे. जीवित्वाच्या समागमेंच तें रहातें. जोंपर्यंत तुह्मी जीवित्व, जन्म, वाढ, नाश, प्रेम, द्वेष, आनंद, यातना, अस्तित्व, आणि कर्म हीं त्यागिलीं नाहींत तावत् ह्या जीवित्वाच्या सहदुःखरूपी सांवलीचा समागम असावयाचाच. हा फांस आहे असें जोंपर्यंत जनास समजत नाहीं तोंपर्यंत दुःखमय असे हे आनंद आणि आनंदमय अशीं हीं दुःखें यांचा वियोग करवत नाहीं. परंतु ज्याला अविद्येच्या जालाचें पूर्ण ज्ञान झालें आहे तो ह्या फांसांस तोडून टाकून आपली सुटका करून घेतो. अशा ज्ञानी मनुष्याच्या दृष्टीस पक्केपणीं दिसून येतें कीं, अविद्या ह्मणजे संकर करण्याची माऊली कुमार्गाच्या पंथास लावणारी विज्ञानाचें मूळ अशी आहे. विज्ञानामुळें वस्तुमात्रास नामरूप मिळून सेंद्रिय असा मानव होत्साता इंद्रियार्थांचा व त्याचा समागम होतो. त्याच्या अंतःकरणपटलावर जेव्हां या इंद्रियार्थांचा ठसा उमटतो तेव्हां त्यांची दुर्बलता त्यांस दिसून येते आणि त्याचा परिणाम जीवात्म्यास वेदना यांत होतो. जीवित्वाच्या सौख्योपभोगा-

मध्यें झालेला आनंद मिथ्या असतो; त्याचाच उलट प्रकार मनुष्यावर शोकप्रसंग आले ह्मणजे होतो. ज्या मिथ्या समुद्राच्या लहरींवरून सौख्य, महत्वाकांक्षा, संपद्, स्तुति, लौकिक, सत्ता, विजय, प्रेम, पंचपक्वान्नांचें जेवण, भरजरीचे पोषाग, सुंदर अशीं वस्तीचीं मंदिरें, मोठ्या कुलामधील जन्माचा अभिमान, दीर्घायु होण्याची इच्छा, सर्व माणसांहून श्रेष्ठ होण्यासाठीं प्रयत्न, आणि त्या यत्नापासून झालेलीं विषमिव व अमृतोपम अशीं पापें ह्यांचा स्वाद घेण्याच्या आशेनें तृष्णा मानवास वारंवार त्या डोहसागरांत बुडवीत आहे. ह्या तृष्णेची तृप्ति इंद्रियार्थांच्या पुरतीनें होते परंतु तेणेंकरून पूर्ण तृप्ति न होतां तृष्णेचा विशेष जोर वाढतो ह्मणून ज्ञाता जो आहे तो या मिथ्या भासापासून दूर रहातो आणि तृष्णेची तृप्ति करण्याच्या संबंधीं अयत्नी असा होतो. तो कोणाहि प्राण्यास दुःख न देतां पूर्व जन्मांतरीं संचित केलेल्या पापांचा दण्ड मुकाट्यानें भोगितो. षड्रिपूंचा पुरतेपणीं विनाश ज्या रीतीनें होईल अशा रीतीनें त्यांचें तो दमन करीत असतो. जन्मजन्मांतरीं ज्या ज्या क्रिया केल्या, ज्या ज्या कल्पना मनांत आणिल्या, ज्या ज्या अदृष्ट कृत कर्मांचा ताणा बनविला होता, आणि त्यांत अदृश्य अशा काळाचा जो वाणा भरला होता आणि ह्या अशा सुतांनीं आत्मरूपी जो वस्त्रपट बनविला होता आणि ह्या सर्व गोष्टी संचित कर्म ह्मणून ज्याला अभिधान दिलें आहे त्यांत समग्रपणें समाविष्ट होत्या. हें संचित कर्म शुद्ध व निष्पाप होईपर्यंत ज्ञाता षड्रिपूंचें दमन करीत असतो. पुनर्जन्म मुळीं येऊं नये अगर आलाच तर त्यांतील संकटें, कष्ट, इतके सहज असावे कीं त्यांचा भार मुळींच नाहीं असें वाटावें. याप्रमाणें धर्मचक्र प्रवर्तन करून धरणीच्या मोहजाळांतून तो आपली सुटका करितो. देह धारण करणाऱ्या प्राण्यास जितकीं ह्मणून पापें लागतात व जितकीं उपादानें जडतात त्यांपासून मुक्त होऊन दुष्ट स्वप्नें ज्यांत पडत होतीं अशा निद्रेंतून जागृत झाल्यावर मनुष्य जसा दिसतो त्याप्रमाणें ज्ञाता चौऱ्यायशीं लक्ष योनींच्या फेऱ्यांतून मुक्त झाल्यावर ज्ञानसंपन्न व तेजःपुंज होतो. त्याला जो आनंद प्राप्त होतो तो देवादिकांच्या आनंदापेक्षांही अधिक असतो. मग आयुर्मर्यादा वृद्धिंगत व्हावी अशी जी शोचनीय आशा तिचाही निरास होतो. सुखकर असा जो निर्वाण त्याप्रत मानव जाऊं लागतो. निर्वाणीच्या स्थळीं निवांत व निष्पाप अशी विश्रांतीची जागा आहे.

हा विजय जेव्हां प्रभूस लाधला तेव्हां अरुणोदय झाला. पूर्वेनें अंधाररूपी वस्त्र जें परिधान केलें होतें त्या वस्त्रामधून प्रभेचीं किरणें प्रथमतः दिसूं लागलीं. शुक्राची चांदणी जसजसा सूर्यनारायण वरतीं येत गेला तसतशी निस्तेज होत गेली. सूर्योदय झाला किंवा नाहीं हें लोकांस माहीत होण्यापूर्वी पर्वतांचीं शिखरें सूर्यकिरणांनीं व्याप्त झालीं. सूर्योदयामुळें प्रातःसमयींची सुखकर उष्णता लागून पुष्पकलिका उम-

लम्या. चकचकित अशा तृणावर प्रभात-सौंदर्य दिसूं लागलें. अश्रुरूपी रात्रीचे दंवास प्रभेनें आनंदपूर्ण अशीं रत्नें केलीं. पृथ्वीवर चारी दिशा प्रकाशमय झाल्या. अस्तास जाणाऱ्या अभ्रांच्या सभोंवार सुवर्णमय प्रकाश पडला. तेणेंकरून चित्र-विचित्र रंगांची जाळीच लावली आहे कीं काय असें वाटे. आपल्या चलनाच्या योगानें जणूं काय स्वागत देण्यास तयार झालीं आहेत, अशा ताड वृक्षांच्या पर्णांवर प्रभातेनें प्रकाश पाडिला आणि आपलीं सुवर्ण किरणें दरिकंदरांत पसारिलीं. जलाशयावर जेव्हां किरणें पडलीं तेव्हां लहरी रत्नाच्या बनविल्या आहेत काय अशी अनुपमेय शोभा जलाशयावर दिसूं लागली. गुहांमधून वस्ती करून रहाणारे काळवीट प्रकाश पाहून दिवस उगवला म्हणून आपल्या विश्रांतीच्या स्थळांतून बाहेर पडले. कोठ्यांतून आपल्या ममता करणाऱ्या आईच्या पंखाखालीं निद्रिस्त झालेल्या पक्ष्यांच्या पिलांस आपल्या किरणरूपी हस्तांनीं जागृत करून, बाळांनो जागृत व्हा, दिवस उगवला, दिवाकराची स्तुति गा असें प्रभातरूपी देवता प्रत्यक्ष आपल्या रूपानें म्हणत होती कीं काय असा भास ते समयीं झाला. अनंतर पक्षी मधुर व सुस्वर अशीं देवाचीं स्तवनें गाऊ लागले. कोकिळ, टिटवी, बुलबुल, राघु, मैना व सीतरंगाचे कावळे, सुतारपक्षी, हरित रंगाचा लोहारपक्षी, परस्परांवर प्रेम करणारीं खबुतरें आणि अनेक चित्रविचित्र रंगांचीं पांखरें हीं आनंदानें प्रातःसमय होतांच आपले मधुकर सुस्वर काढूं लागले. ह्या दिवशींच्या प्रातः समयीं पृथ्वींतील कोट्यावधि लहान मोठ्या घरांतून आजपर्यंत कधीं अशी शांतता व पुण्यानंद पसरला नव्हता. जीवघातकांनीं आपलीं घात करण्याचीं आयुधं हस्ताचा स्पर्श न करितां तशींच त्या दिवशीं पडूं दिलीं. वाटगाऱ्यांनीं त्या दिवशीं कोणास त्रास दिला नाहीं. सराफांनीं लोकांस फसविलें नाहीं, दुष्ट जनांचें अंतःकरण दयार्द्र झालें. दयाशील जन अधिक दयाशील झाले. राजे लोकांनीं परस्परांशीं तह केले. रोगातुर आनंदानें हांसतच आपल्या रोगशय्येवरून उठून इकडेतिकडे फिरूं लागले. आजचा प्रकाश पूर्वेकडून न येतां त्याच्याहि पलीकडल्या प्रदेशांतून आला आहे असा भास मृतजनांस झाला व ते आंनदपूर्ण असे होऊन प्राण धरिते झाले. सुंदरी यशोधरेचीं जीं हीं कष्टाचीं वर्षें प्रभूच्या शय्येसमीप बसून बसून गेलीं त्यांचा अंत दुःखप्रद न होतां या विजयाच्या प्रातःकाळीं तिच्या अंतःकरणांत आनंदाच्या लहरी उद्भवल्या. हा आनंद आपणास आज कां होत आहे याचा समज न पडतां निर्जन अशा अरण्यांत भूतप्रेतादि निर्देह प्राणी परस्परांची थट्टा व मस्करी करितां करितां भूमीवर गडबडा लोळूं लागले. स्वर्गीं देवांनीं 'पूर्ण झालें, पूर्ण झालें' अशी आकाशवाणी केली. पूर्वेकडील प्रकाशातिशय पाहून लोक व त्यांचे पुरोहित आज कांहीं तरी मोठ्या महत्वाची गोष्ट घडून आली असावी असें म्हणून आकाशाकडे दृष्टि देऊन पहात उभे राहिले. नानाविध प्राण्यांमध्यें, ते दिवशीं

रानोरान व जंगलोजंगलीं स्नेहभाव जडला. ज्या स्थळीं व्याघ्री आपल्या पिलास पाजीत होती, तिच्याच समीप रानांतील झुडपांचा कोंवळा कोंवळा पाला खात काळवीट उभे होते. चित्ता ज्या ठिकाणीं चकचक पाणी पीत होता त्याच्याच समीप बाकडहि पाणी पीत होता गरुडपक्ष्याच्या बसण्याच्या खडकाखालीं ससे इकडून तिकडे फिरत होते; त्यांस उपद्रव न करितां गरुडपक्षी आपले पंख आनंदांत हालवीत असे. सर्पांनीं आपल्या भाळीं असणाऱ्या सर्व रत्नांच्या फणा उघडून रत्नांस जणूकाय ऊन दिलें. आपला विषकारी दांत मात्र आपल्या जबड्याच्या आंत लपवून टाकिला. टीवपक्ष्यानें आपल्या पिलांस भय नव्हतें ह्मणून इकडेतिकडे फिरूं दिलें. पांचेसारिखा जो डिचापक्षी स्वस्थ डोळे मिटून बसला होता पण जवळून जे मासे जात येत होते त्यांस त्रास न देतां खुशालपणें क्रीडा करूं दिलें. चित्रविचित्र रंगांचीं फुलपांखरें बहिरीससाण्याच्या अंगावर जरी बसत तरी तो त्यांस त्रास देत नसे. बोद्धिवृक्षाच्या अधोभागीं ध्यानस्त असतां व सर्व रिपूंस जित केलें असतां, आणि दिवाकराच्या प्रकाशापेक्षां विशेष अधिक ज्ञानप्रकाश प्राप्त झाला असतां प्रभूचा आत्मा प्राणिमात्रांचें मन वेधून होता.

अनंतर वृक्षाच्या अधोभागीं तेज; आनंद, बळयुक्त होत्साता अनन्त लोक व अनन्त काळ यांच्या श्रवणीं जाईल अशा उच्च स्वरानें प्रभु बोलता झाला.

॥ अनेक जाति संगसारंग ॥ संधाविसंग अनिमिसंग ॥ गहकारकं गवसंतो दुःख जाति पुनः पुनंग ॥ गहकारक दिथोसि ॥ पुनगेहंग नकाहसि ॥ सभातेका सुखाभाग ॥ गहकुतंग विसंगखितंग ॥ विसंग खारगतंग चिंतग ॥ जन्हानक्रव्यं मज्हगा ॥

दुःखव्याप्त असा हा इंद्रियांचा पिंजरा कोणीं रचिला हें जाणावें ह्मणून अनेक जन्मांतरीं कायानेक धारण केला. हा अपरिसमाप्त श्रम फार दुःखकर झाला.

परंतु साम्प्रत अरे! ह्या मंडपाच्या रचणाऱ्या, तुला मी जाणिलें. ह्या दुःखद भिंति पुनरपि मी तुला बांधून देणार नाहीं. कपटछायाहि मी तुला बनवून देणार नाहीं. ह्या मृत्तिकेच्या कायेवर मीं तुला वांसे घालूं देणार नाहीं. तुझें हें वसतीस्थान ढांसळून गेलें. तुझा टेंक्याचा स्तंभ पिंजून गेला. भ्रांतिमूलक मायेनें हा पिंजरा बांधिला होता! आतां मी निर्वैरपणें निर्वाणाची प्राप्ति करून घेण्यास जातों. "

षष्ठोध्याय समाप्तः

---

## सप्तमोध्यायः

—:*:—

राजा सुदोधन, दुःखानें व्याप्त होत्सातां पुत्रशोक करीत सहा वर्षे आपल्या लोकांसह वस्ती करून होता. प्रेमळ अशी ती पतिव्रता यशोधरा आपल्या प्रिय पतीचा विरह करीत सुखाचा लवलेश हि न घेतां पति गेल्यापासून सहा वर्षे मोठ्या कष्टानें घालविती झाली. यती, तापसी यांची कथा श्रवण करण्यांत ती मोठी तत्पर असे. देशांत राहून आलेल्या वणिक् जनांचा शोध ठेवून 'तुह्मी माझा

पति पाहिला काय' असें त्यांजवळ ती आपल्या सेवकजनांकडून विचारपूस करी. राजानें जे अनेक वेळां दूत पाठवावे त्यांकडून घरदार सोडलेल्या अशा पुष्कळ संन्यासी, तापसी यांच्या कथा श्रवणीं येत; परंतु कपिलवस्तु नगरीचा जो मोहरा, राजाचा जो जीव कीं प्राण, आणि यशोधरेचा जो प्राणप्रिय हा कोणत्या स्थलीं गेला याचा मात्र मागमूस कधीं लागला नाहीं. तो आहे किंवा नाहीं हें मुद्धां कळत नसे.

उद्यानासमीप जो नदीप्रवाह वहात होता, ज्याचें तटाक कमलपुष्पांनीं मंडित झालें होतें, प्रभुबुद्ध व यशोधरा यांची तिराच्या समीपभागीं प्रेमक्रीडा होत असतां ती क्रीडा ज्यांत प्रतिबिंबित होत असे, त्या प्रवाहाच्या कांठीं, वसंत ऋतूंत एके दिवशीं आम्रवृक्षांची पालवी जलतुषारांनीं सुशोभित केलेली आहे अशा समयीं यशोधरा बसली होती. शोक करून करून तिच्या डोळयांच्या पापण्या सुकून गेल्या होत्या. गाल अगदीं बसले होते. शोकानें तिच्या ओष्ठद्वयावर सुरकत्या पडल्या होत्या. मस्तकावरल्या केशपुंजाचा चकचाकितपणा नाहींसा झाला होता. वैधव्यदशा प्राप्त झाली असतां वेणीफणी न करितां स्त्रिया जसा नुसता बुचडाच बांधितात त्याप्रमाणें तिनें आपल्या केसांचा बुचडाच बांधिला होता. अंगावर अलंकार कांहीं ठेविले नव्हते. परिधान केलेलीं वस्त्रेंही साधींच होतीं. पतीचा स्वर ऐकिला म्हणजे आक्रमण करूं लागली असतां जशी हरिणीची चालण्याची ऐट असते तशासारखी ज्या यशोधरेची चाल होती आणि गुलाबाचें पान पडून जसा आवाज होतो असें जिचें पाऊल निःशब्द पडत असे तिचीच आतां आक्रमण करण्याची गति अगदीं दुःखानें मंद झाली होती. प्रेमाचे दीप जे तिचे नेत्रद्वय ते ज्या काळीं प्रकाशत त्या काळीं असा भास होई कीं रात्रीची गाढ अशी शांतता सूर्यप्रकाशानें प्रकाशित झाली आहे, तेच तेजःपुंज्य नेत्रद्वय निःप्रकाशित असे आतां झाले होते. पापण्या गळून नेत्रावर पडल्या होत्या त्यामुळें वसंतसौंदर्याचें सुद्धां तिला भान राहिलें नव्हतें. आशयरहित अशी तिची दृष्टि कोणीकडे तरी जात असे. सिद्धार्थ ज्या रात्रीं तिचा त्याग करून गेला त्या रात्रीपासून मोत्यांचा हार जो ती आपल्या हातांत ठेवी तो या समयीं एका हातांत व दुसरे हातांत तिचा पुत्र जो आतां सात वर्षांचा झाला होता तो होता. त्या पुत्राचें रूप फारच सुंदर होतें. त्याचें नांव राहुल ठेविलें होतें. तो आपला चांगलासा पोषाख करून आनंदित अशा मुद्रेनें व निर्भय अशा अंतःकरणानें धरणीवर वसंताची शोभा पाहण्यास आपल्या आईच्या समागमें निघाला होता.

हीं मायलेंकरें उद्यानांतलि प्रवाहासमीप जात असतां राहुल मोठ्या हर्षानें चित्रविचित्र रंगांच्या माशांस खाण्याकरितां तांदुळ फेंकिता झाला. सारस पक्षी तेथून उडतांना जेव्हां तिनें पाहिले तेव्हां ती त्यांस सुस्कारा टाकून बोलती झाली.

"अरे दूर उडणाऱ्या प्राण्यांनो, माझा प्राणपति ज्या स्थळीं गुप्तपणें राहिला आहे त्या स्थळीं जर तुम्ही उतरला तर त्याला सांगा कीं यशोधरा मरावयास टकली आहे तुझा एकच शद्ब मी ऐकावा व एकदांचें मला स्पर्शसुख तुजपासून व्हावें अशी अपेक्षा करीत मी अद्याप प्राणत्याग केला नाहीं असें माझ्या प्राणप्रियाला सांगा." बालक इकडेतिकडे खेळत आहे, माय या प्रकारें शोक करीत आहे इतक्यांत कांहीं दासी त्या स्थळीं आल्या आणि ह्मणूं लागल्या. "बाई साहेब, दक्षिण दरवाज्याकडून त्रिपुष आणि भल्लक या नांवाचे, मोठे धनाढ्य सावकार, फार दूरचा प्रवास करून आज आपल्या पुरींत आले आहेत. जरीचें काम, जडाव काम, रत्नजडित अशीं शस्त्रास्त्रें, मसाले, ओषधी, नानाप्रकारचीं मोल्यवान अशीं पितळेचीं भांडीं, हस्तीदंती काम, दूरदूर देशांतरीं रहाणारे चित्रविचित्र पक्षी त्यांनीं आपलेबरोबर आणिले आहेत. त्यांचें वसतीस्थान हस्तिनापूर आहे. फार मोलाचा जो पदार्थ त्यांच्याजवळ आहे तो या सांगितलेल्या सर्व पदार्थांस मागें टाकितो. तो हा कीं त्यांनीं आमच्या प्रभूला पाहिला. त्यांनीं त्याला प्रत्यक्ष पाहिला एवढेंच नाहीं तर त्यांनीं त्यास अनेक वेळां साष्टांग नमस्कार करून त्यांनीं त्याची पूजा केली आहे. त्याला त्यांनीं पुष्कळ परिमल द्रव्यें अर्पण केलीं. भविष्य झाल्याप्रमाणें तो ज्ञानी लोकांचा गुरू झाला आहे. तो पुज्य, पवित्र व विस्मयास्पद असा झाला आहे; तो आपल्या मधुर भाषणानें व दैवी प्रेमानें सर्व देहधारी प्राण्यांचा उद्धारक असा झाला आहे. तो मार्गक्रमण करीत करीत कपिलवस्तु नगराकडे येत आहे अशी बातमी आलेले वणिक्‌जन सांगतात."

हें वर्तमान श्रवण करितांच, हिमालयावरचें बर्फ वितळलें ह्मणजे गंगेस जसा पूर येतो तद्वत् यशोधरेचे शरीरांतील रुधिराभिसरण जोरानें होऊं लागलें. हात जोडून डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या असतां मोठ्या हर्षानें ती उभी राहून बोलली. "अहो, या वणिक्‌जनांस माझ्या मंदिरीं बोलवा. कंठशोष झाल्यावर जसा तृष्णातिशय होतो त्याप्रमाणें तें वर्तमान श्रवण करण्याविषयीं मला तृष्णातिशय झाला आहे. जा, त्यांस आंत घेऊन या; त्यांस असा निरोप कळवा कीं, जर त्यांनीं कथन केलेलें वर्तमान सत्य होईल तर अशा प्रकारचीं मी त्यांस रत्नें देईन कीं, राजेलोकांनीं तीं पाहिलीं असतां त्यांनीं लुब्ध व्हावें. अहो दासींनो, हें वर्तमान श्रवण करून मी किती संतुष्ट झालें आहें हें ज्या मोल्यवान देणग्यांनीं दाखवितां येईल त्या देणग्या मी तुह्मांस अर्पण करीन."

आज्ञा होतांच ते वणिक्‌जन राजद्वारीं सोन्यानें मढविलेल्या मार्गांतून येऊन पोहोंचले. त्या सौख्यलोकाच्या सभामंडपाकडे ते उघड्या पायांनीं चालत गेले. राजसंपदा कशा प्रकारची असते हें अवलोकन करून ते सावकार लोक विस्मित झाले. जेव्हां ते यशोधरा राणीच्या आसनाजवळ आले तेव्हां पडद्याच्या आंतून मधुर, उत्सुक, आणि प्रेमळ असा शद्ब त्यांच्या कानीं आला "अहो महाजनांनो, तुह्मी दूरदेशाहून इकडे आलां.

माझा प्राणप्रिय जो आतां बुद्ध झाला आहे, पुण्यशील होऊन जगमान्य झाला आहे, लोकांचा उद्धार करीत करीत कपिलवस्तु नगराकडे येत आहे असें मी श्रवण केलें तें खरें आहे? काय असेल तें निवेदन करा. तुह्मी आमचे पाहुणे आहां आणि आमच्या कुलाचे तुह्मी स्नेही आहां."

त्रिपुषवणिक् असें प्रत्युत्तर करिता झाला कीं, "हे महाराणी, त्या पवित्र गुरूचें आह्मांस दर्शन झालें आहे. आह्मी त्यांस साष्टांग नमस्कार घातला होता. जो राजपुत्र असतांना वैराग्यशील झाला तो साम्प्रत राजादिकांपेक्षांहि श्रेष्ठ झाला आहे. हे भवानी, तुझा जो प्राणपति, सर्व जनांचा राजा व स्नेही त्यानें फल्गु नदीच्या तिरीं बोधि वृक्षाखालीं जगाच्या उद्धाराचा मार्ग शोधून काढिला. त्याला दुःखयातना भोगाव्या लागल्या परंतु त्याच्या दुःखापासून अन्यजनास सुखाचा अंश प्राप्त होतो. देवासारिखा तो दुःखातीत असा आतां झाला आहे. सत्यसूर्याच्या सुवर्णमय प्रभेनें तो अति प्रकाशमान होत आहे. वाय या वेगानें वृक्षपर्णें वायूच्या दिशेस जातात आणि कुरण ज्या मेषाला माहित आहे त्या मेषाच्या मागें जसे इतर मेष जातात तद्वत् शांतिदायक मार्गाच्या धर्माचा उपदेश करण्यास ज्या ज्या नगरींत प्रभु बुद्ध गेला त्या त्या नगरींतले लोक त्याचे अनुयायी झाले. गया नगरीच्या समीप शिरणिका नामें आमराईंत आह्मी स्वतः त्याच्या पूज्य अशा मुखांतून उपदेश ऐकिला. त्याची आह्मी पुजा केली. पर्जन्य काळापूर्वीच तो इकडे येण्यास निघणार आहे." जरी यशोधरा राणीस अत्यानंदामुळें प्रत्युत्तर करवेना तथापि ती आपला आनंद सांवरून त्यांस असें बोलती झाली कीं, अहो स्नेही जनांनो, तुमचें सर्वदा कल्याण असो. तुह्मी विदित केलेली गोष्ट कशी घडून आली त्याची सविस्तर हाकिकत तुह्मांस ठाऊक आहे काय?

त्या भयंकर रात्रीं वातावरणांत दुष्ट भुतांचा संचार कसा झाला, धरणी कशी कंपायमान झाली, मार देवाच्या कोपानें जलाशयें कशीं व्याप्त झालीं; तसेंच प्रातःकाळीं सूर्योदय कसा झाला व तेणेंकरून लोकांस किती जीव आला; तसेंच प्रभु प्रातःसमयीं वृक्षाच्या अधोभागीं कसा आनंदित मुद्रेनें बसला होता असें जितकें वर्तमान त्या दरींतील लोकांस माहित होतें तितकें भल्लक यानें यशोधरा राणीस सांगितलें. हें युद्ध समाप्त झाल्यावरहि सत्य सागराच्या तटीं सुरक्षितपणें निःशंक होत्साता कसें जाऊन पडतां येईल अशा ह्या सुवर्णरूपी काळजीचा भार प्रभूच्या अंतःकरणावर पडला होता. लोक तर पापप्रिय, इंद्रियसुखास ते चिकटून राहतात, भ्रांतीच्या सहस्रावधि झऱ्यांतुन भ्रान्ति पाडणारें जल प्राशन करीत आहेत, ज्या दैहिकजालानें ते बद्ध आहेत त्यांतून सुटका करून घेण्याची ज्यांस शक्ति नाहीं, व आपण या जाळांत आहों किंवा नाहीं हें जाणण्याचीहि ज्यांस इच्छा नाहीं; व पिंजऱ्याचें दार उघडलें असतांहि आंतील वस्ती करणारा पक्षी जसा त्या दाराकडे येत नाहीं, अशी ज्यांची अवस्था आहे, त्यांस मुक्त करणारा धर्म व निदानद्वादश यांचें ग्रहण कसें करितां येईल याची चिंता

प्रभूस फार दिवस पडली होती. मुक्तिमार्गाची प्रभूस प्राप्ति झाली होती, ह्मणून इतर लोकांस त्याची प्राप्ति होणें फार दुर्घट असें समजून जर प्रभु स्वतःच मुक्तीच्या ठिकाणीं जाता तर मानवास ज्या एकाच गोष्टीकडून आश्रय मिळणार होता तिचा या भूतळीं लोप होऊन मानव पूर्ववत् निराधार झाला असता. मानवास मुक्ति मिळणें हें दुर्घट असें जरी प्रभूस वाटत होतें तथापि प्रभूनें मार्ग शोधून काढण्याचें सोडिलें नाहीं. याच दयेच्या विचारांत प्रभु गर्क झाला असतां प्रसववेदनासारखा शोककारक ध्वनि प्रभूच्या श्रवणेंद्रियाचे ठायीं आला कीं, ॥ नश्याम्यहम, भू नश्यति लोक; ॥ कांहीं वेळानंतर ॥ श्रूयताम् धर्म भागवत् ॥ असा दुसरा ध्वनि प्रभूच्या कानीं आला. आतां माझ्या लेंकरांची सुटका होणार नाहीं असें पाहून धरणीनें हे दोन शोकाचे उमाळे काढिले. ते श्रवण करून प्रभूनें आसपास आपल्या सभोंवार नजर फेंकिली. जसा सूर्य कोणत्या कमलिनी आज विकास पावतील व कोणत्यांस पावण्यास अवकाश आहे हें पाहतो तसें माझा धर्म घण्यास कोण सांप्रत काळीं आहेत व कोण पुढें योग्य होतील याचा विचार पाहून, प्रभूनें आनंदहास्य करून असा शब्दोच्चार केला कीं, ज्याला श्रवणे छा आहे तो श्रवण करो. मी धर्माचा उपदेश करितों.

नंतर प्रभु काशीक्षेत्राकडे गेला. तेथें शिष्यपंचक त्यास मिळालें. जन्ममरणापासून कसें मुक्त व्हावें, गतकर्मविरहित दैव ह्मणून कांहीं नाहीं. स्वर्ग व नरक हे ज्याच्या त्याच्या स्वाधीन आहेत. आपल्या इंद्रियांचें जो दमन करील त्यासच स्वर्ग आणि जो तसें न करितां आपलीं इंद्रियें मदोन्मत्त करील त्यासच नरकप्राप्ति झाली असें समजावें. हा उपदेश प्रभूनें दोनप्रहरीं वैशाखाच्या अमावास्येस केला. त्याला आज पंधरा दिवस झाले. जें ऋषिपंचक त्याचे शिष्य झाले त्यांत कौंडिण्य नामा ऋषि, यासच प्रथमतः सिद्धान्ततूर्य समजलें व त्यानेंच प्रथमतः मार्गावलंबन केलें. त्याच्यामागून भद्रक, अश्वजित, बासव महनामा यांनीं शिष्यधर्म स्वीकारिला. त्याच हरिणोद्यानांत यसद नामधारी राजा आपल्या चौपन्न इतर सरदारांसह प्रभूचा उपदेश श्रवण करून प्रभूची दीक्षा घेता झाला. वालुकेच्या मैदानांतून पाणी वाहूं लागलें ह्मणजे वृक्ष व तृण इत्यादिकांचा सौख्यकाळ आला असें जसें वाटूं लागतें तद्वत् ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून उपदेशाचें श्रवण केलें त्यांस सुगती प्राप्त होण्याचा काळ समीप आला.

अशी ही शिष्यषष्ठी, शमदमतपादि गुणेंकरून पूर्ण केलेली धर्मप्रवर्तनाचा उपदेश करण्याकरितां प्रभूनें दिगंतरीं पाठविली. परंतु स्वतः प्रभु त्या हरिणोद्यानांतून निघून दक्षिण दिशेकडे वळला. इशिपट्टण व याष्टि या नगरींवरून तो बिम्बासर, राजाच्या राजधानीकडे आला. या स्थळीं त्यानें बहुतेकांस उपदेश केला. राजा बिंबासर व त्याची सर्व प्रजा प्रेमधर्म व नियमधर्म यांचें प्रभूपासून शिक्षण पावून, प्रभूच्या धर्मप्रवर्तनमार्गाची दीक्षा घेती झाली. गुरूच्या हातावर पाणी सोडून राजानें गुरूस वेळूवन नामाचें स्थळ दिलें. या

स्थळीं अनेक प्रवाह असून सुंदर अशा बहुत गुहा व दरी आहेत. एका शिलेवरती राजानें लेख करून ती शिला त्या स्थळीं ठेविली. तो लेख असा होता. ॥ ये धर्म हेतुप्पभाव ॥ येसन हेतुन् तथागतो ॥ अहयेसन च यो निरोधो ॥ इवन वदि महसामनो ॥ याचा अर्थ असा कीं, जेणेंकरून संसाराची व संसाराच्या कारणाची पुष्टि होते त्याचा खुलासा आह्मास तथागतानें करून दिला. दैहिक यातनांतून मुक्ति कशी करून घ्यावी, याचा मार्ग आह्मांस प्रभूनें शिकविला. या वेळूवनाचे स्थळीं बहुत लोकांचा समाज भरविला होता. तेव्हां गुरूंनीं ज्ञानपर बोध असा केला कीं सर्व श्रोत्यांचें चित्त त्यांच्याकडे वेधून गेलें; गुरू जसें पीतवस्त्र धारण करितात तद्वत् नवशत लोकांनीं वस्त्रें धारण करून ते दीक्षाग्रहण करिते झाले; आणि अनंतर धर्माचा विस्तार त्यांनीं केला. प्रभूच्या उपदेशाचें अंतिम वचन हें होतें कीं, ॥ सव्व पापस्स अकरणन् ॥ कुसलस्स उपसंपदा ॥ स चित्त परिया दपनन् ॥ एतन् बुद्धनन् सासनम् ॥ असत्कृत्यांनीं ऋणाची वृद्धि होते; सत्कृत्यांनीं मानव ऋणमुक्त होतो. ह्मणून असताचा त्याग करा, सताचें अनुकरण करा, स्वात्म्यावर सत्ता करा हाच धर्ममार्ग आहे असें जाणा."

असें आपल्या पतीचें वणिक्जनापासून वर्तमान श्रवण करून यशोधरा राणीनें त्यांस बहुमोल अशीं रत्नें देऊन त्यांस विचारती झाली कीं, माझा प्राणप्रिय कोणत्या मार्गानें येत आहे हें तुह्मांस माहीत आहे काय? सौदागर प्रत्युत्तर करितात. "राजगृहापासून तो साठ योजनें दूर आहे. राजगृहापासून शोण नदीच्या समीप भागाच्या प्रदेशानें तो इकडे येत आहे. आमच्या वृषभांच्या तांड्यासह नित्य अष्ट क्रोशांच्या मजलीनें चालतां चालतां या नगरीस येण्यास आह्मास एक महिना लागला. प्रभुबुद्ध वेळुवनांत वस्ती करून आहे." हें वर्तमान जेव्हां राजानें श्रवण केलें तेव्हां त्यानें आपले नऊ मंत्री उत्तमोत्तम अशा अश्वावर सज्ज करून तिकडे रवाना केले. पुत्रास त्या सचिवांबरोबर जो निरोप पाठविला तो असा होता: "राजा सुदोधन आज सात वर्षें पुत्रशोक करून अगदीं बलहीन असा झाला आहे. त्याचा मरणसमय समीप येत चालला आहे. पुत्राचा शोध आज सात वर्षेंपर्यंत त्यांनीं सतत चालविला होता राजा व प्रजा पुत्राच्या आगमनाची फार आशा धरून आहेत; आणि आपण येण्यास विलंब केला तर कदाचित् राजाचे आशेचा भंग होऊन तो पुत्रशोकानें मरण पावेल." यशोधरा राणीनें सुद्धां नऊ सरदार आपल्या वतीनें पाठविले. त्यांबरोबर असा निरोप पाठविला कीं "चंद्रविकासिनी जशी चंद्रोदयाची अपेक्षा करिते, अथवा अशोक वृक्षकलिका स्त्रीपादपतनाची जशी अपेक्षा करिते, त्याप्रमाणें राहुल बालकाची माता यशोधरा राणी आपल्या प्रिय प्राणपतीचा मुखचंद्रमा अवलोकन करण्याची उत्कंठा करून आहे. राजपुत्रास राज्यसत्तेपेक्षां विशेष मोलाचें सुखप्राप्त झालें असेल तर त्याचा विभाग राहूल बालकास व त्याच्या मातेस दिला पाहिजे. परंतु ह्या वांट्यापेक्षांहि राहुल बालकाच्या मातेची आवड तिचा जो प्राणपति

त्याजवर विशेष आहे ह्मणून त्यांनेंच इकडे अशा बंदोबस्तानें उदयी प्रधानानें वेळू-यावें." ज्या समयीं गुरू धर्मोपदेश करीत होता वनांत प्रवेश करून. राजा व यशोधराराणी-तेच समयीं हे साक्यमंत्री वेळूवनांत शिरले. चा प्रभुस निरोप निवेदन केला.

आंत प्रवेश करोपर्यंत राजानें व यशोधरेनें सांगितलेल्या निरोपाचा त्यांस विसर पडला नव्हता. उपदेश श्रवणीं येतांच दुःखांतर्गत राजा व यशोधरा यांच्या संदेशाचा त्यांस विसर पडला. त्यांची दृष्टि प्रभूकडे लागून गेली होती. प्रभूच्या मुखांतून दयार्द्र, सत्तापूर्ण, शुद्ध, पावित्र व कल्याणकारक अशी वाणी जी निघत होती तिचें पान करण्यांतच त्यांचें तनमनधन निविष्ट झालें होतें. भ्रमर जसा मोग्रयाचा सुवास घेऊन जरी मध प्राशन करून तृप्ति पावलेला असला व रात्र जरी समीप असली अथवा पर्जन्य जरी पृथ्वीतलावर पडत असला तरी ह्या सर्व विघ्नांकडे दुर्लक्ष्य करून पुष्पांत असणारा मधामृत तो प्राशन करावयास जातोच जातो, तद्वत हे पाठिवलेले दूत आपल्या महत्वाच्या कामाचें विस्मरण पावून प्रभूच्या इतर शिष्यवर्गाप्रमाणें त्याच्या बोधामृताचें प्राशन करीत आनंदानें त्या वेळूवनाचे ठायीं राहते झाले. आपल्या दूतांस विलंब फार लागला असें पाहून राजानें आपल्या पुत्राचा बाळपणींचा मित्र उदयी नामा, जो आतां मुख्यप्रधानाच्या स्थानाप्रत पोहोंचला होता त्याला पाठविलें. उदयी, वेळूवनाच्या समीप येतांच वृक्षपल्लवी तोडता झाला. आपल्या कानीं प्रभूचा उपदेश पडूं नये नाहीं तर आपणाहि आपल्या स्नेही मंत्र्याप्रमाणें मोहित होऊं असा विचार करून त्यानें ती वृक्षपालवी आपल्या श्रवणेंद्रियांत घातली.

प्रभूनें आपलें मस्तक खालीं केलें आणि जनांसमोर असें बोलिला कीं, " माझी मनीषा अशीच असून हें माझें कर्तव्यहि आहे कीं मी आपल्या मातापितरांस जाऊन भेटावें. ज्या जन्माच्या योगानें जन्ममरणाचा फेरा चुकवितां येईल, व धर्माचरण केल्यास कल्याणप्रद असें निर्वाण प्राप्त करून घेतां येईल, गत पापांचा संहार करून, दयाधर्माचें अवलंबन करून पुण्यांचा संचय व पापांचा क्षय करितां येईल असा जन्म देणारीं जीं मातापितरें त्यांची सेवा करण्यास व त्यांस सन्मान देण्यास कोणत्याहि मानवानें अनमान करूं नये. राजास व यशोधरा राणीस जाऊन कळवा कीं मी तिकडे येण्यास त्वरेनें निघतों. " हें आनंदकारक वर्तमान श्रुत होतांच स्फटिकासारिख्या शुभ्र कापिलवस्तु नगरींत नागरिक जनांनीं राजपुत्रांच्या आगमनाची तयारी करविली. दक्षिण दिशेकडील दरवाज्याच्या बाजूस किनकापाचे ज्याचे पडदे आहेत व चित्रविचित्र रंगांनीं ज्यावर नकशीचें काम केलें आहे असा मोठा थोरला तंबू उभारिला. रस्त्यावरून हांडेचे हांडे जाईजुई चंदन इत्यादि सुगंधिक पदार्थांचें अत्तर ओतिलें. सुवासिक वृक्षांच्या फांद्या रस्तोरस्तीं शोभेसाठीं लाविल्या होत्या. सुवर्ण रुप्याच्या अंबारीचे हत्ती तयार करून ठिकाणोठिकाणीं उभे केले होते. तसेंच स्थळोस्थळीं नौबदी व नगारे " सिद्धार्थ आला " ह्मणजे गजर कर-

ण्यासाठीं ठेविले होते. तसेंच ठिकठिकाणीं कलावंतिणीचें नृत्य व गायन उभें केलें होतें. प्रभु ज्या अश्वावर आरुढ होऊन येणार त्या अश्वाचे पाय गुडघ्यापर्यंत फुलांमध्यें गडून जावे ह्मणून खंडोगणती गुलाबाचीं फुलें रस्त्यावरून पसरलीं होतीं. जे समयीं तो येईल त्यावेळीं चोहींकडे वाद्यांचा गजर व्हावा ह्मणून वाद्यें ठिकाणोठिकाणीं ठेविलीं होतीं. तो आला ह्मणजे वाद्यांचा घोष व्हावा अशी सक्त ताकीद होती ह्मणून लोकांचीं श्रवणेंद्रियें तिकडे लागलीं होतीं.

यशोधराराणीस अशी उत्कंठा प्राप्त झाली कीं आपण सर्व जनांच्या अगोदर आपल्या प्राणप्रियास भेटावें; ह्मणून ती आपल्या पालखींत बसून ज्या ठिकाणीं राजपुत्राचें आगतस्वागत करण्याचा मंडप उभा केला होता त्या स्थळीं गेली. सभोंवार उपवन केलें होतें. त्याला निग्रोध अशी संज्ञा दिली होती. निरनिराळ्या जातीचे वृक्ष त्या स्थळीं लाविले होते. नाना प्रकारचीं फलेंपुष्पें त्या उद्यानांत विपुल होतीं. चक्रव्युह इत्यादि अनेक प्रकारचे मार्ग बगिच्यांतून तयार केले होते. हा मंडप नगरीच्या दक्षिणदिशेकडील राजद्वाराकडे केला होता. त्या राजद्वाराच्या दक्षिण बाजूस शेतें व मनास आल्हाददायक हिरवागार चारा होता. उजवे बाजूस नीच मानिलेल्या जातीच्या लोकांचीं घरें होतीं. हे स्वभावानें सहनशील असून दरिद्रावस्थेंत असतात. ब्राह्मण व क्षत्रिय, हे यांचा स्पर्श अपवित्र असा मानितात. हे नीच लोक सुद्धां राजपुत्र केव्हां येणार, राजपुत्र केव्हां येणार ह्मणून उतावीळ झालेले होते. वृक्षावर चढून ते पहात कीं कोणी आला काय. कोणी कोठें दुंदुभीचा शब्द ऐकिला काय अशी चौकशी परस्परांमध्यें करीत. कोणी येत नाहीं असें त्यांना कळलें कीं आपला घरदार साफसूफ करण्याच्या कामांत पुनरपि गुंतत. आदल्यादिवशीं वृक्षपालवीच्या ज्या पताका लाविलेल्या त्या सुकून गेल्या असल्या तर काढून दुसऱ्या लावाव्या. महादेवाची शाळुका स्वच्छ जळानें धुऊन चकचकित करावी. पुनःपुनः वाटसरू लोकांस विचारावें कीं राजपुत्र आला काय? ही या गरीब लोकांची आपल्या राजपुत्रावरची निष्ठा पाहून यशोधराराणीस परम विस्मय व आनंद झाला. वाटसरू त्यांस काय उत्तर देतात तें ऐकण्याकडे राणीचें लक्ष्य फार गुंतलें. असे कांहीं दिवस लोटल्यानंतर एके दिवशीं राणीनें एक सन्यासी पाहिला. तो पीतवस्त्र परिधान केलेला होता; पूर्वीसारखे मस्तकावर केशपुंज नसतां श्मश्रु केलेला होता. कंबरेस कुशाचा कंबरपट्टा होता. हातीं कलिंगडाच्या आकाराचा कमण्डलु होता. ज्या घरावरून तो येई त्या त्या घराच्या दाराशीं आपला कमण्डलु पुढें करी; आणि कोणी कांहीं कमण्डलूंत घातलें ह्मणजे घालणाराचे उपकार मानून पुढल्या घराला जाई. जर कोणी कांहीं दिलें नाहीं तर त्याचेही उपकार मानून पुढें हा सन्यासी चालता होई. या सन्याश्याचे मागोमाग पीतवस्त्रें धारण केलेले असे दोन सन्याशी येत होते; परंतु ज्याच्या हातांत कमण्डलु होता तो त्या तिघांमध्यें श्रेष्ठ दिसत होता. सर्वांतःशीच पूजनीय आहे असें

वाटे. त्याची मुद्रा इतकी भव्य होती कीं, व नेत्र पुण्यानें इतके तेजस्वी दिसत होते कीं जे सज्जनलोक त्याच्या भिक्षापात्रांत भिक्षा घालितांना त्याजकडे पाहत ते विस्मय पावून पूजा करण्यास्तव त्याच्या पायां पडत; कित्येक आपण घातलेली भिक्षा फारच अल्प आहे असें समजून अधिक आणण्याकरितां ह्मणून आपल्या धान्यकोठाराकडे जात. गांवांत जसजसा तो येऊं लागला तेव्हां त्याची तेजःपुंज अशी मुद्रा पाहून बालकें, तरूण व वृद्ध असे शतशः लोक त्यांच्यामागून चाल- ले. "हा मुनीसारखा दिसणारा भव्य सन्या- सी कोण आहे" असा प्रश्न लोक एकमेकांस विचारीत. हा तापसी जसा त्या रचलेल्या सभामण्डपाजवळ आला तसे त्यांतील किन- काफी पट वर उचलून टाकिले. अरे! माझ्या प्राणप्रिया सिद्धार्था! असे शब्द यशोधराराणी- नें मुखावाटे काढून करद्वय जोडून स्फुंदत स्फुंदत ती प्रभूच्या पायीं आपलें मस्तक ठेविती झाली.

पश्चात् यशोधरा राणीचा सुगत पंथांत प्रवेश झाल्यावर गुरूच्या शिष्यांतील एका शिष्यानें असा प्रश्न गुरूस विचारिला कीं, हे गुरू! आपण दैहिक मोहपाशांतून मुक्त झालां असतां, आणि पुष्पासारखा सुखकर व मानवास पाशबद्ध करून टाकणारा स्त्री- जनाचा हस्तस्पर्श होऊंनये ह्मणून जपत असतां यशोधराराणीस आपल्या शरीरास आलिंगन कसें करूं दिलें हें कथन करावें. यावर गुरू असें प्रत्युत्तर देते झाले कीं, बाबा; प्रेमाचे दोन प्रकार आहेत. एक उत्तम व दुसरें कनिष्ट; कनिष्ट जातीच्या प्रेमास त्वरेनें उत्तम प्रेम करणें झाल्यास उत्तम प्रेमसंपन्न माणसानें कनिष्ट प्रेमसंपन्न माणसास आपल्या सहवासांत राहूं द्यावें आणि त्याचे अव- गुण सहन करावे. लक्ष्यांत ठेवा कीं मुक्त झाले- ल्या माणसानें कदापि अमुक्त माणसास मुक्तीचा अभिमान दाखवूं नये. शीतळपणानें व ज्ञान- चातुर्यानें लोकांस ज्ञानी करणें यांतच, मुक्ति मिळाली किंवा नाहीं याचीं चिन्हें दिसून येतात. ज्या लोकांच्या योगानें या अंधारमय जगास मुक्ति मिळावयाची व ज्ञानमार्ग खुला व्हावयाचा असे जे बोधिसत्त्व लोक त्यांस स्थितित्रयानंतर बोधिसत्त्व पदवी प्राप्त होते. या त्रयापैकीं प्रथम स्थिति निश्चय, अनंतर प्रयत्न, तदनंतर नियुक्तता. पहा, एके समयीं, मी निश्चयावस्थेंत होतों आणि ज्ञानाची जिज्ञासा होती परंतु ते समयीं माझ्या चक्षुवरचीं अज्ञानपटलें दूर झालीं नव्ह- तीं. एरंडाच्या बोंडांत जितक्या एरंडी असतात तितक्या वर्षांमागें मी रामनामसंपन्न मानव होतों. दक्षिण दिशेस द्विपाच्या समोर मी व्यापार करून रहात असें. ते समयीं लक्ष्मी अभिधान धारण करून कोमलांतःकरण- संपन्न यशोधरा मत्समीप सागर तटीं रहात असे. आमची स्थिति फार गरिबीची असल्यानें मी दूरदेशीं व्यापाराकरितां ह्मणून निघालों. नेत्रीं अश्रु आणून ती मला असें विनवूं लागली कीं तुह्मी मजपासून जाऊं नका. जलपर्यटन व भूमिपर्यटन करून आपला जीव धोक्यांत घालूं नका. तुमचें प्रेम मजवर नाहीं ह्मणून तुह्मी मला असे सोडून जातां. यद्यपि धाडस करून मी रामेश्वर समुद्राकडे निघालों.

अनेक संकटें व दुःखप्रसंग यांतून निभावून सागरांतील भयंकर प्राण्यांबरोबर युद्ध करून मी परम कष्टानें एक महा मोलाचें मौक्तिक संपादन केलें. त्याची प्रभा चंद्रासमान होती. कोट्यावधि रुपये त्याचें मोल होतें. हा मौल्यवान पदार्थ मिळाल्यावर मी आनंदानें घरीं आलों. परंतु त्याच समयीं त्या प्रदेशांत दुर्भिक्ष पडलें होतें. मोठ्या कष्टानें मी घरीं जाऊन पोंहोंचलों. बुभुक्षित असा घराच्या दाराशीं जाऊन पोंहोंचतों न पोंहोंचतों तों माझी प्रिय पत्नी जिच्यासाठीं मी एवढे श्रम केले ती अन्न न मिळतां मरणोन्मुख होऊन घरच्या उंबरठ्यावरच पडली होती. मग मी मोठ्यानें ओरडलों व ह्मटलें, ज्या कोणाजवळ एका माणसाच्या पोटाचें अन्न असेल त्यानें तें मला द्यावें व त्याबद्दल हें मौक्तिक घ्यावें. एका माणसाजवळ मोठ्या कष्टानें तीन शेर धान्य निघालें. असो; पण तेणेंकरून त्या सुंदरीच्या अंगीं कांहीं जीव येऊन ती ह्मणाली, प्राणसख्या, तूं मजवर खरोखरच प्रेम करितोस. त्या जन्मीं अन्यगोष्टीपासून तिच्या मनास अथवा जिवास सुख झालें नसतें ह्मणून मी बहुत कष्टानें मिळविलेलें मौक्तिक याचा तसा व्यय केला हें काम बरें केलें, परंतु साम्प्रत संपादन केलेलीं मौक्तिकरूपी द्वादश निदानें आणि सदाचरणाचा धर्मविधि ह्या मोत्यांचा कधीं व्यय होणार नाहीं व तीं कधीं काळीं "नष्ट-होणार" नाहींत, व तीं जितक्या मोकळ्या मनानें द्यावीं तितकें त्यांचें विशेष महात्म्य व मोल व सौंदर्य आहे असें जाणावें. सूक्ष्म अशा पिपीलिकेच्या सामर्थ्यानें व श्रमानें जसा मेरुपर्वत बनला आहे, व थेंबथेंब मिळून जसे सागरचे सागर बनलेले आहेत तसेंच त्यावेळची ही माझी देणगी आतांच्या देणगीसमोर क्षुल्लक आहे; ह्मणून इंद्रियार्थांचा वीट आल्यानें जी मुक्ति मिळाली आहे त्यामुळें वृद्धिंगत झालेलें जें प्रेम त्यानें युक्त आहे अशा प्रेमी मनुष्यानें दुर्बळ ज्यांचें प्रेम आहे अशा लोकांस आपल्या सबळ प्रेमानें आपल्याकडे ओढून घ्यावें हेंच सुज्ञपणाचें कृत्य आहे. मी यशोधरेशीं जपून वागणूक केल्यानेंच ती सुखस्थानाप्रत जाऊन पोंहोंचली आहे.

हातीं भिक्षेचें पात्र घेऊन, पीतवस्त्र परिधान करून नीच लोकांचें उच्छिष्टान्न खात आपला पुत्र सिद्धार्थ गांवांत येत आहे असें जेव्हां राजास श्रुत झालें तेव्हां त्याच्या अंतःकरणांतली पुत्राविषयींची माया नाहींशी झाली. भूमीवर तीनदां थुंकला. संतापानें आपली दाढी तीनदां ओढली. पडायला लागला होता ह्मणून खिदमतीस असलेल्या सरदारांनीं तीनदां टेंका दिला. संतापतांच तो आपल्या युद्धाच्या अश्वावर आरूढ झाला, आणि लोकांची गर्दी अगदीं दाट झाली अशा गर्दीतून शिपाईप्यादे तयार होऊन रस्ता तयार करितात न करितात इतक्यांत आपल्या घोड्यावर बसून भरधांव घोडा फेंकीत निघाला. राजाची व पुत्राची नजरानजर होऊन दोघे परस्परांस ओळखतात न ओळखतात इतक्यांत लोकांची गर्दी अतिशय माजली. पुत्रानें शान्त मुद्रेनें आपल्या पित्याकडे अवलोकन करून नंतर क्षणेकभरानें आपली मान खालीं घालून विनम्रभावें आपली भक्ति पित्यावर फार आहे हें

आज्ञाधारक मुद्रेनें पित्यास व लोकांस दर्शवूं लागला; हें अवलोकन करून राजाचा सिद्धार्थ राजपुत्रावरचा कोप नाहींसा झाला. पृथ्वीधीश होऊन जें वैभव व सौंदर्य त्याच्या कान्तीवर व मुखचंद्रम्यावर वसतें त्याजपेक्षां उत्तमोत्तम अशी त्याच्या मुखावर या समयीं शोभा आली होती; तसेंच ज्या आपल्या तेजानें त्यानें अन्यजनास मुखस्तंभ करून आपल्या शिष्यवर्गांत घेतलें आहे हें पाहून त्याचें तेज व गंभीर मुद्रा अवलोकन करून राजाचे अंतःकरणांत प्रेमाचा पाझर फुटला. अनंतर राजा स्वस्थ होऊन पुत्रास ह्मणतो "बा सिद्धार्था! माझ्या पुत्रानें पायीं खडावा घालून अंगावर फाटकेंसें वस्त्र नेसून, नीच लोकांपाशीं अन्न मागत फिरावें व ज्याचें आयुष्य देवादिकांच्याही अवस्थेपक्षां सौख्यसंपन्न होतें त्यानें चोरट्यासारखा माझ्या नगरींत प्रवेश करावा हें बरें दिसतें कायरे? माझ्या मुला! तूं या विस्तीर्ण राज्याचा सत्ताधीश आहेस. टाळी वाजविण्याचाच अवकाश कीं, राजांस पाहिजे त्या वस्तूचा पुरवठा होत असे अशा राजाचा तूं वंशज, त्या तूं आपल्या योग्यतेनुसार वस्त्रें परिधान करून वाजी, गज, शिपाई प्यादे, अशा राज्य सौभाग्यानें नगरींत प्रवेश करावयाचा होतास. अरे, पहा माझे सैनिक रस्तोरस्तीं तळ देऊन उभे होते. माझी प्रजा तुला नेण्याकरितां नगराच्या राजद्वारीं उभी आहे. अरे पुत्रा! मला शोकातुर करून तूं इतके काळपर्यंत कोणत्या परमुलखीं नाहींसा झाला होतास; सर्व सुखसोहळ्यांचा परित्याग करून वैधव्यदशा प्राप्त झालेल्या स्त्रियेसारखी तुझी स्त्री यशोधरा ही मोठ्या कष्टानें काळक्रमणा करीत होती. तूं गेल्यापासून तिनें गायन व नृत्य श्रवण केलें नाहीं; आनंदोत्सवाचीं वस्त्रें परिधान केलीं नाहींत; तुला घरीं घेऊन जाण्यासाठीं ती आपला भरजरीचा पोषाग साम्प्रत लेऊन आली आहे. आणि तूं तर असा भिक्षेकऱ्याचा पोषाग करून आला आहेस. पुत्रा, असें कां करितोस?"

"माझ्या पित्या, हा आमचा कुलाचार आहे" असें प्रभूनें राजास प्रत्युत्तर दिलें.

माहासमात नामाभिधानी पूर्वजापासून आज शतराजे आपल्या कुलांत उत्पन्न झाले; परंतु असा आचार त्यांमध्यें कोणाचाच नव्हता" असें प्रत्युत्तर राजा सिद्धार्थास देता झाला.

मी माझ्या मानवकुलाची गोष्ट सांगत नाहीं; परंतु जे बुद्धावतार पूर्वी झाले व पुढें होतील त्यांपैकीं मी एकजण आहें. त्यांनीं जें केलें तेंच मी करीत आहें. अशा ह्या अदृश कुलाची मी कथा सांगितली. साम्प्रत जी कथा घडून येत आहे तशीच गोष्ट पूर्वी एकदां घडून आली. सन्याश्याचीं वस्त्रें परिधान केलेल्या राजपुत्राच्या द्वारीं युद्धसंग्रामाचा पेहराव करून पितृराजा आपल्या मुलाची भेट घेण्यास आला होता. ज्या राजपुत्रानें आपल्या इंद्रियदमनादि वैराग्याच्या सामर्थ्यानें प्रबळ राजादिकाहून शक्तिमान असतां व लोकत्रयासीं मुक्तीचा मार्ग खुला करून देण्याचें सामर्थ्य अंगीं असतां, जसा मी आतां तुह्मापुढें विनम्रभावानें उभा आहें, तसा

तो उभा होता; जे तुह्मी मायेनें मजवर अनेकविध उपकार केले आहेत त्यांची अंशमात्र तरी फेड व्हावी ह्मणून आपल्या पहिल्या मिळकतीचा वांटा जसा मी आतां आपणांपुढें सादर केला आहे तद्वतच कथन केलेल्या राजपुत्रानेंहि आपल्या पितृराजापुढें आपल्या संपत्तीचा वांटा सादर केला होता.

पितृराजा विस्मय पावून कोणतें तूं मला धन देतोस ह्मणून विचारिता झाला. पुत्रानें राजाचा हात धरून त्यास आपलें धन कशा प्रकारचें आहे हें निवेदन केलें. राजपुत्र सिद्धार्थाचे एके बाजूस यशोधरा होती व दुसरे बाजूस राजा चालला होता. हे तिघे मार्गांतून जात असतां दुतर्फा लोक उभे होते. ते त्यांस मुजरे करीत व त्यांच्या अंगावर पुष्पें टाकीत. ज्यास अवलोकन केलें असतां शान्ति व शुद्धि प्राप्त होते, जसा सागर वेलातटांतर्गत तसें सर्व ज्ञान अंतर्गत ज्यांत आहे असा तो प्रभुबुद्ध सत्य चतुष्टयाचें निवेदन मार्गांत पितृराजास करिता झाला.

कोणाही व्यक्तीस—मग तो राजा असो अथवा रंक असो—पथोत्तम आक्रमावयाचा असल्यास नियमाष्टकाचें अवलंबन केलें पाहिजे. हें नियमाष्टक कोणतें याचेंही विधान प्रभूनें आपल्या पित्यास केलें. या पथोत्तमांत चार विरामस्थळें योजिलीं आहेत, व निरालस्यानें पाळण केलें पाहिजे असें आज्ञाष्टक आहे. या पथोत्तमाचा जो कोणी अवलंब करील, मग तो राजा अथवा रंक, ज्ञानी अथवा अज्ञानी, पुरूष अथवा स्त्री, तरुण अथवा वयोवृद्ध, ही सर्व विलंबानें ह्मणा अथवा शीघ्रतेनें ह्मणा या भवचक्रांतून सुटून निर्वाणीचे सुखाची प्राप्ती करून घेतील. असें बोलत चालत प्रभुबुद्ध व यशोधरा यांच्यासह राजा सुद्धोधन प्रभूचा कमण्डलु हातीं घेऊन राजवाड्याच्या दिण्डीदरवाज्याजवळ येऊन पोहोंचला. या प्रसंगास यशोधरेच्या मुखकमलावर फारच विशेष सौंदर्य दिसूं लागलें; आणि तिच्या नेत्रांतून ढळणाऱ्या अश्रूंची कांहीं विलक्षण शोभा दिसूं लागली. त्याच रात्रीं त्या सर्वांनीं प्रभूच्या शांतिदायक मार्गाचा स्वीकार केला.

## सप्तमोऽध्यायः समाप्तः

---

## अष्टमोऽध्यायः

—×·+—

अनंतर निग्रोध उद्यानांत सर्वांस प्रभूनें उपदेश केला. या उद्यानांत नानातऱ्हेचीं कारंजीं व पल्लव होतीं. जे वनमार्ग होते त्यांवरून गर्द छाया पसरली होती. त्याचप्रमाणें चित्रविचित्र रंगांचे पाषाणपीठ लोकांस बसण्यासाठीं ह्मणून बनविले होते. अशा स्थळीं प्रभू बसले असतां ज्या उपदेशानें पूर्वखंडांतील लोक इतके नम्र झाले आहेत तो उपदेश प्रभूच्या मुखानें श्रवण करण्यासाठीं उत्सुक अशा जनांचा समुदाय त्या स्थळीं जमलेला होता. हा जनसमुदाय अगणित असा होता. पितृराजा ज्या सिंहासनावर स्थित होता त्याच्या उजवे बाजूस प्रभू आसनास्थित बसले होते. आसमंतांत आनंद, देवदत्त इत्यादि अनेक राजांचे गोत्रज व सरदार उभे होते. प्रभूच्या मागल्या बाजूस सारिपुत्र व मोगल्लनादि

पीतवस्त्रें धारण करणारा प्रभूचा शिष्यसमुदाय होता. प्रभूच्या पायांसमीप यशोधरामातेसह राहुलपुत्र आश्चर्यवत् मुखानें प्रभूचें मुखतेज अवलोकन करीत होता. यशोधरा साध्वीचें चित्त निर्वाणीच्या सुखाच्या काळाची मार्गप्रतीक्षा करण्याकडे गर्क होतें. या समयीं प्रभूच्या मुखांतून जो उपदेशसागर निघाला त्याचें सर्व वर्णन करणें मला दुरापास्त आहे. मी प्रारंभीं या शिष्यसमुदायांतील शिष्य नसल्यानें ग्रंथांतरीं ज्या उपदेशाचें सविस्तर वर्णन केलें आहे त्यांतील किंचित मात्र तुह्मांस निवेदन करितों. ज्या समयीं हा उपदेश झाला त्या समयीं लक्षावधि यक्ष किन्नर तो श्रवण करण्यास स्थळीं स्थळीं जमले होते. देवादिक व यमराजादि शास्ते आपापलीं स्थळें सोडून त्या स्थळीं आले. दरीकंदरीं काळोखरूपानें असणारी रात्री व पर्वतावर या समयीं असणारी माध्यान्ह, त्याचप्रमाणें एखाद्या कुमारीसारखी असणारी संध्याकाळ तो उपदेश श्रवण करण्यास ह्या आल्या होत्या. सूर्य, चंद्र, तारागण, ह्यांची त्या स्थळीं गर्दी झाली होती. ज्या उपदेशाची सर्व जनित वस्तूंस अपेक्षा होती तो उपदेश श्रवण करावा ह्मणून क्षुद्र कीटकादि प्राणी, त्याचप्रमाणें वानर, व्याघ्र, सिंह, वराह, कोल्हा, मोर, सर्प, इत्यादि व तसेच महाकाया धारण करणारे महिचर व अनेकविध जलचर प्राणी प्रभूचा बोध आपआपल्या स्थळांवरून श्रवण करीत होते.

ओं आमित्य! अगण्य जें रूप त्याची गणना करूं नका; अपार जें त्याचा अंत लावूं नका; ह्यांची जो कोणी पृच्छा करितो व जो कोणी पृच्छेस उत्तर करितो, तो भ्रान्त समजावा. शद्बोच्चार करूं नका. ग्रंथांतरीं लिखित असें कीं, पुराणकाळीं सृष्टि अंधारमय होती; चैतन्य ब्रह्मध्यानीं गर्क होतें. परंतु हा वाद मिथ्या आहे; आदि नाहीं व ब्रह्महि नाहीं; मानवाच्या चक्षुरिंद्रियांस अथवा अन्य चक्षुरिंद्रियांत कितो जरी अज्ञानपटलें नष्ट होऊन ज्ञान झालें तथापि सर्व वस्तूंचें ज्ञान होणें अशक्य आहे. ह्मणून ज्ञानप्रकाश पूर्णपणें मला प्राप्त झाला असा विवाद करणारा मिथ्यावादी होय.

तारागण आकाश क्रमण करितात आणि अशी पृच्छा करीत नाहींत; जननमरण, दुःखशोक, कार्यकारण, काळ व जीवन या सर्वांची नदीच्या प्रवाहासारखी गति चालली आहे; लाटांचा एक ओघ गेला कीं दुसरा, वेगानें अथवा मंदपणें जिकडे प्रवाह जात आहे तिकडच्या बाजूस ही गति आपला प्रवाह नेत आहे; आणि नदीप्रवाह समुद्रास जाऊन मिळाला कीं पुनरपि त्याची वाफ होऊन मेघरूपानें आकाशमार्गाकडे जाऊन पुनः तेथून जलवर्षाव होतो; असें हें जीवनाचें रहाटगाडगें अविश्रान्त असें चाललें आहे; त्यास विसांवा नाहीं व शान्तीहि नाहीं; पृथ्वी आकाश व अगणित अशीं नभोमंडलें, हीं चक्रासारखीं सतत आपलीं कार्यें करीत आहेत; कोणाची शक्ति अशी नाहीं कीं या विश्व चक्राची गति कुंठित करील; असें हें जें वस्तुमात्राचें स्थित्यंतर करणारें चक्राचें आस्तित्व भाव आहे ह्यापेक्षां तत्संबंधीं अधिकोत्तर ज्ञानाची अपेक्षा

धरूं नका.

हे प्रियतम भगिनींनो व भ्रातृजनांनो, प्रार्थना करूं नका; कारण तुमच्या प्रार्थना श्रवण करणारा असा कोणी नाहीं; अंधकार तुमची प्रार्थना श्रवण करून तुमचे अनेकविध मनोरथ तो पुरविण्यास समर्थ आहे काय? देवादिकांस सुंदरशा देणग्यांनीं व मधुरशा स्तोत्रांनीं तुष्ट करण्याच्या भरीस पडूं नका. कारण तुह्मांस चौऱ्याशींच्या फेऱ्यांतून मुक्त करण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य नाहीं; देहरूपी बंदीशाळेंतून आपली सुटका करून घेणें तुमच्या स्वाधीन आहे; त्रैलोक्यांत प्रबळ अशा ज्या देवदेवता आहेत त्यासारखीच यच्चावत सर्व प्राण्यांची स्थिति आहे; ज्याप्रमाणें हे काया धारण करणारे प्राणी कार्यें करतील तदनुरूप त्यांस सुखदुःखभोग प्राप्त होईल. गत कालीं जसें झालें तदनुसार होईल व साम्प्रत होत आहे; उत्तमाचें मध्यम व त्यापासून कनिष्ट अथवा तद्विरुद्ध प्रकार होईल. प्रथमीय तो कनिष्ट व कनिष्ट तो प्रथमीय. स्वर्गींचे यक्षकिन्नर आपल्या गत जन्माच्या कृत्यांचें सुख भोगीत आहेत; तसेंच अधोलोकीं वसती करून असणाऱ्या पिशाच योनी आपल्या गतजन्मीं केलेल्या कृत्यांनुसार दुःखभोग भोगीत आहेत; असें जरी आहे तरी पापपुण्याचें फळ सर्वकाल टिकून रहात नाहीं कोणतीहि स्थिति चिरायु नाहीं; जो रंक असतो तो आपल्या पुण्याच्या योगें राजा अन्य जन्मीं बनतो; व जो राज्यसुख भोगीत असतो तो आपल्या पापाचरणामुळें दास्यत्वाचें दुःख अन्यजन्मीं भोगितो. परंतु ही स्थिति शाश्वत आहे असें समजू नये. पापपुण्याचा मोजवा भरला कीं, प्राणी अन्यस्थितीप्रत आपल्या कर्मानुसार जातो. इंद्रापेक्षां उच्च स्थितीप्रत आपणास जातां येईल; तसेंच नीच होण्याची इच्छा असली तर कीटकापेक्षां नीचावस्था प्राप्त करून घेतां येईल. लक्षावधि जन्म धारण करावे तेव्हांच अतिउंच अथवा अतिनीच स्थिति प्राप्त होते. हें जन्ममरणाचें चक्र यावत् फेऱ्या घालीत आहे तावत् विसांवा किंवा शान्ति यांचा बिंदु प्राप्त होणार नाहीं. चक्राची जी बाजू वर जाते तीच पुनरपि खालीं होते व खालीं असते ती वर जाते.

ही जननमरणावस्था जर शाश्वतीची स्थिति असती तर निश्चयें जीवनतत्व शापित असतें व वस्तुतत्वाच्या अंगींच क्रौर्य असतें. परंतु ही स्थिति शाश्वत नाहीं; तुह्मी ह्या फेऱ्याच्या चक्रास बद्ध नाहीं; जीवनतत्वाची निर्वाण हीच शाश्वतची स्थिति आहे; वस्तुतत्वाच्या अंगीं मधुरपणा आहे; दुःखापेक्षां सबळ अशी मानवेच्छा आहे; चांगल्याची स्थिति अधिक चांगली होऊन ती उत्तमावस्थेप्रत जाते; मी बुद्ध सर्व मानव जातीसाठीं शोक करीत होतों व कण्हत होतों परंतु जेव्हां मला समजलें कीं, मुक्तीचा मार्ग खुला आहे, ज्याची इच्छा होईल त्यानें आपणास मुक्त करून घ्यावें, तेव्हांपासून मी आनंदी व हास्यमुख असा आहें; अहो कष्टी लोकांनो, जे तुह्मी दुःख भोगतां तें तुमच्या करणीनें भोगतां; ह्या जननमरणाच्या चक्रावर तुह्मी वास्तव्य करून जनित व्हावें व मृत व्हावें अशी कोणी तुह्मांवर बळजबरी करीत नाहीं; मी तुह्मास सत्याचा मार्ग सांग-

तों; श्रवण करा; अधोलोकापेक्षां अधोभागीं, स्वर्गलोकाहून उंच, ब्रह्मदेवाच्याहि वसतीपलीकडे, अनाद्यनंत अशी सामर्थ्यवान् शक्ति वास करीत आहे; सदां सर्वकाळ ती जनकल्याण करीत असते; त्या महाशक्तीनें जे नियम लावून दिले आहेत ते मात्र शाश्वत आहेत; गुलाबाच्या पांकळीवर जी लाली आहे ती, तसेंच कमलिनी पुष्पांचा आकार, वसंत ऋतूमधील वृक्षपुष्पसौंदर्य हीं सर्व ह्या शक्तीच्या सामर्थ्याचीं चिन्हें आहेत. मेघांवरील चित्रविचित्र रंग व मयुराच्या पिसाऱ्यावरील पाचेसारखे शोभणारे रंग, हें त्या आदिशक्तीचें कौशल्य. तारागण हें जिचें वसतिस्थान, विद्युत, वायु आणि पर्जन्य हे जिचे दास, अभावापासून जी मनुष्याचें अंतःकरण उत्पन्न करिते; आणि निर्जीव अशा अंड्यापासून जी नानातऱ्हेचे पक्षी उत्पन्न करिते, सतत परिश्रम करून विपरीत जें पूर्वकाळीं घडून आलें तें पुनरपि जी उत्तमावस्थेप्रत पोहोंचविते, सूर्यपक्ष्याच्या घरट्यांत अंडीं जिची कृति, मधमाशांचे षट्कोनी पोळें हें जिचें गृह, पिपीलिका व खबुतरें यांस त्यांच्या कामापुरतें जी ज्ञान देते, गरूडपक्षी आपल्या पिलांसाठीं जेव्हां भक्ष आणितो तेव्हां जी शक्ति त्याचे पंख विस्तृत करिते, जी लांडगीला आपल्या पिलांस पाजण्यास शिकविते, ज्या प्राण्यांचा मानव द्वेष करितो त्या प्राण्यांच्या पोषणासाठीं जी अन्नाचा व प्रेम करण्याऱ्यांचा पुरवठा करिते; जिचें प्रेम सर्वांवर समान आहे; मानव प्राण्याचे बाळकाचें पोषण व्हावें ह्मणून जी शक्ति त्या बाळकाचे मातेच्या स्तनास दूध आणिते, तीच आदिशक्ति सर्पिणीच्या पिलांच्या मुखस्थानीं परप्राणघातक विष उत्पन्न करिते. अनंत पोकळीमध्यें लक्षावधि गोलांकडून तालसुरावर नृत्य करविणारी, भूमिकेच्या उदरीं मौल्यवान् पाषाण छपवून ठेवणारी, वनांतील पर्णें, नानाविध बीजें, पुष्पांचे बहर अशी वनशोभा जी वनांत राहून उत्पन्न करणारी; आपला निश्चित संकेत पूर्ण करण्याकडे मात्र जिचें चित्त, त्या संकेतानुसार कोणास मारणारी व कोणास तारणारी, तिचा विणण्याचा माग आहे त्याचें प्रेम व जीवन हे दोरे आणि मरण व यातना हे जिचे विणायाचे धोटे, मोडतोड हा जिच्या हातचा खेळ, यद्यपि या मोडतोडीनें जी सर्वदां वस्तूमध्यें विशेष सौंदर्य करिते, पूर्वीच्या कृतीपेक्षां जिची दुसरी कृति उत्तमच असावयाची, अशी जी ही शक्ति तिची दृश्य सृष्टीमध्यें दिसणारी ही चमत्कृति होय.

अदृश्य सृष्टीमध्यें तिचा खेळ फारच चमत्कारिक आहे. ही शक्तिरूपी जी नीयतता तिच्या सामर्थ्यानेंच मानवाचें अंतःकरण, त्याचे विचार, त्याचे आचार, त्याची चिच्छक्ति हीं बनतात. तुह्मा भाविकजनांस तुमच्या लक्ष्यांत न येतां ती साहाय्य देते; प्रभंजनापेक्षांहि उंच स्वरानें ती भाषण करिते; अचेतन अशा मातीच्या गोळ्यापासून मानव बनविण्यास तिला बहुत वर्षें लागलीं, व ह्या मातीच्या गोळ्यावर तिनें अतोनात परिश्रम केले आहेत ह्मणूनच मानवांत करुणा व प्रेम वात्सल्य करितें. ह्या अनश्वर नियत शक्तीची कोणीहि हेळणा करितां कामा

नये. जो तिच्या आड येतो त्याची हानी होते; जो तिची सेवा करितो त्याला लाभ होतो; गुप्तपणें जो चांगलें कृत्य करितो त्याला सुख व शान्ति प्राप्त होतात; आणि जो गुप्तपणें असत्कृत्य करितो त्याला यातना भोगाव्या लागतात. सर्व स्थळीं काय होतें हें तिच्या दृष्टोत्पत्तीस येतें; आणि त्याचें टिपणहि ती करून ठेविते; सदाचरण करा, त्याचें सुफल तुह्मांस मिळेल; दुराचरण करा, त्याचा दण्ड तुह्मास भरून द्यावा लागेल; जरी बहुत काळ लोटून गेला तरी दण्ड चुकणार नाहीं; ही नियतशक्ति कधीं क्रोधाविष्ट होत नाहीं; व कधीं कृपापूर्ण होऊन क्षमाशील होत नाहीं; तिची समदृष्टि असून खरेपणाचें फळ खरेपणास व खोटेपणाचें फळ खोटेपणास; मग हें फळ आज मिळो अथवा बहुत काळ लोटल्यावर मिळो; परंतु फळ हें मिळणारच असें ह्या नियतशक्तीचें नियमन आहे. ह्मणूनच दुसऱ्याचें हनन करूं इच्छिणाऱ्याची तरवार त्याच्या स्वतःच्याच कंठावर पडून त्याची प्राणहानी करिते; अन्याय करणारा न्यायाधीश असह्य असा होतो; मिथ्यावाद करणाऱ्याचें अकल्याण होतें आणि दडून चोरी करणारास व लुटणारास भुरदंड भरावा लागतो; असा ह्या नियतशक्तीचा नियम आहे; त्याचा ओघ सत्यरूपी सागराकडे चालला आहे; त्या ओघाची गति कुंठित करण्याची अथवा दुसरे सागराकडे वळविण्याची शक्ति कोणाहि मानवास नाहीं; प्रेम हें त्याचें मूलस्थान, शान्तिसुख व परिपक्वता हा त्याचा अंत. अशा ह्या अनाद्यंत नियतशक्तीची आज्ञा कदापि अवमान्य करूं नका!

ग्रंथांतरीं जें लिखित आहे कीं साम्प्रतचें आपलें आयुष्य हें पूर्वार्जित कर्मांचें फळ तें व्यक्त ह्मणणें आहे; पूर्वजन्मीं केलेल्या पापामुळें इहजन्मीं इहलोकीं दुःखभोग भोगावे लागतात व पूर्वी जन्मांतरीं पुण्यकर्म केलें असतां इहजन्मीं सुखलाभ होतो.

जसें पेराव तसेंच काढावें. पहा हीं आपल्या समोंवारचीं शेतें! तीळ पेरला तर तीळ त्यांत उत्पन्न होतो. धान्य पेरिलें तर धान्यें उत्पन्न होतें. हें कसें होतें याचा उलगडा आपणास लागत नाहीं. त्याचप्रमाणें मानवाचें अदृष्ट. त्याचें ज्या प्रकारचें पूर्वजन्मीं आचरण असेल तदनुरूप त्याला इहजन्मीं फलप्राप्ति होते. धान्य पेरिलें तर धान्याचा पुरवठा त्याच्या कर्मसंचयाचे कोठारांत पडतो; आणि जर त्यानें निवडुंग लाविला असला तर निवडुंगाचें बीज त्याच्या कपाळीं भोगण्याचें येतें; व त्यामुळें तोहि कष्टी होतो व धरणीलाहि कष्ट भोगावे लागतात. युक्त परिश्रम करून सदाचरणाचा जर अवलंब केला आणि निवडुंगाचें बीज व विषारी रोपाचें बीज जर समूळ नाहींसें केलें व त्या स्थळीं सुवृक्षाचें बीज पेरिलें तर भूमि निर्मळ होउन फलदायक होईल व पीक जोरानें विपुलपणें येईल. दुःखाचा उगम कोठें होतो याचा पत्ता लावून जो जीवनधारी प्राणी आलेलें दुःख मोठ्या सहनशीलतेनें सहन करून जन्मजन्मांतरीं घडलेल्या पापाचें ऋण प्रेम व सत्याच्या धोरणानें फेडून टाकितो, व कोणालाहि दुःख न देतां आपल्या देहांतील हाडोहाडीं भरलेला जो मीपणाचा व असत्याचा कांटा आहे त्याचा

समूळ नाश करून जो आपल्या देहास शुद्ध करितो; आलेला यातनाभोग निमुटपणें सहन करून जर कोणी आपलें अनिष्ट केलें तर त्या अनिष्टाबद्दल अनिष्ट करणाऱ्यावर उलट दया व माया जो करितों, आणि असा मनुष्य नित्यशः दयाशील व पवित्र अशी आपली वृत्ति ठेवीत गेला, ज्या ज्या वस्तूंची मनानें आस धरली आहे त्या त्या वस्तूपासून मनास जर त्यानें सर्वशः दूर करून टाकिलें कीं शेवटीं जीवितेच्छेचा सुद्धां मागमूस ठेविला नाहीं; तर मग अशा मनुष्याची मरणसमयींची स्थिति फारच मनोहर होईल. सुकृतदुष्कृताचा हिशेब होऊन सर्व जीवित सुकृतमय ज्याचें झालें आहे अशा मानवास सुफळें मात्र प्राप्त होतील. ज्याला तुह्मी जीवित ह्मणून ह्मणतां तसें दुःखमय जीवित अशा माणसास अतःपर प्राप्त होणार नाहीं. जीवितचक्रावर त्याला घातल्यापासून ज्या ऋणास आरंभ झाला त्याचा आतां निकाल झाला. ज्यामुळें त्याला मानवदेह प्राप्त झाला त्याचा पूर्णपणें त्यानें हिशेब करून जन्मजन्मांतरींची बाकी फेडून टाकिली व तो आतां ऋण मुक्त होऊन बसला आहे. त्याला आतां आशा, पाप, सुखदुःखाचा भोग यांचा विटाळ स्पर्श करणार नाहीं. तो जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होऊन निर्वाणाप्रत जाऊन पोहोंचला. चैतन्य ह्मणून जीवन जें आहे यापासून जरी तो वेगळा नाहीं तथापि जीवनाचें जन्ममरणाचें रूप त्याला आतां बाधा करीत नाहीं. त्याचें अस्तित्व लयास गेल्यामुळें तो सुखसागरांत गढून गेला. ओम् मणि पद्मे ओम्. सोज्वल सागरामध्यें तुषारबिंदु निसरून जाऊन त्यांत विलय पावता झाला!

कर्म ह्मणजे काय तें सांगतों. श्रवण करा. सर्व पापमळ निघून गेला ह्मणजे आयुर्दीपकांतील तैलबिंदू नाहींसा होऊन सोज्वल ज्योती नाहींशी होते व जन्ममरणाचाहि लय होतो. जसा एखादा प्रवासी एक घर सोडून दुसऱ्या गांवीं जाऊन दुसऱ्याच घरीं राहतो, मग एखादे स्थळीं रस्त्यावर सुख झालें असलें तरी किंवा अन्यस्थळीं दुःख झालें असलें तरीत्याचा जसा त्याला विसर पडतो तसेंच एक काया सोडून अन्य काया धारण केली तर त्याचा विचार करण्याची अवश्यकता नाहीं. "मी आहें" 'मी होतों,' 'मी होईन' या शब्दांचा उच्चार देखील करूं नका. पूर्वार्जित कर्मानें या विश्वांत नवीन देह उत्पन्न होतो. आणि रेशीम करणारा किडा रेशमाचे तंतु उत्पन्न करून त्याचें नवीन घर बनवून त्यांत जसा तो वस्ती करून राहतो; तसेंच नवीन एखादी काया पूर्वार्जित कर्मानें धारण करून त्यांत कर्म वस्ती करूं लागतें. सर्पिणीनें आपलें अंडें उबविलें ह्मणजे आंतील पिलांस जसे खवले आणि विषारी दांत आपोआप उत्पन्न होतात; अथवा जसें वेळू अथवा बोरूचें बीज खडकाळीवरून अथवा रेताड प्रदेशांवरून अथवा चिकण मातीच्या प्रदेशावरून उडत उडत जाऊन शेवटीं ओलसर मातींत जाऊन रुजतें व त्या ठिकाणीं त्याची अतोनात वृद्धि होते; त्याचप्रमाणें पूर्वार्जित कर्मामुळें या नूतन धारण केलेल्या कायेस नाम, रूप, आकार इत्यादि

गुण प्राप्त होतात. आणि ह्याच पूर्वार्जित कर्मामुळें झाला तर सुखलाभ होतो नाहीं तर दुःखप्राप्ति होते. जर एखादा वधकर्ता मरण पावला तर त्याच्या पूर्वार्जित कर्मानें तो रोग, दुष्काळ, यांच्यापासून होणाऱ्या यातना भोगीत भोगीत फिरतो. आणि वातावरणांत रोगदुःख उत्पन्न होऊन अन्य प्राण्यांस पीडा होते. परंतु जर एखादा विनम्र व पुण्यशील प्राणी मरण पावला तर वातावरणांत चोहों दिशांस सुगंध पसरून जातो; आणि जसा एखादा वनांतील नदीप्रवाह अरण्यांत गुप्त होऊन अन्यस्थळीं मोठ्या रुंद पात्रांत स्फटिकासारख्या विशुद्ध जलांनीं तुडुंब वाहूं लागतो तद्वत् ह्या उत्तमोत्तम पुण्यशील प्राण्याचें पूर्वसंचित कर्म उत्तमोत्तम जन्म धारण करून जन्ममरणचक्रावरून दूर निघून जाण्याच्या मार्गास लागतें. हें नियमबंधन कल्पांतापर्यंत असेंच जागृत राहणार.

वस्तुस्थिति अशी असतां मनुष्य भ्रमांत कां पडावा असा जर कोणी प्रश्न केला तर त्याचें उत्तर हेंच आहे कीं, अज्ञानाच्या तमानें मानवाच्या बुद्धींत फरक पडून नाशवंत वस्तूंवर मानव सत्यत्वाचा आरोप करून अनेक विषयांची तृष्णा करूं लागतो, आणि मोहाच्या जाळ्यांत सांपडून दुःखें भोगूं लागतो. ही कर्ममीमांसा जाणावी.

अहो मित्रांनो, सद्विचारानें जो मार्ग काढिला आहे आणि शान्तीनें जो साफ करून चालणाऱ्यास सोपासा करून ठेविला आहे असा जो निर्वाणातें पोहोंचविणारा मध्यमवर्ती मार्ग त्याचें ज्यास अवलंबन करावयाचें असेल त्यानें सत्य चतुष्टयाची मीमांसा नीट लक्ष्यांत आणावी.

ह्या सत्य चतुष्टयांतील पहिलें सत्य ह्मणजे दुःख. देह धारण केल्यापासून दुःखभोग भरलेला आहे. प्रियांनो, आपल्या जीवात्म्यास भुरळ पडूं देऊं नका. ज्या जीवितास तुह्मी मोठी मौल्यवान् अशी वस्तु समजतां ती मौल्यवान् नसून फार दिवसांपासून चालत आलेली यातना आहे. या यातनेंतील दुःखें मात्र फार दिवस टिकून राहतात; सुखें आकाशांतील पक्ष्याप्रमाणें उडून वागडून निघून जातात. यातनाभोग हा मात्र चिरायु आहे. मातेच्या उदरांतून जन्म होते समयीं यातना आहे. बाळपणचे निराश्रित दिवसांत यातना आहेत. पहिल्या तारुण्यांतील व प्रौढ वयांतील दुःखभोग निराळा आहेच. वृद्धापकाळीं यातना आहे. जीव जातेवेळची यातना आहेच. मिळून जन्मापासून तों मरणापर्यंत यातनाभोग पाठीस लागलेलाच आहे. यांतून सुटका नाहीं.

स्त्रीपुरुषांचे परस्परांवर असणाऱ्या प्रेमाचें माधुर्य खडीसाखरेच्या माधुर्यापेक्षांहि अधिक आहे. परंतु प्रेमानें मोहित होऊन ज्या कुचकुंभांच्या स्पर्शानें आपण अत्यंत सुख मानितों आणि आपल्या प्रियेच्या ज्या ओष्टद्वयाचें आपण अमृतप्राशन करितों त्या कुचकुंभांस व त्या ओष्टद्वयास चितेवर अग्निज्वालेचा स्पर्श होणारच. समरांगणावर शत्रूशीं युद्ध करितांना दिसून येणारें युद्धसामर्थ्य हें प्रशंसनीय खरेंच. परंतु ज्या शरीरांत हें सामर्थ्य वसत आहे त्याचीं हाडें–मग तें शरीर राजाचें असो अथवा रंकाचें असो–गिधाडें तोडून तोडून

खाणार हें सत्य आहे.

वसुंधरा सौंदर्यपूर्ण आहे खरी परंतु त्याच सुंदर वसुंधरेच्या अरण्यांतून वस्ती करणारे प्राणी एकमेकांचा नाश करून आपली उपजिवीका करीत आहेत. आकाश इंद्रनीलासारखें सुंदर आहे खरें; परंतु कधीं कधीं अनावृष्टीमुळें दुष्काळ पडला असतां मानव प्राण्यांनीं कितीहि आक्रोश केला तरी त्या आकाशांतून पाण्याचा थेंब सुद्धां पडावयाचा नाहीं.

व्यथेनें पीडलेल्या माणसास, जिवलगाच्या मरणानें शोकाकुल झालेल्या माणसास, वृद्धापकाळ आल्यामुळें जवळच्या माणसांनीं टाकून दिलेला आहे, हातीं काठी घेऊन देखील चालतां येत नाहीं व शरीर ज्याचें लटलटत आहे, अशा कोणत्याहि एखाद्या माणसास विचारा कीं बाबा, तुला आणखीं आयुष्य पाहिजे काय? तो खात्रीनें असें उत्तर देईल कीं, दादा, जन्मतःच मुलें जीं जन्मास आलीं ह्मणून रडतात तें मिथ्या नाहीं. त्या अर्भकांस जास्ती शहाणपण आहे ह्मणूनच तीं रडतात. आयुष्यांत सुख अति थोडें आहे. दुःख मात्र पर्वताएवढें आहे.

दुसरें सत्य ह्मणजे दुःखाचें मूळ काय आहे हें शोधून काढणें हें होय. कोणत्या दुःखाचा उगम आपोआप होत असावा व कोणत्या दुःखाचा उगम तृष्णेपासून होत असावा बरें? अंतःकरणांतील मनोविकारांच्या अग्निकणास पदार्थ व इंद्रियें यांचा संयोग झाल्यामुळें पेट लागून तृष्णेची ज्वाळा भडकते आणि पदार्थावरील प्रेम उत्पन्न होतें. छायारूपी पदार्थांना खरे मानून तुह्मी त्यांची आशा करितां आणि स्वप्नवत् ज्या गोष्टी त्यांवर तुह्मीं आसक्ति ठेवितां. अशा सर्व वस्तीमध्यें मीपणाचा जो मिथ्या असा भास त्याचें रोप तुह्मी लावितां; आणि अशी एक मोठी आपल्याभोंवतीं मायासृष्टि उत्पन्न करून ठेवितां कीं या मिथ्या सृष्टीच्यापलीकडे जे हिमाचलासारखे पर्वत आहेत ते सुद्धां तुह्मास दिसत नाहींत. इंद्रलोकीं जें फार सुस्वर गायन चाललें असतें त्याचा ध्वनी तुह्माला ऐकूं येत नाहीं. याप्रमाणें जो भासमान सृष्टीमध्यें रहातो त्याला जीविताच्या खऱ्या तरणोपायाचें निमंत्रण ऐकूं येत नाहीं.

या रीतीनें षड्रिपूंचीं तुंबळ युद्धें उत्पन्न होतात; आणि या मिथ्या सृष्टीचा भुरळ पडलेल्या लोकांना दुःख व शोक करावा लागतो. लोभ, राग, द्वेष, मोह, मद आणि मत्सर यांची वृद्धि या जगांत होते; आणि त्यांच्या प्रेरणेमुळें वर्षानुवर्षें युद्धें होऊन रक्तपात होतात.

ज्या स्थळीं धान्याची समृद्धि व्हावी त्यास्थळीं कांटेरी निवडुंगांची वाढ होते, आणि विषकारी वल्लींना तदनुरूप फुलांचा बहर येतो. उत्तम बीजास रुजावयासारखी व रोपा येण्यासारखी जमीनच सांपडत नाहीं. नंतर या विषवल्लींच्या भक्षणानें व विषारी जलाच्या प्राशनानें आत्मा मदोन्मत्त होऊन कुडी सोडून निघून जातो. परंतु एवढ्यानें त्याची सुटका होत नाहीं. पूर्वार्जित कर्माचा सांठा नष्ट न झाल्यामुळें तो पुनरपि मिथ्याभासाचा मीपणा व पंचेंद्रियें यांसकट नवी कुडी धारण करून पुनरपि नूतन अशा मायाजालाची समृद्धि होते.

या सत्यचतुष्टयांतील तिसरें सत्य ह्मणजे शोकाचें शमन कसें करावयाचें हें समजून

घेणें. जीविताशेचा भंग करून मी-पणाचा वीमोड करणें, तसेंच पुरातन काळापासून अंतःकरणांत रुजून गेलेल्या षड्रि-पूंचा समूळ विध्वंस करून अंतःकरणांत चालणारें द्वंद्व मिटविणें हाच शान्तीचा मार्ग आहे. अनंत काळपर्यंत राहणाऱ्या सुखसौंदर्याची प्राप्ति करून घेणें, जितात्म्याचें वैभव मिळविणें, देवादिकांनाही दुर्लभ असें सुख मिळविणें, सदाचरणानें निष्कलंक असे आयुष्याचे दिवस घालवून, मृदु भाषणानें व सदयांतःकरणानें नानाविध आपलीं कर्तव्यें बजाविणें ही जी अगणित संपत्ति आहे ती यावज्जीव नष्ट होत नाहीं आणि मृत्यूनंतरही तिची कधीं निंदा होत नाहीं.

दिव्यांतील तेलाची परिसमाप्ति झाली ह्मणजे जशी दिव्याची जोत जळत नाहीं त्याचप्रमाणें जीव आणि मृत्यु हीं दोन नाहींशीं झालीं ह्मणजे दुःख व शोक यांचा अंत होतो. मागील चढलेली बाकी जाऊन नवें खातें पडतें आणि त्यांतील पानें तर सर्व कोरींच याप्रमाणें मनुष्याला समाधानाला कारण होतें.

चवथें सत्य ह्मणजे धर्मपथाचें ज्ञान करून घेणें. हा पथ मोकळा व सर्वांस त्याजवरून जातां येईल असा जवळचा आहे. याचें नांव राजमान्य अंगाष्टक पथ आहे. याचा मार्ग सरळ असून शांतिदायक व तरणोपायाचा आहे. श्रवण करून त्याचें मनन करा. पलीकडे असणारीं जीं पर्वतशिखरें आहेत व ज्यांचीं टोकें चोहों बाजूंनीं अभ्रांनीं आच्छादित अशीं आहेत त्या शिखरांवर जाण्याचे मार्ग बहुविध आहेत. वर चढणारा कधीं उभ्या सुळाच्या रस्त्यावरून व कधीं सोप्या रस्त्यावरून त्या अत्युच्च शिखरावर जातो, ज्यांचे हातपाय बळकट आहेत व जे मोठ्या धीराचे आहेत ते ज्या विकट मार्गावर मोठमोठालीं वादळें होतात त्या मार्गावरून पर्वतशिखरांवर चढूं शकतील; परंतु जे दुर्बळ व कम धीराचे आहेत त्यांस तर सोप्याशा मार्गावरून बहुत स्थळीं विश्रांति घेत घेत बरेच दूरचें वळण वर जाण्यासाठीं घेतलें पाहिजे. तरी हा राजमान्य अंगाष्टक पथ अखेरीस शांतिस्थानास नेणारा असा आहे ज्या शिखरावरचें हिम सूर्यरश्मींनीं प्रकाशित झालें आहे तिकडे वर जाण्याचे दोन मार्ग आहेत, एक विकट व दुसरा सहज. जे धीर स्वभावाचे आहेत ते लवकर वर जाऊन पोहोंचतात- परंतु जे दुर्बळ आहेत त्यांस वर जाण्यास विलंब लागतो. परंतु सशक्त व दुर्बळ हे दोघेहि अखेरीस त्या उच्चस्थळीं जाऊन पोहोंचतीलच.

या राजमान्य अंगाष्टक पथांतील पहिलें अंग शुद्धविचार ह्मणून जाणावें. धर्माची भीति बाळगून आचरण करावें. कोणाचेंहि नुकसान करूं नये. पूर्वार्जित कर्मामुळें मानवाचें जीवित बदलतें ह्मणून-कोणत्या प्रकारचें आपण कर्मार्जन करीत आहों इकडे सदा चित्त ठेवावें. पंचेंद्रियांचें बळ आपणावर न राहतां तीं इंद्रियें आपल्या स्वाधीन राहतील अशा प्रकारें आपली वागणूक ठेवावी.

याचें दुसरें अंग शुद्ध संकल्प. यावज्जीवावर प्रेम ठेवून रागलोभकौर्यादि गोष्टींचा समूळ नाश करून टाका, ह्मणजे तुमचें जीवित

झुळझुळ वाहणाऱ्या वायूसारखें जनास सुखदायक असें होईल.

शुद्ध संवाद हें तिसरें अंग होय. ज्या राजमंदिरांत राजा वस्ती करून असतो आणि त्या मंदिराच्या द्वारावर जसा सैनिकांचा पाहरा असतो तद्वत् आपल्या ओष्ठद्वयावर हुकुमत ठेवा. जें जें ह्मणून तुह्मी भाषण कराल तें तें शान्तियुक्त व शिष्टाचारसंपन्न असें असावें.

चवथें अंग शुद्ध आचार. जें जें ह्मणून तुह्मी कृत्य कराल त्याच्यायोगें पूर्वी तुह्मी केलेल्या पातकांचें क्षालन व्हावें अथवा एखादें सत्कृत्यास उत्तेजन तरी मिळावें अशा धोरणानें तुमचें आचरण असावें. रुप्याच्या तारंत गोंविलेली जशी एखादी स्फटिक मण्यांची माळ असते आणि त्या मण्यांकडे अवलोकन केलें असतां त्यांतून जशी रुप्याची तार दिसते तद्वत् तुमच्या आचरणांत चोहोंस्थळीं प्रेमभाव दृष्टोत्पत्तीस यावा ह्मणजेच तुमच्या आचरणास शुद्धाचरण ह्मणतां येईल.

याशिवाय बलवत्तर अशीं दुसरीं चार अंगें आहेत. उपजीविकेचा शुद्ध व्यवहार हें पांचवें अंग. शुद्ध श्रम, शुद्ध अवधान व शुद्ध समाधि हीं साहवीं, सातवीं व आठवीं अंगें आहेत असें जाणावें. बा मित्रा, स्वर्गाच्या पूर्ण प्रकाशाचें दर्शन होण्यासाठीं ह्मणून एकदम उड्डाण मारूं नको. तितकें सामर्थ्य तुझे अंगीं अद्याप आलें नाहीं. ह्याच्या खालचा जो प्रदेश आहे तोच मधुकर, सोपा आणि आपल्या माहितीचा असा आहे. सबल जे लोक आहेत तेच हा सोपा व सहज असा चालण्याचा खालचा भाग सोडून देऊन विशेष संकटाच्या मार्गाचें अवलंबन करितात.

बायकापोरांवरची माया किती असते याचा मला अनुभव आलेला आहे. त्यांचा त्याग करण्याची अवश्यकता नाहीं. स्नेह्यासहि सोडूं नका. तारुण्यांतील मौजेच्या गोष्टींचा त्याग करण्याची जरूर नाहीं. या सर्वांस लगटून राहिलां तरी बाध नाहीं. सुमार्गानें आयुष्यक्रम लोटतांना जो आपल्या हातून धर्म होतो व लोकांस साह्य मिळतें त्यापासून फलप्राप्तीच होईल. त्यांत शंका बाळगिण्याची जरूर नाहीं. संसारांत भीति नाहीं असें नाहीं; परंतु ती जरी दृढतर वाटते तरी ती मिथ्या आहे. तिला वस्तुतः अस्तित्व ह्मणून नाहींच.

प्रियांनो! जर तुह्मास संसारावांचून गत्यंतर नाहीं तर तुह्मी संसारांत राहून परमार्थाचें साधन करा. जसजसें तुमच्यानें परमार्थाचें काम झेंपेल तसतसेंच पायरी पायरीनें आपल्या दुर्बलतेकडे लक्ष्य देऊन काम करा. मग नित्यशः थोडे थोडे वर चढत गेलां ह्मणजे हळुहळु उत्तमोत्तम पदाला जाऊन पोचाल. ह्या मार्गाचा आश्रय धरला ह्मणजे तुमच्या पापाचें ओझें हलकेंहलकें होत जाईल. मार्ग अधिक सोपा झाला आहे असें वाटेल; आणि पंचेंद्रियांच्या पाशांतून मोकळीक करून घेण्यास आपल्या अंगीं अधिक बल आलें आहे असें वाटूं लागेल. आणि असें झालें ह्मणजे पहिल्या टप्यावर तुह्मी जाऊन पोचलां असें समजावें. येथें तुह्मांस सत्य चतुष्टयाचें चांगलें ज्ञान होईल, तसेंच अष्ट अंगात्मक राजमान्य मार्गाची तुह्मांस चांगली ओळख होईल;

नंतर थोड्या अगर बहुत काळानंतर तुह्मांस निर्वाणाचें सुख प्राप्त होईलच होईल. या रीतीनें मार्गाचें आक्रमण करितां करितां तुह्मी दुसऱ्या टप्प्यावर येऊन पोंचलां ह्मणजे तुमच्या संशयांचा छेद होऊन जाईल; भ्रमाचें निरसन होईल; अंतःकरणांतील पटावर चालणाऱ्या युद्धाची परिसमाप्ति होईल. जितेंद्रिय झाल्यावर पुरोहित व वेदादि ग्रंथांचा पाश तुह्मास बाधणार नाहीं. मग एकच जन्म धारण करून निर्वाणाच्या सुखाप्रत येऊन पोचाल. तिसऱ्या टप्प्याचें ठिकाणीं जाऊन पोचलें ह्मणजे त्या स्थळीं अंतरात्मा शुद्ध व पवित्र असा होतो आणि त्याच्या ठायीं सर्व प्राणीमात्रांविषयीं प्रेमभाव उत्पन्न होतो. जन्ममरणापासून मुक्त होऊन कायारूपी बंदीशाळेंतून त्याची सर्वोपरि सुटका होऊन तो मोकळा होतो.

याच्याही पलीकडे जाऊन पोचलेला असाही कांहीं थोडका उत्तम जन आहे. तो जन आयुष्मान् आणि दृश्यमान् असा असतांही चवथ्या आश्रमांत ह्मणजे परम पदाप्रत जाऊन पोंचतो. तो जन कोणता ह्मणाल तर जे बुद्ध आहेत ते आणि जे अत्यंत शुद्धाचरणी आहेत ते.

या आश्रम चतुष्टयाच्या मार्गावर दश महा पापें टपून बसलेलीं असतात. जसा एकादा महान पराक्रमी योद्धा आपल्या मार्गांत आलेल्या शत्रूंस छिन्नभिन्न करून टाकून विजयी होत्साता रणांत आपल्या विजयश्रीची पताका लावून देतो त्याप्रमाणें जो शुद्ध बुद्ध असा होतो त्याच्या हातून धुळीस मिळून गेलेला असा हा रिपुदशाचा मेळा रस्त्यावर चित होऊन पडला आहे असें आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें. ज्या वेळीं मानव मीपणा, मिथ्याभाव, शंका, द्वेष आणि विषयवासना या पांच शत्रूंवर विजय मिळवितो त्यावेळीं त्यानें तीन आश्रमांपर्यंत आक्रमण केलें ह्मणून समजावें; परंतु जेव्हां हाच मानव इह लोकींची जीवितेच्छा, स्वर्गप्राप्तीची इच्छा, आत्मस्तुति, भ्रम व अहंभाव या शत्रूंवर विजय मिळवितो तेव्हांच तो निर्वाणाच्या प्रदेशाच्या मर्यादेनजीक आला असें समजावें. जसा एखादा मनुष्य उंच वहिमानें भरलेल्या पर्वतशिखरावर उभा राहिला ह्मणजे निळया आकाशाखेरीज त्याच्यावर कांहीं नसतें त्याप्रमाणेंच ज्यानें ह्या दहा विकारांवर विजय मिळविला त्याला निर्वाणाचा प्रदेश दिसूं लागला असें समजावें. अधोभागीं वस्ती करणारे देवादिक अशा शुद्ध बुद्ध मनुष्याचा द्वेष करितात. त्रैलोक्याचा नाश जरी झालेला अशा शुद्धबुद्ध मानवाच्या दृष्टीस पडला तथापि त्याची मति क्षणभरहि डगमगणार नाहीं. चौऱ्याशीं योनींचा फेरा त्याचा पूर्ण झाला; मृत्यूच्या सर्व भयापासून त्याची सुटका झाली. कर्माचा लोप झाल्यामुळें पुढें कर्मास चालण्यास गतीच राहिली नाहीं. कोणत्याहि लाभाची इच्छा न धरितांही सर्व गोष्टी त्यास प्राप्त होतात. आपल्या अल्पशा स्वत्वाचा विसर पडून सर्व जगच स्वत्वभावानें भरून गेलें आहे असें त्यास वाटूं लागतें. जर कोणी प्रतिपादन करीत असेल कीं, निर्वाण ह्मणजे सर्व अस्तित्वाचा संक्षेप होतो, तर त्यास निक्षून सांगा कीं तुमचें प्रति-

पादन लबाडीचें आहे. जर कोणी प्रतिपादन करीत असेल कीं निर्वाण ह्मणजे जीवितपरिप्लुत अशी स्थिति तर त्यासहि निक्षून सांगा कीं तुह्मी भ्रमांत आहां. या भ्रमांत पडण्याचें कारण हेंच कीं, निर्वाणाची वस्तुतः स्थिति कशी असते याविषयीं त्यांचा गैरसमज. जीवितानें अथवा कालानें अबाधित अशा प्रकारचा सुखलाभ निर्वाणप्राप्त झाला असतां होतो; अल्प जीवित्वाच्या ज्योतीहून परमश्रेष्ठ प्रकारच्या प्रकाशानें तें स्थळ प्रकाशित आहे, हें त्यांस माहित नाहीं.

प्रियांनो, या माझ्या राजमार्ग पथाचा आश्रय ध्या. परस्परांविषयीं द्वेषबुद्धि जी आपण बाळगितों आणि त्यापासून जें आपणास दुःख होतें अशा दुःखाचा या माझ्या मार्गांत लवलेश नाहीं, षड्रिपूंपासून उद्भवणाऱ्या त्रासास या स्थळीं अवकाश मिळत नाहीं. पंचेंद्रियांची ठकविद्या या ठिकाणीं वास्तव्य करीत नाहीं. दोषास्पद गोष्टींवर अत्यंत प्रेम बाळगिणाऱ्या मानवाचा प्रवेश या माझ्या राजमार्गांत होऊं शकत नाहीं.

या स्थळीं सुखदायक अशा सोज्वळ जलाचें वैपुल्य आहे. या जलपानापासून सर्व जातींची तृषा शमून जाते. या स्थळीं फुलांचा बहर कोमजत नाहीं. मार्गावरून त्यांचा सडाच पडलेला असतो; व त्याजवरून चालणाऱ्यास आनंद होतो. वेळ कंटाळवाणा न होतां सुख देत देत लवकर निघून जातो. प्रियांनो, अशा या माझ्या राजमार्गाचा आश्रय धरा!

मौल्यवानशा रत्नांहूनही माझ्या धर्माचें मोल विशेष आहे. मधाच्या पोळ्याहून त्याची गोडी अधिक आहे. यापासून जो आनंदलाभ होईल तसा इतर कोणत्याही वस्तूपासून होणार नाहीं. या धर्माच्या मताप्रमाणें जर वागणें आहे तर जे नियमविधी लावून दिले आहेत ते पाळले पाहिजेत. ते नियमविधी मी आतां सांगतों. त्यांचें चांगलें मनन करा. अंतःकरण सदय असूंद्या; **हत्या करूं नका.** हत्या केल्यानें कदाचित् तुह्मी एखाद्या प्राण्याच्या—मग तो प्राणी नीच कोटींतला कां असेना—उन्नतीचा मार्ग नष्ट कराल. लोभानें, बळानें अथवा कपटानें **दुसऱ्या मनुष्याची वस्तु घेऊं नका** तर मोकळ्या हातानें द्या व मोकळ्या हातानें ध्या. खोटी साक्ष देऊं नका. दुसऱ्याची निंदा करूं नका. मिथ्या भाषण करूं नका. ज्या मनुष्याचें अंतःकरण शुद्ध आहे तो कदापि खोटें बोलणार नाहीं. ज्या वल्लीच्या सेवनापासून व पेयाच्या प्राशनापासून बुद्धीस भ्रम उत्पन्न होतो त्या वल्लीचें **सेवन करूंनका व पेयाचें प्राशन करूं नका.** ज्यांचें अंतःकरण सोज्वल आहे व देह शुद्ध आहे त्यांस सोमप्राशनाची जरूर नाहीं. **दुसऱ्याच्या बायकोस स्पर्श करूं नका.** जें अयोग्य व अनीतीचें कर्म आहे तें कदापि करूं नका.

पंचेंद्रियांच्या पाशांतून त्वरेनें ज्यांच्यानें गोकळें होववत नाहीं—व बिकट कड्यावरून जावयाचें ज्यांचे अंगीं सामर्थ्य नाहीं अशा अशक्त माणसास जो युक्त उपदेश तो प्रभूनें केला. मातापितरें, मुलेंलेंकरें, आप्त, इष्टमित्र, या सर्वांशीं कसें मर्यादशील वर्तन असावें हें

मूनें शिकविलें. परमार्थ संबंधानें जे दुर्बळ यांनीं आपलें आचरण निर्दोष ठेवावें आणि शुद्ध धर्मादाय करण्यांत काळ घालवावा. सद-य, मर्यादशील, स्थिर बुद्ध अशी स्वभावाची धारणा ठेवावी. यच्चयावत् भूतांवर दया ठेवावी. जें वोखटें आहे तें पूर्व संचित कर्मामुळें वोखटें झालें. जें गोमटें आहे तें तरी पूर्व संचित कर्माचें फळ आहे; ह्मणून जो गृहस्थाश्रमांत आहे तो जितका मीपणा टाकून देईल व परांस साह्य करील तितक्या मानानें तो पुढील जन्मीं उत्तम लोकांत व उत्तमावस्थेप्रत जाईल.

पूर्वीं कोणे एका प्रसंगीं राजगृहाच्या वेळुवनाजवळ शिंगल नांवाचा कोणी एक मनुष्य गृहस्थाश्रम करून रहात होता. एके दिवशीं शिंगलानें स्नान वगैरे झाल्यानंतर तो दिशावंदन करीत असतां तांदुळांत कुंकुं घालून ते तांदूळ तो सर्व दिशांकडे फेंकीत होता. इतक्यांत प्रभूची व त्याची गांठ पडली. गुरु शिंगलास उद्देशून बोलतात "बा शिंगला, असे तांदूळ तूं इकडेतिकडे फेंकून काय करितोस रे." शिंगल प्रत्युत्तर करितो. "गुरुमहाराज! पूर्वजांचा असा उपदेश आहे कीं, प्रातःकाळीं उठल्यावर उद्योगास आरंभ करण्यापूर्वीं अरिष्ट टाळण्याकरितां चोहों दिशांस कुंकुममिश्रित तूं तांदूळ फेंकीत जा." यावर जगद्गुरू उत्तर देतात "बा सख्या, कुंकुममिश्रित तांदूळ टाकण्याची जरूर नाहीं. सर्वांवर प्रेम ठेवून सर्वांशीं शुद्ध आचरण ठेव ह्मणजे झालें. मातापितरांस पूर्व दिशा समजून त्यांस प्रथमतः वंदन कर विद्या देणारा गुरू यांस दक्षिण दिशा समजून त्यांचें अभिवंदन कर. घरदार, बायकापोरें यांस पश्चिम दिशा समजून त्यांचें वंदन कर. आप्तवर्ग व इष्टमित्र यांस उत्तर दिशा मानून त्यांस नमस्कार कर. कृमिकीटकादि नीच कोटींतल्या प्राण्यांची वस्ती पाताळीं आहे ह्मणून अधोभागास वंदन कर. साधुसंत, देवदूत, पित्रादिकांची वस्ती ऊर्ध्व भागीं आहे ह्मणून ऊर्ध्व दिशेचें वंदन कर. असें केलें असतां सर्व प्रकारचें अरिष्ट टळून जाईल व सहाहि दिशांचा बंदोबस्त होईल असें जाण."

आमच्या जगद्गुरूनें एका मंडळीची स्थापना केली होती. त्या मंडळीस संघ अशी संज्ञा असे. त्यांतील सर्व लोकांचा संप्रदाय पीतवस्त्रें धारण करण्याचा होता. निद्रेंतून जागृत झाल्यावर गरुडपक्षी जसा खोलशा दरींतून उंच उंच सूर्यगोलाकडे आक्रमण करीत जातो तसा हा संघ खोलशा जीविताच्या दरींतून निर्वाणाच्या सूर्यगोलाकडे आक्रमण्याच्या मार्गांत होता. हत्या करूं नका, चोरी करूं नका, सर्व प्रकारच्या अशुद्धापासून दूर रहा, असत्य बोलूं नका, मादक पदार्थाचें सेवन करूं नका, वर्ज्य केलेल्या वेळीं भोजन करूं नका, नृत्य, गान, वाद्य व नाट्य यांपासून दूर रहा, पुष्पमाला, सुगंधिक द्रव्यें व अलंकार हीं वर्ज्य करा, विस्तीर्ण व रुंद शय्येचा त्याग करा, सुवर्ण व रौप्य यांचें ग्रहण करूं नका, ह्या दशशीलांचा संघास गुरूनें बोध दिला. तसेंच द्वारत्रय ह्मणजे काय, विचारत्रय ह्मणजे काय, मनाचीं सहा प्रकारची स्थिति कशी असते, पंचबलें ह्मणजे काय, संधान, इद्धिपाद, ज्ञा

विज्ञानाचे मार्ग, इद्धि, उपेक्षा, मित्रभावना (चेक [ मित्रभावना ] हीं जीं अमृतापेक्षांहि मधुर अशीं धर्मरहस्यें आहेत त्यांचा उपदेश करूनें संघांतील श्रामण जनास केला. तसेंच ध्यानाविषयीं व बुद्ध, धर्म, आणि संघ या आश्रयत्रयाविषयीं गुरूनें बोध केला. संघांतील श्रामणांनीं वस्ती करण्यासाठीं कोणत्या प्रकारचें स्थान शोधावें, मोहजाल व द्रव्याभिलाष यांजपासून दूर कसें राहवें, कोणते पदार्थ भक्ष्यास योग्य आहेत व कोणते वर्ज्य आहेत, त्याचप्रमाणें आपल्याजवळ तीन साधीं पीत वस्त्रें, एक कमरबंद, एक कमण्डलु व गाळण्यासाठीं एक वस्त्र इतक्या वस्तूंपेक्षां जास्त वस्तू आपल्याजवळ बाळगण्याचा निषेध करून पीतवस्त्रें धारण करावीं अशा संप्रदायाच्या संघाची स्थापना प्रभूनें केली. तेव्हांपासून ह्या संघांतील श्रामणसमुदाय जगाचा उद्धार करण्यांत तत्पर असा उभा आहे.

याप्रमाणें रात्रभर प्रभू बुद्ध बोध करीत होता. हा गुरुबोध चालत असतां कोणा एकाचाहि डोळ्यास डोळा लागला नाहीं. ज्या ज्या लोकांनीं हा बोध श्रवण केला त्या सर्वांचीं अंतःकरणें आनंदानें ओतप्रोत भरून गेलीं. प्रभूचा हा बोध संपूर्ण झाल्यावर पितृराजा आपल्या राजासनावर उभा राहून प्रभूच्या अंगावरील वस्त्राचें चुंबन घेऊन विनम्रभावानें प्रभूस वंदन करून ह्मणूं लागला. "बा सख्या पुत्रा, तुझ्या संघांत मला प्रविष्ट कर. त्या सर्व तुझ्या शिष्यवर्गांत मी नीचाहून नीच आहें असें समज." तशीच आतां सुखसमाधान पावलेली यशोधराहि प्रभूस विनम्रभावें असें बोलूं लागली कीं "हे परमपूज्य प्रभू, तुझ्या राज्यांतील संपत्तीचें वतन या माझ्या राहुलास दे." अशीं तीं तिघेंजण प्रभूच्या मार्गाचा आश्रय धरतीं झालीं.

ज्या प्रभूनें आह्मावर प्रेम केलें त्या प्रभूच्या ठायीं ज्याचें अत्यंत प्रेम आहे असा जो मी त्याचा आतां हा लेख संपूर्ण झाला. मला प्रभूचें व प्रभूच्या शान्तीच्या मार्गाविषयींचें फारच अल्प ज्ञान आहे आणि तेंहि अल्प ज्ञान मी सगळें या स्थळीं लिहिलें नाहीं.

या शान्तीच्या मार्गाचा बोध बहुत जनसमुदायांस बहुत स्थळीं अनेक भाषणांच्या द्वारानीं प्रभूनें सतत् पाचकम पन्नास वर्षे केला. या शान्तीच्या मार्गानीं आमच्या या औषिक भूमीप्रदेशांत ज्ञानमार्गाचा प्रकाशदीप प्रदीप्त झाला. तो दीप अद्यापपावेतों प्रदीप्तच आहे. ही ज्ञानज्योती आपल्या सोज्वळ तेजानें पृथ्व्यंतर्गत सर्व भूमीवर आपला प्रकाश पाडिते. आमचा प्रभू ज्या स्थळीं गेला, ज्या ज्या महान् महान् राजाधिराजांनीं त्यासाठीं सुंदर अशीं कोरींव लेणीं तयार करविलीं, व महान् महान् ध्वजस्तंभ उभारिले व त्यावर प्रभूचीं अमृतप्राय वचनें केव्हां केव्हां कोरून ठेविलीं, युक्त काल आला त्यावेळीं सर्व नियमविधींची परिसमाप्ति पूर्ण व्हावी ह्मणून हा महान् तथागत देहाचें विसर्जन कसा करिता झाला आणि तदनंतर किती लक्षावधि लोक प्रभूच्या मार्गाचा आश्रय धरून प्रभूनें ज्या स्थळीं प्रयाण केलें व ज्या स्थळीं तो वस्ती करून आहे अशा निर्वाणाप्रत कसे जाते झाले याची सविस्तर कथा पवित्र ग्रंथांतून

वर्णिली आहे.

हे धन्य प्रभु, हे धन्य महोद्धारका, ह्या अल्पशा लेखानें तुझे गुणानुवाद न होतां तुझ्याठायीं ज्याचा गंध नाहीं अशा दोषाचें दिग्दर्शन कदाचित् झालें असेल त्याबद्दल क्षमा कर! तुझ्या महान कृपेचा अंत लागण्यासाठीं मी अत्यल्प बुद्धीनें धारिष्ट केलें ह्याकरितां तूं मजवर अवकृपा करूंनको. हे बंधो, हे प्रियतम सख्या, हे मार्गदर्शका, हे धर्मदीपका, मी तुझ्या नामाचा आश्रय धरितों तुझ्या कल्याणदायक नियमधर्माचा आश्रय धरितों, मी तुझ्या संघाचा आश्रय धरितों. ओम् मणि पद्मेहम्. नलिनीदलगतसलिल दिसतें. हे महान् तेजोराशी, माझें पण उच्च कर. मला सागराच्या लहरींमध्यें निमिलित करून टाक. ओम् मणि पद्मेहम्. तेजोराशी उदयाप्रत आला आहे. जलतुषार प्रकाशित सागरांत निसरून गेला!

## अष्टमोऽध्याय समाप्त.

D K Jayawant Esq Jayawant D.B.

Jayawant Dattatray

Bapu Sahib Jayawant Thana